



# *ख्रिस्ताच्या पवित्र शास्त्रीय अभ्यासक मार्गदर्शिकेतील स्तरे*

कायदेशीर हक्क अधिकृत (C) १९९८
मर्लिन बियरमन आणि रेवेलेशन प्रकाशन द्वारे
जगभर सर्व हक्क अधिकृत

***वितरणाच्या परवानगीसाठीच्या अटी***

आमचे असे ठाम मत आहे की जर तुम्ही हे इतरांच्या प्रत पोहचवले नाही, तर प्रभूसमोर तुम्ही जवाबदार असाल, म्हणून आम्ही तुम्हाला हे इतरांना देण्याचे उत्तेजन देतो आणि ते देखील कोणत्याही प्रकारे पुढील अटीनुसार कोणताही मोबदला न घेता करण्यास आवाहन करतो. हे साहित्य एका पीडीएफ स्वरुपात तुम्ही जतन करून ठेवू शकता अथवा त्याची प्रत काढून किंवा छापील स्वरुपात त्याचे वितरण करू शकता. कोणत्याही परिस्थितीत ह्याची विक्री करता येणार नाही, त्यात फेर बदल करता येणार नाहीत, आणि कायदेशीर हक्काची सूचना प्रत्येक प्रतीत दिलेल्या नमुन्यात असणे जरुरीचे आहे.

**RevelationPublications.com**
**PublisherForGod@gmail.com**

ई.जी. व्हाइट ह्यांच्या ख्रिस्ताकडे जाण्याची स्तरे ह्यातून घेतलेले रुपांतरीत लेखन.
मर्लिन बियरमन ह्यांच्या पवित्र शास्त्राचा अभ्यास ह्याच्या रुपांतरीत स्वरूपातून घेतलेले
उदाहरणे – कायदेशीर हक्क अधिकृत (C) जसटीनेन क्रियेटीव ग्रुप नामपा संकेतस्थळ www.goodsalt.com

**लेखनातील प्रश्नांची उत्तरे बायबल सोसायटीच्या आवृत्तीतून घेण्यात आले आहेत. सर्व हक्क अधिकृत.**

## अनुक्रमणिका

ईश्वराचें मनुष्यावरील प्रेम-१
पापी मनुष्याला ख्रिस्ताची आवश्यकता-२
आपल्या परिस्थितीची जाणीव होणे – ३
अनुताप – ४
पापस्वीकार – ५
आत्मनिवेदन – ६
श्रद्धा आणि स्वीकार – ७
शिष्यत्वाची पारख – ८
ख्रिस्तांत वाढ– ९
कार्य आणि जीवनक्रम– १०
ईश्वराविषयीं ज्ञान – ११
प्रार्थनेचा हक्क – १२
प्रार्थनेचे सामर्थ्य – १३
संशयाचें काय करावयाचें – १४
प्रभूंत आनंद करणे – १५
आता आणि सार्वकालिकतेचा आनंद – १६



## धडा १
## देवाचे मनुष्यावरील प्रेम

### (१) देव सर्व निर्मितीवरील त्याचे प्रेम कसे दर्शवितो?

*सर्वांचीं नेत्रें तुजकडे लागतात,*
*आणि सुसमयीं त्यांस त्यांचें भक्ष देतोस.*
*तूं आपला हात उघडून*
*सर्व जीवजंतूंची इच्छा तृप्त करतोस."*
***(स्तोत्रसहिता १४५: १५-१६)***

सृष्टि आणि प्रकटीकरण म्हणजे पवित्रशास्त्र हीं दोन्ही ईश्वराच्या प्रेमविषयीं साक्ष देत आहेत. आपला स्वर्गीय पिता जीवनाचा, ज्ञानाचा व आनंदाचा कंद आहे. सृष्टींतल्या आश्चर्यकारक आणि सुंदर पदार्थाकडे पहा. मनुष्याच्याच नव्हें, तर एकंदर सार्‍या प्राणीमात्राच्या सुखाला आणि गरजांना अनुसरून ते योजलेले असावे हा चमत्कार होय. ह्या चमत्काराचा विचार करा. पृथ्वीला आनंदित आणि प्रसन्न करणारा सूर्यप्रकाश व

मेघ, पर्वत, समुद्र, मैदानें, हें सारें सृष्टिकर्त्याच्या प्रेमाचें वर्णन करीत आहे. ईश्‌वरच आपल्या प्राण्यांच्या रोजच्या गरजा पुरवीत आहे. हे गीतकर्त्याचे सुंदर शब्द वाचून पहा.

**(२) पवित्र शास्त्र कोणत्या पद्धतीने देवाचे वर्णन करते?**

***देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे व आपण तिच्यावर विश्वास ठेवला आहे. देव प्रीती आहे; जो प्रीतीमध्ये राहतो तो देवामध्ये राहतो व देव त्याच्यामध्ये राहतो. (१ योहान ४:१६)***

प्रारंभी ईश्‌वरानें मनुष्याला पूर्णपणें शुद्ध व सुखी असा निर्मिला; तशीच ही पृथ्वी सृष्‌टिकर्त्यांकडून अस्‌तित्वांत आली, तेव्हां हिच्यावर दु:ख आणि मरण आलें तें ईश्‌वराच्या नियमाचा - प्रीतीच्या नियमाचा-अतिक्रम केल्यानें आलें. तरीसुद्धां पापापासून उद्भवणारें जें दु:ख त्याचें पृथ्वीवर काहूर माजलेलें असून त्यांतून देखील ईश्‌वराची प्रीति व्यक्त होत आहे. असें लिहिलें आहे,कीं ईश्‌वरानें मनुष्यामुळें पृथ्वीला शाप दिला.2 ह्या जगांतले काटे आणि कंटकारण्यें-ज्यांच्या योगानें मनुष्याचें जिणें श्रमाचें आणि काळजीचें होतें- त्या अडचणी आणि संकटे हीं त्यांनें त्याच्या बऱ्याकरितां नेमिलीं आहेत. पापामुळें झालेला नाश आणि भ्रष्‌टपणा ह्यांतून त्याला उद्धरण्याची जी ईश्‌वराची योजना, तिला आवश्‌यक असा एक शिक्षणाचा भाग आहे. जग पतन पावलेलें असलें, तरी सारें दु:खमय, सारें विपत्तिमय नाहीं. सृष्‌टिकडूनच आपणांस कितीतरी आशेचे व समाधानाचें निरोप मिळत आहेत. काटेरी झाडांवर फुलें असतात, काटे गुलाबांनीं झाललेले सांपडतात.

फुलणाऱ्या प्रत्येक कळीवर, उगवणाऱ्या प्रत्येक पात्यावर "देव प्रीति आहे" असें लिहिलें आहे. आपल्या मधुर गायनानें आसपासचा प्रदेश नादित करुन टाकणारे सुंदर पक्षी, रंगाची नाजुक छटा असलेली व ज्यांचा सुवास हवेंत कोंदून जिकडे तिकडे घमघमाट सुटलेला आहे अशीं फुलें, हिरवीगार पालवी फुटलेले रानांतील गगनचुंबित वृक्ष, हीं ईश्वराच्या आपणांवर असलेल्या पितृवात्सल्याची साक्ष देत आहेत, व आपल्या लेकरांस सुखी ठेवावें अशी त्याची इच्छा दर्शवींत आहेत.

## (३) देवाच्या चारित्र्याचे गुणविशेष काय आहेत?

***तुझ्यासमान देव कोण आहे? तू अधर्माची क्षमा करतोस, आपल्या वतनाच्या अवशेषाचे अपराध मागे टाकतोस; तो आपला राग सर्वकाळ मनात ठेवणार नाही, कारण त्याला दया करण्यात आनंद वाटतो.***
***तो वळून पुन्हा आमच्यावर दया करील; आमचे अपराध पायांखाली तुडवील; तू त्यांची सर्व पापे समुद्राच्या डोहात टाकशील. (मीखा ७: १८-१९)***

देवाचें वचन आपणांस त्याचें शील कसें आहे हें प्रगट करीत आहे. स्वत: त्यानें अमर्याद प्रीति व दया आम्हांस व्यक्त केली आहे. "कृपाकरुन आपलें वैभव मला दाखीव" अशी जेव्हां मोश्यानें प्रार्थना तेव्हां ईश्वर त्यास म्हणाला "मी आपलें बरेंपण सर्व तुजपुढें जवळून चालवीन."1 हेंच त्याचें वैभव. परमेश्वर त्याजपुढें जवळून जाऊन मोठ्यानें असें बोलला, "परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव,

मंदक्रोध व फार दयेचा व सत्यतेचा; हजारोंवर दया राखतो, अन्याय व अपराध व पाप यांची क्षमा करतो."2 "तो मंदक्रोध व फार दयाळू आहे,"3 "कारण त्याला दया आवडते."4 {WG 6.2}

आकाशांतील व पृथ्वीवरील असंख्य गोष्टींच्या योगानें आपलीं अंत:करणें त्यानें स्वतांशीं संलग्न करून घेतलीं आहेत. सृष्टपदार्थाच्या योगानें व मनुष्याच्या अंत:करणाला ज्ञेय अशा इहलोकच्या अत्यंत मोठ्या प्रेममय बंधनावरून त्यानें स्वतांस प्रगट केलें आहे. तरी ह्या गोष्टीसुद्धां त्याची प्रीति पुर्णपणें व्यक्त करीत नाहींत. इतके सर्व पुरावे आपणांजवळ असतांहि त्या सर्व शुभाच्या द्वेष्ट्यानें मनुष्यांच्या अंत:करणावर अंध:काराचें पटल पसरीलें आहे, त्यामुळें त्यांना देवाकडे पाहून त्याचें भय वाटू लागलें; तो फार कडक व खुनशी आहे असें त्यांचें मन झालें.

**(४) आपण जर देवाला ओळखत नसलो, तर आपण देवाकडे कसे पाहणार, आणि त्या ऐवजी, सैतान देवाच्या चारित्र्याबद्दल जे दोष लावतो त्यावर विश्वास ठेवण्याची निवड करतो का?**

*ती सर्पाप्रमाणे धूळ चाटतील, पृथ्वीवरील सरपटणाऱ्या प्राण्यांप्रमाणे ती आपल्या विवरांतून थरथर कापत बाहेर येतील, परमेश्वर आमचा देव ह्याच्याकडे ती भयकंपित होऊन येतील; ती तुझ्यापुढे भयभीत होतील. (मीखा ७:१७)*

परमेश्वराविषयीं सैतानानें त्यांस असें भासविलें, कीं त्याचा मुख्य गुण म्हणजे न्यायनिष्ठुरता व तो निष्ठुर असा न्यायधीश अगर कठोर व जुलमी असा सावकारच आहे. मनुष्यें चुकतात केव्हां, व त्यांस शिक्षा करतो

केव्हां, हें मत्सरबुद्धीनें शोधून काढण्यासाठीं रात्रदिवस डोळयांत तेल घालून बसणारी अशी एक ती व्यक्ति आहे अशाप्रकारचें सृष्टिकर्त्याचें चित्र त्यानें काढिलें आहे. हें अंध:काराचें पटल दूर करण्याकरितां व ईश्वराचें प्रेम जगाला व्यक्त करण्यासाठीं प्रभु येशू मनुष्यांत वस्ती करण्यास आला. ईश्वराचा पुत्र आपल्या पित्याला प्रकट करण्यासाठीं स्वर्गांतून खालीं आला.

**(५) मानवाने पापाची निवड केल्यावर कोणत्या सौभाग्याला त्याला मुकावे लागले?**

***देवाला कोणीही कधीच पाहिले नाही; जो एकुलता एक जन्मलेला पुत्र देवपित्याच्या उराशी असतो त्याने त्याला प्रकट केले आहे. (योहान १:१८)***

**(६) स्वर्गीय पिता कसा आहे हे आपण कसे जाणवून घेऊ शकतो?**

***"मी कोण आहे हे तुम्ही ओळखले असते तर माझ्या पित्यालाही ओळखले असते; आतापासून तुम्ही त्याला ओळखता व तुम्ही त्याला पाहिलेही आहे." (योहान १४:७)***

जो आपल्या बापामध्यें आहे त्या त्याच्या एकुलत्या एक पुत्रानें त्याला प्रकट केलें आहे."1 "पुत्रावांचून व ज्या कोणास प्रगट करण्याची पुत्राची इच्छा असेल त्यावाचून ईश्वराला कधीहि कोणीं पाहिलेलें नाहीं."2 जेव्हां प्रभूच्या एका शिष्यानें त्याला उत्तर दिलें, "हे प्रभू, बाप आम्हांला दाखव" तेव्हां येशूनें त्याला उत्तर दिलें, "हे फिलिपा, मी इतका काळ तुम्हांजवळ असतां तूं मला जाणत नाहींस काय ? ज्यानें मला पाहिलें आहे, त्यानें

बापाला पाहिलें आहे; तर बाप आम्हांस दाखव हें तूं कसें म्हणतोस?"3

## (७) येशू ह्या पृथ्वीवर इतर कोणत्या कारणांसाठी आला?

*"' परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे, कारण दीनांस सुवार्ता सांगण्यास, भग्नहृदयी जनांस बरे करण्यास*
*त्याने मला अभिषेक केला; त्याने मला पाठवले आहे, ते अशासाठी की, धरून नेलेल्यांची सुटका व आंधळ्यांना पुन्हा*
*दृष्टीचा लाभ ह्यांची घोषणा करावी, ठेचले जात आहेत त्यांना सोडवून पाठवावे; परमेश्वराच्या प्रसादाच्या वर्षाची घोषणा करावी."*
*(लुक ४:१८-१९)*

येशूचे कार्य म्हणजे सर्वत्र चांगले करत राहणे आणि सैतानाने हल्ला केलेल्या लोकांना बरे करणे हे होते. अशी गावे होती जिथे एकही व्यक्तीकडून ओरड नाही अशी परिस्थिती होती कारण तो त्या गावामधून जात असताना त्याने सर्वांना बरे केले होते. ज्या गोष्टी त्याने केल्या त्यातून तो स्वर्गीय दृष्टीने अभिषिक्त होता हे प्रगट झाले. त्याच्या जीवनातील प्रत्येक कृतीतून प्रेम, दया आणि कनवाळूपणा दिसून येत होता, आणि सर्वांच्या प्रती सहानुभूती दर्शवण्यासाठी त्याचे हृद्य तुटत होते. आपल्या गरजा भागवण्यासाठी तो आपल्यासारखा झाला. सर्वात दरिद्री आणि विनम्र लोक देखील त्याच्याकडे येण्यास घाबरत नव्हते. त्याच्या मांडीवर बसून त्याच्या प्रेमळ कृपाळू चेहऱ्याकडे पाहण्यास त्यांना खूप आवडत असे.

**(८) ख्रिस्ताने स्वतःला आणि सुवार्तेच्या संदेशाला कसे प्रस्तुत केले?**

*शब्द देही झाला व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली, आणि आम्ही त्याचा गौरव पाहिला. तो पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचा गौरव असावा असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता. (योहान १:१४)*

येशूने सत्याचा एकही शब्द मागे राखून ठेवला नाही. नेहमी तो प्रेमाने तो शब्द बोलत असे.लोकांसोबत जसा त्याचा संबंध यायचा तो नेहमी विचारपूर्वक व कुशलतेने त्यांना हाताळायचा. तो कधीही रागीट नव्हता, कठोर शब्द कधीही बोलला नाही आणि कोणाच्या तरी भल्याचे असल्याशिवाय कोणालाही वेदना अथवा दुख देखील द्यायचा नाही. मनुष्याच्या दुर्बलतेमुळे त्याने कधीही लोकांना दोषी ठरवले नाही. प्रेमाने नेहमी सत्य तेच तो बोलायचा. जे धार्मिक नसतानाही तसे असण्याचे भासवत असे त्यांना तो उघडकीस आणायचा.अविश्वास आणि दुष्टता ह्यांच्या विरोधात तो होता. लोकांना त्यांच्या चुकीचा करणीसाठी जेव्हा तो इशारा द्यायचा तेव्हा त्याची वाणी जणू अश्रुपूर्ण असायची. ज्या शहरावर त्याने प्रेम केले, यरुशलेम, त्यावर त्याने आक्रोश केला, ज्या नगराने त्याला स्वीकारण्यास नाकारले , जो मार्ग, सत्य आणि जीवन होता. त्यांनी त्याला नाकारले होते, त्यांचा तारणारा, पण तरीही दया आणि कान्वाळूपणे त्याने त्यांना सांभाळले. त्याचे जीवन निस्वार्थी भावाने भरलेले असून इतरांच्या प्रती त्याने नेहमी दया दाखवली आणि प्रत्येक व्यक्ती त्याच्या नजरेत अनमोल होती. देवाच्या कुटुंबातील प्रत्येक सभासदासाठी त्याने निसीम प्रेम दाखवले.

प्रत्येक व्यक्तीकडे त्याने पतन पावलेला जीवात्मा म्हणून पाहिले आणि तारण करण्याचे त्याचे ध्येय होते. येशू ज्या पद्धतीने जगला त्यातून येशूचे, आणि देव जो त्याचा पिता ह्याचे चारित्र्य प्रगट झाले. पित्याच्या हृदयातून स्वर्गीय कनवाळूपणाचे झरे वाहत असे, जे ख्रिस्तात दिसून येतात, आणि देवाच्या पृथ्वीवरील लेकरांवर ते वाहत जातात. येशू आपला, कनवाळू आणि दयाघन तारणारा, हा देव जो ''देहधारी झाला.'' १ तिमथी ३:१६

**(९) आपल्यासाठी ह्या पृथ्वीवर असताना येशूला कशा प्रकारची वागणूक मिळाली?**

***तुच्छ मानलेला, मनुष्यांनी टाकलेला, क्लेशांनी व्यापलेला व व्याधींशी परिचित असलेला असा तो पुरुष पाहून लोक तोंडे फिरवत व त्याला तुच्छ लेखत; आणि त्याला आम्ही मानले नाही. खरोखर आमचे व्याधी त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले; तरी त्याला ताडन केलेले, देवाने त्याच्यावर प्रहार केलेले व त्याला पिडलेले असे आम्ही त्याला लेखले. खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले. (यशया ५३: ३-५)***

आपल्या तारणासाठींच प्रभु येशूनें जगांत वास्तव्य केलें, दु:ख सोंसलें व तो मरण पावला. आपण चिरकालिन् सुखाचे वाटेकरी व्हावें म्हणून तो "दु:खसाही मनुष्य" झाला. ईश्वरानें आपल्या परम प्रिय, कृपाळू व सत्यपरिपूर्ण अशा

पुत्राला स्वर्गलोकींचें अवर्णनीय वैभव सोडून पापानें स्तंभित झालेल्या, व मृत्यूची छाया व शाप यांनीं अंध:कारमय झालेल्या अशा जगांत येऊं दिलें. त्यानें त्यास, तें प्रीतीचें केंद्र व देवदूतांकडून मिळणारा सन्मान यांचा त्याग करून लज्जा, अपमान, पाण उतारा, द्वेष व मरण हीं सोसूं दिलीं. “त्यावर आमची कुशल साधाण्याची शिक्षा होती; आणि त्यांस मारलेल्या फटक्यांच्या घावाकडून आम्हांस आरोग्य झालें आहे.”1 त्याला रानामध्यें, गेथसेमनेंत खांबीं दिलेला पहा. निष्कलंक अशा देवाच्या पुत्रानें पापाचें ओंझें आपणावर घेतलें आहे. देव आणि तो एक असूनहि त्याच्या आत्म्याला, देवाची व मनुष्याची भयंकर ताटातूट व्हावी ह्याचें वाईट वाटलें. ह्यामुळें त्याच्या मुखावाटे “माझ्या देवा, माझ्या देवा, तूं कां माझा त्याग केलास”2 अशी दु:खाची आरोळी निघाली.

**(१०) पित्याकडे आक्रोश व्यक्त करत असताना येशूने कोणते शब्द वापरले?**

***आणि सुमारे नवव्या तासाला येशू मोठ्याने आरोळी मारून बोलला, “एली, एली, लमा सबख्थनी,” म्हणजे “माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?”*** *(मत्तय २७:४६)*

हेंच तें पापाचें ओंझें, हीच त्या पापाच्या भयंकर यातनांची जाणीव, हीच त्या पापाची ईश्वरापासून ताटातूट, व ह्यामुळें देवाच्या पुत्राचें अंत:करण दुभंग होऊन गेलें.

**(११) देवाने आपल्या पुत्राला ह्या पृथ्वीवर पाठवण्याचे दोन मुलभूत कारणे काय आहेत?**

***देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की,***

*जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. (योहान ३:१६)*

*... म्हणजे जगातील लोकांची पातके त्यांच्याकडे न मोजता, देव ख्रिस्तामध्ये स्वत:बरोबर जगाचा समेट करत होता; आणि त्याने आपल्याकडे समेटाचे वचन सोपवून दिले. (२ करिंथकरास पत्र ५:१९)*

परंतु त्यानें जो मोठा आत्मयज्ञ केला तो बापाचे अंत:करणांत मनुष्यांबद्दल प्रेम उत्पन्न व्हावें व त्यांस वांचविण्यास राजी व्हावें म्हणून केला असें नाहीं. खरोखर नाहीं ! “देवानें जगांवर इतकी प्रीति केली, कीं त्यानें आपला एकुलता एक पुत्र दिला.”3 ख्रिस्ताच्या आत्मयज्ञानें शांत होऊन तो मनुष्यांवर प्रेम करूं लागला असें नव्हें, तर त्याचें आपणां मनुष्यांवर प्रेम होतें म्हणून पापांच्या उपशमनार्थ बळी म्हणून ईश्वरानें त्याला पाठविलें. पतित अशा मर्त्य लोकांवर आपल्या अमर्याद प्रेमाचा सारखा वर्षाव ज्याच्या योगनें त्याला करितां आला तो मार्ग प्रभु ख्रिस्त हाच होय. “देव ख्रिस्तांत आपणाशीं जगाचा समेट करीत होता.”4 पुत्राबरोबर त्यानेंहि दु:ख सोंसलें. गेथसेमनेंत भोगलेल्या यातनांनीं, व कॅलव्हरी बागांतील मृत्युनें त्याच अत्यंत प्रेमळ अंत:करणानें आपल्या तारणाची किंमत दिली.

**(१२) पतन पावलेल्या मनुष्यजातीला तारणाच्या कृतीत सहभागी होण्याचे वर्णन येशूने कसे केले आणि त्याप्रती पित्याचा काय प्रतिसाद होता?**

*... म्हणजे जगातील लोकांची पातके त्यांच्याकडे न मोजता, देव ख्रिस्तामध्ये स्वत:बरोबर*

*जगाचा समेट करत होता; आणि त्याने आपल्याकडे समेटाचे वचन सोपवून दिले. (२ करिंथकरास पत्र ५:१९)*

प्रभु म्हणतो “परत घेण्याकरितां मी आपला जीव देतों, यास्तव बाप मजवर प्रीति करतो”1 म्हणजे माझ्या बापानें तुमच्यावर इतकी प्रिति केली आहे, कीं तुमच्या तारणासाठीं मीं आपला जीव दिला म्हणून माझ्यावर देखील त्याची जास्त प्रीति झाली. तुमचेऐवजी मोबदला होऊन व तुमच्याबद्दल जामीन राहून तुमचीं ऋणें व पापें आपल्या माथीं घेऊन मीं स्वतां जीव दिला त्यामुळें मी आपल्या बापाला अधिक आवडता झालों आहें. कारण माझ्या जीवयज्ञामुळें देव न्यायी ठरतो व जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्यास न्यायी ठरविणारा ठरतो.”

ईश्वराच्या पुत्राशिवाय दुसरा कोणीहि आपलें तारण करण्यास समर्थ झाला नाहीं. कारण बापाच्या हृदयाशीं असणाऱ्या फक्त त्यानेंच बापाला प्रगट केलें आहे. बापाची प्रीति किती उदात्त व अगाध आहे हें ज्याला ठाऊक होतें त्याला मात्र तिचें स्वरुप दाखवितां आलें. पतित अशा मनुष्यप्राण्याप्रीत्यर्थ प्रभु ख्रिस्तानें जों अलौकिक स्वार्थत्याग केला त्याहून यत्किंचित् हि कमी स्वार्थत्यागानें बापाची नष्ट मनुष्यावर असलेली प्रीति व्यक्त करिता आली नसती.

“देवानें जगावर एवढी प्रीति केली कीं त्यानें आपला एकुलता पुत्र दिला.” त्यानें फक्त मनुष्यांत येऊन रहावें म्हणूनच नव्हें तर त्यांच्या पापाचें ओंझें वाहावें व त्यांच्याबद्दल बळीं म्हणून मरावें म्हणून तो दिला. त्यानें तो पतित प्राण्यांला दिला.

## (१३) येशू आपल्याला काय बोलावण्यास लाज मानून घेत नाही?

*कारण जो पवित्र करणारा व ज्यांना पवित्र करण्यात येत आहे ते सर्व एकापासूनच आहेत, ह्या कारणास्तव त्यांना ‘बंधू’ म्हणायची त्याला लाज वाटत नाही. (इब्री २:११)*

मनुष्यप्राण्याचें हित व त्याच्या गरजा ह्यांशीं त्याला एकजीव व्हावयाचें होतें. जो व देव एकच होते त्यानें स्वत:ला मनुष्यप्राण्याशीं कधींहि न तुटणार्‍या अशा बंधनांनीं जोडून घेतलें. प्रभु येशू “त्यांस भाऊ म्हणायास लाजत नाहीं.”2 मनुष्यदेहधारण करणारा व सनातन कालापर्यंत ज्यांचें त्यानें तारण केलें त्याशी एक असलेला तो मनुष्यपुत्र बापाच्या आसनासमोर आपणाबद्दल गेलेला बळी, मध्यस्थ व बंधुहि आहे. आणि हें सर्व झालें तें पापामुळें उत्पन्न झालेल्या नीचावस्थेंतून मनुष्य उद्धरिला जावा व त्याच्यामध्यें ईश्वराची प्रीति दिसून यावी व पवित्रपणाच्या आनंदाचा वाटा त्यास मिळावा म्हणून झालें.

**(१४) त्याच्या अद्‌भुत प्रीतीत, पित्याने आपल्यावर कोणता महान सन्मान प्रदान केला आहे?**

*आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतिदान दिले आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच. ह्यामुळे जग आपल्याला ओळखत नाही, कारण त्याने त्याला ओळखले नाही. (१ योहान ३:१)*

आपल्या तारणाबद्दल दिलेल्या या किंमतीवरून व आपल्या स्वर्गीय पित्यानें आपणाप्रीत्यर्थ मृत्युमुखीं पडण्यास स्वतांच्या पुत्राला देण्यांत जो अमर्याद स्वार्थत्याग केला त्यावरून ख्रिस्तद्वारा आपण कसें व्हावें याविषयीं थोर विचारांची प्रेरणा आपणांमध्यें

होईल. जेव्हां पवित्र आत्म्यानें प्रेरीत झालेल्या प्रेषित योहानानें नाशाप्रत जात असलेल्या मनुष्य जातीवर परमेश्वराचें किती उच्च, किती अगाध, किती व्यापक प्रेम आहे हें पाहिले तेव्हां त्याच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. ह्या प्रेमाच्या महत्वाचें व मृदुलतेचें वर्णन करण्यास भाषा कोती पडल्याकारणानें जगाला त्यानें तें पहा म्हणून सागितलें. “आम्हांस देवाचीं लेकरें हें नांव मिळालें यांत बापाचें आम्हांवर केवढें प्रीतिदान आहे तें पहा!”

## (१५) आपण देवाची लेकरे कसे बनतो?

*परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला; (योहान १:१२ )*

ह्यायोगानें मनुष्याची कितीतरी किंमत ठरते तें पहा! देवाच्या आज्ञेच्या उल्लंघनानें मनुष्यें सैतानाची अंकित होतात. ख्रिस्तानें लोकांच्या पापांबद्दल प्रायश्चित्तादाखल केलेल्या जीवयज्ञावरिल श्रद्धेनें आदामाचे पुत्र देवाचे पुत्र होतात. मनुष्य स्वभाव धारण करून ख्रिस्तानें मनुष्याला उच्चदशेप्रत नेलें आहे. ख्रिस्ताशी संयोग पावल्यानें पतितसुद्धां खरोखर “देवाचे पुत्र” या नांवाला शोभतात.

अशा प्रकारची प्रीति खरोखर अतुल आहे. स्वर्गांतील राजाचीं लेकरें! अमुल्य देणगी ! एकाग्रतेनें मनन करण्यासारखाच विषय ! ज्या जगानें त्याजवर प्रीति केली नाहीं त्या जगावरच उलट त्याची अनुपमेय प्रीति ! ह्या विचारामध्यें आत्म्याला आपल्या अंकित करुन घेण्याचें सामर्थ्य आहे; हा विचार मनाला ईश्वरी इच्छेच्या ताब्यांत आणूं शकतो. आपण वधस्तंभाच्या दृष्टीनें जों जों ईश्वराच्या शीलाचा

अधिकाधिक अभ्यास करूं, जों जों आपण नीति व न्याय यांशीं संमिलित अशी दया, प्रीति, क्षमाशीलता यांचा विचार करूं, आणि आपल्या बहकलेल्या मुलाची आपल्याला जी एकसारखी कळकळ वाटत असते तीपेक्षांही अधिक जिला मर्यादा नाहीं अशा या प्रीतीचे व दयेचे असंख्य पुरावे स्पष्टपणें आपणांपुढें अधिकाधिक येतील तों तों आपण येहोवाला म्हणूं कीं :--

**श्लोक (पृथ्वी)**

*तुटोत भवबंधनें सकल हीं, सखे ते अरी।*
*बनोत, निजबालकांप्रति करो तमाता दुरी, ।।*
*चळोत धरणीनभ: प्रसर शेवटीं हीं, तरी।*
*दया बदलणें तुझी नच घडेल कालांतरीं ! ।।*

***मी आपल्या स्वर्गीय पित्याचे आभारी आहे ह्या सुंदर निसर्गासाठी आणि माझ्या सर्व गरजा पुरवण्याबद्दल तसेच संपूर्ण सजीवांच्या गरजा देखील तो पुरवतो.***

**गोल करा: होय अनिश्चित**

***आपल्या प्रिय पुत्राच्या वरदानामध्ये त्याने जी दया, कनवाळूपणा आणि मंद्क्रोध वृत्ती प्रदर्शित केली त्यामुळे माझे मन प्रेमाने भरून गेले आहे.***

**गोल करा: होय अनिश्चित**

***मी आश्चर्यचकित आहे कि येशू ह्या पृथ्वीवर कसा आला आणि त्याने आजारी लोकांना बरे करून, भग्न लोकांना सांत्वन देऊन आणि पतन पावलेल्या मानवजातीचा उद्धार करून कशा अर्थाने प्रेम व्यक्त केले.***

**गोल करा: होय अनिश्चित**

***देवाच्या वचनात अधिक वेळ घालवण्याची माझी इच्छा आहे जेणेकरून मला त्याचे प्रेम***

*अधिक चांगल्या अर्थाने समजेल आणि मी त्याचे लेकरू बनू शकेल.*

**गोल करा:** **होय** **अनिश्चित**



## धडा २
## पापी मनुष्याला ख्रिस्ताची आवश्यकता

**(१) देवाचा सन्मान आणि आदर करून त्याचे आज्ञापालन जर आपण केले तर कोणते सद्गुण प्राप्त होतात?**

*परमेश्वराचे भय ज्ञानाचा आरंभ होय. त्याप्रमाणे जे वर्ततात त्या सर्वांना सुबुद्धी प्राप्त होते. त्याचे स्तवन सर्वकाळ चालते. (स्तोत्रसहिता १११:१०)*

मनुष्याला प्रथमत: उत्तम मानसिक सामर्थ्य व मनाची समता हीं दिलेली होती. तो आपल्या स्वरूपांत पूर्ण असून ईश्वराशी मिळून होता. त्याचे विचार शुद्ध व अंतिम हेतु पवित्र होते. परंतु आज्ञाभंगामुळें त्याचें सामर्थ्य नष्ट होऊन त्याजमधील प्रेमाची जागा आपलपोटेपणानें पटकाविली. ईश्वराच्या आज्ञेच्या उल्लंघनामुळें तो इतका दुर्बळ झाला कीं त्यास आपल्या स्वतांच्या सामर्थ्यानें दुष्टाच्या सामर्थ्याला प्रतिकार करणें दुरापास्त

झालें. सैतानानें त्यास बंदिवान करुन टाकिलें, व बहुधा ईश्‌वर मध्यें पडला नसता, तर त्यास अशा स्थितींत कायमचेंच रहावें लागलें असतें. मनुष्याच्या उत्पत्तीसंबंधीं ईश्वरीसंकेत उलथून पाडून पृथ्वी दु:खमय व ओसाड करण्याचा, व हें सर्व परमेश्वराच्या-मनुष्यप्राणी निर्माण करण्याच्या-कृतीचें फळ आहे हें दाखविण्याचा त्या मोहांत पाडणाऱ्या (सैताना) चा इरादा होता.

**(२) आदाम आणि हव्वा हे देवापासून का लपले?**

***तो म्हणाला, "मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो." (उत्पत्ती ३:१०)***

मनुष्य आपल्या निष्पाप अशा स्थितींत "ज्यामध्यें ज्ञानाचे व बुद्धीचे सर्व गुप्तनिधी आहेत"1 अशा ईश्‌वराशीं आनंदमय दळणवळण ठेवीत असे. परंतु त्यानें पाप केल्यावर पवित्रपणांत त्यांस आनंद लाभेनासा झाला, व ईश्वराच्या समक्षतेपासून दूर राहण्याचा तो प्रयत्‌न करूं लागला. न पालटलेल्या अंत:करणाची अद्यापपर्यंत अशीच स्थिती आहे. त्याची परमेश्वराशीं एकतानता नसून त्याच्याबरोबर दळणवळण ठेवण्यांत त्याला आनंद होत नाहीं.

**(३) जेव्हा ख्रिस्त पुन्हा येईल तेव्हा अपरिवर्तीत लोकांचा त्याच्या सान्निध्याच्या प्रती कसा प्रतिसाद असेल?**

***आणि ते डोंगरांना व खडकांना म्हणाले, "आमच्यावर पडून राजासनावर जो बसलेला आहे, त्याच्या दृष्टीपुढून व कोकऱ्याच्या***

*क्रोधापासून आम्हांला ‘लपवा! (प्रगटीकरण ६:१६)*

ईश्वराच्या समक्षतेपासून पापी मनुष्याला सुख मिळत नाहीं. पवित्र व्यक्तींच्या संगतीपासून तो दूर दूर पळतो. स्वर्गांत जाण्यास जरी त्याला मोकळीक मिळाली, तरी देखील त्यापासून त्याला आनंद होणार नाहीं. त्याचे विचार, त्याचे हितसंबंध, त्याचे हेतु तेथील रहिवाश्यांना प्रेरीत करणाऱ्या, विचारांना, हितसंबंधांना, व हेतूंना विरुद्ध असणार. स्वर्गीय गायनांत तो म्हणजे एक बेसुरासारखाच ठरणार. स्वर्ग म्हणजे त्याला एक यातनांचें स्थानच वाटेल. ईश्वर जो त्या स्वर्गाचा प्रकाश व त्याच्या आनंदाचें केंद्र त्यापासून दूर राहण्याची तो इच्छा करील. दुष्ट मनुष्यें स्वर्गसुखाला आंचवतात तें कांहीं ईश्वरी शिक्षेच्या अंमलबजावणीच्या जुलमी आज्ञेमुळें नव्हें, तर ते (दुष्ट मनुष्य) त्याच्या सहवासास नालायक ठरल्यामुळें आंचवतात. देवाचें वैभव म्हणजे त्यांस भस्म करणाऱ्या अग्नीप्रमाणें वाटत असतें. जो त्यांच्या तारणासाठीं मरण पावला त्याजपासून दूर रहावें म्हणून ते नाशाचें स्वागत करितात.

**(४) एका पापी व्यक्तीमध्ये त्याचे किंवा तिचे हृदय शुद्ध करण्याची क्षमता का नसते?**

*अमंगळातून काही मंगळ निघते काय? अगदी नाही! (इयोब १४:४)*

ज्या पापदरींत आपण मग्न झालों आहों तींतून आपल्या आपण बाहेर येणें आपणां मानवांस अशक्य आहे. आपलीं अंत:करणें दुष्ट असून तीं आपणांस बदलतां येणें शक्य नाहीं “मलिनांतून स्वच्छ पदार्थ कोण काढील? कोणीहि नाहीं.”

“दैहिक चिंतन हें देवाशीं वैर आहे. कारण तें देवाच्या नियमशास्त्राच्या आधीन नाहीं, आणि त्याच्यानें तसें होववत नाहीं.”1 शिक्षा, सुधारणा, निश्चयशक्ति व मानवी प्रयत्न यांस योग्य अशी त्यांची मर्यादा आहे, परंतु ह्या बाबतींत तीं अगदीं दुर्बळ असतात. शीलाचें बाह्यांग तीं सुधारतील, परंतु त्याच्यानें अंत:करणांत पालट होणार नाहीं, व जीवनाच्या झऱ्याचें शुद्धिकरण होणार नाहीं. मनुष्यें पापातून मुक्त होऊन त्यांचें अंगीं पवित्रपणा येण्यापूर्वीपासूनच त्यांचे अंत:करणांत एक प्रकारचें सामर्थ्य क्रिया करीत असावें लागतें व वरून नवीन जीवन सुरू व्हावें लागतें. हें सामर्थ्य म्हणजे ख्रिस्त होय. त्याच्या कृपेनें निर्जीव प्राणशक्तींस गती मिळून त्या परमेश्वराकडे वळतात.

**(५) देवाच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी तयारी म्हणून आपल्या जीवनात काय घडले पाहिजे?**

***येशू त्याला म्हणाला, “मी तुम्हांला खचीत सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही.” (योहान ३:३)***

प्रभूनें म्हटलें आहे “नव्यानें जन्मल्याशिवाय” -- नवें अंत:करण, नव्या इच्छा, नवीं कार्यें, नवे हेतु हीं त्यांस प्राप्त झाल्याशिवाय- “त्याच्यानें देवाचें राज्य पाहवत नाहीं.”2 मनुष्याच्याठायीं स्वभावत: जें चांगुलपण असेल तें पूर्णावस्थेत आलें म्हणजे झालें ही कल्पना घातक व भ्रामक होय.

**(६) केवळ अध्यात्मिक बाबी कशा रीतीने समजल्या जाऊ शकतात?**

*कारण देवाने ते आत्म्याच्या द्वारे आपल्याला प्रकट केले; कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या गहन गोष्टीचाही शोध घेतो. (१ करिंथकरास पत्र २:१०)*

““दैहिक मनुष्य देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वीकारीत नाहीं, कारण त्या त्याला मूर्खपणाच्या वाटत असतात; आणि त्याच्यानें त्या जाणवत नाहींत, कारण यांची पारख आत्म्याच्या योगानें होते.”3 “तुम्हांस नव्यानें जन्मलें पाहिजे हें मीं तुला सांगितलें म्हणून आश्चर्य मानूं नको.” ख्रिस्ताविषयीं असें लिहिलें आहे, की “त्यांत जीवन होतें, व तें जीवन मनुष्यांचा प्रकाश होतें.” जेणेंकरुन आमचें तारण व्हावयाचें असें फक्त एकच नांव आकाशाखालीं मनुष्यांमध्यें दिलेलें आहे.4

**(७) नितीमत्वाचा अर्थ समजून देखील पापात राहण्याचा संघर्ष आपण का करतो?**
*कारण आपल्याला ठाऊक आहे की, नियमशास्त्र आध्यात्मिक स्वरूपाचे आहे; मी तर दैहिक, पापाला विकलेला असा आहे. (रोमकरास पत्र ७:१४)*

ईश्वराचा प्रेमयुक्त दयाळूपणा जाणणें, व त्याच्या स्वभावांतील उपकारशीलत्व व पितृवात्सल्य हीं लक्षांत घेणें इतकेंच पुरेसें नाही, त्याचप्रमाणें त्याचे नियमशास्त्रांत दिसून येणारीं न्यायीपणा व दूरदृष्टीं हीं ओळखणें व तें नियमशास्त्र प्रेमाच्या त्रिकालाबाधित सिद्धांताच्या पायावर रचलेलें आहे हें समजणें इतकेंच पुरेसें नाहीं. “नियमशास्त्र उत्तम आहे अशी मी संमत्ती देतों.” “नियमशास्त्र पवित्र आणि आज्ञा पवित्र यथान्याय व उत्तम आहे.”1

ह्याप्रमाणें उद्गार काढीत असतांना प्रेषित पौलाला हें सारें कळत होतें परंतु भयंकर

आत्मिक यातनांनीं व निराशेचें तो पुढें म्हणाला "मी तर दैहिक व पापाला विकलेला असा आहें." पवित्रपणाची व न्यायीपणाची इच्छा त्यानें धरिली, परंतु ती आपल्याआपण मिळविण्यास तो अगदीं असमर्थ होता, म्हणून मोठ्यानें ओरडून तो म्हणतो "काय मी कष्टी मनुष्य ! मला वा मरणाच्या देहांतून कोण सोडवील ?"2 सर्वकाळीं व सर्व देशांत कष्टी झालेल्या अंत:करणांतून अशीच आरोळी निघालेली आहे. ह्या आरिळींचें सर्वत्रांना एकच उत्तर आहे व तें हें कीं "पाहा जगाचें पाप हरण करणारा देवाचा कोंकरा !"3

## (८) पापी व्यक्ती आणि देव ह्यांच्यात संधान परत जुळवण्यासाठी एकमेव मध्यस्थ कोण आहे?

***कारण एकच देव आहे, आणि देव व मानव ह्यांच्यामध्ये ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे, (१ तीमथी २:५)***

ईश्वराच्या आत्म्यानें ह्याच्या सत्यपणाच्या स्पष्टीकरणासाठीं व पापाच्या ओझ्यापासून मुक्त होण्याची इच्छा करणाऱ्या आत्म्यांस समजण्यास सोपें करून दाखविण्यासाठीं योजलेले बरेच अलंकारिक दाखले आहेत. एसावाला फसविण्याचें काम केल्यानंतर जेव्हां याकोब आपल्या बापाच्या घरुन पळून गेला, तेव्हां कृतपापाच्या जाणिवेमुळें तो अगदीं कष्टी होऊन गेला होता. एकटा व निराश्रित असा जरी तो होता, व ज्यांच्यायोगानें जीवनक्रम सुखावह होतो अशा सर्व गोष्टींला जरी तो मुकला होता तरी स्वर्गसुखाला आपण मुकलों आहों व पापामुळें आपली ईश्वरापासून ताटातूट झाली आहे, ह्या सर्व गोष्टींहून श्रेष्ठ अशा एका विचाराचें त्याच्या आत्म्यावर

प्राबल्य होतें. सभोंवार भयाण टेंकड्या व वरतीं तार्‍यानें प्रकाशलेलें आकाश अशा ठिकाणीं उघड्या जमिनीवर कष्टी अंत:करणानें तो विश्रांति घेण्यासाठीं पडला.

तो निजला असतां एक विलक्षण उजेड त्यास दिसला; आणि आश्चर्याची गोष्ट ही, कीं ज्या माळ जमिनीवर तो निजला होता त्या जमिनीवरुनच विस्तीर्ण छायाकृति व स्वर्गाच्या दरवाजापर्यंत जाणार्‍या पायर्‍या, व त्यावरून देवदूत खालींवर जात येत आहेत, असें त्यांस दिसलें व वैभवयुक्त स्वर्गातून सुखाच्या व आशेच्या निरोपाचा दैवी शब्द त्याच्या कानीं पडला. ज्याच्या योगानें याकोबाच्या गरजा व त्याच्या आत्म्याच्या इच्छा भागल्या त्या तारकाची त्यास अशा रीतीनें माहीति झालीं. ज्याच्यायोगानें त्याच्यासारख्या पापी मनुष्याचें ईश्वराशीं पुन्हा दळणवळण सुरू झालें, असा त्यास प्रगट केलेला मार्ग त्यानें आनंदानें व कृतज्ञता बुद्धीनें पाहिला. त्याच्या स्वप्नांतील शिंडी एक गुढच होतें; तिनें, येशु हाच काय तो ईश्वर व मनुष्य यांजमधील दळणवळणाचा मार्ग आहे हें दर्शविलें आहे.

**(९) आपण पित्याकडे कसे येऊ शकतो?**

***येशूने त्याला म्हटले, "मार्ग, सत्य व जीवन मीच आहे; माझ्या द्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही. (योहान १४:६)***

आपल्या नथानेलबरोबर झालेल्या संभाषणांत ख्रिस्तानें ज्या अलंकाराचा उल्लेख केला होता, तो हाच होय. तो नथानेलला म्हणाला "आकाश उघडलेलें आणि देवाच्या दूतांस चढतां व मनुष्याच्या पुत्रावर उतरतां पहाल."1 मनुष्यानें पतित होऊन ईश्वरापासून आपणाला दूर केलें, व यामुळेंच पृथ्वी स्वर्गापासून निराळी झालीं.

या दोहोंच्या दरम्यान झालेल्या* आवर्त प्रदेशामुळें एकमेकांमधील दळणवळण अशक्य झालें. परंतु ख्रिस्तद्वारां पृथ्वी व स्वर्ग हीं पुन्हा जोडलीं गेलीं.

सेवा करणाऱ्या देवदूतांस मनुष्यांशीं दळणवळण ठेवतां यावें म्हणून पापांमुळें झालेल्या ह्या आवर्त प्रदेशावर ख्रिस्तानें आपल्या पुण्यानें सेतु बांधिला आहे. पतित मनुष्याला त्याच्या अशक्त व निराश्रित स्थितींत ख्रिस्त हा अनंतशक्तीचें मूळ जो ईश्वर त्याची जोड करून देतो.

**(१०) पतन पावलेल्या मानवतेच्या स्तरापासून आपला बचाव करण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ का आहेत?**

***कारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे तुमचे तारण झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही, तर हे देवाचे दान आहे;कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही. (इफिसकरास पत्र २:८-९)***

पतित मनुष्यांस उद्धरण्याच्या आशेचे व मदतीचे मुख्य मार्गाचा विचार न करितां त्याच्या सुधारणेसंबंधीं मनोरथ व त्यांच्या उद्धाराविषयीं मनुष्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ होत. “प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान.”2 हीं ईश्वराकडून आहेत. शीलाची खरीखुरी उत्कृष्टता त्या व्यतिरिक्त नाहीं; व ईश्वराकडे जाण्याचा ख्रिस्त हा एकच मार्ग आहे. तो म्हणतो, “मार्ग, सत्य व जीवन मी आहें.”3

**(११) आपल्या उद्धारासाठी वर स्वर्गातून कोणता महान प्रयत्न करण्यात आला आहे?**
***तसे असते तर जगाच्या स्थापनेपासून त्याला वारंवार दुःख सोसावे लागले असते; पण आता***

*तो एकदाच युगाच्या समाप्तीस आत्मयज्ञ करून पापे नाहीशी करण्यासाठी प्रकट झाला आहे. (इब्री ९:२६)*

ईश्वराचें अंत:करण त्याच्या पृथ्वीवरील लेकरांबद्दल मृत्युपेक्षां जिचें अधिक सामर्थ्य आहे अशा प्रीतीनें कळवळत आहे. आपल्या पुत्ताला देऊन त्या एकाच देणगींत त्यानें सर्व स्वर्गाचीच आपणांवर वृष्टी केली आहे. त्या तारणाराचें जिणें, त्याचे मरण, त्याची मध्यस्थी, देवदूताम्ची सेवा, पवित्र आत्म्याचें व ईश्वराचें अंतर्बाह्य चाललेलें कार्य व स्वर्गांतील प्राण्यांची सतत कळकळ, या सर्व गोष्टी मनुष्यांच्या तारणासाठीं योजलेल्या आहेत.

आपणांसाठीं केलेल्या त्या जीवयज्ञाचें आपण चिंतन करूं या ! नष्टप्राय मनुष्यांचा पुन्हा स्वीकार करून त्यांस बापाच्या घरीं परत आणण्यासाठीं जे श्रम व जी उत्सुकता खर्ची पडत आहेत त्यांचें मोल समजून घेऊं या ! ह्यापेक्षां अधिक दृढ हेतु व अधिक सामर्थ्यवान साधनें कोणी कधीही उपयोगांत आणूं शकला नसता. सत्कृत्याबद्दल अति मोठें बक्षीस, स्वर्गसुखाचा उपयोग, देवदूतांचा समागम, ईश्वर व त्याचा पुत्र यांचें प्रेम व त्यांशीं दळणवळण, उच्चत्वाचें व अधिक उद्दीपक व उत्तेजक नाहींत काय?

आणि उलटपक्षीं पापाविरुद्ध सांगितलेले देवाचे न्याय, व अपरिहार्य शासन, आपल्या शीलाची नीचावस्था व अखेरचा नाश हीं सैतानाची सेवा न करण्याबद्दल आपण सावध रहाण्यासाठीं ताकिदीदाखल देवाच्या वचनांत सांगितलीं आहेत.

ईश्वराच्या दयेला आपण मान देऊं नये काय? ह्यापेक्षां तो अधिक काय करूं शकणार? जो आपणांवर आश्चर्यकारक रीतीनें प्रेम करतो

त्याच्याशीं आपण योग्य सबंध ठेवून राहूं या ! त्याच्या सादृश्यांत राहण्यासाठीं, सेवा करणाऱ्या देवदूतांची संगति लाभण्यासाठीं, व बाप व पुत्र यांशी एकतानता व दळणवळण प्राप्त होण्यासाठीं जीं साधनें आपणांला दिलीं आहेत, त्यांचा आपण उपयोग करूं या !

*मला आता समजते कि देवाने मानवाला परिपूर्ण म्हणून निर्माण केले आणि ते देखील उदार शक्ती देऊन व स्वतःच्या सुसंवादात निर्माण केले. मग, आपण, अवज्ञा केल्यामुळे स्वभावाने दुर्बल झालो आणि देवाच्या कोणत्याही हस्तक्षेपाच्याशिवाय सैतानाच्या प्रती बंदिवान बनतो आणि दुष्टाईचा प्रतिकार करू शकत नाही.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*मला समजते कि, ह्याच धर्मत्यागामुळे, मनुष्याने स्वतःला देवापासून विभक्त केले आणि देवाकडे परत जाण्याचा एकमेव मार्ग म्हणजे येशू ख्रिस्त आहे.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*मी माझे असहाय्यपण पाहतो आणि येशू ख्रिस्त हा माझा तारणारा आहे हि महान गरज जाणून घेतो.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*देवाचे प्रेम आणि उद्धाराच्या योजनेसाठी मी देवाचे आभारी आहे. त्याने दिलेल्या उदारतेच्या ह्या सवलतीला स्वीकारण्याची माझी इच्छा आहे.*

**गोल करा: होय अनिश्चित**

________________________________________

________________________________________



## धडा ३
## आपल्या परिस्थितीची जाणीव होणे

**(१) आपण पापी ह्या नात्याने पापापासून कशा रीतीने शुद्ध होऊ शकतो?**

*पेत्र त्यांना म्हणाला, “पश्चात्ताप करा व तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हांला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल. (प्रेषित २:३८)*

परमेश्वरासमोर मनुष्य कसा न्यायी ठरेल ? पापी मनुष्यास कसा शुचिर्भूत करावा ? या प्रश्नाचें उत्तर म्हटलें म्हणजे फक्त ख्रिस्तद्वारांच आपला परमेश्वराशीं व त्याच्या पवित्रतेशीं संयोग होईल हें होय. परंतु प्रश्न हा कीं आपण ख्रिस्ताजवळ यावयाचें तें कोणत्या रीतीनें ? पन्नासाव्या दिवशीं लोकांनीं जसा

प्रश्न केला व आपल्या पापांबद्दल त्यांची पक्की खात्री होऊन “आम्हीं काय करावें”1 असें त्यांनी मोठा आक्रोश करीत विचारलें त्याप्रमाणें पुष्कळ लोक हाच प्रश्न आज विचारीत आहेत.

ह्या त्यांच्या प्रश्नास पेत्रसानें “पश्चात्ताप करा” असें पहिल्यानें उत्तर दिलें. लवकरच दुसऱ्या वेळीं तो म्हणाला “तुमचीं पापें पूसून टाकली जावीं म्हणून पश्चात्ताप करा व फिरा.”2

पुष्कळांना पश्चात्तापाचें खरें लक्षण समजत नाहीं. आपण पाप केलें म्हणून पुष्कळांना वाईट वाटतें व तें आपली बाह्यांगीं सुधारणाहि करितात; परंतु ते आपल्या दुष्कृत्यामुळेम एखादें संकट ओढवेल या हेतुनें ती करीतात. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें हा पश्चात्ताप नव्हें. असे लोक पापापेक्षां दु:ख भोगाबद्दलच शोक करितात.

आपल्या ज्येष्टपणाच्या जन्मसिद्ध हक्काला आपण कायमचे मुकलों, असें जेव्हां एसावानें पाहिलें, तेव्हां त्यास अशाच प्रकारचें दु:ख झालें. आपल्या वाटेवर देवदूत तरवार उपसून उभा आहे, असें पाहून गर्भगळीत झालेल्या बालामानें जीव जाइल या भीतींनें आपला गुन्हा कबूल केला; परंतु या ठिकाणीं त्यास पापाबद्दल खराखुरा पश्चाताप झालेला नव्हता, त्याचा मूळ हेतु त्यानें सोडिला नव्हता, व आपल्या दुष्कृतीचा त्यास वीट आलेला नव्हता. आपल्या प्रभूचा विश्वासघात केल्यानंतर यहुदा इस्कार्योंत यानें “मीम निर्दोष मनुश्याचा घात केला हें महत्पाप केलें आहे”1 असें उद्गार काढलें.

कृतापराधाच्या भयंकर जाणिवेमुळें व न्यायासनाच्या प्रीतिप्रद देखाव्यामुळें स्वतांच्या दुष्कृतीबद्दल त्याच्या आत्म्याकडून असा कबूली जबाब आला. भविष्यकाळीं घडनाऱ्या परिणामाच्या धास्तीनें त्याला घेरलें खरें, परंतु

निष्पाप अशा देवाच्या पुत्राचा घात केल्याबद्दल व इस्त्राएलाच्या पवित्राला नाकारल्याबद्दल अंत:करणाला घावच पडतील इतकें जबर दु:ख त्यास झालें नव्हतें.

ईश्वरी क्षोभामुळें फारोला दु:ख प्राप्त झालें तेव्हां त्यानें आणखी जास्त शिक्षा होऊं नये म्हणून आपलें पाप कबूल केलें. परंतु पटकी वगैरे संकटें नाहींशीं झाल्यावर फिरुन तो ईश्वराला तुच्छ मानूं लागला. वर सांगितलेल्या इसमांस पापाच्या परिणामाबद्दल दु:ख झालें खरें. परंतु मूळ पापाबद्दल त्यांस तें झालेलें नव्हतें.

पश्चात्ताप ह्यांत पापांबद्दल दु:ख व त्या पापांपासून परावर्तन या दिन गोष्टींचा समावेश होतो. पापाच्या भ्रष्टतेविषयीं खात्री झाल्याशिवाय आपण त्याचा त्याग करणार नाहीं. त्यापासून आपण अंत:करणपूर्वक परावृत झाल्याशिवाय आपल्या जीवनक्रमांत खराखुरा फरक पडणार नाहीं.

**(२) हे वचन ख्रिस्ताचे कसे वर्णन करते, जो पवित्र आत्म्याने, अंधकार दूर हटवतो आणि जीवात्म्यातील गुप्त स्थळे प्रगट करतो?**

***जो खरा प्रकाश प्रत्येक मनुष्याला प्रकाशित करतो तो जगात येणार होता. (योहान १:९)***

आपलें अंत:करण ईश्वरी आत्म्याच्या इच्छेच्या स्वाधीन होतें त्यावेळीं सद्सद्विचारबुद्धि ही आपलें काम करूं लागते, व पापी मनुष्याला ईश्वराच्या पवित्र नियमाच्या उदात्तपणाची, पावित्र्याची, व स्वर्गांतील व पृथ्वीवरील त्याच्या साम्राजाच्या पायाची (प्रेमाची) कांहींशी ओळख पटते. “जगांत येणारा जो खरा प्रकाश प्रत्येक मनुश्याला प्रकाशित करितो,”2 तो अंधारांत लपलेल्या गोष्टी उघदकीस आणितो, व मनाची व

अंत:करणाची तीं अपराधी असल्याबद्दल खात्री करितो. यहोवा न्यायी आहे असें पापी मनुष्यांस कळून येतें, व आपल्या अपराधी व अपवित्र अशा स्थितींत अंत:करणाची झडती घेणाऱ्या ईश्‍वरासमोर जाण्यास त्यास भीति वाटते. ईश्वराचें प्रेम, पवित्रपणाचें सौदर्य व त्यापासून होणारा आनंद ही त्याच्या नजरेसमोर येतात, तो अंत:करणशुद्धीची व ईश्‍वराशीं पुन्हां दळणवळण सुरुं होण्याची इच्छा करतो.

**(३) दावीद राजासारखे, आपल्याला जर खऱ्या अर्थाने आपल्या पापांसाठी वाईट वाटत असेल, तर आपली प्रार्थना काय असेल?**

*हे देवा, तू आपल्या वात्सल्याला अनुसरून माझ्यावर कृपा कर; तू आपल्या विपुल करुणेला अनुसरून माझे अपराध काढून टाक. मला धुऊन माझा दोष पूर्णपणे काढून टाक, माझे पाप दूर करून मला निर्मळ कर. 3 कारण मी आपले अपराध जाणून आहे, माझे पाप माझ्यापुढे नित्य आहे. तुझ्याविरुद्ध, तुझ्याविरुद्धच मी पाप केले आहे, तुझ्या दृष्टीने जे वाईट ते मी केले आहे; म्हणून तू बोलशील तेव्हा न्यायी ठरशील, व निवाडा करशील तेव्हा नि:स्पृह ठरशील. (स्तोत्रसहिता ५१:१-४)*

*हे देवा, माझ्या ठायी शुद्ध हृदय उत्पन्न कर; माझ्या ठायी स्थिर असा आत्मा पुन्हा घाल. (स्तोत्रसहिता ५१:१०)*

पतन झाल्यानंतर दाविदानें केलेली प्रार्थना पापाबद्दल झालेल्या खऱ्या दु:खाचें स्वरुप कसें असतें, हें दाखवितें. त्यास झालेला पश्‍चात्ताप हा अंत:करणापासून होता. आपलें अपराध कमी

करून दाखविण्याचा त्यात प्रयत्न केलेला नव्हता. अनिवार्य ईश्वरी दंड चुकविण्याच्या इच्छेमुळें त्यास प्रार्थना करण्याची प्रेरणा झाली नव्हती. आपण केलेल्या ईश्वरी आज्ञेच्या उल्लंघनाचें महत्व त्याच्या ध्यानांत आलें, आपल्या आत्म्याची नीचावस्था त्याच्या दृष्टीस पडली, व पापाचा प्रार्थना केली असें नव्हें, तर अंत:करणशुद्धि व्हावी ह्या हेतूनें ती केली. पवित्रपणापासून होणारा आनंद, ईश्वराशीं पुन्हां दळणवळण व स्नेहभाव हीं प्राप्त व्हावीं अशी त्यानें इच्छा धरिली, त्याच्या आत्म्यानें पुधें दिल्याप्रमाणें उद्गार काढलें.

"ज्याचा अपराध क्षमा केला आहे, ज्याचें पाप झाकलें आहे तो सुखी आहे, ज्याला परमेश्वर दोष लावीत नाहीं आणि ज्याच्या मनांत कपट नाहीं तो मनुष्य सुखी आहे."1 "हे देवा, तूं आपल्या कृपेप्रमानें मजवर दया कर, आपल्या परम कृपेप्रमाणें मजवर दया कर, माझें दोष पुसून टाक, मला माझ्या अन्यायापासून स्वच्छ धू व माझ्या पापापासून मला निर्मल कर, का कीं मी आपले अपराध स्वीकारतों व माझें पाप मजपुढें नित्य आहे." "एजोवानें मला निर्मल कर, मग स्वच्छ हृदय उत्पन्न कर, आणि माझ्या अंगी शुद्ध आत्मा नवा कर. तूं आपल्या समोरून मला टाकूं नको, आणि अपला पवित्र आत्मा मजपासून काढूं नको. आपल्या तारणाचा आनंद मला परत दे, आणि आपल्या उदार आत्म्याकडून मला संभाळ. हे देवा, माझ्या तारणाच्या देवा, हिंसादोषापासून मला मुक्त कर, म्हणजे माझी जीभ तुझ्या न्यायाचें कथन करील."1

अशा प्रकारचा पश्चात्ताप प्राप्त होणें आपल्या सामर्थ्याच्या धावेबाहेर आहे. जो आकाशांत गेला व ज्यानें मनुष्याला देणग्या दिल्या आहेत त्या फक्त ख्रिस्ताकडूनच ती सिद्धि प्राप्त होते.

**(४) खऱ्या पश्चातापानंतर जी पापकबुली असते त्याचा परिणाम काय असतो?**

*ज्याच्या अपराधाची क्षमा झाली आहे ज्याच्या पापावर पांघरूण घातले आहे, तो धन्य. स्तोत्रसहिता ३२:१*

**(५) पापकबुलीच्या आधी वैचारिक दृष्टीने कोणते स्तर असतात?**

*अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन.मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे 'तुमच्या जिवांना विसावा मिळेल.' (मत्तय ११:२८-२९)*

पुष्कळ लोक या ठिकाणीं चुकतात; म्हणून ख्रिस्त जी मदत त्यांस करण्यास तयार असतो ती त्यांस मिळत नाहीं. त्यांस वाटतें, कीं प्रथम पश्चाताप केल्याशिवाय ख्रिस्ताकडे आपणांस जातां येणार नाहीं. पश्चाताप हा आपल्या पापांच्या क्षमेबद्दल तयारी करतो, व पापाची क्षमा होण्यास पश्चात्ताप अगोदर व्हावा लागतो ह्या गोष्टी खऱ्या, कारण दु:खानें व्याप्त व कष्टी झालेल्या अंत:करणासच तारकाची जरुरी असणार. परंतु पापी मनुश्य ख्रिस्ताकडे येण्यापूर्वी खराखुरा पश्चात्ताप होण्याची वाट पहात बसलें पाहिजे काय ? व अशा रीतीनें पापी व तारणारा प्रभु यांच्यामध्यें पश्चात्ताप होण्याची वाट पहात बसलें पाहीजे काय? व अशा रीतीनें पापी व तारणारा प्रभु यांच्यामध्यें पश्चात्ताप ही एक अडचण होऊन बसायाची काय?

"अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्हीं सर्व मजकडे या म्हणजे मी तुम्हांला विश्रांति देईन."2 या ख्रिस्ताच्या बोलण्याकडे लक्ष देण्यापूर्वी पापी मनुष्याला पश्चात्ताप झालाच पाहिजे असें शास्त्रांत सांगितलेलें नाहीं, ज्याच्यायोगानें खराखुरा पश्चात्ताप होतो तो गुण ख्रिस्ताकडून प्राप्त होतो.

**(६) पापासाठीचे खरे दुख कोणत्या स्त्रोतातून उत्पन्न होते?**

***... ज्या येशूला तुम्ही खांबावर टांगून मारले त्याला आपल्या पूर्वजांच्या देवाने उठवले. त्याने इस्राएलाला पश्चात्ताप व पापांची क्षमा ही देणगी द्यावी म्हणून देवाने त्याला आपल्या उजव्या हाताशी अधिपती व तारणारा असे उच्चपद दिले. (प्रेषित ५: ३०-३१)***

इस्त्रायली लोकांस सांगितलेल्या वचनांत प्रेषित पेत्रस यानें ही गोष्ट अगदीं उघड करुन सांगितली आहे; यावेळीं तो इस्त्राएलांस म्हणाला "त्यानें इस्त्राएलाला पश्चात्ताप व पापांची क्षमा ही देणगी द्यावी म्हणून देवानें त्याला आपल्या उजव्या हातानें राजा व तारणारा असा उंच केला."3 ख्रिस्ताच्या आत्म्याशिवाय जसें आपणांस क्षमा होणें नाहीम तसें सद्सद्विचारशक्तीला जागें करणाऱ्या ख्रिस्ताच्या आत्म्यावाचून पश्चात्ताप करतां येणार नाहीं.

प्रत्येक चांगल्या चेतनेचा उगम ख्रिस्त हा होय. पाप शत्रूसारखें वाटणें ही भावना अंत:करणांत उत्पन्न करणाराहि फक्त तो एकच आहे. सत्य व शुद्धीकरण यांची उत्कंठा व स्वतांच्या पापांबद्दल पूर्ण खात्री हीं, ख्रिस्ताचा

आत्मा आपल्या अम्त:करणांत वास करीत आहे, याची साक्ष देतात.

**(७) पश्चातापाचे वरदान देऊन तारण देऊ करून प्रभू कोणाला स्वतःकडे खेचून घेतो?**

*आणि मला पृथ्वीपासून उंच केले तर मी सर्वांना माझ्याकडे आकर्षून घेईन." (योहान १२:३२)*

येशूनें म्हटलें आहे, कीं "मला पृथ्वीपासून उंच केलें तर मी आपणाकडे सर्वांस ओढीन."1 ख्रिस्त हा जगाचें तारन करणारा असून तो जगाच्या पापासाठीं मरण पावला असा पापी मनुष्यास प्रगट झाला पाहिजे, आणि देवाचा कोंकरा कॅलव्हरी वधस्तभांवर आपण पहात असतां आपल्या मनाशीं तारणाच्या गुढाचा उलगडा व्हावयास लागतो, व ईश्वराचें चांगुलपण आपणांस पश्चात्तापाचा मार्ग दाखवितें. पापी मनुष्याला ती कळुन आली म्हणजे तिच्या योगीनें त्याचें अंत:करण मृदु होतें, त्याच्या मनावर तिचा परिणाम घडून येतो व त्याच्या आत्म्याल पश्चात्तापाची प्रेरणा होते.

ही गोष्ट खरी, कीं मनुष्यांला कधींकधीं आपल्या पापकृत्यांची लाज वाटते, व आपण ख्रिस्ताकडे जात आहों हें त्यांस समजण्यापूर्वीच ते कांहीं पापकृत्यांचा त्याग करितात. जेव्हां जेव्हां ते स्वत:ला मनापासून सुधारण्याचा प्रयत्न करितात व त्या रीतीनें वागण्याची आवड धरीतात, तेव्हां तेव्हां ख्रिस्ताचें सामर्थ्य त्यांच्या आत्म्यावर कार्य करीत असतें, व यामुळें त्यांचे सद्सद्विचारबुद्धीस चलन मिळून त्यांचे आचार पालटतात. स्वतांच्या खांबाकडे त्यांची दृष्टी लागण्यासाठीं व त्यांच्या पापांनी ज्याला छिन्नभिन्न केलें त्याला पाहण्यासाथीं त्यांचें लक्ष आकर्षून घेत असतां ख्रिस्ताची आज्ञा त्याच्या

मनाला पटते. त्यांच्या जिण्यांतील दुष्टपणा व आत्म्यांत भिनून गेलेलें पाप हीं त्यांस दिसायास लागतात. ख्रिस्ताच्या न्यायीपणाची ओळख त्यांस होऊंन ते ओरडून म्हणतात. ज्या पापाच्या भक्ष्यस्थानीं पडलेल्या मनुष्यांच्या तारणाबद्दल प्रभूस एवढा मोठा यज्ञ करावा लागला असें तें पाप आहे तरी काय ? आपला नाश होऊं नये व आपणांस सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावें म्हणून का एवढी प्रीति, हें इतकें सोसणें, व अशा तऱ्हेचा अपमान ह्यांची जरूर होती?

पाप्यानें ह्या प्रीतीला प्रतिकार करावा अगर न करावा, व ख्रिस्ताकडे वळण्यास कबूल व्हावें अगर नाकबूल व्हावें हें त्याच्या खुषीवर अवलंबून आहे. परंतु जर त्यानें तसा प्रतिकार केला नाहीं, तर मात्र तो ख्रिस्ताकडे ओढला जाईल. जीं आपलीं पापें देवाच्या पुत्राच्या मार्गाचें झालेलें ज्ञान त्यांस वधस्तंभाच्या पायथ्याशीं नेतें.

**(८) हे जग देऊ करते त्यापेक्षा अधिक परप्र करून घेण्याची तहान ज्यांना असते त्यांना कोणते अद्भुत आमंत्रण प्रभू देऊ करतो?**

*आत्मा व वधू म्हणतात, "ये," ऐकणाराही म्हणो, "ये." आणि 'तान्हेला येवो;' ज्याला पाहिजे तो 'जीवनाचे पाणी फुकट' घेवो. (प्रगटीकरण २२:१७)*

सर्व चराचर वस्तूंवर कार्य करीत असलेलें दैवी मन मनुष्याच्या अंत:करणाला सांगत आहे व जिचा त्याजपाशी अभाव आहे अशा एका गोष्टीबद्दल त्याचें मनांत अनिर्वाच्य आशा उत्पन्न करीत आहे. ऐहिक वस्तूंनीं त्याच्या आशा तृप्त होऊं शकत नाहिंत. केवळ ज्यांच्या योगानें शांति, समाधान, ख्रिस्ताची कृपा व पवित्रपणाचा आनंद हीं प्राप्त होतील अशाच

गोष्टींचा शोध करण्याविषयीं ईश्वरी आत्म्या त्यांस मोठ्या कळकळीनें सांगतो. पापापासून होणारी क्षणिक व असमाधानाचीं सुखें सोडून मनुष्यांची मनें त्याच्या (ईश्वराच्या) ठायीं असणाऱ्या अमर्याद कृपादानाकडे ओढलीं जावीं म्हणून त्यांना दृश्य व अदृश्य असे उपाय करून आपला तारक एकसारखा करीत आहे.

ह्या जगांतल्या फुटक्या हौदांतून प्यावयास पाणी मिळण्याची व्यर्थ इच्छा बाळगणाऱ्या सर्व आत्म्यांस असा दैवी निरोप आहे, कीं "तान्हेलेला येवो, आणि ज्याला पाहिजे तो जीवनाचें पाणी फुकट घेवो."1

ह्या जगापासून जें कांहीं प्राप्त होतें त्यापेक्षां अधिक चांगलें प्राप्त व्हावें अशी मनापासून इच्छा बाळगणारे तुम्ही ह्यावरून ओळखा, कीं तुमच्या आत्म्यांची वर सांगितलेली इच्छा हाच देवाचा शब्द आहे. पश्चात्तापाचें दान त्यानें तुम्हांस द्यावें व ख्रिस्ताचें अमर्याद प्रेम व त्याची पूर्ण पवित्रता त्यानें प्रगट करावी असें त्याजजवळ मागा.

**(९) ख्रिस्ताचे चारित्र्य जेव्हा आपण पाहतो, आपल्याला पापी ह्या नात्याने कशाची जाणीव होते?**

***आम्ही सगळे अशुद्ध मनुष्यासारखे झालो आहोत; आमची सर्व नीतीची कृत्ये घाणेरड्या वस्त्रांसारखी झाली आहेत; आम्ही सर्व पाल्याप्रमाणे वाळून गेलो आहोत; आमच्या अधर्माने आम्हांला वादळाप्रमाणे उडवून दिले आहे. (यशया ६४:६)***

येशू ख्रिस्ताच्या जीवनक्रमांत ईश्वरी नियमांचीं मूलतत्वें म्हणजे ईश्वरावर मनुष्यमात्रावर प्रेम पूर्णपणें व्यक्त झालीं पाहिजेत. परोपकार व निष्काम प्रीति हींच

त्याच्या आत्म्याचें जीवन झालीं पाहिजेत. आपलीं अंत:करणें किती पापी आहेत हें पाहण्यासाठीं आम्हांस ख्रिस्ताकडे दृष्टि फेंकली पाहिजे. ज्या मानानें त्या तारकाचा आपणांवर दिसेल.

निकदेमसाला ज्याप्रमाणें वाटलें, कीं आपल्या शीलाची नीतिमत्ता बरोबर असून आपलें जिणें सरळपणाचें आहे, म्हणून साधारण पापी मनुष्याप्रमाणें आपणांस ईश्वरापुढें नम्र होण्याचें कारण नाहीं, त्याप्रमाणें आपणही आपली समजूत करून घेत असूं; परंतु आपल्या अंत:करणांत जेव्हां ख्रिस्ताचा प्रकाश पडतो, तेव्हां आपण कितीं अशुद्ध आहों, हें व आपले आपमतलबी हेतु व ज्याच्या योगानें आपल्या आयुष्यक्रमांतील प्रत्येक कर्तव्य अशुद्ध झालें आहे असें जें ईश्वराविषयीम शत्रुत्व हीं दृष्टोत्पत्तीस दिसून येतात, व असें झाल्यावर आपल्या अंत:करणाचा स्वकपोलक्ल्पित न्यायीपणा म्हणजे खरोखर घाणेरड्या चिंध्याप्रमाणें आहे; व ख्रिस्ताचें रक्तच केवळ त्यांतील पापकर्दम नाहींसा करून तें स्वच्छ करील, व स्वतांच्या अंत:करणाप्रमाणें तें बनवील असें आपणांस दिसून येईल.

आपल्या अंत:करणावर पडणाऱ्या देवाच्या वैभवरुप प्रकाशाचा एक किरण, ख्रिस्ताच्या पवित्रपणाचा एखादा ओझरता एक किरण, त्या अंत:करणावर असलेला अशुद्धपणाचा प्रत्येक डाग पूर्णपणें दृश्यमान करतो, व मनुष्याचा शीलाचा घाणेरडेपणा, त्याचें उणेपण, त्याच्या दुष्टवासना, त्याचा अविश्वासूपणा व त्याची अशुद्धता हीं उघड करून दाखवितो.

ईश्वराच्या नियमांचा भंग करणारीं पापी मनुष्याचीं प्रभुद्रोहाचीं कृत्यें त्याच्या नजरेसमोर आणिलीं जातात व त्यामुळें त्याचा

आत्मा, कर्माकर्माची झडती घेणाऱ्या ईश्वरी आत्म्यापुढें कष्टी व दु:खी होऊन जातो, व निष्कलंक असें ख्रिस्ताचें शील दृष्टीस पडलें म्हणजें तो स्वतांलाच दूषण देऊं लागतो.

**(१०) दानियेलाला जेव्हा त्याच्या चारित्र्याचे दोष आढळले व त्यांची जाणीव झाली तेव्हा त्याच्यावर काय परिणाम झाला?**

*मग मी एकटाच राहिलो व हा मोठा दृष्टान्त पाहिला; माझ्यात काही त्राण उरले नाही. मी निस्तेज होऊन मृतप्राय झालो; मला काहीच शक्ती राहिली नाही. (दानियेल १०:८)*

भविष्यवादि दानिएल यानें जेव्हां दूताचें वैभव पाहीलें, तेव्हां तो स्वताम्च्या दुर्बलतेच्या व अपूर्ण दशेच्या जाणणीमुळें अत्यांत कष्टी होऊन गेला. त्या देखाव्यामुळें उत्पन्न होणाऱ्या परिणामाचें वर्णन करितांना तो म्हणतो “माझ्याठायीं शक्ति राहिली नाहीं, आणि माझें तेज माझ्याठायीं पालटून म्लानव झालें, आणि मी बलहीन झालों.”1 ह्याप्रमाणें कष्टी झालेला आत्मा अर्थांतच आपल्या स्वार्थबुद्धीचा तिरस्कार करील, व आपल्या अहंमतेचा त्यास वीट येऊन ख्रिस्ताच्या न्यायीपणाच्याद्वारें ईश्वरी नियमाशीं व ख्रिस्ताच्या शीलाशीं अनुसरून असणाऱ्या शुद्धतेचा तो शोध करील.

**(११) पौलासारखे, आपण जेव्हा ख्रिस्ताची शुद्धता पाहतो तेव्हा काय म्हणतो आणि देवाच्या नियमशास्त्राच्या पवित्र तत्वांचा खरा अर्थ कसा जाणून घेतो?**

*मी नियमशास्त्राविरहित होतो तेव्हा जगत होतो, पण आज्ञा आल्यावर पाप संजीवित झाले आणि मी मरण पावलो. (रोमकरास पत्र ७:९)*

पौलानें म्हटलें आहे, कीं "मी नियमशास्त्रांतील नीतिमत्वाविशयीं निर्दोष ठरलेला आहें."2 म्हणजे प्रत्यक्ष माझ्या हातून पापें झालीं नाहींत, तथापि आत्मिक दृष्टीनें त्यानें विचार केल्यावर आपण पापी आहों असें त्यास दिसून आलें. नियमशास्त्राच्या शब्दार्थाकडे जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां त्यानें नम्र होऊन आपलीं पापे कबूल केलीं. तो म्हणाला "मी नियमशास्त्रावांचून होतों, तेव्हां जिवंत होतों, पण आज्ञा आल्यावर पाप सजीव झालें, आणि मी मेलों."3 नियमशास्त्राच्या भावार्थाकडे त्यानें पाहिल्यावर पापाचें ओंगळ स्वरूप त्याच्या नजरेस आलें, व त्याचा अभिमान नाहींसा झाला.

*माझ्या जीवाला आराम मिळावा ह्यासाठी येशूचे त्याकडे येण्याचे आमंत्रण मी स्वीकारले आणि शिकलो म्हणून त्याचे आभारी आहे.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*जसे त्याने मला स्वतःकडे खेचले, आणि त्याच्यासोबत वचनात अधिक वेळ घालवत असताना, त्याचे नितीमत्व मी पाहतो आणि ह्या गोष्टीची जाणीव मला होते कि माझे जीवन आणि चारित्र्य अशुद्ध आणि अपवित्र आहे.*


**गोल करा: होय अनिश्चित**

*आता तो त्याच्यासारखे अधिक बनण्याची इच्छा माझ्या हृदयात घालत आहे पण मला जाणीव होते कि स्वताहून बदलण्याचे सामर्थ्य माझ्यात नाही.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*त्याच्याकडे मी येऊ शकतो म्हणून आभारी आहे- पापी, असहाय्य आणि अवलंबून राहू शकतो- आणि त्याचे अभिवचन कि मी माझ्या जीवनात बदल घडवून आणीन त्याद्वारे त्याचे गौरव करीन हे आत्मसात करतो.*

**गोल करा:** **होय** **अनिश्चित**



## धडा ४
## अनुताप

**(१) देवाला क्रोधात टाकणारे ह्या वचनात नमूद करण्यात आलेले कोणते पहिले पाप आहे?**

*परमेश्वराचे भय धरणे म्हणजे दुष्कर्माचा द्वेष करणे होय; गर्व, अभिमान, कुमार्ग व उद्दामपणाची वाणी ह्यांचा मी द्वेष करते. (नीतीसुत्रे ८:१३)*

सर्व पापें सारख्याच महत्वाचीं आहेत असें देव मानींत नाहीं; मनुष्याप्रमाणें त्याच्या दृष्टीनेंहि कमी अधिक प्रमाणाच्या पापविषयक गोष्टी आहेत. तथापि एखादें वाईट कृत्य मनुष्याच्या दृष्टीनें कितीका

क्षुल्लक असेना, देवाच्या दृष्टीनें तें लहान नाहीं. मनुष्यानें केलेला न्याय सत्यपूर्ण नसून कोता असतो, परंतु देवाच्या घरी सर्व गोष्टी जशा त्या खरोखर घडल्या असतील त्याप्रमाणेंच त्यांस किंमत देण्यात येते. दारूबाज मनुष्याचा तिरस्कार करून सांगण्यांत येतें, कीं तें पाप त्याच्या स्वर्गसुखाच्या आड येईल, व गर्व, स्वार्थपरायणता व लोभ यांविषयीं फारसा निषेध करण्यांत येत नाहीं. तथापि हीं पापें मुख्यत्वेंकरून ईश्वराविरुद्ध अपराधाची आहेत; कारण तीं त्याच्या शीलामधील औदार्याच्या व पतित न झालेल्या (स्वर्गाचें) सृष्टीचें जीवन जें नि:सीम प्रेम त्यांच्या अगदीं विरुद्ध आहेत. एखाद्या शारीरिक बीभात्स पापांत पडलेल्या मनुष्याला आपल्या पापाबद्दल लज्जा व कमीपणा वाटून ख्रिस्ताच्या कृपेची तो अपेक्षा करील, परंतु गर्वाला कशाचीही जरूरी भासनार नाहीं, व म्हणून ख्रिस्ताचा व त्यानें देऊं केलेल्या असंख्य देणग्यांचा स्वीकार त्याच्या अंत:करणानें करवत नाहीं.

**(२) ज्या प्रमाणे त्या जकातदाराला पापाची जाणीव झाल्यावर त्याने पश्चाताप केला, आपली देखील तशीच प्रामाणिक प्रार्थना काय असली पाहिजे?**

***जकातदार तर दूर उभा राहून वर स्वर्गाकडे दृष्टी लावण्यासदेखील न धजता आपला ऊर बडवत म्हणाला, ‘हे देवा, मज पाप्यावर दया कर!’ (लूक १८:१३)***

“हें बापा, मज पाप्यावर दया कर”1 अशी ज्या जकातदारानें प्रार्थना केली. त्यानें स्वतांला फार दुष्ट असें मानिलें व दुसऱ्यांनींहि त्याला तसेंच मानिलें; परंतु आपणांला कशाची जरूरी आहे हें त्यानें ओळखलें व आपल्या पापाच्या

ओझ्यानें लज्जित होत्साता परमेश्वराजवळ येऊन त्याच्या दयेची अपेक्षा त्यानें केलीं. ईश्वरी आत्म्याचें दयाळूपणाचें कार्य करण्यास व त्याला पापाच्या ओझ्यापासून मुक्त करण्यास त्याचें अंत:करण खुलें होतें. परुश्याच्या अभिमानयुक्त व जींत स्वतांच्या नीतिमत्तेची रेलचेल स्तुती केली आहे अशा प्रार्थनेनें पवित्र आत्म्याचे सामर्थ्याचा त्याचे अंत:करणांत प्रवेश होण्यास तें किती नालायक आहे हें दाखविलें आहे. ईश्वराशीं फटकून वागल्यामुळें दैवी पावित्र्याच्या अगदीं विरुद्ध असणार्‍या आपल्या पापांची ओळख त्यास नव्हती. त्याला कशाचीहि जरुर भासली नाहीं, अर्थात् त्यास कांहीं मिळालें नाहीं.

**(३) पापाची जाणीव होताच, आपण स्वतःच्या प्रयत्नांनी आपल्या जीवनात पावित्र्याची फळे का ग्रहण करू शकत नाही?**

***“मीच वेल आहे, तुम्ही फाटे आहात; जो माझ्यामध्ये राहतो आणि मी ज्याच्यामध्ये राहतो तो पुष्कळ फळ देतो, कारण माझ्यापासून वेगळे असल्यास तुम्हांला काही करता येत नाही. (योहान १५:५)***

जर तुम्हांला आपलीं पापें दिसत असतील तर आपली सुधारणा करून घेण्यास विलंब लावूं नका. ख्रिस्ताजवळ येण्यास आपण योग्य नाहीं असें वाटणारे कितीतरी आहेत ? स्वतांच्या प्रयत्नानें सुधारण्याची आशा तुम्ही करता काय ? “खुशी आपलें कातडें किंवा चित्ता आपले ठिपके पालटूं शकेला काय? मग ज्या तुम्हांस वाईट करण्याची संवय आहे तें उत्तम करूं शकाल ?”2 आपणांला प्राप्त होणारी मदत ईश्वराचे ठायीच संभवते. कोणाच्या उपदेशासाठीं अगर एखाद्या सुसंधीसाठीं अगर अधिक पवित्रपणा

अंगीं येईपर्यंत आपणांला वाट पहांता कामा नये. आपल्या आपण स्वतांसाठीं कांहींएक करूं शकत नाहीं. आहों असेच आपणांला ख्रिस्तापाशीं गेलें पाहिजें.

**(४) ज्या व्यक्तीला पश्चाताप केल्यावर धार्मिकता प्राप्त होते पण नंतर तो देवापासून दूर जातो, अशा नीतिमान मनुष्यावर पापाचा काय परिणाम होतो?**

***"तरीपण नीतिमान आपली नीतिमत्ता सोडून दुष्कर्म करू लागला व दुष्टाच्या सर्व अमंगळ आचारांप्रमाणे वागू लागला, तर तो वाचावा काय? त्याने केलेली सर्व नीतिमत्ता जमेस धरण्यात येणार नाही; त्याने केलेला भ्रष्टाचार व त्याने केलेले पाप ह्यामुळे तो मरेल. (यहज्केल १८:२४)***

ईश्वर आपल्या प्रेमामुळें अगर दयाळूपणामुळें त्याच्या कृपेची अवहेलना करणारासही तारण करील ह्या विचारानें कोणीहि आपली फसवणूक करून घेऊं नये. वधस्तंभावर दृष्टीनेंच मात्र पापाचा विचार केला जातो. जेव्हां कांहीं लोक असें म्हणत बसतात कीं, ईश्वर आपल्या दयाळूपणानें पापी माणसांचा त्याग करीत नाहीं, तेव्हां अशा लोकांनीं कॅलव्हेरी येथें घडलेल्या गोष्टीकडे लक्ष द्यावें. त्याचें कारण असें होतें कीं मनुष्यप्राण्याचें तारण होण्यास तिजशिवाय दुसरा मार्गच नव्हता व ह्या आत्मयज्ञाचे अभावीं मनुष्याला पापाच्या तावडीतून सुटून त्यांचें पवित्र योनींतील प्राण्यांशीं पुन्हां दळणवळण सुरू होणें व आत्मिक जीवनाचें पुन्हा वाटेकरी होणें निव्वळ अशक्य होतें. परंतु ख्रिस्तानें त्यांच्या आज्ञाभंगाचें पातक आपल्या माथीं घेऊन त्यांजबद्दल दु:ख सोसलें. देवाच्या

पुत्राचें तें प्रेम, तें दु:ख सोसणें, तें मरण हीं सर्व पापाच्या भयंकर दुष्टतेची साक्ष देत आहेत, व मोठ्या जोरानें सांगत आहेत, कीं ख्रिस्ताच्या स्वाधीन आत्मा केल्याशिवाय आपल्या तावडींतून कोणालाही सुटतां येत नाहीं, व उच्च प्रकारच्या जीवनाची आशाहि बाळगता येत नाहीं.

**(५) कोणाच्या उदाहरणाचे अनुसरण करण्याची सूचना आपल्याला देण्यात आली आहे?**

***कारण ह्याचकरता तुम्हांला पाचारण करण्यात आले आहे; कारण ख्रिस्तानेही तुमच्यासाठी दुःख भोगले आणि तेणेकरून तुम्ही त्याच्या पावलांवर पाऊल ठेवून चालावे म्हणून त्याने तुमच्याकरता कित्ता घालून दिला आहे: (१ पेत्र २:२१)***

पश्चात्ताप न झालेला मनुष्य कधीं कधीं “सच्छील अशा ख्रिस्ती मनुष्यांइतकाच चांगला आहे” असें बोलून स्वतांचे समर्थन करीत असतो. “असे ख्रिस्ती मनुष्य मजपेक्षां अधिक स्वार्थत्यागी, शांत व परिस्थितीप्रमाणें वर्तन करणारे नाहींत. मला ज्याप्रमाणें ऐहीक सुखाची आवड आहे त्याप्रमाणें त्यांसही ती असते,” अशाप्रकारें तो मनुष्य आपल्या स्वतांच्या कर्तव्याच्या उपेक्षेबद्दल दुसऱ्याचें उणें काढून आपल्यावरील आरोप टाळण्याचा प्रयत्न करितो. परंतु दुसऱ्यांची पातकें व त्यांची व्यंगें काढण्याच्या ह्या सबबीना कोणीहि सुटत नाहीं. कारण प्रभुनें आपणां सर्वांस सर्वथैव चुकीस पात्र व केवळ अनुकरण करणारीं पात्रें असें केलें नाहीं. निष्कलंक असा देवाचा पुत्र कित्त्यादाखल आपणांला दिलेला आहे; व जे नाणावलेल्या ख्रिस्ती माणसाचा मार्ग चुकलेला आहे अशी

तक्रार करीतात त्यांनीं त्यांच्यापेक्षां अधिक चांगला जीवनक्रम चालवून लोकांना अधिक चांगला धडा घालून द्यावा. ख्रिस्ती मनुष्यानें कसें असावें ह्याबद्दल त्यांची उच्चत्वाची कल्पना असेल तर त्या कल्पनेप्रमाणें अधिक चांगलें न करणें हें त्यांचें स्वतांचें पाप नव्हें काय ?योग्य गोष्ट कोणती हें त्यास माहीत असूनहि ती करण्याचें तें नाकारितात.

**(६) पापाचा त्याग न करण्याचे व पवित्र आत्म्याची विनवणी करणारी वाणी न ऐकण्याचे अथवा त्याकडे दुर्लक्ष करण्याचे घटक परिणाम काय आहेत?**

***सरळांचा सात्त्विकपणा त्यांना सांभाळून नेतो, कपटी इसमांचा कुटिलपणा त्यांचा नाश करतो.सात्त्विकाची नीतिमत्ता त्याचा मार्ग नीट करते, पण दुर्जन आपल्या दुष्टतेने पतन पावेल. (नीतीसुत्रे ११:३, ५)***

उद्यांवर ढकलण्याविषयीं सावध रहा. आपल्या पातकाचा त्याग करण्याचें व ख्रिस्तामार्फत आपलीं अंत:करणें शुद्ध करण्याचें भविष्यकालावर टाकूं नका. हजारों लोक चुकतात ते याच ठिकाणीं, व त्यामुळें ते आपलेम कायमचें नुकसान करून घेतात. आयुष्याच्या क्षणभंगुरतेबद्दल व अनिश्चिततेबद्दल मी ह्या ठिकाणीं विचार करीत बसत नाहीं, परंतु इतकें मात्र खचित सांगतों कीं. ईश्व्रराच्या पवित्र आत्म्याच्या सांगीप्रमाणें करण्यास विलंब लावण्यांत व पापामध्येंच कुजत पडणें यांत बरें वाटण्यांत धोका-कधींहि पुरतेपणीं समजून न येणारा धोका- आहे. पाप, मग तें कितीका क्षुल्लक असेना, अमर्याद अशा नुकसानालाच कारणीभूत होईल. जें आपण ताब्यांत ठेवीत

नाहीं तेंच आपल्यावर ताबा करून आपला नाश करील.

आदाम व हव्वा, यांनीं नमा केलेलें फळ खाण्याइतक्या क्षुल्लक गोष्टींचा परिणाम ईश्वरानें सांगितल्याइतका भयंकर होणार नाहीं अशी आपली समजूत करून घेतली; परंतु ही इतकी क्षुल्लक गोष्ट म्हणजे ईश्वराच्या पवित्र नियमाचें उल्लंघन होऊन, व त्यामुळें मनुष्यांची ईश्वरापासून ताटातुट होऊन त्याला मृत्युचें द्वार खुलें झालें. मनुष्यानें ईश्वरी आज्ञेचा भंग केला म्हणून सर्व पृथ्वीवर युगानुयुग शोकाची सत्त आरोळी निघूं लागली व सर्व सृष्टि दु:खानें व शोकानें व्याप्त झाली. ईश्वराविरुद्ध केलेल्या दांडगाईचा परिणाम प्रत्यक्ष स्वर्गाला देखील भोगावा लागला. ईश्वरी नियमाच्या भंगाबद्दल भोगाव्या लागणाऱ्या प्रायश्चित्ताकरीतां केलेल्या अलौकिक आत्मयज्ञाची कॅलव्हरी ही संस्मरणीय जागाच होऊन बसली आहे. सबाब पातक ही केवळ क्षुद्र गोष्ट आहे असें आपण मानतां कामा नये.

आज्ञाभंगाची प्रत्येक बाब, ख्रिस्ताच्या कृपेची प्रत्येक हयगय व अवहेलना हीं आपणांवर कार्य करितात. तिच्या योगानें अंत:करण कठोर होऊन वासना दुष्ट बनतात व बुद्धीला भ्रंश पडतो व केवळ ईश्वराला शरण जाण्याची बुद्धि कमी होते, इतकेंच नव्हें, तर ईश्वरी आत्म्याच्या प्रेमल इच्छेप्रमाणें चालण्यास ती अगदीं असमर्थ होते.

**(७) आपल्या जीवनात ज्ञात पापांना कवटाळून बसण्याचा परिणाम काय होतो?**

*दुर्जनाला त्याची स्वत:चीच दुष्कर्मे पछाडतात; तो आपल्याच पापाच्या पाशात सापडतो. (नीतीसुत्रे ५:२२)*

कित्येक लोक वाटेल त्य वेळीं आपण पापाची दिशा बदलूं ह्या विचारानें गोंधळलेल्या विचारशक्तीस स्वस्थता आणण्याचा प्रयत्न करितात, आणि घरीं चालून आलेल्या ईश्वरी कृपेस तुच्छ मानून पुन: पुन: घोटाळयांत पडतात. त्यांस वाटतें कीं, कृपेच्या आत्म्याचा तिरस्कार करुन सैतानाकडे आपलें संधान बांधून ऐन प्रसंगीं आपणांस आपला मार्ग बदलतां येईल; परंतु हें करणें इतकें कांहीं सोईस्कर नाहीं. आयुष्यांतील अनुभव व शिक्षण यांच्या योगानें असें कांहीं शील बनलेलें असतें कीं, फारच थोडे लोक मूर्तीमंत ख्रिस्ताचा स्वीकार करण्याची इच्छा धरतात.

शीलांतील नुसता एक वाईट गूण, नुसती एकच पापाची इच्छा हीं जर हट्टानें बाळगून ठेवलीं तर ती शुभवर्तमानाचें सर्व सामर्थ्य नि:संशय बाजुला गुंडाळून ठेवतील. पापाची प्रत्येक आवड, आत्म्याचें ईश्वराशीं असलेलें वैर दृढ करितें.

जो मनुष्य अढळ अविश्वासूपणा अगर ईश्वरी सत्याबद्दल पूर्ण निष्काळजीपणा दाखवितो, तो जसें पेरितो तसेंच त्यास फळ मिळतें. शास्त्रांत साधु पुरुषांच्या वचनांस तुच्छ मानण्याविरुद्ध कडक शासन सांगितलें आहे, “पापी मनुष्य आपल्या पापाम्च्या बंधनांत सांपडेल.”1 तें शासन पापाची हयगय करण्याबद्दलच्या शासनाइतकेंच आहे.

**(८) ख्रिस्ताच्या तारण देऊ करण्याच्या आमंत्रणाला आपण केव्हा प्रतिसाद दिला पाहिजे?**

*कारण तो म्हणतो :“अनुकूल समयी मी तुझे ऐकले,व तारणाच्या दिवशी मी तुला साहाय्य केले.” (२ करिंथकरास पत्र ६:२)*

पापापासून आपणांला मुक्त करायाला ख्रिस्त सदाचाच तत्पर आहे, परंतु तो मनुष्याच्या वासनांवर जुलूम करीत नाहीं; आणि जर त्या वासना ईश्वरी आज्ञेच्या उल्लंघनानें नेहमीं पापच करण्यास प्रवृत्त झाल्या, व आपण त्याच्या कृपेचा स्वीकार करण्यास राजी नसलों, तर त्यानें अधिक काय करावें ? त्याची प्रीति नाकारण्याच्या आपल्या निश्चयामुळें आपण आपला नाश करून घेतला आहे. “पहा, आतांच अभिष्ट वेळ; पहा, आतांच तारणाचा दिवस आहे.” “आज जर तुम्हीं त्याची वाणी ऐकाल, तर आपली मनें कठोर करूं नका.”1

**(९) एका कपटी हृदयाचे हेतू, विचार आणि उद्देश ह्यापासून सुटका करून घेण्याची एकमेव सुरक्षित प्रार्थना काय आहे?**

***देवा, माझी झडती घेऊन माझे हृदय जाण; मला कसोटीस लावून माझे मनोगत जाण.माझ्या ठायी दुष्टपणाकडे काही प्रवृत्ती असेल तर पाहा; आणि मला सनातन मार्गाने चालव.***
***(स्तोत्रसहिता १३९: २३-२४)***

“पुष्कळ लोक अंत:करण अशुद्ध अराखून दैवी स्वरूपाचा जो एक प्रकार बौद्धिक धर्म त्याचा अंगिकार करतात. परंतु तुमची प्रार्थना अशी असूं द्या कीं, “हे देवा मजमध्यें स्वच्छ हृदय उत्पन्न कर, आणि माझ्या अंगी शुद्ध आत्मा नवा कर.”2 तुम्ही आत्म्याशीम सत्यानें वागा. तुमचें मृत्युलोकचें जिणें जणूं काय पणास लाविलें आहे असें समजून उल्हासव्रुत्तीनें व चिकाटीनें वागा. ह्या विशयींचा ठराव देवामध्यें व तुमच्या आत्म्यामध्यें शाश्वत सुखाबद्दल व्हावयाचा आहे. कल्पनेंत मात्र आशा, परंतु कृतींत कांहीं नाहीं अशानें तुमचा नाश मात्र होईल.

**(१०) देवाच्या वचनाचा प्रार्थनापूर्वक केलेल्या अभ्यासाचे पाच विशिष्ट फायदे काय आहेत जे आपल्याला पश्चातापाकडे घेऊन जातील?**

***...त्या कोणापासून शिकलास हे, आणि बालपणापासूनच तुला पवित्र शास्त्राची माहिती आहे हे तुला ठाऊक आहे; ते ख्रिस्त येशूमधील विश्वासाच्या द्वारे तुला तारणासाठी ज्ञानी करायला समर्थ आहे. प्रत्येक परमेश्वरप्रेरित शास्त्रलेख सद्बोध, दोष दाखवणे, सुधारणूक, नीतिशिक्षण ह्यांकरता उपयोगी आहे,ह्यासाठी की, देवाचा भक्त पूर्ण होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा. (२ तिमथी ३:१५-१७)***

प्रार्थनापूर्वक देवाच्या वचनाचा अभ्यास करा. त्या वचनांत ईश्वरी नियमांतील व ख्रिस्ताच्या जिण्यांतील पवित्रपणाचीं उदात्त तत्त्वें-ज्यांच्या अभावीं “कोणीहि प्रभुला पाहणार नाहीं”3-सांदितलीं आहेत. तें वचन पापाबद्दल खात्री करितें व मुक्तिचा घोपटमार्ग स्पष्टपणें दाखवितें. तुमच्याआत्म्याबरोबर बोलणार्‍या ईश्वरी वाणीकडे (त्या वचनाकडे) लक्ष द्या.

**(११) पश्चातापाचे वरदान देऊन ख्रिस्ताच्या द्वारे देव आपल्यासाठी काय करत आहे?**

***...म्हणजे जगातील लोकांची पातके त्यांच्याकडे न मोजता, देव ख्रिस्तामध्ये स्वत:बरोबर जगाचा समेट करत होता; आणि त्याने आपल्याकडे समेटाचे वचन सोपवून दिले. (२ करिंथकरास पत्र ५:१९)***

पापाच्या गुन्ह्याचा मोठेपणा जर तुम्हांस दिसत असेल व तुम्हीं खरोखर ज्याप्रमाणें आहांत त्याप्रमाणेंच जर स्वतांस पहात असाल तर निराश होऊं नका. पाप्यांसच तारण्यासाठीं ख्रिस्‌त आला होता. आपणांला ईश्वराशीं तडजोड करावयाची नाहीं, तर-आश्चर्यकारक तें प्रेम !-देव ख्रिस्‌तांत “आपणांशीं जगाचा समेट करीत होता.”4 आपल्या बहकलेल्या लेकरांची अंत:करणें तो आपल्या दयाळूपणाच्या प्रीतिनें आपलीशीं करून घेत आहे. त्याचीं सर्व वचनें, व त्याच्या सूचना हीं अवर्णनीय अशा त्याच्या प्रेमाचा केवळ श्वासोच्छ्‌वासच आहेत.

**(१२) येशू कोणाचे तारण करण्यासाठी आला?**

***ख्रिस्त येशू पापी लोकांना तारण्यास जगात आला, हे वचन विश्वसनीय व पूर्णपणे स्वीकारण्यास योग्य आहे; त्या पापी लोकांपैकी मी मुख्य आहे. (१ तिमथी १:१५)***

तुम्ही पापी आहांत असें जेव्हां सैतान सांगायाला येईल तेव्हां तुम्ही आपल्या तारणाऱ्याकडे पाहणें हेंच काय तें तुम्हांला उपयोगी पडेल. आपलें पाप कबूल करा, परंतु शत्रुला सांगा कीं “पाप्याच्या तारणासाठीं येशू ख्रिस्‌त जगांत आला,”तिम. १:१५. म्हणजे त्याच्या अतुल प्रितीनें तुझें तारण होईल.

**(१३) कोण ती व्यक्ती आहे जी प्रभूवर सर्वाधिक प्रेम करेल?**

येशूनें शिमोनला दोन कर्जदारासंबंधानें प्रश्न विचारीला. त्यांपैकीं एकाला लहानशी रक्कम आपल्या धन्याला द्यावयाची होती व दुसऱ्याला बरीच द्यावयाची होती. धन्यानें दोघांसहि ज्याच्या त्याच्या रकमा सोडून दिल्या;

ख्रिस्तानें शिमोनला विचारलें ह्या दोघांपैकीं कोणता देणेदार धन्यावर अधिक प्रीति करिल ? शिमोननें उत्तर केलें "ज्याला अधिक सोडलें तो."

आपण फार पापी आहों, परंतु आपणांला क्षमा व्हावी एतदर्थ ख्रिस्त मरण पावला. त्याच्या आत्मयज्ञाचें पुण्य आपणांकरीतां बापापुढें करणें पुरेसें झालें. ज्यांला त्यानें अधिक क्षमा केली ते त्याजवर ज्यास्त प्रीति करणार , व त्याच्या प्रीतीबद्दल व अलौकिक स्वार्थत्यागाबद्दल त्याचें स्तुतिस्तोत्र गाण्यास ते त्याच्या सिंहासनाजवळ उभे राहतील. इश्वराच्या प्रेमाची पूर्णपणें कल्पना जेव्हां आपणांस होते तेव्हां पापाचीहि योग्य किंमत आपणांस कळून येते. आपणांसाठीं खालीं सोडून दिलेल्या साखळीची लांबीं जेव्हां आपन पाहतों व जेव्हां आपणांप्रीत्यर्थ ख्रिस्तानें केलेल्या आत्मयज्ञाची कांहींशी ओळख आपणांस होते, तेव्हा आपलें अंत:करण प्रेमानें व पश्चात्तापानें भरून येतें.

*मी माझ्या तारणार्याकिडे अधिक समीप येतो तसे मी त्याचे नितीमत्व पाहतो. मला जाणीव होते कि माझे जीवन आणि चारित्र्य हे अशुद्ध आणि अपवित्र आहे. त्याच्यासारखे अधिक बनण्याची माझी प्रामाणिक इच्छा आहे.*

**गोल करा:** होय अनिश्चित

*मला हे समजते कि पापासाठी पश्चाताप हे खरे दुख आहे आणि त्याद्वारे मिळणारी शिक्षा एवढेच नाही.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*येशूने माझ्या हृदयात जे पश्चातापाचे वरदान घातले त्यासाठी मी त्याचे आभारी आहे, आणि त्यावर कृती करण्याची मी निवड करतो.*

**गोल करा: होय अनिश्चित**



## धडा ५
## पापस्वीकार

**(१) आपल्याला पापी ह्या नात्याने दया प्राप्त करून घेण्यासाठी अटी काय आहेत?**

***जो आपले दोष झाकतो त्याचे बरे होत नाही; जो ते कबूल करून सोडून देतो त्याच्यावर दया होते. (नीतीसुत्रे २८:१३)***

"जो आपली पातकें झांकतो तो कल्याण पावणार नाहीं, परंतु जो पाप पदरीं घेऊंन सोडतो तो दया पावेल."1

ईश्वराची दया प्राप्त करून घेण्याच्या अटी साध्या, न्यायाच्या व संयुक्तिक आहेत. पापाची क्षमा व्हावी म्हणून एखादी कष्टदायक गोष्ट आपण करावी अशी प्रभूची इच्छा नाहीं.

आपल्या जिवाची शिफारस करण्यासाठीं दूरदूरच्या व अति कष्टाच्या यात्रा करण्याची किंवा शरीरदंड सोसण्याची कशाचीहि जरूर नाहीं; परंतु जो मनुष्य आपलें पाप पदरीं घेऊन त्याचा त्याग करितो तोच मात्र दया पावेल.

**(२) कोणापुढे आपण आपले दोष व चुका कबूल केल्या पाहिजे?**

*तेव्हा तुम्ही निरोगी व्हावे म्हणून आपली पातके एकमेकांजवळ कबूल करून एकमेकांसाठी प्रार्थना करा. नीतिमानाची प्रार्थना कार्य करण्यात फार प्रबळ असते. (याकोब ५:१६)*

*मी आपले पाप तुझ्याजवळ कबूल केले; मी आपली अनीती लपवून ठेवली नाही; “मी आपले अपराध परमेश्वराजवळ कबूल करीन” असे मी म्हणालो, तेव्हा तू मला माझ्या पापदोषाची क्षमा केलीस. (स्तोत्रसहिता ३२:५)*

प्रेषितानें म्हटलें आहे “तुम्ही निरोगी व्हावें म्हणून एकमेकांजवळ आपलीं पातकें कबूल करून एकमेकांसाठीं प्रार्थना करा.”1 ज्या एका ईश्वरालाच पापाची क्षमा करितां येते त्याजवळ तुम्हीं आपलीं पातकें कबूल करा, व एकमेंकांजवळ एकमेकांविरुद्ध केलेले मात्र अपराध कबूल करा. तुम्हीं आपल्या मित्राला अगर शेजाऱ्याला दुखविलें असेल तर आपली चूक पदरांत घ्या म्हणजे त्यानें तुम्हांला मोकळया मनानें क्षमा करणें हें त्याचें कर्तव्य आहे; नंतर ईश्वराचीं क्षमा तुम्हांला मागितली पाहीजे, कारण ज्या भावाला तुम्हीं दुखविलें ती ईश्वराची मालमत्ता असल्यामुळें त्यास दुखविण्यांत त्याचा उत्पन्नकर्ता व तारणारा याविरूद्ध तुम्हीं पाप केलें, असें होईल. “जो सर्व प्रकारें आम्हांप्रमाणें पारखलेला होता तरी

निष्पाप राहीला, व जो आमच्या दु:खानें कळवळला"2 व जो आमच्या पापाचा प्रत्येक डाग धुऊन काढण्यास समर्थ आहे अशा त्या आपल्या खऱ्या मध्यस्थ व प्रमुख याजकापुढें ही फिर्याद आणिलीं जाते.

**(३) देवाची खरी शांती आणि जवळीक ह्यांचा अनुभव घेण्यासाठी आपल्या हृदयाची आणि आत्म्याची परिस्थिती कशी असली पाहिजे?**

*परमेश्वर भग्नहृदयी लोकांच्या सन्निध असतो; अनुतप्त मनाच्या लोकांचा तो उद्धार करतो. (स्तोत्रसंहिता ३४:१८)*

आपलें अपराध कबूल करण्याच्या बाबतींत ज्यांनीं आपणाला ईश्वरापुढें नम्र केलें नाहीं अशा लोकांनीं, त्यानें त्यांचा स्वीकार करण्याच्या अटीपैकीं अगदीं पहिली अट-नम्रतेनें पाप स्वीकार करण्याची-पुरी केली नाहीं. ज्याच्याबद्दल आपणांस अनुताप व्हावयाचा नाहीं अशा दैवी पश्चात्तापाच अनुभव आपण घेतला नसेल व आपल्या खऱ्या लज्जित स्थितीनें व दुभंग झालेल्या अंत:करणानें आपल्या पापांचा तिरस्कार करून जर तीं कबूल केलीं नाहींत, तर खुल्या अंत:करणानें त्यांच्या क्षमेची अपेक्षा केली नाहीं असें होईल; व जर कधीं अशी अपेक्षाच केली नाहीं तर ईश्वराच्या शांतीचा लाभही कधी झालेला नाहीं असें होईल. पूर्वी झालेल्या पापापासून विनिर्मुक्त न होण्याचें कारण आपलीं अंत:करणें नम्र करण्यास व सत्यवचनांत (शुभ्वर्तमानांत) सांगितलेल्या अटी कबूल करण्यास आपण तयार नाहीं, हें होय.

**(४) पापाची आपली कबुली किती विशिष्ट असली पाहिजे?**

*‘तो अशा कोणत्याही गोष्टीविषयी दोषी ठरला तर ज्या बाबतीत त्याने पाप केले ती त्याने कबूल करावी. (लेवीय ५:५)*

शास्त्रांत सदरहू बाबीसंबंधानें उघड उघड सूचना दिलेला आहे. पापाची कबुली, मग ती सर्व समाजांत केलेली असो, अगर गुप्तपणें केलेली असो, अंत:करनपूर्वक व स्पष्टपणें मात्र केलेली असली पाहिजे. अशी कबूली पापी मनुष्यापासून ओढून ताणून काढावयाची नसते, अगर पापाबद्दल तिरस्कार वाटणार्‍या शीलाची खरी किंमत समजण्याचें सामर्थ्य ज्यांचें ठायीं नसतें अशा मनुष्यांपासून जबरदस्तीनें काढवयाची नसते. अंतस्थ आत्म्यापासून स्वाभाविकपणें निघालेला पापाच्या कबुलीचा ओघ दयासागर ईश्वराकडे आपला मार्ग काढीत असतो. गीतकारानें म्हटलें आहे कीं, “मनाचें नम्र यांजवळ परमेश्वर असतो, आणि आत्म्यानें दीन असतील त्यांस तारतो.”1

अंत:करणपूर्वक केलेलीं पापाची कबुली ही कांहीं विशिष्ट प्रकारची असून तो केलेलीच पापें प्रत्यक्ष कबूल करतें. तीं पापें कदाचित् ईश्वरापुढेंच आणण्याच्या स्वरूपाची असतील, अगर आपल्याकडून ज्यांस त्रास पोहोंचला असेल अशा व्यक्तीपुढें कबूल करण्यासारख्या दुष्कृत्यांच्या स्वरूपाची असतील, अगर तों सामाजिक स्वरूपाचीं असलीं तर सर्व समाजापुढें कबूल करावयाची असतील. म्हणून पापाची कबुली, मग ती कोणत्याही पापाची केलेली असो, पद्धतशीर, मुद्देसूद व ज्या पापाबद्दल तुम्ही अपराधी असाल तीच कबूल करनारी असली पाहिजे.

### (५) इस्राएल लोकांनी कोणत्या विशिष्ट पापाची कबुली दिली?

*तेव्हा सर्व लोक शमुवेलास म्हणाले, "आपल्या दासांप्रीत्यर्थ आपला देव परमेश्वर ह्याची प्रार्थना करा म्हणजे आम्ही मरणार नाही; आम्ही राजा मागितला त्यामुळे आमच्या एकंदर पातकांना हे एक दुष्कर्म आम्ही जोडले आहे." (१ शमुवेल १२:१९)*

शमुवेलच्या वेळीं इस्त्राएल लोक देवापासून दुरावले होते, व आपल्या पापाचें प्रायश्चित भोगीत होतें; कारण ईश्वरावरील त्यांचा विश्वास उडून गेला होता. त्याचें सामर्थ्य व राष्ट्रांवर राज्य करण्याचें त्याचें शहाणपण हीं ओळखण्याची त्यांची शक्ति नष्ट झाली होती, व आपलें कार्य संभाळून तें तडीस नेण्याविषयींच्या त्याच्या बुद्धिचातुर्यावरिल त्त्यांचा विश्वास उडाला होता. सर्व जगावर सत्ता करणार्‍या ईश्वरास पाठमोरे होऊन सभोंवतालच्या इतर राष्ट्रांप्रमाणें राजकीय अमलाखाली राहण्याची त्यांनीं इच्छा बाळगली. त्यांस शांतता प्राप्त होण्यापूर्वी त्यांनीं "आम्ही राजा मागण्यानें आपल्या सर्व पापांवर आणखा दुष्कर्म केलें आहे"2 ह्याप्रमाणें पापस्वीकार केला. ज्या पापाबद्दल ते गुन्हेगार ठरेल होते तेंच पाप त्त्यांस कबुल करायाचें होतें. त्यांच्या कृतघ्नपणानें त्यांच्या जीवास टोचणी लावून त्याम्स इश्वरापासून दूर ठेविलें.

**(६) देवाला आपली कबुली मान्य होण्यासाठी, क्षमा मिळवून घेण्यसाठी आपली प्रामाणिक इच्छा व्यक्त करण्यात आपण कोणती कामगिरी बजावली पाहिजे?**

*"आपणांस धुवा, स्वच्छ करा; माझ्या डोळयांपुढून आपल्या कर्मांचे दुष्टपण दूर करा; दुष्टपणा करण्याचे सोडून द्या; (यशया १:१६)*

अंत:करणपूर्वक केलेल्या पश्चात्तापशिवाय व शीलाची सुधारणा झाल्याशिवाय केलेला पापस्वीकार ईश्वर मान्य करणार नाहीं. जीवनक्रमांत कायमचाच फरक झाला पाहिजे. ईश्वराविरुद्ध असलेला प्रत्येक गोष्टीचा त्याग केला पाहिजे व असें होणें हा पापाबद्दल झालेल्या खऱ्याखुऱ्या दु:खाचाच परिणाम होईल. आपणांला करावयाचें काम आपणांपुढें स्पष्टपणें मांडिलें आहे. “तुम्ही धुवा, आपणांस स्वच्छ करा, आपल्या आचारांचें दुष्टपणें माझ्या डोळयांपुढून दूर करा; दुष्ट करणें सोडा, उत्तम करायास शिका, नीति करायास शोधा, जाचलेल्यांस सुखी करा, अनाथाम्चा न्याय करा, विधवेची दाद लावा.”1

**(७) शक्य असेल तेव्हा ज्या लोकांना आपण दुखावले, लुबाडले, अथवा इजा पोहचवली त्यांच्यासाठी आपण काय केले पाहिजे?**

*तो दुर्जन गहाण परत करील, हरण केलेले परत देईल, आणि काहीएक अधर्म न करता जीवनाच्या नियमांप्रमाणे चालेल तर तो जगेलच, मरायचा नाही. (यहज्केल ३३:१५)*

**(८) आदाम आणि हव्वा ह्यांनी त्यांच्या कृतीसाठी कोणावर दोष लावला, ज्यामुळे देवाच्या ठायी त्यांची पापकबुली अमान्य झाली?**

*आदाम म्हणाला, “जी स्त्री तू मला सोबतीला दिलीस तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि ते मी खाल्ले.” (उत्पत्ती ३:१२)*

*परमेश्वर देव त्या स्त्रीला म्हणाला, “हे तू काय केलेस?” स्त्री म्हणाली, “सर्पाने मला भुरळ घातली म्हणून मी ते खाल्ले.” (उत्पत्ती ३:१३)*

"जर दुष्ट गहाण परत देईल, व जें हरलेलें तें परत भरून देईल, अन्याय केल्यावांचून जिवाच्या नेमाप्रमाणें वर्तेल, तर तो वांचेलच; मरणार नाही."2 पश्चातापाविशयीं साम्गतांना पौल म्हणतो "देवाच्या मनाप्रमाणें तुमच्या दु:खाचा प्रकार होता, याच गोष्टीनें तुम्हांस केवढी कळकळ, होय. केवढें दोषनिवारण, होय, केवढा संपाप,होय, केवढें भय, होय, केवढी उत्कंठा,होय, केवढी आस्था, होय, केवढी शिक्षा करण्याची बुद्धि हीं उत्पन्न झालीं. याकामांत तुम्हीं सर्व प्रकारें निर्दोष आहां असें तुम्ही पतविलें"3

पापामुळें मनाच्या नीतिदृष्ट्या शक्ति व धीर होताता तेव्हां दुष्कर्म करणारांस आपल्या आचरणांतील व्यंगें दिसत नाहींत व पापाच्या अपराधाच्या महत्त्वाची योग्य कल्पना त्यास होत नाहीं; व पवित्र आत्म्याचें दोषी ठरविण्याचें जें सामर्थ्य त्याच्या इच्छेस त्यानें मान न दिला तर तो आपल्या पातकांविषयीम बहुतेक अंधदृष्टि बनतो. त्यानें केलेले पापस्वीकार अंत:करणपूर्वक व कळकळिचे नसतात. अमुक अमुक गोष्टी नसत्या तर मीं अमुक अमुक केलें असतें अशा प्रकारच्या सबबी तो ज्या अपराधांबद्दल त्त्याची निर्भत्सना केली जाते त्या अपराधांवर पांघरूण घालण्यासाठीं पुढें आणितो.

आदाम व हव्वा यांनीं मना केलेंले फळ खाल्ल्यानंतर त्यांस लज्जा व भीती वाटूं लागली. पहिल्या प्रथम त्यांचा विचार, आपल्या पापाबद्दल काय सबब सांगावी व भयंकर स्मरणदंड कसा चुकवावा हा होता. प्रभूनें त्यांस त्यांनीं केलेल्या पातकासंबंधानें विचारिलें तेव्हां कांहीं दोष ईश्वरावर व कांहीं आपल्या सहधर्मिणीवर ठेऊन आदाम म्हणाला. "जी स्त्री तूं मला दिली तिनें त्या झाडाचें फळ मला दिलें

व म्यां खाल्लें.” बायकोनेहि आपल्यापरी सर्पावर दोष ठेऊन ती म्हणाली “सापानें मला भुलविलें आणि म्यां खाल्ले”1 तूं अगोदर सर्पच कशाला केलास ? त्याला एदेनमध्यें येऊन का दिलेंस ? अशाप्रकारे स्वतांच्या पतनाची जबाबदारी ईश्वरावर ढकलणारे प्रश्न पापाबद्दल सांगितलेल्या त्यांचा सबबींत गर्भींत अर्थानें होते. स्वतांस न्यायी ठरविण्याची बुद्धि असत्याचा मूळ पुरूष लबाडांचा बाप जो सैतान त्याजपासून उत्पन्न होऊन आदामाच्या वंशजात कायम राहिली नसल्यामुळें ईश्वरास मान्य झाली नाहीं. खरा अनुताप म्हटला म्हणजे तो स्वतांच्या अपराधाचें माप, फसवणूक अगर लबाडी न करितां स्वतांच्याव शिरावर घ्यावयास लावील. गरीब जकातदाराप्रमाणें आकाशाकडे विशेष रीतीनें दृष्टी न लावितां “हें ईश्वरा, मज पाप्यावर दया कर.”2 असें तो म्हणेल. जे आपलीं पापें कबूल करतील तेच न्यायी ठरतील, कारण पश्चात्तापी आत्म्याबद्दल प्रभु ख्रिस्त स्वतांच्या रक्तानें मध्यस्थी करील.

**(९) जकातदराने स्वतःकडे कशा नजरेने पाहिले?**

***जकातदार तर दूर उभा राहून वर स्वर्गाकिडे दृष्टी लावण्यासदेखील न धजता आपला ऊर बडवत म्हणाला, ‘हे देवा, मज पाप्यावर दया कर!’ (लूक १८:१३)***

ज्यांत पापांबद्दल कोनतीहि सबब सांगितलेली नव्हती व स्वतांस न्यायी ठरविण्याचा प्रयत्न केला नव्हता, अशी खऱ्या पश्चात्तापाची व लाजेची शास्त्रांत जी उदाहरणें सांगितलीं आहेत त्याम्त पापाम्गीकाराचें लक्षण स्पष्टपणें सांगितलें आहे. प्रेषित पौलानें स्वताम्चा बचाव करण्याचा प्रयत्न केला

नव्हता. आपल्या पापाचें स्वरूप कमी करण्याचा प्रयत्न न करितां त्यानें तें शक्य तितक्या वाईट स्थितींत उघड करून दाखविलें. तो म्हणतो,

**(१०) पापासाठी आपले खरे दुख व्यक्त करण्यासाठी दावीद आणि पूल ह्या दोघांनी कोणता विशिष्ट शब्द वापरला?**

*आणि तसे मी यरुशलेमेत केलेही; मी मुख्य याजकांपासून अधिकार मिळवून पुष्कळ पवित्र जनांना तुरुंगात कोंडून टाकले; आणि त्यांचा घात होत असताना मी संमती दिली. प्रत्येक सभास्थानात त्यांना वारंवार शासन करून त्यांना दुर्भाषण करायला लावण्याचा प्रयत्न मी करत असे; त्यांच्यावर अतिशय पिसाळून जाऊन बाहेरच्या नगरांपर्यंतदेखील मी त्यांचा पाठलाग करत असे. (प्रेषित २६:१०-११)*

*कारण मी आपले अपराध जाणून आहे, माझे पाप माझ्यापुढे नित्य आहे. तुझ्याविरुद्ध, तुझ्याविरुद्धच मी पाप केले आहे, तुझ्या दृष्टीने जे वाईट ते मी केले आहे; म्हणून तू बोलशील तेव्हा न्यायी ठरशील, व निवाडा करशील तेव्हा निःस्पृह ठरशील. (स्तोत्रसहिता ५१:३-४)*

प्रामाणिक पापकबुलीची उदाहरणे: लूक १८:१३, १४; १५:१८-२१; स्तोत्रसहिता ५१:३,४; २ शमुवेल १२:१३; दानियेल ९:३-१२, १८; यिर्मया ३:२५

अप्रामाणिक पापकबुलीची उदाहरणे: उत्पत्ती ३:१२, १३; १ शमुवेल १५:२२-२६; यहोशवा ७:१९-२१

“मुख्य याजकांपासून अधिकार मिळवून बहूत पवित्र लोकांस बंदीशाळेत कोंडून टाकिलें, आणि त्यांच्या घातास मीं समत्ति दिलीं; आणि प्रत्येक सभास्थनांत त्यास वारंवार शासन करुन दुर्भाषण करण्यास लावण्याचा प्रयत्न करीत असें, आणि त्यांवर अतिशय पिसाळून बाहेरच्या नगरांपर्यंत देखील मी त्यंच्या पाठीस लागें.”1 “ख्रिस्त येशु पाप्यांस तारायास आला, त्या सर्व पाप्यांत मी मुख्य आहे.”2 “ख्रिस्त येशु पाप्यांस तारायास आला, त्या सर्व पाप्यांत मी मुख्य आहे.”

**(११) आपल्या पापासाठी जर खऱ्या अर्थाने दुखी होऊन देवासमोर जर ते आपण कबूल केले तर कोणते अद्‌भुत अभिवचन आपण आत्मसात करू शकतो?**

***जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील. (१ योहान १:९)***

खऱ्या पश्चात्तापाच्या स्वाधीन होऊन नम्र व कष्टी झालेल्या अंत:करणालाच ईश्वराच्या प्रीतीची व कॅलव्हरी येथें दिलेल्या किमतीची कांहींशी किंमत समजणार: आणि ज्या प्रमाणें मुलगा आपल्या प्रिय बापापुढें कबुलीजबाब देतो त्याप्रमाणें खरा पश्चात्तापी मनुष्य आपलीं पापें ईश्वरापुढें मांडतो.

***पश्चातापाचे वरदान देवाने मला दिले म्हणून मी त्याची स्तुती करतो आणि त्याचे अनुसरण करण्याची निवड करून मी पापकबुली करतो आणि सर्व पापांचा त्याग करतो.***

**गोल करा: होय अनिश्चित**

*मला समजते कि दया प्राप्त करून घेण्यासाठी आणि माझ्या हृदयात खरी शांती मिळवण्यासाठी मी देवाच्या समोर माझे विशिष्ट पाप कबूल केले पाहिजे, आणि जेव्हा शक्य होईल, ज्यांना मी दुखावले त्यांच्यासमोर देखील ते कबूल करावे.*

गोल करा: होय अनिश्चित

*अभ्यास करत असताना मी जसे ख्रिस्ताच्या अधिक समीप जातो, मला जाणीव होते कि माझ्या भूतकाळात मी अनेक लोकांना दुखावले, लुबाडले किंवा इजा पोहचवली. देवाच्या कृपेने मी प्रतिज्ञा करतो कि, शक्य तितके, मी सर्व गोष्टी बरोबर करेन.*

गोल करा: होय अनिश्चित

*त्याच्या विरुद्ध व त्याच्या निर्मितीविरुद्ध मी जे अधर्म केले त्यांना देवाने त्याच्या अनमोल रक्ताने झाकून टाकावे.*

गोल करा: होय अनिश्चित

*माझी प्रार्थना आहे कि जर मी त्याच्या मार्गापासून दूर गेलो तर देव मला पश्चातापाचे वरदान देईल आणि माझ्या पापांची कबुली करण्यास मार्गदर्शन करेन जेणेकरून त्याच्या नावास्त्व मी नितीमत्वाच्या मार्गात चालावे.*

गोल करा: होय अनिश्चित

______________________________________

______________________________________

______________________________________

______________________________________

______________________________________

______________________________________



## धडा ६
## आत्मनिवेदन

**(१) प्रभूचा शोध करण्यासाठी आपण त्याला कसे शोधावे आणि त्यामुळे त्याच्या प्रतीरुपात कसे जोडले जाऊ शकतो?**

*तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागाल, तेव्हा मी तुम्हांला पावेन. (यिर्मया २९:१३)*

“तुम्हीं आपल्या सार्‍या हृदयानें मला शोधाल तेव्हां तुम्ही हुडकाल व पावाल,”1 असें देवाचें वचन आहे. स्वभावत:च आपण ईश्वरापासून दुरावलेले आहोंत.

**(२) देवाच्या हस्तक्षेपाच्या शिवाय आपली परिस्थिती कशी होते?**

*तुम्ही आपले अपराध व आपली पातके ह्यांमुळे मृत झालेले होता; (इफिसकरास पत्र २:१)*

“अपराधांनी व पापाग्नी मेलेलें” “सर्व मस्तक दु:खी व सर्व हृदय रोगी आहे; त्यांत कांहीं आरोग्य नाहीं,” असें आपलें वर्णन पवित्र आत्म्यानें केलें आहे. सैतानाच्या पाशांत पूर्णपणें अडललेलें व “त्यानें आपल्या इच्छेस वश होण्यासाठीं धरलेलें.”2 असे आपण आहोंत आपणांस बरें करण्याची व त्याच्या पाशांतून मुक्त करण्याची ईश्वरी इच्छा आहे, परंतु असें होण्यास ज्याअर्थी आपनांमध्यें सर्वस्वीं पालट होणें जरूर आहे, व आपला स्वभाव नवीन बनणें जरूर आहे, त्याअर्थीं आपण त्यास पूर्णपणें शरण गेलें पाहिजे.

आजपर्यंत जितक्या लढाया झाल्या त्या सर्वात “स्व” च्या विरुद्ध केलेली लढाई अतिशय महत्त्वाची आहे. ईश्वराच्या इच्छेला स्वार्पण करणें व त्याला सर्वस्वी शरण जाणें ह्या गोष्टीला बराच झगडा करावा लागतो; परंतु आत्म्याला पवित्रपणा प्राप्त होण्यापूर्वी त्यानें ईश्वराला शरण गेलें पाहिजे.

**(३) देवाने दिलेल्या कोणत्या आमंत्रणाने हे दिसते कि त्याने आपल्याला निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे?**

***“परमेश्वर म्हणतो, चला, या, आपण बुद्धिवाद करू; तुमची पातके लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखी पांढरी होतील; ती किरमिजासारखी तांबडी असली तरी लोकरीसारखी निघतील. (यशया १:१८)***

अंधदृष्टीनें केलेलें आत्मसमर्पण व अविचारानें केलेलेम आत्मसंयमन यांच्या पायावर उभारलेलें असें सैतानानें भासविल्याप्रमाणें देवाचें राज्य नाहीं. तें आपल्या बुद्धिस व सद्सद्विचारशक्तीस पटणारें आहे. उत्पन्न केलेल्या प्राण्यास त्यानें पाचारण

केलें आहे. कीं "याहो, आपण विवाद करुं."1 त्यानें निर्माण केलेल्या प्राण्यांच्या इच्छाशक्तीवर तो जुलूम करीत नाहीं व नाखुषीनें व बुद्धिपुर:सर न केलेल्या आत्मनिवेदनानें मनाचीं अगर शीलाची वाढ होण्यास प्रतिबंध होऊन तें मनुष्याला ठराविक गति दिलेलें एक यंत्रच बनवील. परंतु अशा प्रकारचा ईश्वराचा इरादा नाहीं. सकलसृष्टिचा मुगुटमणि जो मनुष्यप्राणी त्यास शक्य त्या उच्च स्थितीस पोहोंचवावें अशी त्याची इच्छा आहे, त्यानें मनुष्यापुढें उच्च स्थितीचें चित्र ठेविलें असून आपल्या कृपेनें त्यास तें प्राप्त करून द्यावें अशी त्याची इच्छा आहे. ईश्वरी इच्छेनें कार्य आपणांमध्यें व्हावें व त्यासाठीं आपण स्वतांला त्यास वाहून घ्यावें म्हणून तो आपणांस बोलावीत आहे. पापाच्या गुलामगिरीपासून मुक्त होऊन देवपुत्रांच्या वैभवयुक्त स्वतंत्रतेचा लाभ घेंणें हें आपल्या इच्छेवर अवलंबून आहे.

**(४) जेव्हा आपण देवाच्या अधीन होतो आणि ख्रिस्ताचे शिष्य बनतो तेव्हा काय करण्याची इच्छा आपली असावी?**

***म्हणून त्याचप्रमाणे तुमच्यापैकी जो कोणी आपल्या सर्वस्वाचा त्याग करत नाही त्याला माझा शिष्य होता येत नाही. (लूक १४:३३)***

आत्मनिवेदन करावयाचें म्हणजे ज्या गोष्टीमुळें ईश्वरापासून आपण दूर राहूं त्या सर्व गोष्टींचा त्याग करणें होय; ह्याविषयीं तरक प्रभु यानें म्हटलें आहे, "तुम्हांतील जो आपल्या सर्वस्वाचा त्याग करीत नाहीं त्याच्यानें माझा शिष्य होववत नाहीं."1 जी जी गोष्ट आपल्या अंत:करणाला ईश्वरापासून दूर करील त्या त्या गोष्टीचा आपण त्याग केला पाहिजे. द्रव्यलोभ

ही एक सैतानाची आपनांस बद्ध करणारी सोन्याची बेडीच आहे. कीर्ति व ऐहीक सन्मान हेंच ज्याचें दैवत अशा लोकांचा दुसरा एक वर्ग आहे. आणखी कित्येक असे आहेत, कीं सुखस्वार्थ व अंगचोरपणा हेंच त्यांचें ब्रीद ! अशा लोकांचें वर्ग साफ नाहीसे करून टाकिले पाहिजेत. अर्धे ईश्वराचे व अर्धे जगाचें असें आपणांस होतां येत नाहीं. ईश्वराचे असे पूर्ण असल्याशिवाय आपण त्याची लेंकरें नव्हेत.

**(५) आपले तारण आपण का मिळवून घेऊ शकत नाही?**

***कारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे तुमचे तारण झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही, तर हे देवाचे दान आहे, (इफिसकरास पत्र २:८)***

कित्येक असे आहेत, कीं ते ईश्वराचे नियम पाळण्यास, उत्तम शील बनविण्यास, व मुक्ति मिळविण्यास स्वतांच्याच प्रयत्नांवर विसंबून राहून देवाची सेवा करण्याचा बाणा बाळगणारे आहेत. ख्रिस्ती प्रीतीच्या थोर ज्ञानानें त्यांचें अंत:करण उचंबळून येत नाही, परंतु ईश्वरानें लावून दिलेली जीं कर्तव्यें आहेत तीं करण्याचा ते प्रयत्न करितात, जणूंकाय ह्याद्वारें स्वर्गप्राप्ति होईल. अशा प्रकारच्या धर्म कुचकामाचा आहे. ख्रिस्ताचें वास्तव्य ज्या वेळीं अंत:करणांत होतें त्या वेळीं त्याच्या प्रीतीनें त्याशी झालेल्या दळणवळणाच्या आनंदानें आत्मा इतका भरून जातो, कीं तो व ख्रिस्त हीं दोन्ही एकरुपच होऊन जातात, व केवळ त्याचेच ठिकाणीं ध्यान असल्यामुळें त्याचें “स्व” त्व अजीबात नाहीसें होऊन ख्रिस्तप्रेम हाच त्याच्या कृत्यांचा झरा होतो. ज्यांस ईश्वराविषयीं उत्कट प्रेम वाटत असतें, ते त्यास कमींत कमी असेम देण्याची

इच्छा करीत नाहींत. तर त्यास जितकें जास्त देता येईल असेंच पहात असतात. मोठ्या औत्सुक्यानें ते सर्वस्व अर्पण करीतात व ज्या गोष्टीचा शोध ते करीत असतात त्या गोष्टीच्या महत्वाच्या मानानें ते आपली कळकळ दाखवितात, अशा अगाध प्रेमाशिवाय ख्रिस्ती कामगिरी म्हणजे निव्वळ बडबड, पोकळ आचार व ओंझें लादलेलें एक संकटच होय.

**(६) आपल्या उद्धारासाठी ख्रिस्ताने जो छळ आणि अपमान सहन केले त्याचे वर्णन हे वचन कसे करते?**

***पाहा, तू ओळखत नाहीस अशा राष्ट्रांना तू बोलावशील; ज्या राष्ट्राला तुझी ओळख नाही ते तुझ्याकडे धाव घेईल; ज्याने तुला वैभवयुक्त केले तो परमेश्वर तुझा देव, इस्राएलाचा पवित्र प्रभू ह्याच्यामुळे असे होईल. दुर्जन आपला मार्ग सोडो, अधर्मी आपल्या कल्पनांचा त्याग करो आणि परमेश्वराकडे वळो म्हणजे तो त्याच्यावर दया करील; तो आमच्या देवाकडे वळो, कारण तो त्याला भरपूर क्षमा करील.***
***(यशया ५५:५, ७)***

ख्रिस्ताला सर्वस्व अर्पण करणें हा सर्वात मोठा स्वार्थत्याग आहे. असेम तुम्हांस वाटतें काय ? “ख्रिस्तानें मजसाठीं काय दिलें आहे” हे तुम्हीं स्वतांलाच पुसा. त्या देवाच्या पुत्रानें आपल्या तारणासाठीं जीव, प्रेम, दु:खसहनशीलता वगैरे सर्व काहीं दिलें आहे. इतक्या मोठ्या प्रेमाला पात्र नसलेले जे आपण त्या आम्हाला आपलीं अंत:करणें त्यापासून दूर राखणें संभवेल काय ? आपल्या आयुष्यांत क्षणोंक्षणीं त्याच्या कृपेनें प्राप्त होणाऱ्या

सुखाचे वाटेकरी आपण होत आहों, व ह्याच कारणास्तव ज्या अज्ञानापासून व दु:खापासून आपला बचाव झाला आहे त्याचा अनुभव आपणांस पूर्णपणें घडून येत नाहीं. ज्याला आमच्या पापांनी छिन्नविच्छिन्न केलें, त्याकडेच मात्र आम्ही पहावें, परंतु त्याच्या प्रेमाकडे व त्यानें केलेल्या आत्मयज्ञाकडे दुर्लक्ष करावें काय ? वैभवयुक्त प्रभूच्या झालेल्या अपमानाच्या दृष्टीनें बराच झगडा करून व नीच स्थिती पत्करून मात्र आपणांस सार्वकालीका जीवन प्राप्त होईल म्हणून आपण कुरकूर करावी काय?

**(७) आपल्या जागी ख्रिस्ताने कोणते ओझे सहन केले ज्यामुळे आपण आपल्या पापांसाठी पश्चातापदग्ध होतो?**

***ह्यामुळे मी त्याला थोरांबरोबर विभाग देईन, तो बलवानांबरोबर लूट वाटून घेईल; कारण आपला प्राण वाहू देऊन तो मृत्यू पावला, त्याने आपणास अपराध्यांत गणू दिले; त्याने बहुतांचे पाप आपल्यावर घेतले व अपराध्यांसाठी मध्यस्थी केली. (यशया ५३:१२)***

ईश्वर आमचा स्वीकार करीलच अशी हमी दिल्याशिवाय पश्चात्तापी व लज्जित अंत:करणानें त्याजकडे जाण्याची आम्हांस काय जरूरी आहे, असा प्रश्न अंत:करणांत ताठा असलेले बरेच लोक विचारीत असतात. ह्या त्यांच्या प्रश्नास उत्तर म्हणून मी त्यांस ख्रिस्ताकडे बोट दाखवितों. तो निष्पाप-नव्हे ह्याहिपेक्षां जास्त असून ईश्वराचा ज्येष्ठ पुत्र होता, परंतु मनुष्यजातीकरीतां देवानें त्याला पाप असें केलें. “तो अपराध्याशीं मोजलेला होता; आणि त्यानें बहुतांची पापें साहिली, आणि अपराध्यांसाठी मध्यस्थी केलीं”1

आपण सर्वस्व द्यावयाचें म्हणजे काय द्यावयाचें ? तर मलीन झालेलें अंत:करण शुद्धीकरणासाठीं, त्याच्या स्वताच्या रक्तानें तें स्वच्छ करण्यासाठीं, व त्याच्या अनुपमेय प्रेमानें आपलें तारण होण्यासाठीं द्यावयाचें आहे. अशी स्थिती असतांही सर्वस्व अर्पण करणें मनुष्याच्या जिवावर यावें आं ! “जिवावर येतें” हे शब्द ऎकावयास व लोहावयासहि मला खरोखर लाज वाटते !

**(८) सर्व गोष्टीत आपले ध्येय काय असावे, आणि जसे आपण ते करतो, कोणते अभिवचन आपण आत्मसात करू शकतो?**

***तर तुम्ही पहिल्याने देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील. (मत्तय ६:३३)***

आपल्या योग्य त्या फायद्यासाठीं जी गोष्ट राखून ठेवणें इष्ट आहे तिचा आपण त्याग करावा असें ईश्वराचें म्हणणें नाहीं. तो जें जें म्हणून कांहीं करतो त्या सर्वात त्याचा हेतु आपल्या लेकरांचें कल्याण व्हावें हाच असतो. ज्यांनीं ख्रिस्ताला पत्करिलें नाहीं त्यास ते स्वतां मिळवितील त्यापेक्षां विशेषच अधिक देण्याचा त्याचा इरादा आहे हें त्यांनींजाणण्याची त्याची इच्छा आहे. मनुष्य जेव्हां ईश्वराविरुद्ध विचार करितो व वागतो तेव्हां तो स्वताला अधिक अपाय करून घेतो, व आपल्या आत्म्याविरुद्ध अति मोथा अन्याय करितो. सर्वाहून अधिक असेम कल्याण कशांत आहे हें ज्यास माहीत आहे, व जो आपण उत्पन्न केलेल्या प्राण्यांच्या कल्याणाचीच योजना करीत असतो अशा त्या ईश्वरानें मना केलेल्या प्राण्यांच्या कल्याणाचीच योजना करीत असतो

अशा त्या ईश्वरानें मना केलेल्या मार्गात खरा आनंद सापडणें असंभवनीय आहे. ईश्वरी आज्ञेच्या उल्लंघनाचा मार्ग म्हणजे दु:खाचा मार्ग होय.

**(९) देवाच्या राज्याचा जसा आपण शोध करतो, त्याचे संतान म्हणून कोणते अभिवचन आपण हस्तगत करू शकतो?**

*म्हणजे परमेश्वराच्या ठायी तुला आनंद होईल; तो तुझे मनोरथ पूर्ण करील. आपला जीवितक्रम परमेश्वरावर सोपवून दे; त्याच्यावर भाव ठेव म्हणजे तो तुझी कार्यसिद्धी करील. (स्तोत्रसहिता ३७:४-५)*

आपलीं लेकरें दु:ख सोशीत असतां तें पाहण्यांत ईश्वराला आनंदा होतो अशा तर्हेची विचारसरणी चुकीची आहे. सर्व स्वर्ग मनुष्याच्या सुखासाठीं कळकळ बाळगीत आहे. आपल्या स्वर्गीय पित्यानें उत्पन्न केलेल्या कोणत्याहि प्राण्याला आनंदरुप गृहांत शिरण्यास तो बंदी करीत नाहीं. ज्यांच्या योगानें दु:ख व निराशा हीम प्राप्त होतील व ज्या आपणांस सुखाच्या स्वर्गाचा दरवाजा बंद करितील अशा गोष्टींपासून अलिप्त राहण्यास ईश्वराची इच्छा आपणांस सांगत आहे. मनुष्येम ज्या स्थितींत असतील त्या स्थितींत त्यांच्या गरजा, त्यांच्या उणीवा व त्यांचे दोष यासहवर्तमान त्यांस स्वीकारावयास जगाचा तारक तयार आहे. जे लोक त्याचें जूं आपल्या मानेवर घेउन त्याचें ओझें वाहतात, त्यांस तो आपल्या रक्तानें पापापासून शुद्ध करुन थोर प्रकारचें तारण देईल, इतकेंच नव्हें,तर ज्या गोष्टींविषयी त्यांचें अंत:करण भुकेलें असेल, त्या गोष्टी त्यांस देऊन तें तृप्त करील.

जीवनाच्या भाकरीसाठीं जे त्याकडे येतात त्या सर्वास शांतता व विश्रांति द्यावी हा त्त्याचा हेतु आहे. जें अत्यूच्च सुख आज्ञाभंग करणारास कधींहि प्राप्त होणार नाहीं त्या सुखाच्या मार्गास नेणारीं जीं कर्तव्यें असतील तीच मात्र आपण करावीं अशी त्याची इच्छा आहे. अंत:करणांत ख्रिस्ताचें वास्तव व वैभवाची आशा हेंच आत्म्याचें खरें व आनंदाचें जिणें आहे.

**(१०) मी देवाच्या अधीन स्वतःला पूर्णपणे कसे देऊ शकतो?**

*परमेश्वराची सेवा करणे हे तुम्हांला गैर दिसत असले तर तुम्ही कोणाची सेवा करणार हे आजच ठरवा; महानदीपलीकडे तुमच्या पूर्वजांनी ज्या देवांची सेवा केली त्यांची, किंवा तुम्ही राहत आहात त्या देशातल्या अमोऱ्यांच्या देवांची? मी आणि माझे घराणे तर परमेश्वराची सेवा करणार." (यहोशवा २४:१५)*

मी स्वतां पूर्णपणें देवाच्या स्वाधीन कसें व्हावें याविषयीं पुष्कळजण शोध करीतात. त्याला वाहून घेण्यास तुम्ही इच्छितां खरें, परंतु तुम्ही नैतिक सामर्थ्यानें दुर्बल असून संशयरूप गुलामगिरींत रुतून गेलेले आहांत व पापी आयुष्यक्रमाच्या जदलेल्या संवयीच्या ताब्यांत सांपडलेली तुमची वचनें, तुमचें निश्चय हीं वाळूच्या दोरासारखी आहेत. तुमचे विचार, तुमच्या उर्मी, तुमच्या आवडी ह्यांस तुम्हांस ताब्यांत ठेवतां येत नाहीं. मोडलेल्या वचनांनीं व करारांनीम आत्मविश्वास डळनळून जातो, व त्यामूळें ईश्वर आपला स्वीकार करणार नाहीं. तुमच्या इच्छाशक्तीचें सामर्थ्य किती आहे हेंच काय तें समजण्याची तुम्हांस आवश्यकता आहे. ही इच्छाशक्ति म्हणजे मनुष्यस्वभावांतील

सत्ता करणारी, सर्व गोष्टीचा निर्णय करणारी व बऱ्यावाईटांतून पसंतीनुरूप ग्रहण करणारी शक्ति होय. प्रत्येक बाब या इच्छाशक्तिच्या योग्य कार्यावर अवलंबून असते. ईश्वरानें मनुष्यांस चांगल्यावाईटाची निवड करून मनास वाटेल तें ग्रहण करण्याचें सामर्थ्य दिलें आहे; व त्या सामर्थ्याचा उपयोग करण्याचें काम त्यांचें आहे. अंत:करणाच्या आवडी ईश्वरार्पण करीतां येत नाहींत, परंतु त्याची सेवा करण्याचें पसंत करणें हें तुम्हांस करिता येतें. तुमची इच्छा त्याला देतां येतें. तुमची इच्छा त्याच्या स्वाधीन राहील.

तोच तुमच्या आवडीनावडींचें केंद्र होऊन राहील, व तुमचें विचार त्याशीं अनुरुप असे होतील.

चांगुलपणाची व पवित्रपणाची आशा ही चांगली खरी, परंतु ती तितक्यावरच जर थांबले तर तिचा कांहींएक उपयोग नाहीं. असें असेल तर पुष्कळ लोक ख्रिस्ती होण्याची नुसती आशा धरून बसण्यांतच आपले जन्म व्यर्थ घालवितील. सबब आशेबरोबर आपली इच्छा ईश्वरार्पण करण्याचें कामही त्यांनीं नेटानें चालविलें पाहिजे.

**(११) ख्रिस्ताच्या अधीन जेव्हा आपण आपले जीवन आणि इच्छा सुपूर्त करतो तेव्हा त्याचा परिणाम काय होतो?**

***तू भिऊ नकोस, कारण मी तुझ्याबरोबर आहे, घाबरू नकोस, कारण मी तुझा देव आहे; मी तुला शक्ती देतो, मी तुझे साहाय्यही करता, मी आपल्या नीतिमत्तेच्या उजव्या हाताने तुला सावरतो. (यशया ४१:१०)***

मनुष्याच्या इच्छेस चांगलें वळण मिळाल्यानें अंत:करणांत सर्वस्वीं पालट होतो, व हें चांगलें

वळण त्यानें आपली इच्छा ख्रिस्तार्पण केल्याशिवाय प्राप्त होणें नाहीं. ती एकदां ख्रिस्तार्पण केली म्हणजे स्वभावांत स्थिरता प्राप्त होण्यासाठीं ईश्वरीसामर्थ्य अंत:करणावर कार्य करीतें, व तुमच्या आयुष्यक्रमास नवीन दिशा प्राप्त होते.

*मला समजते कि सैतान जसे भासवतो कि देवाचे शासन हे आंधळया समर्पण अथवा अवैचारिक नियंत्रणावर स्थापित आहे, तसे ते नाही.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*मी आश्चर्यचकित आहे की माझ्या निर्मात्याने त्याने सर्वस्व मला दिले- जीवन आणि प्रेम आणि सर्व यातना- माझ्या उद्धारासाठी आणि माझ्या जीवनात पापाच्या ह्या शक्तीवर विजय मिळवण्यासाठी तो माझ्यामध्ये राहू इच्छितो.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*मी जाणतो कि जेव्हा माझी इच्छा सैतानाच्या नियंत्रणाखाली असते, मी माझ्या विचारांवर, शक्तीवर किंवा जिव्हाळयावर नियंत्रण ठेऊ शकत नाही, चांगल्यासाठीचे माझी अभिवचने आणि निर्धार हे वाळूच्या दोरीसारखे आहेत.*


**गोल करा: होय अनिश्चित**

*मी आभारी आहे कि देव त्याच्या निर्मितीवर त्याची इच्छा ज्बरदास्तीने थोपवत नाही. मला आनंद होतो कि तो आपली इच्छा त्याला देण्यास सांगतो जेणेकरून मन, शरीर आणि चारित्र्य ह्यांचे उच्चतर स्तर मिळवण्यात तो आपले सहाय्य करेल , शक्य करेल.*

गोल करा:     होय     अनिश्चित

*इच्छेच्या जबरदस्तीच्या शक्तीला जसे मी अधिक जाणून घेतो, आणि हे समजून घेतो कि निवड करण्याचे सामर्थ्य माझ्यात आहे, ख्रिस्ताच्या आत्म्याने माझ्या इच्छेवर नियान्तार्ण ठेवावे ह्याची मी निवड करतो.*

गोल करा:     होय     अनिश्चित



## धडा ७
## श्रद्धा आणि स्वीकार

**(१) देवासोबत शांती आणि सुस्थिती प्रस्थापित करण्याची जशी आपली इच्छा वाढत जाते, आपल्या पापाच्या दुष्टतेप्रती देव- प्रेरित प्रतिक्रिया काय असेल?**

***तुम्हांला आपल्या दुष्कर्माचे व अनाचाराचे स्मरण होईल; तुमचे अधर्म व अमंगळ कृत्ये ह्यांमुळे तुमचा तुम्हांलाच वीट वाटेल. (यहज्केल ३६:३१)***

पवित्र आत्म्यानें तुमच्या विचारशक्तीस चलन दिल्यामुळें पापाची दुष्टता, त्याचें सामर्थ्य, त्याचा अपराध व त्यापासून होणारें दु:ख ह्यांची तुम्हांस कांहींशीं कल्पना होते व त्यामुळें तुम्ही त्याचा तिरस्कार करीतां. त्यानेंच आपली ईश्वरापासून ताटातूट केली केली आहे व त्या दुष्टाच्या सामर्थ्याच्या कचाटींत आपण

सांपडलों आहों असें ज्ञान तुम्हांस होतें, त्याच्या तावडींतून सुटण्याचा जसजसा तुम्ही प्रयत्न करीतां तसतशीम तुमच्या अशक्तपणाची खात्री तुम्हांस पटतें. तुमचें हेतु अपवित्र असतात व अंत:करण मलीन असतें. आपलें जिणें स्वार्थी व पापी आहे असें तुमच्या नजरेस येतें. क्षमेची, शुद्धीकरणाची व पापाच्या तावडींतून मुक्त होण्याची अपेक्षा तुम्ही करीतां, परंतु ईश्वराशीं एकतानता व स्वरूपता ह्या प्राप्त होण्यास तुम्हांस काय करीतां येईल ?

**(२) क्षमेचे आणि शांतीचे जल प्रभू कोणाला देऊ करतो?**

***"अहो तान्हेल्यांनो, तुम्ही सर्व जलाशयाकडे या, जवळ पैसा नसलेले तुम्ही या; सौदा करा, खा; या, पैशावाचून व मोलावाचून द्राक्षा-रसाचा व दुधाचा सौदा करा! (यशया ५५:१)***

आत्म्याचेठायीं शांतता, प्रेम व पापाची क्षमा ह्यांची तुम्हांस आवश्यकता आहे. हीं पैका देऊन विकत घेतां येत नाहींत, बुद्धिनें व शहाणपणानें पैदा करीतां येत नाहींत, व तुमच्या स्वतांच्या प्रयत्नानें तीं तुम्हांस प्राप्त होत नाहींत. परंतु ईश्वर तीं तुम्हांस "पैक्यावांचून अगर मोलावांचून"1 केवळ देणगीदाखल देतो. तुम्ही हात घालून जर तीं देणगी चांचपलींत तर ती तुमचीच आहे. परमेश्वर म्हणतो "तुमची पापे जरी लाखेसारखीं असलीं तरी तीं बर्फासारखी पांढरी होतील. किरमिजाप्रमाणें जरी तीं तांबडी असली तरी लोकरीसारखीं पांढरी होतील."2 "मी तुम्हांस नवें हृदय देईन व नवा आत्मा तुम्हांमध्यें घालीन."3

**(३) शांतीच्या शोधात प्रभुने आपल्याला कोणते अद्भुत अभिवचन दिले आहे?**

*देईन, तुमच्च्या ठायी नवा आत्मा घालीन; तुमच्च्या देहातून पाषाणमय हृदय काढून टाकीन व तुम्हांला मांसमय हृदय देईन. (यहज्केल ३६:२६)*

तुम्हीं आपलीं पापें कबूल करून अंत:करणपूर्वक त्यांचा त्याग केला आहे, व ईश्वराला वाहून घेण्याचा निश्चय केला आहे, तर मग ईश्वराकडे जा व आमचीं पापें पुसून टाकून “आम्हालां नवें अंत:करण देशील काय” असें विचारा. मग तो हें करीतो तें त्यानें वचन दिलें आहे म्हणून करीतो असा दृढ विश्वास धरा. ईश्वर जी देणगी देण्याचें वचन देतो ती आपणांस प्राप्त होते, व ती आपलीच आहे असा पक्का विश्वास पाहिजे; व हाच धडा प्रभु येशूनें ह्या लोकीं असतां घालून दिला होता.

**(४) ख्रिस्ताचे चिन्ह आणि चमत्कार ह्यांची नोंद शास्त्रवचनात का देण्यात आली आहे?**

***... येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे असा तुम्ही विश्वास ठेवावा, आणि विश्वास ठेवून तुम्हांला त्याच्या नावाने जीवन प्राप्त व्हावे म्हणून ही लिहिली आहेत. (योहान २०:३१)***

लोकांनीं त्याचे सामर्थ्यावर जेव्हां विश्वास ठेविला तेव्हां त्यानें लोकांचें रोग बरे केले. ज्या गोष्टी प्रत्यक्ष त्यांच्या नजरेस पडतील अशा गोष्टीत त्यानें त्यांस साहय्य केलें व अशा रीतीनें ज्या गोष्टी त्याचे दृष्टीचे टप्याचे आड होत्या त्यांजवर विश्वास ठेवण्यास-- तें इतकें कीं आपणांस पापंची क्षमाहि करितां येते एथपर्यंत त्याचेठायी प्रेरणा उत्पन्न केली.

**(५) पापक्षमा मिळवून घेण्यामध्ये आपला काय सहभाग आहे?**

*म्हणून मी तुम्हांला सांगतो, तुम्ही प्रार्थना करून जे काही मागाल ते आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हांला मिळेल. (मार्क ११:२४)*

पक्षघातानें आजारी असलेल्या मनुष्यास बरा करण्यांत त्यानें असें स्पष्ट सांगितलें आहे, कीं "पृथ्वीवर पापांची क्षमा करावयास मनुष्याच्या पुत्राला अधिकार आहे हें तुम्ही जाणावें." तेव्हां त्यानें पक्षघात्याला सांगितलें, कीं "उठ, आपली बाज घेऊन घरी जा."1 त्याचप्रमाणें प्रेषित योहान्न ख्रिस्ताच्या चमत्कारांविषयीं म्हणतो. "येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे, असा तुम्ही विश्वास धरावा, आणि विश्वास धरून तुम्हीं त्याच्या नावांचें जीवन पावावें म्हणून हीं लिहिलीं आहेत."2
येशूनें रोग्यास बरें केल्याबद्दलची जी हकिकत शास्त्रांत दिली आहे तीजवरून आपल्या पापांची क्षमा होण्यासाठीं आपण तीजवर कसा विश्वास ठेवावा हें आपणांस कळावें. बेथसूदा येथील पक्षघाती मनुष्याच्या गोष्टीकडे आपण वळूं. ३ त्या गरीब दुखाईताचा अगदीं नाइलाज झाला होता; कारण त्याचे अवयव अडतीस वर्षेपर्यंत अगदीं निरुपयोगी झालेले होते. तथापि येशूनें त्यास म्हटलें, "ऊठ, आपली बाज उचलून घेऊन घरीं जा." यावर तो दुखणाईत म्हणाला असता, "हे प्रभु तूं मला बरा करिशील तर मी तुझें वचन मानीन;" परंतु नाहीं. त्यानें ख्रिस्ताच्या वचनावर विश्वास ठेविला, व आपणांस त्यानें बरें केलें असा विश्वास धरून त्यानें एकदम उठण्याचा प्रयत्न केला, चालण्याची त्यास इच्छा झालीं व एकदम तो चालूंहि लागला. ख्रिस्ताच्या वचनाप्रमाणें तो चालला म्हणून ईश्वरानें त्यास सामर्थ्य दिलें व तो बरा झाला.

**(६) आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी आपल्या हृदयात आपण पावित्र्य का आणू शकत नाही?**

*“हृदय सर्वांत कपटी आहे; ते असाध्य रोगाने ग्रस्त आहे, त्याचा भेद कोणास समजतो? (यिर्मया १७:९)*

त्याप्रमाणेंच तुम्हीहि पापीच आहांत. तुम्हांस आपल्या पापांबद्दल पश्चात्ताप करीतां येत नाहीं, आपलें अंत:करन पालटता येत नाहीं, व स्वतांस पवित्र करिता येत नाहीं. परंतु ईश्वरानें हें सर्व ख्रिस्ताकडून करण्याचें वचन दिलें आहे. त्या वचनावर तुम्ही विश्वास ठेवा, आपलीं पापें पदरीं घ्या व स्वतांस देवाला वाहून घ्य. त्याची सेवा करण्याची इच्छा धरा. जितका विश्वास तुम्ही धराल, तितक्याच विश्वासानें ईश्वर तुमच्याशीं आपलें वचन राखील. त्या वचनावर---ईश्वरानें आपणांस क्षमा केली आहे, व आपलें अंत:करण शुद्ध केले आहे---- जर तुम्ही विश्वास ठेवाल, तर ईश्वरहि आपलें वचन सत्य करील. आपन बरें झालों आहों असा जेव्हां त्या पक्षवात्यानें विश्वास धरीला तेव्हां त्याला ख्रिस्तानें सामर्थ्य दिलें; त्याप्रमाणेंच आपण बरें झालों आहोंत असा जेव्हाम तुम्ही विश्वास धराल त्यावेळीच तुम्ही बरें व्हाल.

आपणांला बरें केलें आहे अशी भावना तुमचें ठायीं होईपर्यंत वाट पाहूं नका; तर म्हणा कीं “मी त्त्यावर विश्वास ठेवितोंच व तें असें आहेच, याचें कारण मला भासतें म्हणून नव्हें तर देवाचेम वचन आहे म्हणून.”

**(७) विश्वासात जर आपण देवाकडून क्षमा मागितली, आपल्याला ती मिळाली असा आत्मविश्वास का आपण बाळगू शकतो?**

***मग तुम्ही वाईट असताना आपल्या मुलाबाळांना चांगल्या देणग्या देणे तुम्हांला समजते, तर तुमच्या स्वर्गातील पित्याजवळ जे मागतात त्यांना तो किती विशेषेकरून चांगल्या देणग्या देईल? (मत्तय ७:११)***

प्रभू येशू म्हणतो, "जें कांहीं तुम्हीं प्रार्थना करून मागाल तें तुम्हांला मिळालेंच आहे, असा विश्वास धरा, म्हणजे तें तुम्हांस प्राप्त होईल."1 ह्या वचनाला एक शर्त आहे, ती ही कीं, आपण मागावयाचें तें ईश्वराच्या इच्छेप्रमाणें मागावयाचें.

पापापासून आपली शुद्धता व्हावी व आपण त्याचीं लेकरें व्हावेम व आपला जीवनक्रम पवित्र व्हावा अशी ईश्वराची इच्छा आहे, म्हणून हे आशीर्वाद आपण त्याजजवळ मागून आपणांस ते मिळालेच आहेत असा विश्वास धरावा व ते मिळाल्याबद्दल त्याचे उपकार मानावेत. प्रभु येशूकडे जाऊन आपली शुद्धता करून घेण्याचा, व लज्जा, भीड वगैरे कांहीं एक न धरीतां न्यायासमोर उभें राहाण्याचा आपला हक्कच आहे. "जे ख्रिस्त येशूंत आहेत त्यांस आतां दंडाज्ञा नाहीं. कारण जो जीवनाच्या आत्म्याचा नियम, त्यानें मला ख्रिस्त येशूंत पाप व मरण यांच्या नियमापासून मुक्त केलें."1

**(८) देवासोबत आपण आपले नातेसंबंध कसे जतन करून ठेऊ शकतो?**

***तर ख्रिस्त येशू जो प्रभू, ह्याला जसे तुम्ही स्वीकारले तसे त्याच्यामध्ये चालत राहा; (कलस्सेकरास पत्र २:६)***

ह्यापुढें तुम्ही स्वताचें नाहींत, तर मोबदला देऊन विकत घेतलेले आहांत. “तुम्ही सोनें रुपें अशा नाशवंत वस्तूंनीं नव्हे तर निष्कलंक व निर्दोष कोंकरा असा जो ख्रिस्त त्याच्या मौल्यवान रक्तानें मुक्त झाला आहां.”2 ईश्वरावर विश्वास ठेवणें यासारख्या सोप्या गोष्टींनीं पवित्र आत्म्यानें तुमचे अंत:करणांत नवीन जीवन घातलें आहे. ईश्वराच्या कुटुंबांत जन्मलेलें असें एक लेकरूं तुम्हीं आहांत, व आपल्या मुलावर जशी तो प्रीति करितो तशीच तो तुम्हांवरहि करितो.

तुम्ही आतां ख्रिस्ताला वाहिलेले आहांत म्हणून माघार घेऊ नका, व त्याजपासून दुरावूं नका. उलट असें म्हणा, कीं “मी ख्रिस्ताचा आहे. मीं त्याला वाहून घेतलें आहे,” व त्याजवळ त्याचा पवित्र आत्मा देण्याविषयीं व त्याच्या कृपेंत राखण्याविषयीं मागा. तुम्हीं स्वतांला ईश्वरार्पण करन्यानें व त्यावर विश्वास ठेवण्यानें त्याचे पुत्र असे झाला आहांत व म्हणुन तुम्हांला त्याजमध्यें रहावयाचें आहे. प्रेषितानें म्हटलें आहे “तर ख्रिस्त येशू प्रभु असा तुम्हीं स्वीकारिला त्यांतच चाला.”3

**(९) जे सर्व त्याच्याकडे येतात त्यांच्यासाठी ख्रिस्त काय देऊ करतो?**

***अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. (मत्तय ११:२८)***

ईश्वराचा आशीर्वाद मिळण्यापूर्वी आपन त्याचे पसंतीस उतरलों पाहिजे व आपली सुधारणा झाली आहे असें त्यास सिद्ध करून दिलें पाहिजे अशी कित्येकांची समजूत असल्याचें दिसतें, परंतु तसें नाहीं. त्यांस आतांसुद्धां ईश्वराचा आशीर्वाद मागता येतो.

त्यांस त्यांच्या अशक्ततेंत मदत करण्यांत ईश्वराची कृपा-ख्रिस्ताचा आत्मा-पाहिजे आहे, नाहींतर त्यानां दुष्टाचा प्रतिकार करणें अशक्य आहे. आपण आहों त्या स्थितींतच पापी, अशक्त व परावलंबी--त्याजवळ जाणें ख्रिस्तास आवडतें. आपण त्याजवळ आपल्या अशक्त, मूर्खपणाच्या व पापी अशा स्थितीत त्याजवळ जाऊन पश्चात्तापी होत्साते त्याच्या चरणांवर लोटांगण घातलें पाहिजे. आपल्या प्रीतिरुप बाहूंत आम्हांस कंवटाळून घेंणें, आमच्या जखमा बांधणें व आमचा अशुद्धपणा घालविणें हेंच त्याचें वैभव आहे.

**(१०) प्रत्येक पश्चाताप करणाऱ्या पापी व्यक्तीसाठी देवाने काय खात्री देऊ केली आहे?**

***तुझे अपराध धुक्याप्रमाणे, तुझी पातके अभ्राप्रमाणे मी नाहीतशी केली आहेत; माझ्याकडे फीर, कारण मी तुला उद्धरले आहे.” (यशया ४४:२२)***

हजारों लोक चुकतात ते ह्याच ठिकाणीं. प्रभु येशु व्यक्तिश: आमची क्षमा करितो ह्यावर त्यांचा मुळीच विश्वास बसत नाहीं. ईश्वराचें वचन ते मानीतच नाहींत. प्रत्येक पापाबद्दल सरसहा क्षमा केली जाते हें ते त्याच्या अटी मान्य करीतात त्यांस आपापल्यपरी समजण्याचा हक्क आहे. ईश्वराचीं वचनें आपणांसाठीं योजिलेलीं नाहींत हा भ्रम दूर करा. ती प्रत्येक आज्ञा मोडणाराकरिता परंतु पश्चात्ताप करण्याकरिता योजिलेली आहेत. प्रत्येक विश्वास ठेवणाऱ्या प्राण्यास सामर्थ्य व कृपा ह्यांचा पुरवठा सेवा करणाऱ्या देवदूतांकडून ख्रिस्त करीत असतो. जो केवळ पाप्यांसाठीं मरण पावला अशा येशूचे ठायीं ज्यांस सामर्थ्य, पवित्रपणा व नीतिमत्व हीं

सांपडत नाहींत इतका पापी कोणीहि नाही. पापरुप कर्दमानें भरलेली व दूषित झालेली वस्त्रे पापी लोकांच्या अंगावरुन काढून त्यावर नीतिमत्तेचा शुभ्र झगा घालावयास तो अगदीं वाट पाहातच बसला आहे. तो त्यांस जिवंत राहाण्यास सांगत आहे, मरावयास सांगत नाहीं.

**(११) देवाच्या पश्चाताप करण्याच्या मार्गदर्शनाचे जर आपण अनुसरण केले तर तो आपल्या पापाच्या समस्येला कसे हाताळतो?**

***आमच्या पातकांच्या मानाने त्याने आम्हांला शासन केले नाही, त्याने आमच्या दुष्कृत्यांच्या मानाने आम्हांला प्रतिफळ दिले नाही. कारण जसे पृथ्वीच्या वर आकाश उंच आहे, तशी त्याची दया त्यांचे भय धरणाऱ्यांवर विपुल आहे. पश्चिमेपासून पूर्व जितकी दूर आहे, तितके त्याने आमचे अपराध आमच्यापासून दूर केले आहेत. (स्तोत्रसहिता १०३:१०-१२)***

मर्यादीत अशा मनुष्यप्राण्याचें ज्याप्रमाणें एकमेंकांशीम वर्तन असतें, त्याप्रमाणें ईश्वराचें त्यांशीं असत नाहीं. त्याचे विचार म्हणजे कृपेचे, प्रेमाचे, अत्यंत दयाळूपणाचे असतात. तो म्हणतो, “दुष्ट आपल्या मार्गास व अन्यायी मनुष्य आपल्या संकल्पांस सोडो; आणि परमेश्वराकडे फिरो, म्हणजे तो त्याजवर दया करील आणि आमच्या देवाकडे फिरो, कां की तो फार क्षमा करील.” “म्यां तुझें अपराध दाट ढगाप्रमाणें व तुझीं पातकें आभाळाप्रमाणें

पुसून टाकिलीं आहेत. म्यां तुला उद्धरिलें म्हणून मजकडे परत ये.”1

जो मरतो त्याच्या मरणाविषयीं मी संतुष्ट नाहीं, म्हणून फिरा व वांचा असें परमेश्वर म्हणतो.”2 सैतान ह्या तर ईश्वराचीं आशीर्वादाचीं वचनें हिरावून नेण्यासच बसलेला आहे. आत्म्यांतून प्रत्येक आशातंतु व प्रकाशाचा प्रत्येक किरण नाहींसा करण्याची त्याची इच्छा आहे; परंतु तुम्ही त्यास तसें करूं देतां कामा नये.

**(१२) आपला स्वर्गीय पिता त्याच्याकडे येणाऱ्या लेकरांना जे पपरतीच्या मार्गावर आहेत त्यांना कसे वागवतो?**

***“मग तो उठून आपल्या बापाकडे गेला. तो दूर आहे तोच त्याच्या बापाने त्याला पाहिले. त्याला त्याचा कळवळा आला आणि धावत जाऊन त्याच्या गळयात गळा घालून त्याने त्याचे मुके घेतले. (लूक १५:२०)***

“त्या मोहांत पाडणाऱ्याकडे लक्ष न देतां म्हणा “मीं जगावें म्हणून ख्रिस्त मेला. त्याचें माझ्यावर प्रेम आहे, व माझा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाहीं. मला दयाळू स्वर्गीय पिता आहे; व जरी मीं त्याच्या प्रेमाचा दुरुपयोग केलेला आहे, व त्यानें दिलेल्या कृपादानांची उधळपट्टी केलेली आहे, तरी मी उठून आपल्या बापाकडे जाईन व म्हणजे ‘मीं स्वर्गाविरुद्ध व तुझ्यासंबंधानें पाप केलें आहे व तुझा पुत्र म्हणविण्यास योग्य नाहीं. आपल्या एका मोलकऱ्याप्रमाणें मला ठेव.”3 ह्या दाखल्यावरून बहकलेल्यांचा स्वीकार कोणत्या रीतीनें केला जाईल हें तुम्हांस कळून येईल. “तो दूर आहे इतक्यांत त्याच्या बाप त्याला पाहून कळवळला

आनि धांवत जाऊन त्यनें त्याच्या गळयांत मिठी घातली व त्याचे मुके घेतले.”

हा दाखला जरी ममताळूपणा दाखविणारा व अंत:करण उचंबळून आणणारा आहे तरी त्यावरून आपल्या स्वर्गीय पित्याच्या अमर्याद दयाळूपणाची योग्य कल्पना करुन देण्यास तो अगदीं कोता आहे. प्रभूनें आपल्या भविष्यवाद्यांच्या द्वारें असें सांगितलें आहे, कीं “म्यां सार्वकालिक प्रीतीनें तुजवर प्रीति केली, म्हणून म्यां प्रसादेंकरून तुला ओढलें आहे.”4 पापी मनुष्य आपल्या बापाच्या घरापासून दूर असतांहि व आपली चीजवस्तु परदेशांत खर्च करीत असतांही त्या बापाचें अंत:करण त्याजकडे ओढ घेत आहे; पापी मनुष्याच्या अंत:करंणांत ईश्वराकडे परत जाण्याविषयीं उत्पन्न झालेली प्रत्येक इच्छा हें त्या पवित्र आत्म्याच्या विनंतीचें त्या बहकलेल्या मुलास बापाच्या प्रेमळ अंत:करणाकडे परत आणण्याचें कार्य आहे.

**(१३) जे सर्व प्रभूचा शोध करतात त्यांच्या सर्वांसाठी काय अभिवचन देण्यात आले आहे?**

***पिता जे मला देतो ते सर्व माझ्याकडे येईल आणि जो माझ्याकडे येतो त्याला मी मुळीच घालवून देणार नाही. (योहान ६ :३७)***

शास्त्रांतील मोठमोठीं वचनें तुम्हांपुढें असतां संशयाला तुम्ही जागा देतां काय ? ज्यावेळीं पापी मनुष्य आपल्या बापाकडे परत जाण्याची व आपल्या पापांचा त्याग करण्याची इच्छा करितो, त्या वेळीं प्रभु त्याला पश्चात्तापी अशा स्थितींत तो आलेला असतांहि आपल्या पायाजवळ येण्यास प्रतिबंध करितो असें तुम्हांस वाटते काय ? असे विचार मनांतहि आणूं नका. बापाविषयीं अशी कल्पना मनांत

बाळगणें ह्यासारखें तुमच्या आत्म्याला अधिक अपाय करणारें दुसरें कांहीं एक नाहीं. तो पापाचा द्वेष करितो, परंतु पाप्यावर प्रेमच करितो. वैभवयुक्त राज्यांत शाश्वत सुख प्राप्त व्हावें अशी ज्यांची ज्यांचीं म्हणून इच्छा असेल, त्या त्या सर्वास वांचविण्यासाठीं ख्रिस्तरुपानें त्यानें अवतार धारण केला. आमच्याविषयींची प्रीति व्यक्त करण्यासाठीं त्यानें जी भाषा वापरली आहे तिजपेक्षां अधिक जोरदार व ममताळूपणाची भाषा कोठून उपयोगांत आणतां येणार? त्यानें म्हटलें आहे, “स्त्री आपल्या पोटच्या पुत्रावर दया न करुन आपल्या तान्ह्या बालकाला विसरेल ? होय, त्या कदाचित विसरतील, प्रंतु मी तुला विसरणार नाहीं”1

संशयग्रस्त व कंपित झालेले असे तुम्ही वर पहा ! कारण प्रभु येशू हा तुमच्या मध्यस्थीसाठीं राहिलेला आहे. आपल्या प्रिय पुत्राच्या देणगीबद्दल ईश्वराचें आभार माना, व तुम्हांसाठी त्यांचें मरण व्यर्थ होऊं नये अशी प्रार्थना करा. आज तुम्हांस पवित्र आत्मा बोलावीत आहे. अंत:करणपूर्वक प्रभु येशूजवळ या, आणि त्याचा आशीर्वाद मिळवा.

ईश्वराचीम वचनें तुम्ही वाचित असतां त्यांत अवर्णनीय असें प्रेम व दया हीं दाखविलीं आहेत हें लक्षांत ठेवा. अमर्याद अशा दयेनें पापी मनुष्याकडे अत्यंत प्रेमळ अंत:करण ओढ घेत आहे. “त्याच्या रक्ताच्याद्वारें आम्हांस मुक्ति म्हणजे अपराधाची क्षमा मिळाली आहे.”2 होय, ईश्वर मदत करणारा आहे असा विश्वास मात्र ठेवा. आपली नैतिक छाया मनुष्यास परत देण्याची त्यास गरज आहे. पापस्वीकार व अनुताप ह्यांम्नीं युक्त असे तुम्ही त्याजकडे जात असल्यामुलें कृपेनें व क्षमेनें तो तुम्हांस आपल्याकडे ओढील.

(१४) देवाची सर्व लेकरे कोणती आशीर्वादित अभिवचने आत्मसात करू शकतात?

*"' स्त्रीला आपल्या पोटच्या मुलाची करुणा येणार नाही एवढा तिला आपल्या तान्ह्या बाळाचा विसर पडेल काय? कदाचित स्त्रियांना विसर पडेल, पण मी तुला विसरणार नाही. (यशया ४९:१५)*

*तुमची वागणूक द्रव्यलोभावाचून असावी; जवळ आहे तेवढ्यात तुम्ही तृप्त असावे; कारण त्याने स्वतः म्हटले आहे, "मी तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणार नाही." (इब्री १३:५ एनकेजेवी)*

*देवाच्या वचनाचा जसा मी अभ्यास केला, त्याचा आत्मा माझ्या हृदयाच्या द्वारावर ठोकत असल्याची जाणीव मला झाली (प्रगटीकरण ३:२०).*

गोल करा: होय अनिश्चित

*मला जाणीव झाली कि मी पतन पावलेला पापी आहे आणि तारणार्याची मला गरज आहे( रोमकरास पत्र ३:२३).*

गोल करा: होय अनिश्चित

*मला आश्चर्य वाटते कि देवाने त्याचे प्रेम प्रदर्शित केले मला नाशापासून सोडवण्यासाठी आपल्या पुत्राला पाठवले (योहान ३:१६,१७) आणि मला ठाऊक आहे कि तो तारनाचे एकमेव द्वार आहे (योहान १०:९).*

गोल करा: होय अनिश्चित


*मला समजते कि, मी जर एका प्रामाणिक हृदयाने, माझ्या सर्व पापांची कबुली दिली, तर येशूचे अनमोल रक्त मला सर्व अधार्मिक्तेपासून शुद्ध करेल (१ योहान १:९).*

**गोल करा:  होय  अनिश्चित**

वरील प्रशांना जर तुम्ही जर ''होय'' असे उत्तर दिले, तुमच्या आयुष्याचा सर्वात महत्वाचा निर्णय घेण्याचे आमंत्रण मी देतो. विश्वासाने, तुम्ही येशूचा वयक्तिक तारणारा म्हणून स्वीकार करू शकता आणि तुमच्या जीवनात त्याची महान शांती, शक्ती आणि अढळ प्रेम ह्यांचा अनुभव घेऊ शकता. खाली दिलेली प्रार्थना एका प्रामाणिक हृदयाने केवळ माझ्या मागे म्हणा (योहान १:१२):

***"प्रिय स्वर्गातील पित्य, मला ठाऊक आहे कि मी एक पापी आहे आणि माझ्यासाठी तू आपल्या पुत्राला पाठवले व त्याने मरण सहन केले. विश्वासाने, मी येशूला माझा तारणारा म्हणून स्वीकारतो आणि त्याच्या अनमोल रक्ताने माझी सर्व पापे धुवून काढावे अशी प्रार्थना करतो (शक्य तेवढे विशिष्ट बोला). माझ्या पापी मार्गांपासून परत वळण्याची निवड मी करतो आणि माझ्या जीवनाचा प्रभू तू व्हावे अशी प्रार्थना करतो. येशूच्या नावाने. आमेन. "***

अभिनंदन! तुम्हाला काहीतर वेगळे झाल्यासारखे वाटेल अथवा नाही, तुमच्या विश्वासामुळे, तुम्ही देवाचे एक उद्धार पावलेले मूल होऊन ख्रिस्तात एक नवीन उत्पत्ती आहात (प्रेषित १६:३१) ! आता, द्राक्षवेलाची फांदी जशी असते, त्याच्या मध्ये सदैव राहा (योहान १५:१-८) आणि एके दिवशी स्वर्गातील तुमच्या नवीन घरात घेऊन जाण्यासाठी तो येईल (योहान १४:१-३).



## धडा ८
## शिष्यत्वाची पारख

**(१) पवित्र आत्म्याच्या कार्याची तुलना हे वचन कशासोबत करत आहे?**

*वारा पाहिजे तिकडे वाहतो आणि त्याचा आवाज तुम्ही ऐकता, तरी तो कोठून येतो व कोठे जातो हे तुम्हांला कळत नाही; जो कोणी आत्म्यापासून जन्मलेला आहे त्याचे असेच आहे." (योहान ३:८)*

"जर कोणी ख्रिस्तांत आहे, तर तो नवी उत्पत्ति आहे, जुनें तें होऊन गेलें, पहा, तें नवें झालें."1

अंत:करणाचा पालट होण्याच्या बाबतीत त्याचा निश्चित काल, ठिकाण यांचा अगर

त्याच्या घडणाऱ्या क्रियांचा यथायोग्य रितीनें पत्ता लागणें मनुष्यांस कदाचित अशक्य असेल, परंतु एवढ्यावरूनच त्याचा पालट झाला नाहीं, असें सिद्ध होत नाहीं. ख्रिस्तानें निकदेमसास म्हटलें "वारा पाहिजे तिकडे वाहतो, आणि त्याचा शब्द तूं ऐकतोस, तरी तो कोठून येतो व कोठें जातो, हें तुला कळत नाहीं; जो कोणी आत्म्यापासून जन्मला तो तसाच आहे."2 ज्याचे परिणाम आपण उघड रीतीनें पाहतों, व आपणांस ते भासतात, अशा अदृश्य वाऱ्याप्रमाणें मनुष्याच्या आत्म्यावर कार्य करीत असलेला ईश्वरी आत्मा आहे. चर्मचक्षूंस अदृश्य परंतु मनुष्यास नवीन दशा प्राप्त करून देणारें असें तें सामर्थ्य त्याच्या आत्म्याच्याठायीं नवीन जीवन उत्पन्नकरून त्यास ईश्वरी स्वरूपाप्रमाणें बनवून सोदतें. ईश्वरी आत्म्याचें हें कार्य अदृश्य रीतीनें चालत असतां त्याचे परीणाम मात्र दृग्गोचर होतात. ईश्वरी आत्म्याच्या कार्यामुळें अंत:करणास नाविन्य प्राप्त झालें असेल, तर त्या गोष्टीची सत्यता मनुष्याच्या आयुष्यक्रमावरून पटेल.

**(२) जीवन कसे बदलते आणि हृदय कसे नवीन बनवले जाते?**

***म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे. (२ करिंथकरास पत्र ५:१७)***

आपल्या अंत:करणाचा पालट करण्याच्या व ईश्वराशीं आपली एकतानता करून घेण्याच्या बाबतींत आपणांस कांहीं एक करतां येणें नाहीं. आपल्यावर ईश्वरीकृपा आहे अगर नाहीं हें पाहण्यास आपण स्वतांवर अगर आपल्या सत्कृत्यांवर भरवंसा ठेवता कामा नये, तर आपला आयुष्यक्रमच तें दाखवील.

आयुष्यक्रमांतील फरक आप्ल्या शीलांत, जडलेल्या संवयींत व व्यासंगांत नजरेस येईल, व आपण पूर्वी कसे होतों व आज कसे आहों ह्यामधील भेद उघड करून दाखवीत. प्रसंगानुसार केलेली सत्कृत्यें अगर दुष्कृत्यें ह्यावरून शील व्यक्त होत नाहीं, तर वारंवार केलेले उच्चार व आचार यांवरून तें व्यक्त होतें.

ख्रिस्ताच्या सामर्थ्याव्यतिरिक्त मनुष्याच्या कृति केवळ बाह्यात्कारी चांगल्या असतील ही गोष्ट नाकबूल करितां येत नाहीं. कारण वजनदारपणाची आवड व लोकमान्यतेची हाव ही सुव्यवस्थित आयुष्यक्रम बनविण्यास कारणीभुत होतील, व स्वाभिमानामुळें दुष्कृत्य करण्यापासून असा मनुष्य कदाचित परावृत्त होईल; आपमतलबी अंत:करणाचा मनुश्य उदारपणाचीं कृत्यें करील. तर मग आम्हीं कोणाच्या बाजूनें आहोंत, हें काय साधनांनीं ठरवावयाचें ?

अंत:करण कोणाजवळ आहे ! आपले विचार कोणाबरोबर आहेत ? कोणाशीं संभाषण करणें आपणांला आवडतें ? आपलें उत्कट प्रेम व आपला थोर उत्साह हीं कोनाजवळ आहेत ? आपण ख्रिस्ताचे असलों, तर आपले विचारहि त्याच्याबरोबर असतील, व आपले सुविचार त्याचेच असतील . आपणांजवळ जें काम्हीं आहे तें त्यालाच वाहीलेलें आहे असें होईल. त्याचीच प्रतिमा आपण व्हावें ही इच्छा होईल, त्याच्याच आत्म्यानें आपन श्वासोच्छ्वास करूं, त्याच्याच इच्छेप्रमाणें सर्व कांहीं करूं व सर्व बाबतींत त्यास संतोष देऊं.

**(३) आपला जर खऱ्या अर्थाने नव्याने जन्म झाला तर आपल्या जीवनात कोणते चारित्र्याचे गुणधर्म प्रदर्शित होतील?**

*आत्म्याच्या द्वारे निष्पन्न होणारे फळ, प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन हे आहे, अशांविरुद्ध नियमशास्त्र नाही. (गलतीकरास पत्र ५:२२-२३)*

ख्रिस्तात जे लोक नव्यानें जन्म पावतात त्यांच्याठायी "प्रीति, आनंद, शांत, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासुपणा, सौम्यता ईंद्रियदमन."1 हीं फळें दृष्टोत्पत्तीस येतात. असे लोक आपल्या ऐहिक वासनांप्रमाणें चालत नाहींत, तर देवाच्या पुत्राच्या ठायीं पूर्ण श्रद्धायुक्त होत्साते त्याच्याच पावलांस अनुसरतात, त्याच्या शीलाचाच विचार ते करतात, व तो ज्याप्रमाणें पवित्र आहे, त्याप्रमाणें तेहि आपणांस पवित्र करतात. एके वेळी ज्या गोष्टी त्यांस एकदा प्रिय होत्या त्यांचा आंता ते द्वेष करू लागतात. गर्विष्ट व स्वयमंद असेल तो सौम्य व अंत:करणानें नम्र होतो. पोकळ डौली व अभिमानी असेल, तो गंभीर व नम्र होऊन जातो. दारुबाज असेल तो दारु न पिणारा होईल, दुराचरणी असेल, तो पवित्र होईल. जगांतील शुष्क चालीरीति व पोकळ डामडौल ह्यांचा तो त्याग करील. ख्रिस्ती मनुष्य "बाह्य शोभा" प्राप्त करून घेण्याची खटपट करणार नाहीं, तर "जो सौम्य व शांत आत्मा देवाच्या दृष्टीनें बहुमूल्य त्यानें, म्हणजे अंत:करणांतील गुप्त मनुष्यपणानें जी अविनाशी शोभा"1 ती प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करील.

**(४) आपला नव्याने जन्म झाल्यावर ज्या लोकांना आपण दुखावले आहे त्यांच्यासाठी काय करण्याची आपली इच्छा असेल?**

*तेव्हा जक्कय उभा राहून प्रभूला म्हणाला, "प्रभूजी, पाहा, मी आपले अर्धे द्रव्य दरिद्र्यांस देतो, आणि मी अन्यायाने कोणाचे काही घेतले असेल तर ते चौपट परत करतो." (लूक १९:८)*

शीलामध्यें सुधारणा घडून आली नसेल, तर तो पश्चात्तापाचा खरा पुरावा नाहीं. आपलें वचन पुन्हा पाळील, व जे हरण केलें आहे, तें परत देईल, आपलीं पापें कबुल करील, ईश्वर व बंधुवर्गावर प्रेम करील, तर पापी मनुष्य मरणांतून निघून आपण जीवनंत आलों आहों अशी त्यानें खात्री बाळगावी.

चुकीस पात्र व पापी असे आपण अंत:करणांत प्रेमाचा पाझर फुटुन ओझें हलकें वाटूं लागतें; कारण ख्रिस्तानें घातलेलें जूं हलकें असतें. अशावेळीं कर्तव्यामध्त आनंद व स्वर्थत्यागाम्त सुख वाटू लागतें. व पूर्वी जो मार्ग अंधकारमय वाटत होता तोच आतां न्यायीपणाच्या सूर्यकिरणांमुळें प्रकाशमय भासतो.

**(५) ख्रिस्ताच्या कृपेने नवीन बनवलेल्या हृदयातून बाहेर पडणारे जे प्रेम असते जे भरून टाकते, बदलते आणि बाहेर इतरांच्या प्रती जाते त्या प्रेमाचा स्रोत कोण आहे?**

*आणि जशी आमची प्रीती तुमच्यावर आहे, तशी प्रभू तुमची प्रीती एकमेकांवर व सर्वांवर वाढवून विपुल करो; (१ थेसलोनिकरास पत्र ३:१२)*

ख्रिस्तांतील शिलाचें सौदर्य त्याच्या शिष्याच्याठायीं दिसून येईल व ईश्वराच्या इच्छेप्रमाणें चालण्यांतच त्याला आनंद होतो. ईश्वरावर प्रेम, त्याचें वैभव प्राप्त होण्याची उत्कट इच्छा, हींच आपल्या प्रभूच्या आयुष्यक्रमास वळण देणारीं सामर्थ्यें होतीं.

त्याच प्रेमामुळें त्याच्या सर्व कार्यांस शोभा येऊन त्यांस थोरपणा आला होता. अशा प्रकारचें प्रेम ईश्वरी होय, व तें ईश्वरार्पण न केलेल्या अंत:करणांतच तें सांपडतें. “त्यानें पहिल्यानें आम्हांवर प्रीति केली, म्हणून आम्ही प्रीति करतों.”2 ईश्वरी प्रसादानें नव्या झालेला अंत:करणांत प्रेम हेंच कर्माचें मूळ असून तें शील बदलतें; त्याच्या नैसर्गीक उर्मीवर सत्ता करून मनोविकारांस आपल्या ताब्यास्त ठेवितें, व शत्रुत्वास आपल्या स्वाधीन करून घेऊन त्याच्या आवडी थोर प्रकारच्या करितें. अशा रीतीनें आत्म्याच्याठायीं वागवलेलें प्रेम आयुष्यक्रम सुखकर करून सर्व प्रकारें शुद्ध अशा सामर्थ्याचा पाऊस पाडितें.

**(६) आपले देवावरील प्रेम दाखवण्यासाठी काय करण्याची आपली इच्छा असेल?**

***“माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल. (योहान १४:१५)***

**(७) ख्रिस्ताच्या बरोबर असलेल्या नात्यात, त्याच्या सामर्थ्याने आज्ञापालन का आवश्यक आहे?**

***“मी त्याला ओळखतो” असे म्हणून त्याच्या आज्ञा जो पाळत नाही तो लबाड आहे, त्याच्या ठायी सत्य नाही. (१ योहान २:४)***

देवाच्या लेकरांनीं व विशेषत: जे त्याच्या कृपेवर विश्वास ठेवण्यास नुसतेच आलेले आहेत, त्यांनी दोन प्रकारच्या चुका न होऊं देण्याविषयीं सावधगीरी ठेवावी. पैकीं, पहिलीचा उल्लेख पूर्वी केलेलाच आहे. म्हणजे ईश्वराशीं एकमतानता प्राप्त होण्यासाठीं स्वतां केलेल्या गोष्टीवर विश्वास ठेऊन त्यांवर नजर

देणें, ही होय. ईश्वरी नियमांचें पालन करण्याच्या बाबतींत स्वताम्च्या कृत्यांनीं पवित्र होण्याचा प्रयत्न करणारे लोक केवळ अशक्य अशा गोष्टी शक्य करून दाखविण्याचा प्रयत्न करतात. ख्रिस्ताशिवाय जें सर्व कांहीं मनुष्य करतो, तें आपमतलबानें व पापानें दूषित झालेलें असतें. जिच्या योगानें आपण पवित्र होऊं, ती केवळ एका ख्रिस्ताचीच कृपा विश्वासाच्याद्वारें आपणांस पवित्र करते.

ह्या पहिल्या चुकीच्या विरुद्ध परंतु तितकीच भयंकर अशी दुसरी चूक म्हटली म्हणजे ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यानें ईश्वरीनियमांचें पालन करण्यापासून आपण मुक्त होतों, व ज्याअर्थी केवळ विश्वासानें मात्र आपणांस ख्रिस्ताच्या कृपेचें भागीदार होता येतें, त्याअर्थी आपल्या तारणाप्रीत्यर्थ कार्यावर नजर देण्याचें कांहीं एक कारण नाहीं अशी समजूत.

**(८) आपला जेव्हा नव्याने जन्म होतो तेव्हा ख्रिस्ताने आपल्यामध्ये काय करण्याचे अभिवचन दिले आहे?**

***"परमेश्वर म्हणतो, "त्या दिवसांनंतर जो करार मी त्यांच्याबरोबर करीन तो हा मी आपले नियम त्यांच्या मनात घालीन,आणि ते त्यांच्या हृदयपटांवर लिहीन," (इब्री १०:१६ )***

परंतु ह्याठिकाणीं पहा, कीं आज्ञाधारकत्व म्हणजे केवळ बाह्यात्कारी दुसऱ्याच्या इच्छेस मान देणें नव्हें; तर प्रेमळ अंत:करणानें केलेली सेवा. ईश्वरीनियम म्हणजे त्याच्या शीलाचें प्रगटीकरण, व प्रेमाचें--उदात्त तत्त्वाचें--दृश्य असें स्वरूप होय, व म्हणून तो स्वर्गावरील व पृथ्वीवरील त्याच्या साम्राज्याचा पाया आहे. जर आपलीं अंत:करणें ईश्वराशीं सादृश्य

पावतील अशीं बनविलीं, व आत्म्यांत प्रेमवृक्षाचें बीज लाविलें, तर आपल्या आयुष्यक्रमांत ईश्वरीनियम शेवटास जाणार नाहींत काय ? मनुष्याच्या अंत:करणांत प्रेमवृक्षाचें बीज लावलें जातें, व त्यास उत्पन्न केलें त्या परमेश्वराच्या प्रतिमेवरहुकूम तो बनविला जातो, तेव्हां "मी आपले नियम त्यांच्या हृदयांत घालीन, आणि ते त्याच्या मनावर लिहिन."1 हा शास्त्रवचनाचा नवा करार पूर्ण होतो. आणि जर ते नियम अंत:करणावर लिहिले तर ते आयुष्यक्रमास योग्य वळण देणार नाहींत काय ?

आज्ञापालन म्हणजे सेवा, व प्रेमळतेंचें स्वार्पण हींच शिष्यत्वाचीं खरीं लक्षणें आहेत. "देवावर प्रीति करणें म्हणजे आपण त्याच्या आज्ञा पाळणें हेंच आहे." "मला त्यांचे ज्ञान आहे असें म्हणुन जो त्याच्या आज्ञा पाळीत नाहीं, तो लबाड आहे, त्यांत सत्य नाहीं."2 जिच्यायोगानें ख्रिस्ताच्या कृपेचे आपण भागीदार होतों, ती एकच गोष्ट म्हणजे श्रद्धा ही होय. ती मनुष्याला आज्ञापालनाच्या जबाबदारीतून सोदविण्याच्याऐवजी त्यास आज्ञापालनास समर्थ करतें.

**(९) ज्या प्रभूची आपण सेवा करतो त्याचे एक दर्शक तत्व काय आहे?**

*त्यांच्या फळांवरून तुम्ही त्यांना ओळखाल. काटेरी झाडांवरून द्राक्षे किंवा रिंगणीच्या झाडांवरून अंजीर काढतात काय? (मत्तय ७:१६)*

*ह्यास्तव तुम्ही त्यांच्या फळांवरून त्यांना ओळखाल. (मत्तय ७:२०)*

स्वेच्छेच्या आज्ञापालनानें मुक्ति मिळत नाहीं कारण ती ईश्वराची परंतु फुकट मिळणारी देणगी आहे. परंतु आज्ञापालन हें श्रद्धेचें फळ आहे. “तुम्ही जाणतां, कीं तों पापें हरण करावीं म्हणून प्रगट झाला, त्याच्याठायीं पाप नाहीं. जो कोणी त्याच्याठायीं राहतो, तो पाप करीत नाहीं.”3 परिक्षा आहे ती ह्याच ठिकाणी. आपण ख्रिस्तांत राहिलों, व ईश्वराचें प्रेम आपणांत वास्तव्य करीत असेल, तर आपल्या भावना, आपले विचार, आपली कृत्यें ही त्याच्या पवित्र नियम शास्त्रांतील आज्ञांत दर्शविल्याप्रमाणें त्याच्या इच्छेशीं अनुरूप अशी होतील. “लेकरांनो, कोणी तुम्हांस बहकांवू नये. जसा तो धार्मिक आहे, तसा धर्मानें वागणाराहि धार्मिक आहे.”4 सीना डोंगरावर ईश्वरानें दिलेल्या दहा आज्ञांत सांगितलेल्या पवित्र नियमांच्या उच्च प्रमाणानें नीतिमत्त्वाची व्याख्या ठरविली जाते.

**(१०) प्रभूला आपले हृदय दिल्यावर आपल्या जीवनात समान रीतीने कोणते दोन घटक असणे आवश्यक आहेत?**

***ह्याप्रमाणे विश्वासाबरोबर जर क्रिया नाहीत तर तो जात्या निर्जीव आहे. (याकोब २:१७)***

ईश्वराच्या आज्ञा पाळण्यापासून मनुष्यांस मुक्त करणारा ख्रिस्तांतील विश्वास म्हणुन ज्यांस म्हणतात तो खरा विश्वास नव्हे, तर तो खोटा आहे. “कृपेनेंच विश्वासाच्या द्वारें तुमचें तारण झालें आहे.”5 परंतु “विश्वासाला जर क्रिया नाहींत, तर तो जात्याच निर्जीव

आहे."6 पृथ्वीवर येण्यापूर्वी येशूनें स्वतांविषयीं म्हटलें होतें, "हें माझ्या देवा, तुझा मनोदय साधायाला मी इच्छितों, आणि माझ्या अंतर्यामांत तुझें नेमशास्त्र आहे."1 त्याच्या स्वर्गारोहणाच्यापूर्वी थोडा वेळ अगोदर तो म्हणाला "मी आपल्या बापाच्या आज्ञा पाळून त्याच्या प्रीतींत राहतों."2 शास्त्रांत सांगितलें आहे, "आणि आम्ही त्याच्या आज्ञा जर पाळतों, तर त्यावरून आम्ही जाणतों कीं आम्हांस त्याचे ज्ञान आहे. मी त्यामध्यें राहतों, असें म्हणणाऱ्यानें तो चालला तसें स्वत:ही चाललें पाहीजे," "कारण ख्रिस्तानेहि तुम्हांसाठीं सोशिलें, तुम्ही त्याच्या पावलास अनुसरावें म्हणुन तुम्हांकरीता कित्ता घालून ठेविला आहे."3

**(११) कोणाच्या उदाहरणाच्या आधारे आपण आपला विश्वास आणि सेवेचे आयुष्य ठेवावे?**

*कारण ह्याचकरता तुम्हांला पाचारण करण्यात आले आहे; कारण ख्रिस्तानेही तुमच्यासाठी दुःख भोगले आणि तेणेकरून तुम्ही त्याच्या पावलांवर पाऊल ठेवून चालावे म्हणून त्याने तुमच्याकरता कित्ता घालून दिला आहे. (१ पेत्र २:२१)*

**(१२) आपण कोणते गुणवैशिष्ट्य शोधले पाहिजे आणि जे त्याचा शोध करतात व त्याच्यासाठी तहानलेले व भुकेले असतात त्यांच्यासाठी ख्रिस्ताने कसे अभिवचन दिले आहे?**

*जे नीतिमत्त्वाचे भुकेले व तान्हेले ते धन्य, कारण ते तृप्त होतील. (मत्तय ५:६)*

सार्वकालिक जीवनाच्या अटी--आपल्या प्रथम पूर्वजांच्या पतनापूर्वी एदेन बागांत अगदीं

जशा होत्या तशाच, म्हणजे ईश्वरी नियमांचें पूर्ण पालन, पूर्ण नीतिमत्त्व - पूर्वी जशा होत्या तशाच त्या आता आहेत. ह्यापेक्षा कमी दर्जाच्या अटीवर जर सार्वकालिक जीवन दिलें असतें, तर सर्व जगाचें सुखास धोका आला असता व पापास त्याच्या दु:ख व हालापेष्टांच्या परिवारासह सर्वकाळ मोकळा मार्ग झाला असता.

**(१३) देव आपल्या प्रत्येकाला कोणते सौभाग्य देऊ करतो?**

*त्यांच्या योगे मोलवान व अति महान अशी वचने आपल्याला देण्यात आली आहेत, ह्यासाठी की, त्यांच्या द्वारे तुम्ही वासनेपासून उत्पन्न होणारी जगातील भ्रष्टता चुकवून ईश्वरी स्वभावाचे वाटेकरी व्हावे. (२ पेत्र १:४)*

**(१४) ख्रिस्ताचे रक्त आपल्याला कोणते दोन भागात विभागू शकणारे वरदान देते, आणि त्याच्या कृपेने आपल्याला धार्मिकता देखील प्राप्त होते?**

*त्याच्या कृपेच्या समृद्धीप्रमाणे त्या प्रियकराच्या ठायी, त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरून मिळवलेली मुक्ती, म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा, आपल्याला मिळाली आहे. (इफिसकरास पत्र १:७)*

पतनापूर्वी आदामास ईश्वरी नियमांचें पालनानें नीतिमत्त्वाचें शील बनविणें शक्य होतें. परंतु तसें करण्यास तो चुकला, व म्हणून त्याच्या पापानें आमचा स्वभाव नीच दशेस आला व आमचें आम्हांस नीतिमान होतां येईनासें झालें. आपण पापी, अपवित्र असल्यामुळें आपणां स्वतांस ईश्वराचा पवित्र

नियम पूर्णपणें पाळता येत नाहीं. ईश्वरी नियमांचे परिपालनाचे हक्कांस मिळवितां येण्याजोंगें आमचें स्वतांचें नीतिमत्व नाही, परंतु ख्रिस्तानें आम्हांसाठीं यांतून पार पाडण्याचा मार्ग तयार केला आहे. आयुष्यक्रमातिल ज्या परिक्षाम्स व मोहास आपणांस तोंड द्यावयाचें असतें, त्याच परिक्षाम्च्या व मोहांच्य आयुष्यक्रम चालविला, तो आम्हांसाठीं मरण पावला, व त्यानें आमचीं पापें पत्करून आम्हांस नीतिमत्व दिलें. तुम्ही आपणांला त्याला वाहून घ्याल व त्यास तुमचा तारणारा म्हणुन स्वीकराल, तर तुमचें जिणें पापी असतांहि केवळ त्याच्याचमुळें तुम्ही नीतिमान ठराल. तुमच्या शिलाऐवजी ख्रिस्ताचें शील उभे राहतें व जणूं काय तुम्हीं पाप केलेंच नव्हतें अशा स्थितींत ईश्वर तुमचा स्वीकार करतो, इतकेंच नव्हें, तर ह्याहिपेक्षां जास्त म्हणजे प्रभु ख्रिस्त अंत:करणाचा पालट करतो.

**(१५) ख्रिस्तामधील आपल्या नव्याने जन्म पावलेल्या अनुभवानंतर, त्याच्यामध्ये वाढत जात आपण कसे टिकून राहू शकतो?**

***मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वत:ला माझ्याकरता दिले. (गलतीकरास पत्र २:२०)***

विश्वासानें केवळ तो तुमच्या अंत:करणांत वास करितो. त्याजबरोबरचा हा संबंध तुम्ही विश्वासानें व त्याच्या इच्छेस सर्वदा वाहून घेण्यानें राखावयाचा आहे; व जोपर्यंत तुम्ही असें करीत राहाल, तोपर्यंत तो तुमच्या

अंत:क्रणांत त्याच्या सदिच्छेप्रमाणें करण्याचें कार्य करील. म्हणून तुम्ही असें म्हणावें, कीं “देहांत जें माझें जिणें आहे, तें ज्या देवाच्या पुत्रानें मजवर प्रीति केली, व आपणांला मजकरिता दिलें त्यावरील विश्वासात आहे.”1 म्हणून प्रभु ख्रिस्त आअलुआ शिश्यांस म्हणतो, “बोलणारे तुम्हीं नाहीं, तर तुमच्या बापाचा आत्मा हाच तुम्हांमध्यें बोलणारा आहे.”2 प्रभु ख्रिस्त तुमचेठायीं कार्य करीत असतां तोच (ख्रिस्ताचा) आत्मा व तीच कृत्यें--नीतिमत्वाचीं व आज्ञापालनाची--तुमचेठायीं दिसून येतील.

बढाई मारतां येण्याजोगें असें आपणांजवळ स्वतांचें कांहींएक नाहीं. स्वतांस थोर मानावयास आपणांस कांहीं कारण नाहीं. आपणांस दिलेल्या ख्रिस्ताच्या नीतिमत्त्वांत व आपणांमध्यें कार्य करणाऱ्या ख्रिस्ताच्या आत्म्यानें घडवून आनलेल्या क्रियेंतच अशा मानण्यास आपणांस जागा आहे.

**(१६) विश्वास हा श्रद्धा ह्यापेक्षा कोणत्या अर्थाने वेगळा आहे हे ह्या वचनातील कोणत्या विधानाने प्रगट होते?**

***एकच देव आहे, असा विश्वास तू धरतोस काय? ते बरे करतोस; भुतेही तसाच विश्वास धरतात व थरथर कापतात! (याकोब २:१९)***

श्रद्धेविषयी आपण बोलतों, तेव्हां एक फरक लक्षांत ठेवण्यासारखा आहे. श्रद्धेहून अगदीं भिन्न असा एक प्रकारचा विश्वास आहे. ईश्वराचें व त्याच्या सामर्थ्याचें अस्तित्व, त्याच्यावचनाची सत्यता ह्या गोष्टी सैतान व त्याचे अनुयायी यांसहि नाकबूल करितां येत नाहीं. शास्त्रांत सांगितलें आहे, कीं “भुतेंही विश्वास धरितात व कांपतात.”3 परंतु ही कांहीं

श्रद्धा नव्हें, जेथें ईश्वराच्या वचनावर नुसता विश्वासच नव्हें, तर त्याच्य इच्छेस मान देणें, अंत:करण त्यास वाहून घेणें, त्याचीच आवड धरणें हीं आहेत त्यास श्रद्धा--प्रेम करणारी व आत्म्यास पवित्र करणारी-असें म्हणतात. अशा श्रद्धेनें अंत:करणाचा ईश्वरी स्वरूपांत पालट होतो. आणि जें अंत:करण त्याच्या न पालटलेल्या अशा स्थितींत ईश्वरी नियमांच्या अंकित नसतें, व तें तसें असणें शक्यहि नाहीं, तेंच आतां पालटलेल्या स्थितींत त्याच्या पवित्र आज्ञांचें पालन करण्यांत आनंद मानितें व गीतकर्त्याबरोबर “तुझें शास्त्र मी केवढें प्रिय मानितों ? सारा दिवस तें माझ्या ध्यानाचें आहे.”1 व ईश्वरी नियमांचें नीतिमत्त्व आपलेठायीं पूर्ण होतें, म्हणजे आपण “देहाप्रमाणें नव्हें तर आत्म्याप्रमाणें चालणारे”2 असें होतों.

**(१७) किती काल ख्रिस्त अगदी संयमाने आपले गुणवैशिष्ट्ये सुधारत राहील?**

***... ज्याने तुमच्या ठायी चांगले काम आरंभले तो ते येशू ख्रिस्ताच्या दिवसापर्यंत सिद्धीस नेईल हा मला भरवसा आहे; (फिलिप्पेकरास पत्र १:६)***

ख्रिस्ताचें क्षमा करणारें प्रेम ओळखणारे व खरोखर ईश्वराची लेंकरें होंण्याची इच्छा बाळगणारे असें कांहीं असतात, परंतु त्यांस आपलें शील असावें तसें नाहीं, व आपलें जिणें अपराधाचें (पापाचें) आहे असा अनुभव येतो, व ते आपल्या अंत:करणाचा पवित्र आत्म्यानें पालट केला आहे किंवा नाहीं ह्याबद्दल साशंक असतात. अशा लोकांस माझें सांगणें आहे, कीं बाबानों, असे हताश होऊन माघार घेऊं नका. आपल्या कोतेपणामुळें व अपराधांमुळें प्रभु

ख्रिस्ताचे पायाशीं आपणांस वारंवार लोटांगण घालावें लागेल. आपणांस केवळ निराश व्हावयाचें नाहीं. शत्रुनें जरी आपणांवर पगडा बसविला असला, तरी ईश्वरानें आपणांस सोडलें नाहीं व आपला नाकारही केला नाहीं; खरोखरच नाहीं.

**(१८) ह्या आयुष्यभराच्या चारित्र्य बांधणीच्या प्रक्रियेच्या दरम्यान जर आपण पापात पडलो, मग कोणते अद्‌भुत अभिवचन आपण हस्तगत करू शकतो?**

***अहो माझ्या मुलांनो, तुम्ही पाप करू नये म्हणून हे मी तुम्हांला लिहितो. जर कोणी पाप केले, तर नीतिसंपन्न असा जो येशू ख्रिस्त तो पित्याजवळ आपला कैवारी आहे. (१ योहान २:१)***

ख्रिस्त हा देवाच्या उजवीकडे बसून आपणांसाठीं मध्यस्थी करीत आहे. प्रिय प्रेषित योहानानें म्हटलें आहे, “तुम्ही पाप करुं नये. म्हणून हें मी तुम्हांस लिहितों. जर कोणीं पाप केंलेंच तर धार्मिक असा जो येशू तो बापाजवळ आमचा कैवारी आहे.”3 “बाप स्वतां तुम्हांवर प्रीति करतो”4 हे आपल्या प्रभु ख्रिस्ताचे शब्द विसरुं नका. बापाकडे तुम्हांस परत आणण्याची व स्वताम्ची शुद्धता व पवित्रपणा हीं तुमचें ठायी प्रतिबिंबित झालेली पाहण्याची त्याची इच्छा आहे. तुम्ही मात्र त्यास आपणांला वाहुन घ्याल, तर ज्यानें तुमचेठायीं चांगलें काम करण्याचें पत्करलें आहे असा प्रभु ख्रिस्त तें आपला दिवस येईपर्यंत तसेंच चालू ठेवील. अधिक उत्कठेंनें प्रार्थना करा, व पूर्णपणें विश्वास ठेवा. आपल्याच सामर्थ्यावर आपला विश्वास नाहीं, तर त्या तारकाच्या सामर्थ्यावर विश्वास
नाहीं, तर त्या तारकाच्या सामर्थ्यावर विश्वास

ठेऊं या, व आपल्या देहाचें आरोग्य जो प्रभु ख्रिस्त त्याची स्तुति करूं या.

**(१९) आपला नव्याने जन्म झाल्यावर आणि त्या वाढीच्या प्रक्रियेत असल्यावर, आपल्याला कशाची जाणीव होईल?**
***आम्ही सगळे अशुद्ध मनुष्यासारखे झालो आहोत; आमची सर्व नीतीची कृत्ये घाणेरड्या वस्त्रांसारखी झाली आहेत; आम्ही सर्व पाल्याप्रमाणे वाळून गेलो आहोत; आमच्या अधर्माने आम्हांला वादळाप्रमाणे उडवून दिले आहे. (यशया ६४:६)***

जसजसे अधिक तुम्ही ख्रिस्ताजवळ येता, तसतसे आपण अधिक अपराधी आहों, असें तुमच्या नजरेस येतें; कारण तुमची दृष्टी अधिक स्वच्छ होईल, व प्रभूच्या पूर्ण अशा स्वभावाशीं अगदीं विरुद्ध असणारा तुमचा कोतेपणा ठळठळीतपणें तुमच्या दृष्टीस पडेल. सैतानाच्या मोहाचें सामर्थ्य नष्ट होऊन देवाच्या आत्म्याचें सामर्थ्य तुम्हांस जागृत करीत आहे हा ह्या गोष्टीचा पुरावा आहे.

ज्या अंत:करणास आपल्या पापीपणाची ओळख पडत नाहीं, त्या अंत:करणांत ख्रिस्तीविषयीं अढळ प्रेम वास करीत नाहीं. ख्रिस्ताच्या कृपेनें बदललेला आत्मा त्याच्या दैवी शीलाची वाखाणणी करील. परंतु आपण जर स्वतांची नीतिभ्रष्टता पाहनार नाहीं, तर ख्रिस्ताचें सौंदर्य व त्याची उत्कृष्टता हीं आपल्या नजरेस येणार नाहींत हाहि एक बिनचुक पुरावा आहे.

जसजसे आपण स्वतांस कमी लेखूं. तसतशी आपल्या तारकाच्या अमर्याद पवित्रतेची व सौंदर्याची आपण अधिकाधिक तारीफ करूं आपल्या पापीपणाचें दृश्य झालेलें स्वरूप


आपणांस त्या प्रेम करणाऱ्या ईश्वराकडे नेईल. आणि आपल्या दुर्बलतेची साक्ष पटविणारा आत्मा जेव्हां ख्रिस्तामागून जाईल तेव्हां तो आपलें सामर्थ्य त्याच्या नजरेस आणील, आपल्या गरजांची जाणीव जसजशी आपनांस त्याच्याकडे व त्याच्या वचनाकडे नेईल, तसतसे त्याच्या शीलाविषयीं आपलें विचार अधिक होत जातील व पूर्णपणें त्याचें स्वरूप आपल्याठायीं प्रतिबिंबित होईल.

*त्याच्या कृपेने, मी ख्रिस्ताच्या पावलांवर चालण्याची निवड केली आणि माझ्या आयुष्याचा प्रभू आणि स्वामी म्हणून अनुसरण्याची देखील निवड केली.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*माझी प्रार्थना आहे कि त्याच्या आत्म्याची फळे माझ्यात दिसून यावी जेणेकरून मी त्याचे नीतिमान आणि पवित्र चारित्र्य प्रगत करू शकेन.*

**गोल करा: होय अनिश्चित**



## धडा ९
## ख्रिस्तांत वाढ

**(१) ख्रिस्तात नवीन बालक ह्या नात्याने, आपले ख्रिस्ताच्या सोबत कशा अर्थाने नातेसंबंध विकसित होईल ह्याप्रती कशी इच्छा असावी?**

***... तुमची आध्यात्मिक वृद्धी व्हावी म्हणून नूतन जन्मलेल्या बालकांसारखे वचनरूपी निर्‍या दुधाची इच्छा धरा, (१ पेत्र २:२)***

अंत:करणाचा जो पालट झाल्यानें आपण ईश्वराची लेकरें होतों, त्यास शास्त्रांत जन्म असें म्हतलें आहे. पुन्हा दुसर्‍या ठिकाणीं त्याची तुलना शेतकर्‍यानें पेरलेल्या चांगल्या बियांच्या कोंबाबरोबर केलेली आहे. त्याप्रमाणेंच प्रभु ख्रिस्ताकडे जे लोक नुकतेच वळलेले आहेत ते “नूतन जन्मलेले बालक”1 ख्रिस्तांत वाढणार्‍या स्त्रीपुरुषांच्या

बांध्याप्रमाणें वाढावयाचें आहेत, अगर शेतांत पेरलेल्या चांगल्या बींप्रमाणें त्यांनीं वाढून चांगलीं फळें द्यावयाचीं आहेत. यशाया प्रवक्त्यानें म्हटलें आहे, कीं “त्याचा महिमा व्हावा म्हणून त्यांस न्यायाचे वृक्ष, परमेश्वराचें लावणें असें म्हणतील.”2 म्हणून आत्मिक जीवनांतील निगुढ सत्यतत्त्वें समजण्यास आपणांस मदत व्हावी याकरीतां सृस्ट पदार्थातील जीवनाची उदाहरणें प्रभूनें घेतलीं आहेत. सृष्टींतील अतिशय क्षुल्लक अशा पदार्थांत जीवन उत्पन्न करणें मनुष्याचें जीवन फक्त ईश्वरानें स्वतां दिलेल्या जीवनापासूनच आहे. त्याचप्रमाणें मनुष्याच्या अंत:करणांत आत्मिक जीवन उत्पन्न होतें, तें केवळ ईश्वरापासून मिळालेल्या जीवनापासूनच होते. मनुष्यास तो “वरून जन्मल्याशिवाय”3 प्रभु ख्रिस्त जें जीवन देण्यास आला, त्याचा भागीदार त्यास होता येत नाहीं.

**(२) आपण आपली स्वत:ची अध्यात्मिक वाढ का करून घेऊ शकत नाही?**

***स्वाभाविक वृत्तीचा माणूस देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वही, कारण त्या त्याला मूर्खपणाच्या वाटतात; आणि त्याला त्या समजू शकणार नाहीत, कारण त्यांची पारख आत्म्याच्या द्वारे होते. (१ करिंथकरास पत्र २:१४)***

जीवनाप्रमाणेंच वाढीची गोष्ट आहे. कळीस फुलविणारा व फुलाचें फळ करणारा केवळ तो एक परमेश्वरच आहे. त्याच्याच सामर्थ्यानें बीं, “पहिल्यानें अंकूर, मग कणीस, मग कणसांत भरलेला दाणा,”4 अशा रीतीनें वाढत जातें. इस्त्राएली भविष्यवादी होशेहा यानें म्हटलें आहे, कीं “कमलिनीसारखा फुलेल.” “ते

धान्यासारखें उत्पत्ति करतील व द्राक्षीप्रमाणें फुलतील."5 प्रभु येशूची आपणांस आज्ञाआहे, कीं "भूकमलें कशी वाढतात हें लक्षांत आणा."6 वनस्पती व फुलें हीं आपल्या स्वताम्च्या देखरेखीनें, काळजीनें अगर प्रयत्नानें वाढत नाहींत; तर त्यांचें जीवन चालविण्यास जें कांहीं ईश्वर देतो, त्याच्यायोगानें वाढतात, मूल आपल्या स्वताच्या काळजीनें अगर सामर्थ्यानें आपल्या शरीराच्या बांध्यांत भर टाकीत नाहीं. त्याचप्रमाणें तुम्हांसहि आपल्या काळजीनें अगर प्रयत्नानें आत्मिक वाढ संपादन करतां येत नाही.

**(३) एका वनस्पतीला वाढण्यासाठी पोषणाचे कोणते दोन स्रोत असतात आणि ह्या वचनामध्ये चिन्हात्मक स्वरूपाने आपल्या अध्यात्मिक वाढीसाठी प्रभूचा प्रभाव म्हणून वापरण्यात आलेली आहेत?**

*कारण परमेश्वर देव हा सूर्य व ढाल आहे, परमेश्वर अनुग्रह व गौरव देतो; जे सात्त्विकपणे चालतात त्यांना उत्तम ते दिल्यावाचून तो राहणार नाही. (स्तोत्रसहिता ८४:११)*

*मी इस्राएलास दहिवरासारखा होईन; तो भूकमलाप्रमाणे फुलेल, लबानोनाप्रमाणे मूळ धरील. (होशेय १४:५)*

वनस्पति, मूल ही भोवतालच्या परिस्थितीपासून जें कांहीं हवा, सुर्यप्रकाश व अन्न-आपल्या जीवनाकरीतां घेतात, त्याच्यायोगानें वाढतात. सृष्टीच्या देणग्या जशा वनस्पतीस व प्राण्यास होत, तसाच ख्रिस्त हा जें त्याच्यावर विश्वास ठेवितात त्यांस होय. तो त्यांची "सर्वकालची प्रभा" "सूर्य व ढाल"1 आहे. तो इस्त्राएलास "दहिंवरा"-

सारखा होईल. “कापलेल्या गवतावर पावसाप्रमाणें तो उतरेल.” “तो जिवंत उदक व जी स्वर्गांतून उतरते, व जगाला जीवन देते ती देवाची भाकर”2 आहे.

ईश्वरानें आपल्या पुत्ररुपी अतुल देणगीनें पृथ्वी सभोवतीम असलेल्या वातावरणाप्रमाणेंच सत्य असें वातावरण सर्व सृष्टीच्या भोंवतीं ठेविलें आहे. जें कोणी ह्या जीवन देणाऱ्या वातावरणांत श्वासोच्छ्वास करण्याचें पसंत करतील, ते सर्व जगातील; व ख्रिस्तांत असणाऱ्या स्त्रीपुरुषांइतके वाढतील.

आपलें सौंदर्य व आकार पूर्नत्वास येंण्यास सूर्यकिरणांची मदत व्हावी म्हणुन ज्याप्रमाणें फूल सूर्याकडे वळते, त्याप्रमाणें स्वर्गाचा प्रकाश आपणांवर पडून आपणही प्रकाशित व्हावें व आपलें शिल ख्रिस्तासारखें होत जावें म्हणून नीतिमत्त्वाच्या सूर्याकडे आपण वळलें पाहिजें. “तुम्ही मजमध्यें रहा, आणि मी तुम्हांमध्यें जसें फांटा वेलांत राहिल्यावांचून तुमच्यानेंही देववत नाहीं.”3

**(४) येशुमध्ये वाढत राहून चांगल्या फलधारण करणारे आपण कसे होऊ शकतो?**

***मीच वेल आहे, तुम्ही फाटे आहात; जो माझ्यामध्ये राहतो आणि मी ज्याच्यामध्ये राहतो तो पुष्कळ फळ देतो, कारण माझ्यापासून वेगळे असल्यास तुम्हांला काही करता येत नाही. (योहान १५:५)***

वाढीसाठीं व फळें येण्यासाठीं ज्याप्रमाणें खांदीस झाडाच्या बुंधावर अवलंबून राहावें लागतें, तसें तुम्हांस ख्रिस्तावर अवलंबून राहीले पाहिजे. त्याव्यतिरिक्त तुम्हांस जीवन नाहीं. मोहाच्या प्रतिकार करण्याचें, अगर कृपेनें व पवित्रपणानें वाढण्याचें सामर्थ्य तुमच्यापाशी

नाहीं. त्या ख्रिस्तामध्यें असतांनाच केवळ तुमचा उत्कर्ष होणार आहे. तुम्हांस त्यापासून जीवन मिळाल्यामुळेम तुम्ही सुकून जाणार नाहीं, अगर निष्फळ होणार नाहीं. तर नद्यांनीं पोसलेल्या झाडांप्रमाणें तुम्ही व्हाल.

**(५) आपल्या विश्वासाचा स्रोत कोण आहे आणि आपल्या ख्रिस्ती अनुभवाच्या दरम्यान तो कसा वाढत राहतो?**

***आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू ह्याच्याकडे पाहत असावे; जो आनंद त्याच्यापुढे होता त्याकरता त्याने लज्जा तुच्छ मानून वधस्तंभ सहन केला, आणि तो देवाच्या राजासनाच्या उजवीकडे बसला आहे. (इब्री १२:२)***

पुष्कळांची अशी कल्पना असते, कीं जीवनक्रमांतील कांहीं कामें आपण एकटेच उरकूं. ते फक्त पापाच्या क्षमेबद्दल ख्रिस्तावर विश्वास ठेवितात; परंतु असे लोक स्वतांच्या प्रयत्नांनी चांगला जीवनक्रम चालविण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारचा त्यांचा प्रयत्न निष्फळ झालाच पाहिजे. प्रभु येशूम्हणतो, “माझ्याशिवाय तुमच्यानें कांहीं करवत नाहीं.” त्याच्या कृपेंत होणारी आपली वाढ, आपला आनंद, आपला उपयोग हीं सर्व आपल्या व ख्रिस्ताच्या संयोगावर अवलंबून आहेत. दररोज, नव्हे प्रत्येक तासास त्याशीं तादात्म्य पावल्यानें, त्याच्यांत राहिल्यानें आपणांस त्याच्या कृपेंत वाढायाचें आहे. आपल्या श्रद्धेचा तो केवळ उत्पादकच आहे, असें नव्हे , तर तिची परिपूर्ति करणाराहि आहे. तो ख्रिस्तच केवळ आरंभीं, शेवटी व सर्वकाळ आहे. आरंभीं व शेवटीं मात्र तो आपणांजवळ असायाचा असें नाहीं, तर आपल्या मार्गातील प्रत्येक पायरीवर

तो आपनांसन्निध असणार. दाविदानें म्हटलें आहे "म्यां आपणापुढें परमेश्वर नित्य ठेविला आहे ; तो माझ्या उजव्या हाताकडे आहे , म्हणून मी ढळणार नाही."1

**(६) आपण ख्रिस्तामध्ये कसे टिकून राहू शकतो?**

***तर ख्रिस्त येशू जो प्रभू, ह्याला जसे तुम्ही स्वीकारले तसे त्याच्यामध्ये चालत राहा; त्याच्यामध्ये मुळावलेले, रचले जात असलेले, तुम्हांला शिकवल्याप्रमाणे विश्वासात दृढ होत असलेले, आणि निरंतर उपकारस्तुती करणारे व्हा. (कलस्सेकरास पत्र २:६-७)***

"आम्ही ख्रिस्तांत कसें राहावें" असें तुम्ही विचारता काय? तर मी सांगतो जसें तुम्ही त्याला पहिल्यानें स्वीकारताम्न्रा राहिलेत, तसेच रहा. "तर ख्रिस्त येशू प्रभु असा तुम्ही स्वीकारीला त्यांतच चाला." "माझा नीतिमान विश्वासानें जगेल."2 तुम्ही सर्वस्वी ईश्वराचे होण्यासाठीं, त्याची सेवा करण्यासाठीं, व त्याच्या आज्ञा पाळण्यासाठीं त्याला वाहून घेतलें आहे, व ख्रिस्ताला आपला तारणारा म्हणुन पत्करलें आहे. तुम्हांला आपल्या पापाबद्दल प्रायश्चित्त घेता येत नव्हतें, अगर आपल्या अंत:करणाचा पालट करतां येत नव्हता, परंतु तुम्ही ईश्वराला वाहून घेतल्याकारणानें त्यानें केवळ ख्रिस्तामुळेंच तुमच्यासाठीं सर्व कांहीं केलें असा तुमचा विश्वास बसला. विश्वासाच्याद्वाराम तुम्ही ख्रिस्ताचे असे झालां, व विश्वासानेंच तुम्हांला त्याच्यांत वाढवयाचें आहे. पहिल्यानें देणें व नंतर घेणें. तुम्हांस आपलें सर्वस्व-अंत:करण, इच्छा, सेवा-द्यावयाचें आहे. त्याच्या

इच्छेस मान देण्यासाठीं तुम्हांस स्वतांला त्याला अर्पण करावयाचें आहे. त्याचप्रमाणें तुम्हांस सर्व कांहीं द्यावयाचें आहे. सुखपरिपूर्ण अशा ख्रिस्तानें तुमच्याठायीं वास्तव्य करण्यासाठीं, तोच तुमचें सामर्थ्य होऊन राहण्यासाठीं, तुमचें नीतिमत्व होऊन राहण्यासाठीं, तुमचा सर्वकालचा मदतगार होऊन राहण्यासाठीं व तुम्हांस ईश्वराच्या आज्ञा पाळण्यास सामर्थ्य देण्यासाठीं तुम्हांला त्यास स्वीकारावयाचें आहे.

**(७) रोजच्या दिवसाच्या प्रारंभी प्रभूचा शोध करणे आणि त्याचे सुज्ञान प्राप्त करून घेणे इतके का महत्वाचे आहे?**

***माझ्यावर जे प्रीती करतात त्यांच्यावर मी प्रीती करते; जे मला परिश्रमाने शोधतात त्यांना मी सापडते. (नीतीसुत्रे ८:१७)***

सकाळींच तुम्ही आपणांला ईश्वराला वाहून घ्या, व हेंच तुमचें पहिलें काम असूं द्या. “हें प्रभो, मला सर्वस्वीं तुझा असा करून घे. माझे सर्व बेत तुझ्या चरणांशीं आणून वाहतों. तुझ्या सेवेंत आज माझा उपयोग करून घे. माझ्याबरोबर रहा व तुझ्यांतच माझीं सर्व कामें होऊं दे.” ही रोजची बाब. प्रत्येक दिवशीं सकाळीं त्या दिवसापुरते तुम्ही आपणांला ईश्वराला वाहून घ्या. तुमचे सर्व बेत सिद्धीस नेण्यासाठीं अगर त्यांचा त्याग करण्यासाठीं-जसें त्याच्या मर्जीला येईल त्याप्रमाणें-त्याच्या हवालीं करा. ह्याप्रमाणें रोजच्या रोज तुमचें जीवन त्याच्या हवाली केलें, म्हणजे तें ख्रिस्ताच्या जीवनाप्रमाणें बनविलें जाईल.

**(८) आपल्या हृदयात शांती राखून ठेवण्याचा मार्ग काय आहे?**

*ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्याला तू पूर्ण शांती देतोस, कारण त्याचा भाव तुझ्यावर असतो. परमेश्वरावर सर्वकाळ भाव ठेवा, कारण प्रभू परमेश हा सनातन आश्रयदुर्ग आहे. (यशया २६:३-४)*

*परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाडत आहोत; आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत. (२ करिंथकरास पत्र ३:१८)*

ख्रिस्तांतील जिणें विश्वासाचें आहे. त्यांत परमानंद नसेल, परंतु स्थायिक व शांततायुक्त विश्वास आहे. तुमची आशा तुम्हांत नाहीं, परंतु ती ख्रिस्तांत आहे. तुमचा मानसिक अशक्तपणा त्याच्या मानसिक सामर्थ्याशीं अगदीं जखडलेली आहेत, म्हणून तुम्ही स्वतांकडेच न पहांता व स्वतावरच दृष्टि न ठेवितां तुम्हांला ख्रिस्ताकडे पहावयाचें आहे. त्याच्या प्रेमावर, त्याच्या शीलाच्या सौंदर्यावर व पूर्णतेवर तुमचें चित्त असू द्या; म्हणजे मग ख्रिस्त-त्याच्या स्वनाकाराच्या, पाण उतार्याच्या, शुद्धतेच्या व पवित्रपणाच्या स्थितींत असा-तुमच्या आत्म्याचा विषय होऊन राहतो. त्याच्या सादृश्यांत तुमचा पालट व्हावयाचा तो त्याजवर प्रेम केल्यानें, त्याचें अनुकरण केल्यानें व सर्वस्वी त्याजवर अवलंबून राहिल्यानें व्हावयाचा आहे.

**(९) ख्रिस्ताने संपूर्ण मानवजातीसाठी काय आमंत्रण दिले आहे?**

*अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. (मत्तय ११:२८)*

प्रभु येशूनें म्हटलें आहे. “मजमध्यें रहा.”1 ह्या शब्दांत त्यानें विश्रांति, स्थिरता व विश्वास ही दर्शविलीं आहेत. पुन्हां एके ठिकाणीं तो म्हणतो, “मजकडे या म्हणजे मी तुम्हांस विश्रांति देईन.” गीतकर्त्याच्या शब्दांत-“परमेश्वरास स्वस्थपणें जप व त्याची स्थीर आशा धर.” हाच विचार सुचविलेला आहे. यशायानें निश्चयपूर्वक साम्गितलें आहे, कीं “शांति व भाव धरिला असतां तुमचें सामर्थ्य होइल.” ही विश्रांति तुमच्या निष्क्रियत्वांत सांपडणार नाहीं. कारण तारणाऱ्या प्रभूच्या बोलावण्यांत तुमच्या श्रमाची व शांततेची सांगड घालून दिलेली आहे. “माझें जूं आपणांवर घ्या, म्हणजे तुमच्या जीवास विश्रांति मिळेल.”2 जें अंत:करण ख्रिस्तांत पूर्णपणें विश्रांति घेत असतें, तें सदा उत्सुक व त्याच्यासाठीं श्रम करणारें असतें.

**(१०) ख्रिस्ताच्या सोबत ऐक्याने राहून सह्भागीता घेण्यापासून मन वळविण्यास सैतान कोणते तीन उपाय ह्यांचा उपयोग करतो?**

*व नंतर प्रपंचाची चिंता, द्रव्याचा मोह व इतर गोष्टींचा लोभ ही त्यांच्यामध्ये शिरून वचनाची वाढ खुंटवतात आणि ते निष्फळ होते. (मार्क ४:१९)*

जेव्हां मन “स्व” चाच विचार करीत असतें तेव्हा तें सामर्थ्याचा व जीवनाचा उगम जो ख्रिस्त त्यापासून दुरावतें. म्हणुन त्या तारकापासून अंत:करण दूर राखण्याचा व तेणेंकरून आत्म्याचें ख्रिस्ताशीं ऐक्य व दळणवळण बंद करण्याचा सैतानाचा

एकसारखा प्रयत्न चाललेला असतो. ऐहिक सुखें, जिवांच्या काळज्या, संशयीपणा व दुःखें, दुसऱ्यांचे अगर स्वतांचें अपराध व उणीवा ह्यापैकीं एखाद्याकडे अगर सर्वांकडे तो तुमचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न करितो. तरी ह्या त्याच्या युक्त्यांनीं तुम्ही फसून जाऊं नका. जे खरे इमानी आहेत व जे, ईश्वराकरितांच जगण्याची केवळ इच्छा करितात, अशा पुष्कळ मनुष्यांस त्यांच्या अपराधांकडे व दुर्बलतेकडे त्यांचें चित्त लावून, व अशा रीतीनें त्याची ख्रिस्तापासून ताटातूट करुन तो (सैतान) आपला डाव साधण्याची इच्छा करितो.

**(११) आपल्याला सार्वकालिक जीवन प्राप्त आहे ह्या खात्रीमध्ये आपण कसे विश्राम पावू शकतो?**

*ज्याला तो पुत्र लाभला आहे त्याला जीवन लाभले आहे; ज्याला देवाचा पुत्र लाभला नाही त्याला जीवन लाभले नाही. देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्या तुम्हांला सार्वकालिक जीवन लाभले आहे हे तुम्हांला कळावे म्हणून मी हे तुम्हांला लिहिले आहे. (आणि तुम्ही देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवीत राहावे).(१ योहान ५:१२-१३)*

"स्व" हेंच आपल्या विचारांचें केंद्र असतां कामा नये, व आपलें तारण होईल किंवा नाहीं ह्याविषयी काळजी अगर भीति बाळगीत बसूं नये. ह्या अशा प्रकारच्या काळज्या आपल्या आत्म्याला सामर्थ्याचें मूळ जो ख्रिस्त त्यापासून दूर करितात. तुमचा आत्मा रक्षण करण्याचें ईश्वरावर सोंपवा व त्याजवरच विश्वास ठेवा. सदोदित येशूविषयींच बोला व विचार करा. तुमचें "स्व" त्याच्याचमध्यें विलीन होऊन जाऊं

द्या. सर्व संशय व भीति सोडा, व साधु पौल जसें म्हणाला “मी जगतों, तो मी नाहीं, तर ख्रिस्त माझ्याठायीं जगतो; आणि आतां देहांत जें माझें जिणें आहे तें विश्वासांत आहे. ज्या देवाच्या पुत्रानें मजवर प्रीति केली व आपणांला मजकरितां दिलें, त्यावरील विश्वासांत तें आहे”1 तसें म्हणा. ईश्वरावर विसंबून रहा. जें तुम्ही त्याच्या हातांत द्याल तर तो ज्यानें तुमच्यावर प्रेम केलें त्याचाद्वारें तुम्हांला जिंकणाऱ्यापेक्षांहि अधिक विजयी करिल.

**(१२) एके काळी जे लोक नीतिमान होते पण आता त्यांनी पापी मार्गात परत जाण्याची निवड केली त्यांचे काय होईल?**

***“तरीपण नीतिमान आपली नीतिमत्ता सोडून दुष्कर्म करू लागला व दुष्टाच्या सर्व अमंगळ आचारांप्रमाणे वागू लागला, तर तो वाचावा काय? त्याने केलेली सर्व नीतिमत्ता जमेस धरण्यात येणार नाही; त्याने केलेला भ्रष्टाचार व त्याने केलेले पाप ह्यामुळे तो मरेल. (यहज्केल १८:२४)***

ख्रिस्तानें मनुष्यस्वभाव धारण केला, तेव्हां त्यानें कसल्याहि सामर्थ्यानें कधींहि न तुटणाऱ्या प्रेमबंधनानें ( मनुष्य स्वतांच तें पत्करण्यास नाकबूल असेल तर मात्र नव्हे ) आपणांस मनुष्यत्वाशीं जखडून घेतलें. तें बंधन तोडून टाकण्यास ( ख्रिस्तापासून दूर राहण्याचें पसंत करण्यास ) सैतान आपणांस वारंवार लालूच दाखवील; म्हणून याच सम्धीस सावधगिरीनें राहून एकसारखा प्रयत्न करायाचा व दुसरा धनी पत्करण्याचा मोह आम्हांस पडूं नये अशी प्रार्थना करावयाची. हें सर्व करण्याचें कारण वर सांगितलेंच आहे, दुसरा धनी पत्करणें अगर न पत्करणें हें आपल्या खुषीवर अवलंबून

आहे; तर त्या तसल्या खुषीचा मोहहि आम्हांस नको. उलट आपण आपली दृष्टी एकसारखी ख्रिस्ताकडे लावावी, म्हणजे तोच आपलें रक्षण करील. त्याच्याचकडे आपली दृष्टी असतां आपण सुरक्षित राहूं, व मग कसलाहि मोह त्याच्यापासून आपली ताटातूट करण्यास समर्थ नाहीं. सतत त्याच्याचकडे पाहात असतां, आपण “प्रभु जो आत्मा त्याकडून रुपांतर पावून त्याच रुपाचे होतों.”2

**(१३) ख्रिस्ताचे पाचारण ऐकल्यावर, आपण त्याचा शोध कसा करू शकतो?**

***तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागाल, तेव्हा मी तुम्हांला पावेन. (यिर्मया २९:१३)***

ह्याच मार्गानें पूर्वकालांतील शिष्य प्रिय अशा तारकाप्रमाणें झाले. त्यांनीं प्रभूचें वचन ऐकलें, तेव्हां त्यांस त्याची गरज वाटली. त्यांनीं त्याला शोधिलें, तो सांपडलाहि व नंतर ते त्याच्यामागून गेले. घरीं, दारीं, एकांतीं, शेतांत, कोठेंहि शिष्य या नात्यानें त्याच्या तोडूंन निघणारे शुद्ध सत्याचें धडे शिकत ते त्याजबरोबर होते. आपापली कामगिरी समजण्यासाठीं नोकर ज्याप्रमाणें आपल्या धन्याकडे पाहातो त्याप्रमाणें ते प्रभूकडे पाहात असत. ते शिष्य “आमच्यासारख्या स्वभावांचेच मनुष्य होते.”1 आम्हांप्रमाणें त्यांसहि पापाशीं लढाई करायाची होती.

**(१४) ह्या शास्त्रभागातील कोणते विधान दर्शवते कि देवाच्या सेवकांनी देखील मोहापासून सुटका करून घेण्यासाठी संघर्ष केला?**

*कारण जे चांगले करावेसे मला वाटते ते मी करत नाही; तर करावेसे वाटत नाही असे जे वाईट ते मी करतो. (रोमकरास पत्र ७:१९)*

ते शिष्य "आमच्यासारख्या स्वभावांचेच मनुष्य होते."1 आम्हांप्रमाणें त्यांसहि पापाशीं लढाई करायाची होती. प्रभूचा आवडता शिष्य योहान ह्यामध्यें जरी तारकाच्या शीलाचें बरेचसें प्रतिबिंब पडलें होतें, तरी त्यांच्याठिकाणी देखील प्रभूच्याइतकें शीलाचें सौंदर्य नव्हतें. तो आपलेंच थोडें पुढें ढकलणारा होता, इतकेंच नव्हें, तर उतावळा व रागीटहि होता, परंतु दैवी शील त्याच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्याला आपली व्यंगें दिसून येऊन ज्ञान प्राप्त झाल्यामुळें त्याचा आत्मा कौतुकानें व प्रेमानें भरून गेला. आपल्या धन्याच्या प्रेमांत "स्व" ची भावना नष्ट होऊन जाईतोंपर्यंत रोजच्या रोज त्याचें अंत:करण ख्रिस्ताकडे ओढत गेलें शीलास अनुरुप आकार देणाऱ्या ख्रिस्ताच्या शीलाला त्याचा ( योहानाचा ) रागीट व महत्वाकांक्षी स्वभाव वश होऊन गेला. शीलांत नवीनपणा आणण्याचें पवित्र आत्म्याचें जें सामर्थ्य त्यानेम त्याचें अंत:करण नवीन बनविलें, ख्रिस्ताच्या प्रेमाच्या सामर्थ्यानें त्याच्या शीलात फरक घडवून आणिला. ख्रिस्ताशी केलेल्या संयोगाचा हा निखालस परिणाम होय. अंत:करणांत ख्रिस्ताचें वास्तव्य होतें, तेव्हां सर्व स्वभाव पालटून जातो. त्याचा आत्मा व त्याचें प्रेम ही अंत:करण मृदु करुन मनुष्याच्या आत्म्याला वश करून घेतात, व ईश्वराविषयीं व स्वर्गाविषयी विचार व इच्छा उत्पन्न करितात.

**(१५) येशू स्वर्गात जात असताना त्याच्या अनुयायांसाठी त्याने कोणते सांत्वनाचे महान अभिवचन दिले?**

*... जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे." आमेन (मत्तय २८:२०)*

त्याचें स्वर्गारोहण झालें तरी तो अद्याप आपणांत हजर आहे, अशी भावना त्याच्या अनुयायांच्या ठिकाणीं होती. त्याचें साक्षांत अस्तित्व प्रेमाचें व प्रकाशमय होतें. जो त्यांजबरोबर बोलत चालत होता, प्रार्थना करीत होता, व त्यांशी आशेचे व सुखाचे शब्द बोलत होता. तो आपल्या शिष्यांस शांततेचा निरोप अगदीं देतां देतां स्वर्गांत गेला व "पहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सदोदित तुम्हांबरोबर आहे,"1 अशा प्रकारचे शब्द मेघदूत त्यास वर नेत असतां त्या शिष्यांच्या कानीं पडले. मनुष्याच्या रुपानेंच तो स्वर्गांत गेला. ईश्वराच्या सिंहासनासमोर तो आपला मित्र व तारक असा अद्यापपर्यंत आहे असें त्यांनीं जाणिलें. आपणांविषयीं पूर्वी असलेल्या त्याच्या सहानुभूतींत काडीमात्र फरक झाला नसून दु:खी मनुष्यांबरोबर तोहि दु:खी असा आहे असें त्यांनीं जाणिलें. आपण तारण केलेल्यांच्या भरपाईबद्दल जी किंमत दिली तिच्या स्मरणार्थ म्हणून त्यानें आपले जखमी झालेले हातपाय ईश्वरास दाखवून तो आपल्या अमूल्य रक्ताचे गुण त्याच्यापुढें ठेवीत होता. आपणांसाठीं तो स्वर्गांत जागा तयार करण्यास तो गेला आहे, व तो फिरुन परत येऊन आपणांस तिकडे घेऊन जाईल असें त्यांस माहीत होतें.

**(१६) येशू सदैव त्याच्या अनुयायांच्या हृदयात सदैव कसा राहू शकतो?**

*मी पित्याला विनंती करीन, मग तो तुम्हांला दुसरा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईल;*

*अशासाठी की, त्याने तुमच्याबरोबर सदासर्वदा राहावे.—(योहान १४:१६)*

तो स्वर्गात गेल्यानंतर जेव्हां तें एकत्र जमले, तेव्हां बापापाशीं आपले विनंति अर्ज प्रभू येशूच्या नावानें गुजरण्यास ते उत्सुक होते. “तुम्ही बापाजवळ कांहीं मागाल तर तें तो तुम्हांस माझ्या नावानें देईल. तुम्ही अजून माझ्या नावानें कांहीं मागितलें नाहीं, मगा म्हणजे तुम्हांस मिळेल, यासाठीं कीं तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा.”2 अशा तऱ्हेनें प्रभूनें दिलेलें भरंवशाचें वचन तोंडानें म्हणत ते प्रार्थनापूर्वक व गंभीरपणानें नमन करीत. “जी मेला इतकेंच नव्हें, तर मेलेल्यांतून उठविला गेला, जो देवाच्या उजवीकडे आहे, आणि जो आम्हांसाठीं विनंति करितो,”3 असा तो येशू आम्हांसाठीं मध्यस्थी करील ह्या थोर मुद्यावर ते आपला श्रद्धारुप हस्त अधिकाधिक पसरीत. आणि ज्या कैवाऱ्याविषयीं ख्रिस्तानें सांगितलें होतें, तो पन्नासाव्या दिवशीं आला. तो आणखीहि म्हणाला होता, कीं “मी जावें हें तुम्हांस हितकारक आहे; कारण मी न गेलो तर कैवारी तुम्हांकडे येणार नाहीं. मी गेलों तर त्याला तुम्हांकडे पाठवीन.”4 येथून पुढें ख्रिस्त लोकांच्या अंत:करणांत सतत राहणार होता. तो स्वतां मनुष्यरुपानें शिष्यांबरोबर होता, त्यापेक्षांहि आतां त्याचा त्याच्याशी अधिक संयोग होता. त्यांच्याठायीं ख्रिस्ताचें तेज, प्रेम व सामर्थ्य हीं पाहणारांस इतकी दिसून आलीं, कीं त्यास “आश्चर्य वाटून” “ते (शिष्य) येशूच्या संगती होते असें त्यांस ओळखलें.”1

**(१७) ख्रिस्ताने जशी आपल्या शिष्यांसाठी प्रार्थना केली तशी त्याने अजून कोणासाठी प्रार्थना केली?**

*“मी केवळ त्यांच्यासाठी नाही, तर त्यांच्या वचनावरून जे माझ्यावर विश्वास ठेवतात त्यांच्यासाठीही विनंती करतो; (योहान १७:२०)*

खिस्ताची अशी इच्छा आहे, कीं आपण जसें आपल्या पहिल्या शिष्यांस होतो, तसेच आजहि आपल्या लेकरांस असावें; कारण थोड्या शिष्यांसमवेत केलेल्या शेवटच्या प्रार्थनेंत तो असें म्हणाला, की “मीं त्यांच्यासाठीं केवळ नाहीं, तर त्यांच्या वचनांवरून जे मजवर विश्वास ठेवितात त्यांसाठीहि विनंती करतों.”2

**(१८) जर रोज दैनंदिन रीतीने प्रेमाने सत्याची घोषणा करत ख्रिस्तात जर आपण वस्ती केली, तर त्याचा परिणाम काय होईल?**

***... तर आपण प्रीतीने सत्याला धरून मस्तक असा जो ख्रिस्त त्याच्याप्रत सर्व प्रकारे वाढावे. (इफिसकरास पत्र ४:१५)***

येशूनें आपणांसाठीं प्रार्थना करून सांगितलें आहे, कीं जसा “मी बापामध्यें आहें तसे तुम्हीं मजमध्यें राहावें.” अहाहा ! कसला संयोग हा ! त्या तारकानें स्वतांविषयी असें सांगितलें आहे, कीं “पुत्राला आपल्या आपण कांहीं करतां येत नाही” “मजमध्यें राहाणारा बाप तो आपलीं कामें करीतो.” तर मग ख्रिस्ताचें आमच्या अंत:करणांत वास्तव्य असेल, तर “इच्छिणें व करणें हीं आपल्या सत्संकल्पासाठीं साधण्याचें” ४ तो आम्हांमध्यें करिल. त्यानें काम केलें त्याप्रमाणें आम्हीहि आपलें काम करूं. आम्हीहि तोच उत्साह दाखवूं आणि ह्याप्रमाणें त्याच्यावर प्रेम करीत व त्यांत रहात आपणही “मस्तक जो ख्रिस्त त्याच्या मानानें सर्व प्रकारें वाढावें.”

*मला जाणीव आहे कि मी जेव्हा ख्रिस्ताकडे येतो, मी एक वाढ होण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करतो ज्यावर माझ्या आयुष्याच्या सर्व क्षेत्रात तो कार्य करत राहतो.*

गोल करा: होय अनिश्चित

*ख्रिस्ताच्या सोबत असलेल्या माझ्या नात्यात मी काहीच करू शकत नाही: न चिंता न कार्ये, ज्यामुळे माझी अध्यात्मिक वाढ शक्य होऊ शकते.*

गोल करा: होय अनिश्चित

*मी त्याचा शोध करण्यात माझा वाटा निवडू शकतो आणि स्वतःला त्याच्या जीवन देणाऱ्या वातावरणात सोपवू शकतो जेणेकरून वाढत राहण्यात मला मदत मिळते.*

गोल करा: होय अनिश्चित

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________



## धडा १०
## कार्य आणि जीवनक्रम

**(१) येशू आपल्याला कोणत्या स्वर्गीय तत्वाचे अनुसरण करण्यास सांगतो?**

***मी तुम्हांला नवी आज्ञा देतो की, तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी; जशी मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करावी. (योहान १३:३४)***

ईश्वर हा सर्व विश्वाच्या जीवनाचा, तेजाचा व आनंदाचा कंद आहे. सूर्यप्रकाशाच्या किरणांप्रमाणें अगर जिवंत झऱ्यापासून निघणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाप्रमाणें त्याच्यापासून सुखाचा प्रवाह प्राणिमात्रांकडे वाहात असतो. आणि ज्या ज्या ठिकाणी म्हणुन मनुष्याच्या अंत:करणांत ईश्वराचें जिवन असतें, त्या त्या ठिकाणीं तें प्रेमानें व अशीर्वादानें इतरांकडे धाव घेतें.

पतित मनुष्यांचा उद्धार करून त्यांचें तारण करण्यांतच ख्रिस्ताला आनंद होता, व म्हणूनच

त्यानें स्वताला प्रिय असाजो जीव त्याकडे न पाहतां लाजलज्जा वगैरे सर्वांस तुच्छ मानून खांब पत्करला. त्याचप्रमाणें देवदूत हे दुसऱ्यांच्या सुखासाठीं रात्रंदिवस झटत आहेत, व त्यांतच त्यांस आनंद आहे. दुष्टांची व शीलनें व दर्जानें कमी असलेल्यांची सेवा करणें हें कमीपणा आणणारें काम आहे, असें स्वार्थी लोकांस वाटतें; परंतु अशांची सेवा करणें हेंच निष्पाप देवदूतांचें कार्य असतें. ख्रिस्ताचा स्वार्थत्यागी प्रेमाचा आत्मा जगद्व्यापी व सर्व सुखांचा निष्कर्ष आहे. हाच आत्मा ख्रिस्ताच्या अनुयायांस मिळेल.

अंत:करणांत ख्रिस्ताचें वास्तव्यहोतें त्यावेळीं तें मधुर वासाप्रमाणें लावून ठेवतां येत नाहीं. त्या प्रेमाच्या पवित्रपणांचें वजन ज्यांच्या ज्यांच्याशीं म्हणुन आपला सहवास घडेल त्या सर्वांच्या अनुभवास येईल. अंत:करणांतील ख्रिस्ताचा आत्मा हा सर्वांस ताजेतवाने करणाऱ्या व मरायास टेकलेल्यास जीवनाचें पाणी पिण्यासाठीम उत्सुक करणाऱ्या वाळवंटातील झऱ्याप्रमाणें आहे.

## (२) येशू ह्या पृथ्वीवर का आला?

*ह्याप्रमाणे मनुष्याचा पुत्र सेवा करून घेण्यास नाही, तर सेवा करण्यास व पुष्कळांच्या खंडणीसाठी आपला प्राण अर्पण करण्यास आला आहे." (मत्तय २०: २८)*

मनुष्याच्या सुखासाठीं व त्याच्या उद्धारासाठीं ख्रिस्ताचें कार्य चालू असतां, आपणांस कार्य करण्याची जी इच्छा होते तींत आपलें ख्रिस्ताविषयींचें प्रेम दिसून येईल. तें प्रेम आपल्या स्वर्गीय पित्याच्या
देखरेखींत असलेल्या सर्व प्राणिमात्रांबद्दल प्रेम, ममताळूपणा व सहानुभूति उत्पन्न करील.

त्या आपल्या तारकाचें पृथ्वीवरील जिणें सुखाचें व स्वताचे ठायींच आसक्त झालेलें नव्हतें ; तर पतित अशा मनुष्यजातीच्या तारणासाठीं त्यानें दृढनिश्चयानें, उत्सुकतेंनें सतत प्रयत्न केले. गव्हाणींत जन्मल्यापासून तों कॅलव्हरी येथें वधस्तंभावर जाईपर्यंत त्यानें स्वनाकाराचा मार्ग धरीला व आपल्या कष्टमय कामगिरीपासून, दुःखप्रद प्रवासापासून व खालावून टाकणाऱ्या काळजीपासून व श्रमंपासून सुटून जाण्याचा त्यानें प्रयत्न केला नाहीम. तो म्हणाला, “मनुष्याचा पुत्र सेवा करून घ्यायास नाहीं, तर सेवा करावयास व बहुतांची खंडणी व्हावीं म्हणून आपला जीव देण्यास आला.”1 हाच त्याच्या जिण्याचा थोर हेतु असुन दुसऱ्या गोष्टी त्यास दुय्यम प्रतीच्या होत्या. ईश्वराच्या इच्छेप्रमाणें करून आपलें कार्य तडीस नेणें हेंच त्याचें अन्नोदक होतें. त्यानें केलेल्या श्रमांत त्याच्या स्वताच्या हितास मुळींच जाग नव्हती.

**(३) जेव्हा आपण ख्रिस्ताच्या कृपेचे सहवाटेकरी बनतो, योहानाप्रमाणे , पवित्र आत्मा आपल्याला कोणती साक्ष घोषित करण्यास प्रेरित करेल?**

***दुसऱ्या दिवशी येशूला आपणाकडे येताना पाहून तो म्हणाला, “हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा! (योहान १:२९)***

ज्यांच्यासाठीं प्रभु खांबी गेला त्यांनीं स्वर्गीय देणगीचें वाटेकरी व्हावें म्हणून कोणत्याही प्रकारचा स्वार्थ त्याग करण्यास जे लोक ख्रिस्ताच्या कृपेचे वाटेकरी झालें आहेत ते तयार होतील. जगांतील त्याम्चें वास्तव्य अधिक सुखकर करण्यासाठीं सर्व कांहीं ते करतील. अशा प्रकरचा उत्साह हाच खऱ्या पालटलेल्या

आत्म्याची खरी वाढ होय. कोणी मनुष्य ख्रिस्ताकडे वळतांच त्याच्या अंत:करणांत ख्रिस्त हा आपणांस किती उत्तम मित्र लाभला आहे, हें इतरांस कळविण्याची इच्छा उत्पन्न होते. ज्याच्या योगानें तारण व शुद्धीकरण होत, असें सत्य त्याच्या अंत:करणांत लपून राहातच नाहीं. ख्रिस्ताच्या नीतिमत्वाचा झगा आपण घालून त्याच्या अंत:स्थ आत्म्यापासून होणाऱ्या आनंदानें आपण परिपूर्ण भरलेले असलों तर आपल्याच्यानें स्वस्थ बसवणार नाहीं. प्रभु चांगला आहे असा आपण अनुभव घेतला, तर दुसऱ्यांस कांहींना कांहीं तरी सांगावयास आपणांस सांपडेल. तारकाचा शोध लागल्यावर फिलिपाप्रमाणें आपणाही दुसऱ्यांस ख्रिस्तासमोर आणूं. ख्रिस्ताकडे वळण्याचें व अदृश्य परंतु सत्य असें पुढील जग त्याम्स दाखवून देऊं. ज्या मार्गानें ख्रिस्त चालला, त्या मार्गाचें अवलंबन करण्याची प्रबळ इच्छा मग त्यांस होईल, व जगांचें पाप हरण करणारा देवाचा कोंकरा”1 पाहण्याची उत्कट इच्छा आपल्या सभोवतीं असणारांस होईल.

**(४) इतरांसाठी केलेल्या निस्वार्थी कष्टाचा परिणाम काय आहे?**

***उदार मनाचा समृद्ध होतो; जो पाणी पाजतो त्याला स्वत:ला ते पाजण्यात येईल. (नीतीसुत्रे ११:२५)***

दुसऱ्यांस सुखी करण्याच्या प्रयत्नानें आपल्या स्वतांवरही सुखाची उलट प्रतिक्रिया होईल. जगाचें तारण करावें, हा जो त्याचा हेतु त्यांत आपणांसही भागीदार करण्यांत ईश्वराचा हाच हेतु आहे. दैवी शीलाचे भागीदार होण्याचा हक्क त्यानें मनुष्यांस दिला आहे. आणि मनुष्यांनीं आपल्यापरी दुसऱ्या मनुष्यांस सुखी

करण्याचाही हक्क दिला आहे. मनुष्यांस देतां येण्यासारख्या सर्व मोठ्या मानांत हाच मोठा मान व हाच मोठा आनंद त्यांस दिला आहे.

शुभवर्तमानाचा निरोप सांगण्याचें व प्रेमानें सेवा करण्याचें सर्व काम हीं ईश्वराला दुसऱ्या दूतांस सांगतां आलीं असतीं; आपला उद्देश सिद्धीस नेण्यास त्यानें दुसरी साधनें उपयोगांत आणिलीं असतीं; परंतु प्रेमामुळें आपल्या स्वताबरोबर, ख्रिस्ताबरोबर व दूतांबरोबर आपणांस भागीदार करून सुख व आनंद यांची प्रीति करून द्यावी, व निरपेक्ष सेवेपासून घडणारी आत्मिक उन्नति करावी हाच त्याचा उद्देश आहे. ख्रिस्तानें सोसलेल्या दु:खाचे भागीदार झाल्यानें त्याची सहानुभूती आपणांस मिळते. दुसऱ्याच्या कल्याणासाठीं केलेल्या स्वार्थत्यागाचें प्रत्येक कार्य आपल्या अंत:करणांत परोपकार बुद्धी अधिक दृढ करून “तो धनवान असतां तुम्हांकरीतां दरिद्री झाला, यासाठीं कीं तुम्ही त्याच्या दरिद्रानें धनवान व्हावें.”2 त्याशीं तुमचा संबंध अधिक निकट जोडितें, आणि ह्याप्रमाणें जेव्हां जग उत्पन्न करण्याचा हेतु आपण पूर्ण करतों, तेव्हांच आयुष्यक्रम सुखाचा होतो.

## (५) ख्रिस्ताने स्वयं- त्यागाचे कोणते उदाहरण दिले?

*आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हांला माहीत आहे; तो धनवान असता तुमच्याकरता दरिद्री झाला, अशा हेतूने की, त्याच्या दारिद्र्याने तुम्ही धनवान व्हावे. (२ करिंथकरास पत्र ८:९)*

आपलें शिष्य जाऊन आपणासाठीं आत्मे जिंकतील हा जो ख्रिस्ताचा संकल्प तो तुम्हीं करुं लागला, तर आत्मिक गोष्टींमध्यें अधिक अनुभव व

थोर प्रकारचें ज्ञान आपणांस असावें अशी तुम्हाम्स जरुरी भासेल व नीतिमत्त्वाची भूक व तहान तुम्हांस लागेल. तुझी ईश्वराची विनवणी कराल, तुमचा विश्वास दृढ होईल व तारणाच्या विहीरींतून तुझ्यांस मनमुराद जिवनाचें पाणी प्यावयास मिळेल. प्रतिकाराच्या व कसोटीच्या गोष्टीस तोंड देण्याचा प्रसंग तुझास शास्त्राकडे व प्रार्थनेकडे धाव घ्यावयास लावील. तुझी कृपेंत व ख्रिस्ताच्या ज्ञानांत वाढून तुमचा अनुभवहि अधिक वाढेल.

इतरांसाठीं अहेतुक वृत्तीनें खपण्याच्या उत्साहानें शीलाला थोरपणा, स्थैर्य, व ख्रिस्तासारखें सौंदर्य प्राप्त होऊन तें शील धारण करणारास शांतता व सुख हीं प्राप्त होतात. त्याच्या आकांक्षा थोर प्रकारच्या होतात. आळस अगर स्वार्थ ह्यांस त्याच्यामध्यें थाराही मिळत नाहीं. ह्याप्रमाणें ख्रिस्ताचें कृपादान प्राप्त झालेल्यांची वाढ होऊन ते ईश्वराच्या कार्यासाठीं दृढ मनाचे होतात. त्यांस स्पष्ट अशी आत्मिक दृष्टि, निश्चल व वाढत जाणारी श्रद्धा व प्रार्थनेंत वाढतें सामर्थ्य हीं प्राप्त होतात. त्याच्या आत्म्यावर देवाचा आत्मा कार्य करितो व दैवी स्पर्शाच्या उत्तरादाखल म्हणून आपणाशीं जुळणाऱ्या यांच्या मनोवृत्तीस तो बोलावतो. ह्याप्रमाणें दुसऱ्यांच्या हितासाठीं अहेतुक वृत्तीनें प्रयत्न करणारे लोक स्वतांचें तारण निःसंशय करून घेतात.

**(६) इतरांच्या पर्यंत पोहोचण्याची इच्छा आपल्याला कोण देते?**

***... कारण इच्छा करणे व कृती करणे हे तुमच्या ठायी आपल्या सत्संकल्पासाठी साधून देणारा तो देव आहे. (फिलिप्पेकरास पत्र २:१३)***

**(७) इतरांच्या हितासाठी जे स्वतःला निस्वार्थी कष्टाला वाहून घेतात त्यांना कोणता आशीर्वाद मिळतो?**

*जर तू आपल्या जिवाला इष्ट ते भुकेल्यांना देशील, दुःखग्रस्त जिवांना तृप्त करशील; तर तुझा प्रकाश अंधकारात झळकेल, निबिड अंधकार तुला मध्यान्हाचे तेज असा होईल, परमेश्वर तुझा सततचा मार्गदर्शक होईल, तो अवर्षणसमयी तुझ्या जिवास तृप्त करील, तुझ्या हाडांना मजबूत करील; तू भरपूर पाणी दिलेल्या मळ्यांप्रमाणे होशील; पाणी कधी न आटणाऱ्या झऱ्याप्रमाणे होशील, (यशया ५८:१०-११)*

ख्रिस्तानें नेमून दिलेलें कार्य--ज्यांस मदतीची अपेक्षा आहे त्यांस मदत करण्यांत आपल्या शक्तीप्रमाणें गुंतण्याचें निष्काम बुद्धीनें करणें हाच काय तो त्याच्या कृपेंत वाढण्याचा मार्ग आहे. अभ्यासानें सामर्थ्य येतें, व कार्यक्षमता हेंच जीवनाचें तत्व.

**(८) पवित्र आत्म्याने आशीर्वादित कोणत्या दोन कृतींचा परिणाम म्हणजे आपली सर्वाधिक अध्यात्मिक वाढ होईल?**

*परंतु जो स्वातंत्र्याच्या परिपूर्ण नियमांचे निरीक्षण करून ते तसेच करत राहतो, तो ऐकून विसरणारा न होता, कृती करणारा होतो व त्याला आपल्या कार्यात धन्यता मिळेल. (याकोब १:२५)*

कृपेमुळें प्राप्त झालेल्या सुखांचा सुखानें उपभोग घेऊन जे लोक ख्रिस्ती जीवनक्रम

चालविण्याचा प्रयत्न करितात व ख्रिस्तासाठीं कांहीं एक करीत नाहींत, तें कांहीं एक काम न करतां आयतोबा होऊन खाण्याचा प्रयत्न करतात. ह्याचा परिणाम आत्मिक व भौतिक सृष्टींत नीचावस्था व अखेरीस नाश असा होतो. हातपाय हालविण्याचें जो मनुष्य नाकारतो, तो लौकरच त्यांचें काम करण्याचें सामर्थ्य गमावितो. म्हणुन जो ख्रिस्ती मनुष्य आपल्या ईश्वरदत्त सामर्थ्याचा उपयोग करीत नाहीं, त्याची ख्रिस्तांत वाढ होत नाहीं, इतकेंच नव्हें, तर त्याजवळ असलेलें सामर्थ्यहि लयास जातें.

ख्रिस्ताची मंडळी म्हणजे मनुष्यांच्या तारणासाठीं उभारलेली एक संस्थाच आहे. तिचें काम म्हटलें म्हणजे सर्व जगाला शुभवर्तमान सांगणें. हें काम सर्व ख्रिस्ती मनुष्याचें आहे. प्रत्येक मनुष्यानें आपल्या बुद्धीप्रमाणें व संधि सांपडेल त्याप्रमाणें त्या तारकानें नेमून दिलेलें कार्य करावयाचें आहे. आपणांस प्रगट झालेले ख्रिस्ताचें प्रेम, ज्याम्स तें माहींत नाहीं त्यांचे ऋणी करतें. ईश्वरानें आपणांस प्रकाश दिला, तो स्वतांकरितां नव्हें, तर दुसऱ्यांसहि आपण तो द्यावा म्हणून दिला आहे.

ख्रिस्ताचें अनुयायी आपल्या कर्तव्यास जागतील, तर विधर्मी लोकांत शुभवर्तमानाच्या प्रसाराचें काम करणारा आज जो एक दिसत आहे, त्याऐवजी हजारों दृष्टिस पडतील. ज्यांस हें शुभवर्तमानाच्या प्रसाराचें काम स्वतां करतां येत नसेल, त्यांनीं आपल्या इतअ साधनांनीं, सहानुभूतीनें आणि प्रार्थनांनीं ह्या कामास हातभार लावावा.

**(९) ख्रिस्ताने त्याच्या मंडळीला काय कामगिरी दिली आहे?**

*तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा; त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या; जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे." आमेन. (मत्तय २८:१९-२०)*

ख्रिस्ताची मंडळी म्हणजे मनुष्यांच्या तारणासाठीं उभारलेली एक संस्थाच आहे. तिचें काम म्हटलें म्हणजे सर्व जगाला शुभवर्तमान सांगणें. हें काम सर्व ख्रिस्ती मनुष्याचें आहे. प्रत्येक मनुष्यानें आपल्या बुद्धीप्रमाणें व संधि सांपडेल त्याप्रमाणें त्या तारकानें नेमून दिलेलें कार्य करावयाचें आहे. आपणांस प्रगट झालेले ख्रिस्ताचें प्रेम, ज्याम्स तें माहींत नाहीं त्यांचे ऋणी करतें. ईश्वरानें आपणांस प्रकाश दिला, तो स्वतांकरितां नव्हें, तर दुसऱ्यांसहि आपण तो द्यावा म्हणून दिला आहे.

ख्रिस्ताचें अनुयायी आपल्या कर्तव्यास जागतील, तर विधर्मी लोकांत शुभवर्तमानाच्या प्रसाराचें काम करणारा आज जो एक दिसत आहे, त्याऐवजी हजारों दृष्टिस पडतील. ज्यांस हें शुभवर्तमानाच्या प्रसाराचें काम स्वतां करतां येत नसेल, त्यांनीं आपल्या इतअ साधनांनीं, सहानुभूतीनें आणि प्रार्थनांनीं ह्या कामास हातभार लावावा.

**(१०) ख्रिस्ती ह्या नात्याने, ख्रिस्तासाठी कार्य करण्यास आपले कोठे पाचारण झाले आहे?**

***बंधुजनहो, ज्या स्थितीत कोणाला पाचारण झाले असेल त्या स्थितीतच तो देवाजवळ राहो. (१ करिंथकरास पत्र ७:२४)***

ख्रिस्ताकरीता काम करण्याची आपल्याच घरांत जरूरी असेल तर परदेशांत जाण्याची जरूरी नाहीं. हें काम आपणांस आपल्या घरांत, मंडळींत, आपल्या सोबत्यांत, अगर ज्यांशीं आपला व्यवहार आहे अशा लोकांतहि करतां येण्यासारखें आहे.

आपल्या तारकाच्या आयुष्याचा बराचसा भाग नासरेथ येथील त्याच्या सुतारकीच्या दुकानांत शांतपणें उद्योग करण्यांत गेला. शेतकऱ्यांबरोबर व मजुरांबरोबर चालत असतां सेवा करणारे देवदूत अनोळखी व मानरहीत अशा त्याजबरोबर असत. आजाऱ्यांस बरे करीत असतांना व गालील समुद्रांतील तुफानाच्या लाटांमधून चालत असतांना तें चालविलें. म्हणून क्षुल्लक अशा कामांत व खलक्या दर्जाच्या जिण्यांतहि ख्रिस्ताबरोबर आपण चालून काम करावें.

प्रेषितानें म्हटलें आहे, कीं “ज्या स्थितींत ज्याला बोलावणें झालें त्या स्थितींत देवाजवळ राहों”1 प्रभूच्या गौरवासाठीं धंदेवाल्या मनुष्यानें सत्यपणानें आपलें काम करावें. ख्रिस्ताचा खरा अनुयायी तो असेल, तर प्रत्येक बाबतींत आपला धर्म तो दाखवील, व इतर मनुष्यांस ख्रिस्त प्रगट करील. गालील प्रांतातील डोंगराळ प्रदेशांत एकांत प्रवास करुन श्रम करणाऱ्या प्रभूचा उत्साही व विश्वासु असा प्रतिनिधी यंत्रशास्त्रज्ञानेंहि व्हावें. ख्रिस्ताचें नावं सांगणाऱ्या प्रत्येकानें अशी कृति करावी, कीं तेणेंकरून इतरांनीं त्याची कामें पाहून त्यांचा उत्पन्नकर्ता व तारक ह्याचें गौरव करण्याच्या मार्गास लागावें.

**(११) जरी आपण त्यांना विनम्र असे लेखतो, ख्रिस्ताच्या सेवार्थ आपल्या कलागुणांचा वापर करणे का अत्यंत महत्वाचे आहे?**

*माझ्यातील फळ न देणारा प्रत्येक फाटा तो काढून टाकतो; आणि फळ देणाऱ्या फाट्याला अधिक फळ यावे म्हणून तो त्या प्रत्येकाला साफसूफ करतो. (योहान १५:२)*

आपणांहून इतरांस अधिक मोठीं साधनें व अनुकूलता हीं आहेत अशा सबबीवर ख्रिस्ताच्या सेवेसाठीं जें कांहीं त्यांनीं करावयाचें तें करण्यापासून आपली सुटका कांहीं लोक करून घेतात. ज्यांस विशेष प्रकारची बुद्धि आहे, त्यांनींच ती ईश्वराच्या सेवेला लावावी अशा प्रकारची कित्येकांची समजूत असते. कित्येकांची अशी असते, कीं इतर वर्ग खेरीज करून एका विशिष्ट वर्गासच बुद्धीचें दान दिलें आहे, व म्हणुन त्या इतर वर्गातील लोकांस ख्रिस्तांसाठीं श्रम करून बक्षीस मिळविण्यास पाचारण केलें नाहीं परंतु प्रभूनें दाखल्यांत असें सांगितलेलें नाहीं. घराच्या मालकानें नोकराला बोलविलें, तेव्हां प्रत्येकास त्यानें आपापलें काम दिलें.

**(१२) जेव्हा देवाची प्रिती आपले हृदय भरून टाकते, आयुष्याच्या विनम्र कर्तव्यांच्या प्रती आपण कसे पोहचू शकतो?**

*माणसांना खूश करणाऱ्या लोकांसारखे तोंडदेखल्या चाकरीने नव्हे, तर देवाची इच्छा मनापासून पूर्ण करणाऱ्या ख्रिस्ताच्या दासांसारखे ते करीत जा. ही चाकरी माणसांची नव्हे तर प्रभूची आहे असे मानून ती सद्भावाने करा, (इफिसकरास पत्र ६:६-७)*

प्रेमभरीत आत्म्यानें आपण “प्रभुसाठीं”2 आपल्या आयुष्यक्रमांतील क्षुल्लक कामें करावीं. अंत:करणांत प्रभूविषयी प्रेम

असेल, तर तें आयुष्यक्रमांत दिसून येईल। ख्रिस्ताच्या मधुर सुवसानें आपण भरून जाऊं व मग आपला थोंरपणा वाढून आपणांस सुखप्राप्ति होईल.

**(१३) जर देवासोबत आपले नातेसंबंध योग्य असले, तर सर्व गोष्टीत आपली प्रेरणा काय असेल?**

***आणि जे काही तुम्ही करता ते माणसांसाठी म्हणून करू नका तर प्रभूसाठी म्हणून जिवेभावे करा. (कलस्सेकरास पत्र ३:२३)***

देवाचें काम करण्यास जावयास मोठा प्रसंग अगर विलक्षण बुद्धि प्राप्त होण्याची वाट पहात बसण्याचें कारण नाहीं। जग काय म्हणेल ह्याचाहि विचार करण्याचें कारण नाहीं। तुमच्या विश्वासाच्या शुद्धतेचा व सत्यतेचा पुरावा म्हणजे तुमाचा रोजचा आयुष्यक्रम हा असेल, तर फायदा करण्याची इच्छा तुम्हांस आहे, अशी लोकांची खात्री होईल, व तुमचे प्रयत्न सर्वस्वी वायां जाणार नाहींत. {WG 78.3}

**(१४) विश्वास आणि इतरांना वाटणी करून देण्याच्या आयुष्याचा परिणाम काय असेल?**

***हे ध्यानात घ्या की, जो हात राखून पेरतो तो त्याच मानाने कापणी करील; आणि तो सढळ हाताने पेरतो तो त्याच मानाने कापणी करील. (२ करिंथकरास पत्र ९:६)***

अति नम्र व अति गरिब असे ख्रिस्ताचे शिष्य दुसऱ्यांस सुख देणारेच असतात. आपण एखादें चांगलें कृत्य करीत आहों, असें त्यांस समजून न येवो, परंतु त्यांच्या न कळत पडणाऱ्या

वजनामुळें ते सुखाच्या लाटा-दूरवर जाणाऱ्या-उत्पन्न करतील व बक्षिसाच्या अखेरच्या दिवसापर्यंतहि त्यांस कदाचित आपणांला सुख मिळणार आहे हें कळुन येणार नाहीं. आपण एखादें मोठें कृत्य करीत आहों, असें त्याम्स न वाटो. आपल्या कार्याम्त यशप्राप्ति होईल किंवा नाहीं. ह्याबद्दल चिंतातूर होऊन बसण्याचें त्यांस कारण नाहिं. त्याचें काम म्हटलें म्हणजे धिमेपणानें ईश्वरानें नेमून दिलेलें काम पुढें चालवावयाचें; म्हणजे मग त्यांचें जिणें व्यर्थ होणार नाहीं. त्यांचा आत्मा हळूहळू ख्रिस्तांत वाढत जाईल. ह्या जिण्यांत ते ईश्वराशीं सहभागीदार होतील, व पुढें येणाऱ्या आयुष्यांतील खऱ्या आनंदाचे भागीदार होण्यास व अति थोर कार्यास आपणांस लायक करून घेतील.

*मी येशूचे आभारी आहे कारण मानवजातीच्या गरजा भागवण्यासाठी तो स्वर्गाचे गौरव सोडून खाली आला.*


**गोल करा: होय अनिश्चित**

*ख्रिस्ताच्या सुवार्तप्रसाराचे उदाहरण व त्याचे अनुसरण करण्यात पवित्र आत्म्याने मला सहाय्य करावे म्हणून मी प्रार्थना करतो: पहिले म्हणजे, लोकांसोबत मिसळण्यासाठी आणि मित्र बनण्यासाठी; दुसरे म्हणजे त्यांच्या शारुरिक गरजांवर कनवाळूपणे पाहण्यासाठी व त्याद्वारे त्यांचा विश्वास संपादन करून; त्यांना शुभवर्तमान सांगण्यासाठी मी त्याचे आभारी आहे.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*मला ह्याची जाणीव होते कि जे इतरांची सेवा करतात त्यांना सर्वोच्च अध्यात्मिक आशीर्वाद आणि वृद्धी प्राप्त होते. मी देवाच्या सेवार्थ माझे जीवन समर्पित करतो आणि इतरांसाठी सेवा करण्यात त्याने माझे मार्गदर्शन करावे म्हणून प्रार्थना करतो.*

गोल करा: होय अनिश्चित



## धडा ११
## ईश्वराविषयीं ज्ञान

**(१) देवाला व त्याच्या अद्‌भुत गौरवाला प्रगत करणारे सदैव उपलब्ध असणारे स्रोत काय आहे?**

*आकाश देवाचा महिमा वर्णिते; अंतरिक्ष त्याची हस्तकृती दर्शवते (स्तोत्रसहिता १९:१)*

स्वताला प्रगट करण्यासाठीं व आमचें त्याच्याशीं ऐक्य करण्यासाठीं ईश्वर अनेक प्रकारें प्रयत्न करीत आहे. सृष्टि त्याच्याविषयीं आमच्या इंद्रियाम्स सतत सांगत आहे. त्याच्या हातानेम केलेल्या कामांत प्रगट झालेल्या त्याच्या प्रेमाचा व वैभवाचा ठसा खुल्या अंत:करणावर उमटेलच उमटेल. सृष्ट पदार्थाच्याद्वारे ईश्वराचें आपणांशी असलेलें दळणवळण आपल्या कानांस ऐकूं येतें, व समजतें. हिर्वीगार शेतें, गगनचुंबित वृक्ष, कळया व फुलें, चालत जातातसें भासणारे ढग, पडणारा पाऊस, खळखळ आवाज करणारा ओढा,

आकाशांतील वैभवयुक्त तारकापुंज हीं सर्व आपल्या अंत:करणास त्याच्याविषयीम सांगतात, व ज्यानें हें सर्व जग उत्पन्न केलेम त्याची ओळख करून घेण्यास पाचारण करीतात.

आपल्या प्रभूनें सृष्टपदार्थाशीं त्या परमेश्वराच्या अमुल्य वचनांचीं सांगड घालून दिली आहे. मनुष्याच्या कष्टमय आयुष्यक्रमांतील सतात काळजीच्या स्थितींतहिं त्या परमेश्वराच्या सत्यवचनांची आठवण त्यास व्हावी, म्हणून झाडें, पक्षी, दरीतील वन्य पुष्पें, डोंगर, सरोवरें, शोभायमान व सुंदर आकाश त्याचप्रमाणें आपल्या रोजच्या आयुष्यक्रमांतील गोष्टी व सभोंवतालची परिस्थितिं ह्या सर्वांची ईश्वराच्या सत्यवचनांशीं प्रभूनें जोड लावून दिली आहे.

ह्या आपल्या कामाचें आपल्या लेंकरांनीं गौरव करावें, व ज्या सौंदर्याच्या योगानें ह्या आपल्या पृथ्वीला शोभा आली आहे, त्या साध्या परंतु मनोरम सौंदर्यांत त्यांनीं आनंद मानावा अशी परमेश्वराची इच्छा आहे. तो सौंदर्यांचा भोक्ता तर खराच ,परंतु जें सौंदर्य बाहेरुन चित्ताकर्षक असतें, त्यापेक्षाम शिलाचे सौंदर्य त्यास अधिक आवडतें. फुलाच्या मनोहरतेप्रमाणें आपण शुद्धता व साधेपणा कमावावा अशी त्याची इच्छा आहे.

**(२) आपल्या व्यस्त जीवनाच्या मध्ये, देव आपल्याशी बोलत असताना आपण कसे पाहू व ऐकू शकतो?**

*त्याची भीती बाळगा, पाप करू नका; अंथरुणात पडल्यापडल्या आपल्या मनाशी विचार करा; स्तब्ध राहा. (स्तोत्रसहिता ४:४)*

आपली लक्ष देण्याची इच्छा मात्र असली, तर ईश्वरनिर्मित कामें आपणांस आज्ञाधारकत्वाचें व विश्वासाचे अमूल्य धडे शिकवतील. आकाशांत युगानुयुग नेमून दिलेला मार्ग आक्रमणाऱ्या ताऱ्यांपासून तों तहत अतिशय बारीक अशा परमाणूपर्यंतच्या सर्व सृष्ट वस्तु त्या निर्माणकर्त्या ईश्वराची इच्छा मान्य करीत आहेत.

**(३) देवाने ज्या सर्व गोष्टी निर्माण केल्या त्यांच्याप्रती तो आपला कळवळा कसा प्रगट करतो?**

***दोन चिमण्या दमडीला विकतात की नाही? तथापि तुमच्या पित्याच्या आज्ञेवाचून त्यांतून एकही भूमीवर पडणार नाही. तुमच्या डोक्यावरील सर्व केसदेखील मोजलेले आहेत.(मत्तय १०:२९,३०)***

ईश्वरहि त्यानें निर्माण केलेल्या सर्व वस्तूंची काळजी घेत आहे व त्यांचें चालवीत आहे. अनंतकालापासून अनंतसृष्टि चालवीत असतां झाडावर बसून न भिता सुखानें गाणें गाणाऱ्या एखाद्या लहानशा चिमणीचांहि तो प्रभु काळजी वहात असतो. माणसें आपल्या रोजच्या कामगिरीवर जातात तेव्हां, रात्रीं निजतात व सकाळीं उठतात तेव्हां, एखादा श्रीमंत मनुष्य आपल्या वाड्यांत मेजवाणी करित असतो तेव्हां, अगर एखादा गरीब मनुष्य आपल्या मुलाबालांसह गरीबीची मीठ भाकरखात असतांना वगैरे प्रत्येक जणाकडे त्या स्वर्गीय पित्याचें अगदीं बारीक नजरेनें लक्ष असतें. ईश्वराच्या नजरेस येत नाहीं असा एकहि अश्रुबिंदु जमिनीवर पडत नाहीं, व असें एकहि

चेहेर्‍यावरचें हास्य नाहीं, कीं तें त्या प्रभूच्या लक्षांत येत नाहीं.

**(४) जेव्हा आपण प्रभूवर प्रेम करतो, आणि त्याच्या हातात आपले जीवन सुपूर्त करतो, आपल्याला कोणती सुरक्षा मिळते?**

***परंतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणार्‍यांना म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांना देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात. (रोमकरास पत्र ८:२८)***

ह्या सर्व गोष्टींवर आपला पुर्ण विश्वास असेल, तर जगांतील सर्व शुष्क काळज्या नाहींशा होतील. हल्लींप्रमाणें आपल्या जिण्यांत निराशा भरलेली असायाची नाहीं. कारण अशा वेळी प्रत्येक गोष्ट मग ती लहान असो वा मोठी असो, जो नानाप्रकारच्या काळज्यांनीं गोंधळून जात नाहीं, अगर त्याम्च्या भारामुळें कष्टीही हो ऊन जात नाहीं अशा त्य ईश्वराच्या हातांत सोंपवलेली असते, वमग आत्म्याच्या ज्या शांततेस पुष्कळ लोक बहुत काळापर्यत पारखे झालेले असतात ती शांतता आपणांस अनुभवावयास सांपडते.

**(५) आपण कल्पना देखील करू शकत नाही इतका गौरवी कृत्य देव त्याच्या उद्धार पावलेल्या लेकरांच्या हितासाठी "सर्व गोष्टी" म्हणून काय करू शकतो?**

***तेव्हा 'राजासनावर बसलेला' म्हणाला, "'पाहा, मी' सर्व गोष्टी 'नवीन करतो.'" तो म्हणाला,***

*“लिही; कारण ही वचने विश्वसनीय व सत्य आहेत.” (प्रगटीकरण २१:५)*

ह्या पृथ्वीवरील मनोहर अशा सौंदर्यांत तुमच्या इंद्रियांना आनंद होतो, त्याअर्थी ज्या जगांत पापाचा व म्हणून मृत्युचा डागहि कधीं लागत नाहीं व ज्याच्यावर ह्या भौतिक सृष्टीप्रमाणें शापाची छायाहि नाहीं, अशा पुढील जगाचा विचार करा। तारण झालेल्यांच्या त्या गृहाचें चित्र डोळयसमोर आणा, व लक्षांत ठेवा, कीं तुमच्या त्या काल्पनिक चित्रापेक्षांही तें गृह अधिक वैभवाचें असेल. ह्या सृष्टींतील ईश्वराच्या नानाप्रकारच्या देणग्यांत आपणांस त्याचें वैभव केवळ अंधुक असें दिसतें. शास्त्रांत असें सांगितलें आहे, कीं “डोळयानें पाहिलें नाहीं व कानांनीं ऐकलें नाहीं, व माणसाच्या मनांत आलें नाहीं, आपणांवर प्रीति करण्यासाठीं देवानें जें कांहीं सिद्ध केले तें.”1

कवि व सृष्टपदार्थविज्ञानशास्त्रवेत्ता हे सृष्टीविषयी पुष्कळ सांगत असतात, तथापि ह्या पृथ्वीवरील सौंदर्याचा उत्कृष्टपणें उपभोग एका ख्रिस्ती मनुष्यासच केवळ घेतां येतो; कारण त्यासच केवळ त्या पित्याचें हस्तकौशल्य ओळखतां येतें, व फुलामधील, झुडुपामधील अगर एखाद्या झाडामधील त्याचें प्रेम त्यास दिसून येतें. नदी, समुद्र ह्याचें महत्त्व जो त्यांजकडे तीं ईश्वराच्या मनुष्यावरील प्रेमाचेंच दर्शक आहे असें मानीत नाही, अशा कोणासही कळून येत नाहीं.

**(६) जेव्हा आपले त्याच्या आत्म्यासोबत सुत जुळते, देवाबद्दलचे कोणते धडे प्रगट होतात?**

*त्याला नीती व न्याय ही प्रिय आहेत; परमेश्वराच्या वात्सल्याने पृथ्वी भरली आहे. (स्तोत्रसहिता ३३:५)*

ईश्वरानें निर्माण केलेल्या वस्तुंमधून व अंत:करणांतील त्याच्या आत्म्याच्या प्रभावामधून तो आपणांशीं बोलतो. आपल्या स्वताच्या व भोंवतालच्या परिस्थितींत जे रोजच्या रोज फेरफार घडून येतात त्यांवर आपणाला मौल्यवान धडे--जर ते शिकण्यासाठीं आपलें अंत:करण खुलें ठेवीलें तर सहज सांपडतील. ईश्वरनिर्मित गोष्टींचा तपास करीत असतां गीतकर्त्यानें म्हटलें होतें, “परमेश्वराच्या दयेनें पृथ्वी भरली आहे.”1 “कोण बुद्धिमान? तर तो हे अर्थ ध्यानांत धरो, आणि परमेश्वराची परम दया ते समजोत.”2

**(७) कुलाधीपती व संदेष्टे ह्यांचे अनुभव शास्त्रवचनात का नमूद करून ठेवण्यात आलेले आहेत?**

***धीराच्या व शास्त्रापासून मिळणाऱ्या उत्तेजनाच्या योगे आपण आशा धरावी म्हणून जे काही शास्त्रात पूर्वी लिहिले ते सर्व आपल्या शिक्षणाकरता लिहिले. (रोमकरास पत्र १५:४)***

ईश्वरानें दिलेल्या शास्त्रवचनांतूनहि तो आपणांशी बोलत आहे. ह्या ठिकाणीं त्याच्या शीलाचें, मनुष्यांशीं चाललेल्या त्याच्या व्यवहारांचें व मनुष्याच्या तारणाच्या कामगिरीचें प्रगटीकरण अगदीं स्पष्ट अक्षरांनीं नमुद केलें आहे; शिवाय धर्मगुरू, भविष्यवादी, व इतर जुने पवित्र लोक ह्यांचाहि इतिहास आपणांपुढें ठेवून दिला आहे. ते “आम्हांसारख्या स्वभावाचे मनुष्य होते.”3 आपल्याप्रमाणें निराशेमध्यें त्यांनीं कसा झगडा केला, मोहाला ते कसे बळी पडले, व इतकें असूनहि ईश्वराच्या कृपेनें धैर्य करून त्यांनी जय मिळविला हें आपणांस माहीत आहेच. ह्या त्यांच्या गोष्टी

पाहात असतां आपणांसही नीतिमत्व मिळविण्यास उत्तेजन येतें. सोज्वळ, प्रेमाचे व सुखाचे असे त्यांचे अमूल्य अनुभव व प्राप्त झालेल्या ईश्वराच्या कृपेनें जें कार्य त्यांनीं केलें तें, हीं वाचीत असतां जो आत्मा त्यांच्या अंत:करणांत प्रज्वलीत झाला होता, तोच आत्मा आपल्या अंत:करणांत त्याम्ची बरोबरी करण्याची व त्यांच्या शीलाप्रमाणें आपलेंही शील बनवून घेण्याची पवित्र इच्छा-- त्यांच्याप्रमाणें ईश्वराबरोबर चालण्याची-- उत्पन्न करितो.

**(८) शास्त्रवचनांचा अभ्यास करून कोणते दोन विशेष आशीर्वाद प्रगट होतात?**

***तुम्ही शास्त्रलेख शोधून पाहता; कारण त्यांच्या द्वारे तुम्हांला सार्वकालिक जीवन प्राप्त होईल असे तुम्हांला वाटते; आणि तेच माझ्याविषयी साक्ष देणारे आहेत; (योहान ५:३९)***

जुन्या करारांतील लेखाविषयीं व नव्या कराराला ते लागू पडणारे आहेत. ह्याविषयीं प्रभु येशुनें म्हटलें आहे, “मजविषयीं साक्ष देणारे तेच आहेत.”4 होय, होय, सर्व शास्त्र येथून तेथून ख्रिस्ताविषयींच सांगत आहे. उत्पत्तीच्या पुस्तकाच्या आरंभापासून म्हणजे “जें झालें असें कांहींच त्यानें केल्यावांचून झालें नाहीं”5 येथपासून तों वचन समाप्त होईपर्यंत म्हणजे “पहा मी लौकर येतों”6 येथपर्यंत त्याचीं कामें आपण वाचतों व त्याची वाणी आपण ऐकतो. तारकाशीं आपला परीचय व्हावा अशीं इच्छा असली तर सर्व पवित्रशास्त्राचें अध्ययन करा.

**(९) देवाला अभ्यासाच्या व त्याच्या वचनावर मनन करण्याच्या द्वारे जाणून घेणे का इतके महत्वाचे आहे?**

*... मी जी वचने तुम्हांला सांगितली आहेत ती आत्मा व जीवन अशी आहेत. (योहान ६:६३)*

ईश्वराच्या वचनानीं तुमचें सर्व अंत:करण भरून टाका. तीं वचनें जीवनाचें उदक असून तुमची मोठी तहान भागवणारी आहेत. स्वर्गांतून उतरलेली ती वचनें म्हणजें म्हणजे स्वर्गातून उतरलेली जीवनाची भाकर आहे. प्रभु येशू म्हणतो. “तुम्ही मनुष्याच्या पुत्राचा देह खाल्ला नाहीं व त्याचें रक्त त्याला नाही तर तुम्हांमध्यें जीवन नाहीं” “जी वचनें मी तुम्हांस सांगितलीं ती आत्मा व जीवन आहेत.”1 असें म्हणून तो आपल्या स्वताचें स्पष्टीकरण करीत आहे. जें कांहीं आपण खातों व पितों त्यानेंच आपली शरीरें घडवली आहेत, भौतिक गोष्टीप्रमाणेंच आत्मिक वळण देऊन सामर्थ्य आणतें.

**(१०) पौलासारखे, पवित्र शास्त्राच्या कोणत्या उल्लेखनीय गमकावर आपण वस्ती करून राहावी व ते इतरांना देखील सांगावे?**

*कारण येशू ख्रिस्त, म्हणजे वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरू नये असा मी ठाम निश्चय केला. (१ करिंथकरास पत्र २:२)*

ज्या गोष्टींकडे आपण लक्ष द्यावें अशी देवदूतांची इच्छा आहे, त्यापैकीं तारण ही एक आहे. तें तारण म्हणजे अनंतकालापासून तारण केलेल्याचें शास्त्र व गाणेंच आहे. म्हणून आतांहि तें मनापासून विचार करण्यासारखें व अभ्यास करण्यासारखें नाहीं काय ? ख्रिस्ताची अमर्याद दया, त्याचें प्रेम, व त्यानें आमच्यासाठीं केलेला आत्मयज्ञ हीं आम्हांस फारच गंभीर विचार

करावयास सांगत आहेत ; म्हणुन आपण आपल्य प्रिय तारकाच्या व मध्यस्थाच्या शीलाचा, व जो आपल्या लोकांस त्यांच्या पापापासून मुक्त करण्यास आला त्याच्या कामगिरीचा विचार करावा. ह्याप्रमाणें स्वर्गीय गोष्टींबाबत आपण विचार करतों, तेव्हां आपली श्रद्धा व आपलें प्रेम स्वर्गीय गोष्टीबाबत आपण विचार करतों, तेव्हां आपली श्रद्धा व आपलें प्रेम हीं वृद्धिंगत होत जातात, व आपल्या प्रार्थना ईश्वराकडून अधिक स्वीकारण्यालायक होतात; कारण त्या अधिक श्रद्धायुक्त व प्रेमाच्या, अधिक विचाराच्या व अंत:करणपूर्वक केलेल्या असतात, व म्हणून ख्रिस्ताचे ठायीं आपला विश्वास अधिक वाढतो, व जे त्याच्यामार्फत ईश्वराकडे जातात, त्यांस वांचविण्याच्या त्याच्या सामर्थ्याचा ढळढळीत अनुभव त्याम्स येतो.

**(११) आपले चारित्र्य बळकट करण्यासाठी शास्त्रवचन कोणत्या दुसर्या प्रभावावर वस्ती करण्याची सूचना देते?**

*बंधूंनो, शेवटी इतके सांगतो की, जे काही सत्य, जे काही आदरणीय, जे काही न्याय्य, जे काही शुद्ध, जे काही प्रशंसनीय, जे काही श्रवणीय, जो काही सद्‌गुण, जी काही स्तुती, त्यांचे मनन करा. (फिलीप्पेकरास पत्र ४:८)*

**(१२) देवाच्या वचनावर व त्याच्या पावित्र्यावर मनन करून ज्ञान संपादन करत असताना, त्याचा आपल्यावर काय परिणाम होतो आणि इतरांना देण्याच्या आपल्या साक्षीवर काय होतो?**

*परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे ‘प्रभूच्या*

*वैभवाचे' प्रतिबिंब पाडत आहोत;आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत. (२ करिंथकरास पत्र ३:१८)*

खिस्ताच्या पूर्णत्वाविषयीं आपण विचार करीत असतां, आपणांमध्ये सर्वस्वी पालट व्हावा, व त्याच्या शुद्धतेंत अगदीं त्याच्यासारखेच आपण व्हावें ही इच्छा आपणांस होते. ज्याला आपण पूज्य मानतों, त्याच्यासारखी होण्याची तहान भुक आपणांस लागते. जों जों अधिक आपलें विचार खिस्ताविषयीं असतील, तों तों त्याच्याविषयीं आपण दुसऱ्यांस सांगूं व साऱ्या जगाला त्याची ओळख करून देऊं.

**(१३) देवाचे वचन कोणाला प्रज्वलित करून सुज्ञ बनवेल?**

*परमेश्वराचे नियमशास्त्र परिपूर्ण आहे, ते मनाचे पुनरुज्जीवन करते; परमेश्वराचा निर्बंध विश्वसनीय आहे. तो भोळ्यांना समंजस करतो. (स्तोत्रसहिता १९:७)*

निष्णात अशा पंडितांकरितांच मात्र शास्त्र लिहिलें आहे असें नाहीं, तर तें सामन्य जनसमूहाकरितांहि लिहिलें आहे. तारणास उपयुक्त अशी त्यांतील सत्यवचनें माध्यान्हकाळच्या सूर्याप्रमाणें स्पष्ट अशीं आहेत ; व जें त्यांत स्पष्टपणें प्रगट केलेल्या ईश्वराच्या वचनांस न जुमानता आपल्याच मतानें चालतात, अशा लोकांखेरीज दुसरा कोणीहि मनुष्य त्या सत्यवचनांसंबंधानें आपला मार्ग चुकत नाहीं.

**(१४) देवाच्या वचनाचा वयक्तिक अभ्यास इतका का महत्वाचा आहे?**

*तू सत्याच्या वचनाची योग्य विभागणी करून नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेही कारण नसलेला, देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी, असा स्वतःला सादर करण्यास होईल तितके कर. (२ तिमथी २:१५)*

शास्त्र काय शिकवितें ह्याबद्दल दुसऱ्या कोणाचाहि पुरावा आपण घेऊं नये, तर तें आपण स्वतांच आपल्याकरतां शिकावें. आपल्याबद्दल दुसऱ्यांस विचार करावयास लाविलें, तर आपला उत्साह व आपली विचारशक्ति खुंटतील. ईश्वरी वचनांतील गुढ अर्थ समजण्याचें सामर्थ्य नष्ट होण्याइतक्या एखाद्या विषयाचें जरूर तें मनन करण्याच्या अभावामुळें मनाच्या उच्च शक्तिचा अशा रीतीनें ऱ्हास होऊन जाईल. शास्त्रांतील वचनाम्ची व आत्मिक गोष्टींची एकमेकांशी तुलना करून त्यांतील विषयांचा एकमेकांमधील संबंध शोधून काढण्याकडे मन लाविलें, तर त्याची अधिक वाढ होईल. शास्त्रवचनांच्या अभ्यासापेक्षां बुद्धीची वाढ करणारें असें दुसरें कंहीं एक नाहीं विचार उदात्त करावयास व मानसिक शक्तींस सामर्थ्य देण्यास ह्या पुस्तकाइतकें दुसरें कोणतेहि पुस्तक समर्थ नाहीं. करावा त्या रीतीनें आपन त्याचा अभ्यास केला, तर आपलें शील होऊन आपल्या हेतूंस ह्यावेळीं क्वचितच दिसणारी स्थिरता प्राप्त होईल.

**(१५) कोणत्या प्रकारच्या अभ्यासामुळे आपल्याला सार्वाधिक फायदा होईल?**

*मी तुझ्याविरुद्ध पाप करू नये म्हणून मी आपल्या मनात तुझे वचन जपून ठेवले आहे. (स्तोत्रसहिता ११९:११)*

परंतु हीहि गोष्ट आहे, कीं शास्त्राचा उडत उडत अभ्यास केल्यानें फारच थोडा फायदा होतो. एखादा मनुष्य सबंध शास्त्र वाचून टाकील, परंतु त्यास त्यांतील सौंदर्य दिसून येणार नाहीं, अगर त्यांतील वचनांचा खोल व गुढ अर्थ समजनार नाहीं. एकाच कलमाचें महत्व मनास बरोबर पटेल अशा रीतीनें तयार केलें, व त्या कलमाचा तारणाशीं काय संबंध आहे, हें पक्कें समजून आलें, तर अशा रीतीनें केलेला अभ्यास मनसोक्त, वरवर वाचलेल्या च कांहींएक शिक्षण प्रत्यक्ष न मिळालेल्या बऱ्याच कलमांच्या अभ्यासापेक्षां अधिक महत्त्वाचा आहे. आपलें पवियत्शास्त्र अगदीं जवळ बाळगा, व संधि सांपडेल तेव्हां तें वाचा. त्यांतील प्रतिकें लक्षांत ठेवा. रस्त्यांतून चालतांना देखील कलम वाचा. त्याचें मनन करा, व अशा रीतीनें तें मनांत पक्कें बिंबवून ठेवा.

**(१६) पवित्र शास्त्रातील खोलवर रुजलेले सत्य जर आपल्याला बरोबर जाणून घ्यायचे असतील तर पवित्र शास्त्राच्या अभ्यासाकडे आपण कसे पाहिले पाहिजे?**

*कारण नियमावर नियम, नियमावर नियम; कानूवर कानू, कानूवर कानू; थोडे येथे, थोडे तेथे; असे तो बोलत असतो." (यशया २८:१०)*

एकचित्तपणें लक्ष दिल्याशिवाय व प्रार्थनापूर्वक केलेल्या अभ्यासाशिवाय ज्ञान प्राप्त होणें नाहीं. शास्त्रांतील कांहीं कांहीं भाग अगदीं गैरसमजूत न होता समजण्यासारखे आहेत. कांहीं असे आहेत, कीं त्यांचा अर्थ सहज

वाचून समजून येण्यासारखा नाहीं. त्यांचा अभ्यास करावयाचा म्हणजे वचनावचनांची सांगड घालून व त्यांची तुलना करून करावयाचा आहे. या कामीं विचारपूर्वक शोध केला पाहिजे, व प्रार्थनापूर्वक विचार केला पाहिजे. पृथ्वीच्या पोतांत असलेल्या व म्हणून अदृश्य अशा मौलुअवान धातूंच्या वचनांचा शोध, तें गुप्तधन आहे असें स्मजून जो करतो त्यास, निश्काळजीनें शोध करणारास कधीहि न सांपडणारी अशीं अमूल्य सत्य तत्वें सांपडतात. अंत:करणांत बिंबलेली ती ईश्वराचीं वचनें जीवनरूप पाण्याच्या साठ्यामधून निघालेल्या झऱ्यांप्रमाणें होतील.

**(१७) प्रार्थना, पवित्र आत्म्याने उत्तेजित करणे, आपण शास्त्रभागांचा अभ्यास करण्यापूर्वी इतके का महत्वाचे आहेत?**

*'मला हाक मार म्हणजे मी तुला उत्तर देईन व तुला ठाऊक नाहीत अशा मोठ्या व गहन गोष्टी तुला सांगेन.' (यिर्मया ३३:३)*

प्रार्थना केल्याशिवाय शास्त्राचा अभ्यास कधीही करूं नयें. तें उघडण्यापूर्वी पवित्र आत्म्याचा प्रकाश आपणांमध्यें पडावा अशी ईश्वराची विनंति करावी; म्हणजे मग तो प्रकाश मिळेल.

नथनेल प्रभु येशूकडे आला, तेव्हां त्या तारकानें सांगितलें, "पहा, हा खरोखर इस्त्रायली आहे, यांत कपट नाहीं." त्यावर नथनेल म्हणाला, "आपणांला माझी ओळख कोठली ?" येशूनें त्याला उत्तर दिलें, "फिलीपसानें तुला बोलाविल्यापुर्वी तूं अंजिराच्या झाडाखाली होतास, तेव्हां मीं तुलापाहिलें."1 सत्य काय आहे हें समजण्यास प्रकाश मिळावा म्हणून आपण त्यास शोधिलें, तर तो प्रभु आमच्या

प्रार्थनेंच्या एकान्त स्थलीदेखील आम्हांस पाहिल. अंत:करणानें नम्र असणारें जे लोक दैवी मदतीची अपेक्षा करतील, त्यांस स्वर्गीय दूत मदत करतील.

**(१८) दैवी सत्य कोणाच्या द्वारे प्रगट होते?**

***तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो तुम्हांला मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईल; कारण तो आपल्या स्वतःचे सांगणार नाही; तर जे काही ऐकेल, तेच सांगेल; आणि होणाऱ्या गोष्टी तुम्हांला कळवील. (योहान १६:१३)***

पवित्र आत्मा त्या तारकाचा मोठेपणा प्राप्त करून देऊन त्याचें गौरव करतो. ख्रिस्त प्रगट करणें, त्याचें नीतिमत्व दाखवून देणें, व त्याच्याकडून प्राप्त होणारें तारण दाखवून देणें हीं पवित्र आत्म्याचीं कामें आहेत. प्रभु येशूनें म्हटलें आहे “जें माझें आहे त्यांतून घेऊन तें तुम्हांस विदित करील.”2 सत्यपणाचा आत्मा हाच काय तो दैवी सत्य शिकविणारा आहे. ईश्वरानें आपला पुत्र मनुष्यांसाठीं दिल्यापासून तो मनुष्यजातीला किती थोर मान देत असला पाहिजे ? व म्हणून त्यानें स्वताचा पवित्र आत्मा मनुष्याला शिक्षक व मार्गदर्शक असा नेमिला आहे.

***देवाच्या वचनात मला शिकवण, संयम, सांत्वन आणि आशा मिळतात. त्याचा अभ्यास करण्यासाठी देवाने माझ्यात ती उत्तेजित करून टाकणारी इच्छा टाकावी जेणेकरून त्याचे सत्य मी माझ्या हृदयात ठेऊ शकेल आणि त्याच्या विरुद्ध पाप करणार नाही.***

गोल करा:   होय   अनिश्चित

*पवित्र आत्म्याने माझा शिक्षक व्हावे म्हणून मी प्रार्थना करतो आणि तसेच त्याने मला विनम्र हृदय द्यावे. मी सुज्ञानासाठी प्रार्थना करतो जेणेकरून मी अगदी योग्य रीतीने प्रत्येक रेघ न रेघ पाहू शकेल आणि नियम जाणून घेऊन सत्य ग्रहण करू शकेल.*

गोल करा:   होय   अनिश्चित

*माझ्या संपूर्ण मानाने, जीवाने आणि हृदयाने मी देवाचा शोध करावा हे माझे ध्येय आहे. पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन समजून घ्यावे हि माझ्या हृदयाची इच्छा आहे जेणेकरून शास्त्रवचनात सार्वकालिक जीवनाच्या मार्गावर ज्या गोष्टींवर प्रकाश पाडण्यात आला आहे त्या मला समजतील.*

गोल करा:   होय   अनिश्चित

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

_______________________________________



## धडा १२
## प्रार्थनेचा हक्क

**(१) प्रार्थनेच्या द्वारे देवाशी संपर्क साधने इतके का महत्वाचे आहे?**

*तेव्हा तुम्ही माझा धावा कराल, तुम्ही जाऊन माझी प्रार्थना कराल व मी तुमचे ऐकेन. (यिर्मया २९:१२)*

सृष्टि, प्रगटिकरण व पवित्र आत्म्याची प्रेरणा ह्यांच्याद्वारें परमेश्वर आपणांशीं बोलत असतो. परंतु हीच इतकीं पुरेशी आहेत असें नाहीं. यांशिवाय आपण आपलें अंत:करणहिं त्याजकडे लाविलें पाहिजे. आत्मिक जीवन व आत्मिक उत्साह प्राप६त होण्यासाठीं आपण आपल्या स्वर्गीय पित्याशी प्रत्यक्ष सहवास ठेविला पाहिजे. आपलेम मन त्याजकडे लावावें, त्याच्या कार्याचें, त्याच्या दयाळूपणाचें व त्याजपासून प्राप्त होणाऱ्या आशीर्वादाचें आपण मनन करावें; परंतु त्याशीं दळण ठेवण्याच्या दृष्टीनें पाहतां ह्याहि गोष्टी पुरेशा नाहींत. तर दळणवळण ठेवण्यासाठीं त्याशीं

आपल्या ह्या जिण्यासंबंधानें आपण कांहींतरीं बोललें पाहिजे.

ज्याप्रमाणें आपण आपल्या मित्राजवळ आपलें अंत:करण अगदीं खुलें करतों, त्याचप्रमाणें तें देवाजवळ करणें म्हणजे प्रार्थना. तिची जरूरी आपण कोण आहोंत, काय आहोंत, हें त्यास सांगावें म्हणून आहे असें नव्हें, तर तिच्यायोगें आपला स्वीकार केला जाण्यासा आपण लायक आहों हें ठरावें म्हणून आहे. आपण प्रार्थनेच्याद्वारें ईश्वराला खालीं आणतों असें नव्हें, तर उलट ती आपणांसच त्याच्या सन्निध नेतें.

**(२) प्रार्थनेमध्ये जसे आपण येशूकडे येतो तसे येशूने आपल्याला काय करण्याचे आमंत्रण दिले आहे?**

*... त्याच्यावर तुम्ही 'आपली' सर्व 'चिंता टाका' कारण तो तुमची काळजी घेतो. (१ पेत्र ५:७)*

ख्रिस्त जगांत असतांना त्यानें आपल्या शिश्यांस प्रार्थना कशी करावी हें शिकविलें. आपल्या रोजच्या गरजा आपण त्याच्यापुढें मांडाव्या, व सर्व भार त्याच्यावर टाकावा असें त्यानें आपल्या शिष्यांस सांगितलें होतें. तुमच्या प्रार्थना ऐकल्या जातील अशी त्यानें त्यांस खात्री दिली, तशीच ती आपणांसहि दिली आहे.

**(३) ख्रिस्ताने जेव्हा ह्या पृथ्वीवर वस्ती केली, प्रार्थनेमध्ये पित्याशी सहभागीतेच्या संबंधी त्याने कोणते उदाहरण दिले?**

*मग तो सकाळी मोठ्या पहाटेस उठून बाहेर गेला व रानात जाऊन तेथे त्याने प्रार्थना केली. (मार्क १:३५)*

प्रभु येशू ह्या पृथ्वीव्र आपणांमध्यें असतां वारंवार प्रार्थना करी. आम्ही आपलें कर्तव्य करावें व परिक्षांत टिकावें म्हणून तो आमच्या गरजा व आमचा अशक्तपणा ह्याशीं तो आम्हांबरोबर सहभागी झाला होता, व अशा स्थितींत नम्र, अर्जदार व आपल्या बापापासून सामर्थ्य मागणारा होता. प्रत्येक बाबतीत तो आपणांला कित्त्यादाखल आहे. आपल्या दु:खांत तो आपला केवळ भाऊच आहे. “आपणांप्रमाणेंच सर्व बाबतींत पारखलेला तो होता,” परंतु अगदी निष्पाप अशा एखाद्याप्रमाणें तो पापापासून परावृत्त झाला. पापमय जगांत झगडा करून त्यानें जीवाला होणारे कष्ट सोसलें. प्रार्थना म्हणजे एक आवश्यक व हक्काची गोष्ट आहे, असें त्यानें मनुष्यरुप धारण करून दाखविलें. आपल्या बापाशीं दळणवळण ठेवण्यांत त्याला सुख व आनंद होई. एकंदरींत मनुष्यांचा तारक व देवाचा पुत्र असा तो असतांहि त्यांस जर प्रार्थनेची जरूरी भासली, तर अशक्त, पापी व मर्त्य अशा आपणांस अंत:करणपूर्वक व सतत अशा प्रार्थनेची किती तरी अधिक जरूरी आहे?

**(४) प्रार्थनेमध्ये आपण देवाकडे कसे आले पाहिजे?**

***तर मग आपल्यावर दया व्हावी आणि ऐन वेळी साहाय्यासाठी कृपा मिळावी, म्हणून आपण धैर्याने कृपेच्या राजासनाजवळ जाऊ. (इब्री ४:१६)***

आपणांस आशीर्वाद देण्यासाठीं आपला स्वर्गीय पिता अगदीं वाट पहात आहे. अमर्याद प्रेमरूप झऱ्यांतून जीवनाचें पाणी मनमुराद पिण्याचा आपला हक्क आहे. असें असून आपण फारच थोडी प्रार्थना करतों हें किती आश्चर्य आहे ? अतिशय नम्र अशा आपल्या लेकरांनीं

अंत:करणपूर्वक केलेली प्रार्थना ऐकण्यास ईश्वर तयार असूनहि आपन आपल्या गरजा त्याच्यापुढें मांडण्याची नाखुषी दाखवतों. अतिशय प्रेमळ असें ईश्वराचें अंत:करण आपणांकडे ओढ घेत असूनहि व आपण मागतों अगर आपणांस वाटतें त्यापेक्षां पुष्कळच अधिक असें तो देण्यास तयार असतांहि, जर आपण त्याचीं फारच थोडी प्रार्थना करतों, व त्याविषयीं फारच कमी विश्वास बाळगतों, तर मोहपाशांत सापडणाऱ्या आपणां गरीब, निरूपयोगी मनुष्यांबद्दल स्वर्गीय देवदूतांस काय बरें वाटत असेल ? त्या देवदूतांस ईश्वरापुढें नम्र होऊन त्याच्या सानिध्यांत राहणें आवडतें. त्याचा अतिशय मोठा आनंद म्हणजे ईश्वराशीं ऐक्य करणें हा होय. आणि इकडे पृथ्वीवर पाहावें तों मनुष्यांस, एका ईश्वरापासूनच मिळणाऱ्या मदतीची अतिशय जरूरी असतां तें त्याच्या आत्म्याच्या प्रकाशाशिवाय व त्याच्या समक्षतेशिवाय चालण्यात समाधान मानितात.

**(५) मोहावर विजय मिळवण्यासाठी कोणत्या दोन गुरुकिल्ली आहेत?**

***तुम्ही परीक्षेत पडू नये म्हणून जागृत राहा व प्रार्थना करा; आत्मा उत्सुक आहे खरा, पण देह अशक्त आहे." (मत्तय २६:४१)***

पापात्म्याचा (सैतानाचा) अंधकार प्रार्थनेची हयगय करणारांस घेरून टाकतो. त्या शत्रूच अंत:करण अस्पष्ट शब्दांनीं उच्चारलेलें मोह त्यास पाप करावयास मोह पाडतात. आणि ह्याचें कारण म्हटलें म्हणजे त्यांस ईश्वरानें दिलेल्या प्रार्थनेच्या हक्काचा उपयोग ते करीत नाहीत हें होय. सर्व सामर्थ्याचें अमर्याद भांडार ज्यांत भरलें आहे असें स्वर्गरुप कोठार खुलें करण्याची किल्ली म्हणजे श्रद्धायुक्त प्रार्थना व

सतत पाहरा न केला तर आपण निष्काळजी बनण्याची व सन्मार्गापासून भ्रष्ट होण्याची भीति असते. मन:पूर्वक केलेल्या वंदनानें व श्रद्धेनें मोहाला प्रतिकार करण्यास आपणांला कृपादान व सामर्थ्य ही प्राप्त होऊं नयेत, म्हणून ईश्वराच्या दयासनाच्या मार्गांत अडथळा करण्याचा प्रयत्न शत्रु एकसारखा करीत आहे.

**(६) दाविदासारखे, देवाने आपल्या प्रार्थनांची उत्तरे द्यावी ह्यासाठी आपली अध्यात्मिक परिस्थिती कशी हवी?**

*हे देवा, तू माझा देव आहेस; मी आस्थेने तुझा शोध करीन; शुष्क, रुक्ष व निर्जल प्रदेशात माझा जीव तुझ्यासाठी तान्हेला झाला आहे, माझ्या देहालाही तुझी उत्कंठा लागली आहे. (स्तोत्रसंहिता ६३:१)*

ईश्वर आपल्या प्रार्थना ऐकून त्याचें उत्तर देईल तें कांहीं अटीवर देईल. ह्या अटीपैकीं पहिली अट म्हटली म्हणजे त्याच्या मदतीची अपेक्षा आपणांस वाटणें हीं होय. त्यानें आश्वासन दिलें अहे कीं, “मी तान्हेल्यावर पाणी, सुक्या भूमीवर पूर ओतीन.” 1 नीतिमत्वाची तहानभूक ज्यांस लागतें, व जे ईश्वराच्या समागमाची इच्छा करितात, त्यांनीं आपणांस भरपूर मिळेल अशी खात्री बाळगावी. पवित्र आत्म्याचें वजन पदण्यास अंत:करण त्यांनीं खुलें ठेविलें पाहिजे, नाहींतर ईश्वराचें कृपादान त्यास प्राप्त होणार नाहीं.

**(७) आपल्या प्रार्थनांची उत्तरे मिळवण्यासाठी आपण कोणते तीन मार्ग अवलंबिले पाहिजे?**

*"मी तुम्हांला सांगतो, मागा म्हणजे तुम्हांला दिले जाईल; शोधा म्हणजे तुम्हांला सापडेल; ठोका म्हणजे तुमच्यासाठी उघडले जाईल. (लूक ११:९)*

आपल्या मनांतील ईश्वराच्या मदतीची अपेक्षा ही स्वताच एक ईश्वराचा कृपाप्रसाद प्राप्त करून घेण्याचें साधन असून ती आपल्यातर्फे मोठ्या कळकळीनें ईश्वरास शोधलें पाहिजे. परमेश्वर म्हणतो, "मागा म्हणजे तुम्हांस दिलें जाईल." "ज्यानें आपला पुत्र राखून ठेवलानाहीं, तर आम्हां सर्वांसाठीं दिला, तो त्यासहित आम्हांला सर्वकांहीं कसा देणार नाहीं ?"2

**(८) बंडखोरी आपल्या प्रार्थनांवर कसा प्रभाव पाडते?**

*नियमशास्त्र कानी पडू नये म्हणून जो आपला कान बंद करतो त्याची प्रार्थनादेखील वीट आणणारी आहे. (नीतीसुत्रे २८:९)*

पापाला आपण अंत:करणांत थारा दिला व त्यासच चिकटून राहिलों, तर ईश्वर आपलें म्हणणें ऐकणार नाहीं ; परंतु पश्चात्ताप पावलेल्यांची प्रार्थना व कष्टी झालेला आत्मा ह्यांचा तो स्वीकार करतो. सर्व ज्ञात अपराधांपासून मुक्त होऊं तेव्हां ईश्वर आपल्या प्रार्थनांस उत्तर देईल असा विश्वास धरावा.

स्वताच्या गाठी असलेले पुण्य ईश्वरीकृपाप्रसाद प्राप्त करून देण्यास कधींही उपयोगी पडणार नाहीं, तर एका प्रभु येशुचीच लायकी व त्याचेंच रक्त आपणांस वाचविण्यास व शुद्ध करण्यास उपयोगी पडेल; आपण मात्र त्याच्या अटीचा स्वीकार करण्यास तयार असलें पाहिजे.

**(९) आपल्या प्रार्थनांची उत्तरे मिळवण्यात दुसरा कोणता घटक महत्वाचा आहे?**

***म्हणून मी तुम्हांला सांगतो, तुम्ही प्रार्थना करून जे काही मागाल ते आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हांला मिळेल. (मार्क ११:२४)***

श्रद्धा हें एक प्रार्थनेंतील मूलभूत तत्व आहे. “देवाजवळ जाणाऱ्यानें असा विश्वास धरला पाहिजे कीं, तो आहे, आणि त्याकडे धाव घेणाऱ्याला तो प्रतिफळ देणारा होतो.”1 प्रभु येशू आपल्या शिष्यांस म्हणाला, “जें कांहीं तुम्ही प्रार्थना करून मागाल, तें तुम्हांला मिळालेंच आहे असा विश्वास धरा, म्हणजे तें तुम्हांस प्राप्त होईल.”2 आपण त्याचें वचन पाळतों काय?

त्यानें दिलेलें आश्वासन फारच मोठें असून तें तो पाळणारा आहे. आपण मागतों त्य वस्तूंचा स्वीकार आपण करीत नाहीं, तेव्हां - अगदीं त्याचवेळी--प्रभु आपली प्रार्थना ऐकत आहे, व तो त्या प्रार्थनेचें उत्तर देईलच असा विश्वास आपण धरावयाचा आहे. आपण इतकें चुकनारे व असूरदर्शी आहोंत, कीं ज्या वस्तूंपासून आपणांस सुखप्राप्ती होणार नाहीम अशाच वस्तु आपण मागतों; परंतु आपला स्वर्गीय पिता केवळ म्हणजे अशाच गोष्टी प्रेमामुळें थोर कल्याणप्रद गोष्टी म्हणजे कीं जर आपणांस दैवी दृष्टी असती व सर्व गोष्टी जशा असतात तशाच त्या आपणांस दिसल्या असत्या, अशावेळीं जें थोर कल्याण प्राप्त करून घेण्याची इच्छा केली असती अशाच गोष्टी देतो. आपल्या प्रार्थना ऐकल्या जात नाहीम्त असें दिसूं लागतें त्यावेळीं त्यानें दिलेलें वचन लक्षांत आणावें. कारण आपल्या प्रार्थनेच्या उत्तराची

वेळ त्यानें दिलेलें वचन लक्षांत आणावें. कारण आपल्या प्रार्थनेच्या उत्तराची वेळ खात्रीनें येणारच, व ज्या सुखाची आपणांस अतिशय गरज आहे, असें सुख प्राप्त होणारच. परंतु आपल्या मनाप्रमाणेंच अमुकच रीतीनें व अमुकच वस्तूबद्दल केलेल्या प्रार्थनेस सदोदित उत्तर दिलें जावेंच असा हक्क सांगणें म्हणजे शुष्क चुकीचा तर्क होय. ईश्वर मुळींच चुकणारा नसून जे मार्गानें जातात त्यांचे मनोरथ पूर्ण करणारा आहे; म्हणून तुमच्या प्रार्थनेस तत्काळ उत्तर न मिळालें, तरी त्या ईश्वरावर विश्वास ठेवण्यास मागें पुढें पाहूं नका. “मागा म्हणजे तुम्हांस दिलें जाईल”1 ह्या त्याच्या वचनावर विश्वास ठेवा.

**(१०) आपण, जर विनम्र आणि विश्वास ठेवणाऱ्या विश्वासात, देवासमोर आपल्या गरजा ठेवल्या, कोणते महान अभिवचन आपण हस्तगत करू शकतो?**

*त्याच्यासमोर येण्यास आपल्याला जे धैर्य आहे ते ह्यावरून की, आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल; आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून ज्या मागण्या आपण त्याच्याजवळ केल्या आहेत त्या आपल्याला मिळाल्या आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे. (१ योहान ५:१४-१५)*

शंका व धास्ती बाळगून त्याप्रमाणें आपण चालत असलों अगर जी गोष्ट आपणांस स्पष्टपणें समजत नाहीं अशा गोष्टींचा उलगडा करण्याचा प्रयत्न आपण करीत गेलों तर आपण विश्वास धरण्यापूर्वींच आपलें अंत:करणांत घोटाळा माजून जाईल परंतु

निरूपायी, परतंत्र आणि खरोखरच आपण तसे आहोंत नम्र होत्साते ज्यानें ज्ञान अगाध आहे, व जो सृष्ट वस्तूंतील प्रत्येक गोष्ट पाहतो, व ज्याच्या इच्छेनें व शब्दानें सर्व चराचर जगत् चालतें, अशा ईश्वरास श्रद्धापूर्वक आपल्या गरजा कळविण्यासाठीं त्याजवळ आपण आलों तर आपलें गार्‌हाणें तो एकेल, व आपल्या अंत:करणांत प्रकाश पाडील.

**(११) देवापासून मिळणारी आपली क्षमा कशी निश्चित केली जाते?**

*"कारण जर तुम्ही लोकांना त्यांच्या अपराधांची क्षमा केली तर तुमचा स्वर्गीय पिता तुम्हांलाही क्षमा करील; परंतु जर तुम्ही लोकांना क्षमा केली नाही तर तुमचा पिताही तुमच्या अपराधांची क्षमा करणार नाही. (मत्तय ६:१४-१५)*

प्रार्थना ऐकली जाण्याची दुसरी अट म्हटली म्हणजे ती सतत करणें ही होय. श्रद्धा व अनुभव ह्यांत वाढण्याची इच्छा असल्यास सतत प्रार्थनाच केली पाहिजे. "प्रार्थनेंत तत्पर असा व तींत उपकारस्तुति करित जागृत राहा"2 असें साधु पौलानें सांगितल्याप्रमाणें आपणांस राहावयाचें आहे. विश्वास ठेवणारांस पेत्रसाची अशी सांगी आहे, कीं "मर्यादेनें राहा व प्रार्थना करण्यास सावध असा."3 साधु पौलानें आणखी एकें ठिकाणी असें म्हटलें आहे, कीं "सर्व गोष्टीविषयीं उपकारस्तुतिसहित प्रार्थना व विनंती करून आपली मागणीं देवाला कळवा."4 प्रेषीत यहूदानें म्हटलें आहे, "तुम्ही तर प्रियांनो, पवित्र आत्म्यांत प्रार्थना करुन देवाच्या प्रईतींत आपणांस राखा."5 सतत प्रार्थना म्हणजे ईश्वराशीं आत्म्याचा न तुटणारा

असा संबंध ; ह्या संबंधाच्यायोगानें ईश्वरापासून जीवन निघून तें आपल्याठायीं उतरतें, व पुन्हा आपल्या जिण्यामधून शुद्धता व पवित्रता हीं देवाकडे जातात.

**(१२) प्रार्थनेच्या आत्म्यात देवासोबत किती वेळा आपली हृदये हि ऐक्यात असली पाहिजे?**

**प्रार्थनेत तत्पर असा व तिच्यात उपकारस्तुती करत जागृत राहा; *(कलस्सेकरास पत्र ४:२)***

प्रार्थनेला उत्सुकतेचीहि आवश्यकता असते. कोणतीही गोष्ट तींत आड येतां कामा नये. प्रभु येशू व तुमचा आत्मा ह्याचें दळणवळण सारखें राहावें म्हणून जरूर तो प्रयत्न करा. प्रार्थना करितात त्या ठिकाणीं जाण्याची प्रत्येक संधि साधा. ईश्वराशीं ऐक्य करण्याचा खरोखर मनापासून जे लोक प्रयत्न करितात, ते प्रार्थनेच्या सभेंत आपलें कर्तव्य बजावण्यास विश्वासू, व त्याहून होणारा आपला फायदा करून घेण्यास सदा उत्सुक असलेले दृष्टीस पडतील. स्वर्गांतील प्रकाशाचें किरण ज्या ज्या ठिकाणीं म्हणून मिळतील, त्या त्या ठिकाणीं स्वतां जाण्यास ते प्रत्येक संधी साधतील.

***देवाने मला जे अद्‌भुत सौभाग्य दिले कि मी केव्हाही ख्रिस्ताच्या द्वारे प्रार्थनेत त्याच्याकडे येऊ शकतो, त्यासाठी त्याचे आभारी आहे.***

**गोल करा: होय अनिश्चित**

***मला जाणीव आहे कि प्रभूसोबत प्रार्थनेच्या द्वारे संपर्क साधने म्हणजे आपली जीवनावश्यक बाब आहे व स्वर्गाप्रत जोडणारी आहे. सतत त्याच्या संपर्कात राहण्याची माझी इच्छा आहे आणि***

*प्रार्थनेच्या वरदानाच्या द्वारे त्याच्या अढळ शांतीचा अनुभव घेण्याची देखील इच्छा आहे.*


गोल करा: होय अनिश्चित

*माझा विश्वास आहे आणि मी भरवसा ठेवतो कि देव त्याच्या परिपूर्ण समयात आणि इच्छेनुसार माझ्या प्रार्थनांची उत्तरे देतो.*

गोल करा: होय अनिश्चित

*'प्रार्थनेमध्ये 'धीटपणे कृपेच्या सिंहासनासमोर" येण्याच्या देवाच्या निमंत्रणाचा मी स्वीकार करतो जेणेकरून त्याच्या सोबतच्या दैनंदिन चालचलणुकीत मला सहाय्य, कृपा आणि दया प्राप्त होतील.*

गोल करा: होय अनिश्चित



## धडा १३
## प्रार्थनेचे सामर्थ्य

### (१) वयक्तिक प्रार्थनेचा परिणाम काय आहे?

***तू तर जेव्हा जेव्हा प्रार्थना करतोस तेव्हा तेव्हा 'आपल्या खोलीत जा व दार लावून घेऊन' आपल्या गुप्तवासी पित्याची 'प्रार्थना कर' म्हणजे तुझा गुप्तदर्शी पिता तुला उघडपणे तिचे फळ देईल. (मत्तय ६:६)***

आपल्या कुटुंबात आपण प्रार्थना करावी ; परंतु विशेषत: एकान्तात प्रार्थना करण्याची तर मुळीच हयगय करू नये. कारण अशी प्रार्थना हेंच आत्म्याचें जीवन आहे. प्रार्थनेची हयगय केली तर आत्म्याची उन्नति होणें अशक्य आहे. कौटुंबिक अगर सार्वजनिक प्रार्थनाच केवळ केल्यानें पुरेसें होतें असें नाहीं, तर ईश्वराच्या सर्वदृष्ट्या नेत्रापुढें एकान्ती तुमचा आत्मा जाऊं द्या. एकान्तांत केलेली प्रार्थनाच फक्त ईश्वर ऐकतो. ईश्वराच्या कानाव्यतिरिक्त दुसरा कोणताहि कान असल्या विनंत्या ग्रहन करूं

शकत नाहीं आपण एकान्ती प्रार्थना करीत असतां सभोंवतालच्या गोष्टींपासून व मनाच्या चलबिचलीपासून आपला आत्मादूर राहतो. अंत:करमपुर्वक केलेल्या प्रार्थना ऐकण्यास ज्याचा कान सदाचाच उघडा असतो अशा गुप्तपणें पाहनाऱ्या ईश्वराचें वजन अशा आत्म्यावर पडतें. सैतानाशीं सामना करण्यास अशा आत्म्याला बळकटी यावी व तो त्या सामन्यांत टिकावा म्हणून तो शांत व शाधेपणाच्या श्रद्धेनें ईश्वराशीं तादात्म्य करुन घेऊन त्याच्या दैवी प्रकाशाचे किरण प्राप्त करुन घेतो. ईश्वर हा आमचा सामर्थ्याचा खंबीर बुरुजच आहे.

आपल्या खोलींत एकान्ती प्रार्थना करा; आणि आपल्या रोजच्या कामगिरीवर तुम्ही जात असतां तुमचें अंत:करण ईश्वराकडे लावलेलें असूं द्या. ह्याप्रमाणेंच हनोख हा ईश्वराबरोबर चालला. कृपेच्या सिंहासनासमोर ह्या एकांतांतील प्रार्थना मौल्यवान धूप ज्याप्रमाणें वर जातो त्याप्रमाणें त्या कृपेच्या सिंहासनासमोर वर जातात. ज्याचें अंत:करण ईश्वराकडे लागलेले आहे अशा मनुष्यास सैतान जिंकीत नाहीं.

**(२) ह्या वचनात दिलेली कोणती सूचना प्रार्थनेच्या महत्वावर जोर देते?**

***... निरंतर प्रार्थना करा, (१थेसलोनिकरास पत्र ५:१७)***

ईश्वराला विनंति करण्यास नालायक अशी कोणतीहि वेळ व कोणतीहि जागा नाही. अंत:करणपूर्वक केलेल्या प्रार्थनेच्या आत्म्याने आपलीं मनें ईश्वराकडेलागण्यास प्रतिबंध करणारे असें कांहिं नाहीं. अर्तहशश्ते राजापुढें नेहम्यानें विनंति केल्याप्रमाणें भर रस्त्यामधिल

गर्दीत, कामकाजांत त्यानें मार्ग दाखवावा म्हणुन आपण देवाची विनंति करावी. आपण असूं त्या ठिकाणी ईश्वराशीं ऐक्य करण्यास एकांत जागा सापडेल. आमच्या आत्म्यांत प्रभु ख्रिस्तानें स्वर्गीय पाहुणा म्हणून येऊन राहावें म्हणून त्यास आपण पाचारण करावें.

आपल्या सभोंवती दुषित व बिघडलेलें वातावरण असलें तरी आपण त्यांतील आरोग्यघातक परमाणु ग्रहण करुं नयेत, तर आकाशांतील (स्वर्गांतील) शुद्ध हवेंत राहावें. प्रार्थनेच्या द्वारें ईश्वराच्या समक्षतेंत आत्मा आणून अशुद्ध कल्पना व अपवित्र विचार यांस आपण थाराहि देऊं नये ईश्वराचा आश्रय व त्याचा आशीर्वाद ग्रहण करण्यास जे लोक अंत:करन खुलें ठेवितात, ते पृथ्वीवरील वातावरणांपेक्षां अधिक पवित्र अशा वातावरणांत राहतील व त्याचें स्वर्गाशीं सतत दळणवळण राहील.

**(३) ख्रिस्तासोबत जेव्हा आपण सातत्याने संधान साधतो, तेव्हा त्याचा परिणाम काय होतो?**

*ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्याला तू पूर्ण शांती देतोस, कारण त्याचा भाव तुझ्यावर असतो. (यशया २६:३)*

प्रभु येशूविषयीं आपलें विचार अधिक स्पष्ट असावेत व सार्वकालिक सत्य वस्तूंशी थोरवी आपण पूर्णपणें समजावी. पवित्रपणाचें सौंदर्य म्हणजे देवाच्या लेंकराची अंत:करणें पवित्रतेनें भरणें, व हें परिपूर्ण व्हावें म्हणून आपण स्वर्गीय गोष्टी शोधण्याचा प्रयत्न करावा.

ईश्वरानें आपणांस स्वर्गीय वातावरणात श्वाओच्छवास करूं द्यावा ह्यातून आपला आत्मा आहे त्या स्थितींतून काढून वर जाऊं द्या. आपण

ईश्वराच्या इतकें सन्निध्य राहावें, कीं प्रत्येक अकल्पित परिक्षेंत आपलें विचार, फुल ज्याप्रमाणें सूर्याकडे वळतें त्याप्रमाणें ईश्वराकडे वळतील.

**(४) भग्न हृदयी लोकांच्या प्रती देव कृपाळूपणे कोणते अभिवचन देतो?**
*भग्नहृदयी जनांना तो बरे करतो; तो त्यांच्या जखमांना पट्ट्या बांधतो. (स्तोत्रसहिता १४७:३)*

तुम्ही आपल्या गरजा, आपले आनंद, आपलीं दु:खें, आपल्या काळज्या व आपली भीति ही सर्व ईश्वरापुढें मांडा. तुमचा भार त्यास होत नाहीं, व त्यास तुमच्यामुळें शीणहि येत नाहीं. जो तुमच्या डोक्याचा प्रत्येक केंस मोजितो, तो आपल्या लेंकराच्या गरजांविषयीं बेफिकीर राहात नाहीं. “तो फार कनवाळू व दयाळू आहे.”1 आपल्या दु:खाच्या नामोच्चारानेंहि तें कळवलतें. तुमच्या मनाचा घोटाळा करणारी प्रत्येक बाब त्याजकडे न्या. त्याला वाहतां येणार नाहीं इतकें मोठें जगांत कांहीं नाहीं. कारण तो अनंत जग धारण करून त्यातील प्रत्येक वस्तूवर सत्ता करतो. आपल्या शांततेशी कोनत्याहि रीतीनें संबंध आहे अशी कोनतीहि क्षुल्लक बाब त्याच्या नजरेंतून निसटून जात नाहीं. आपल्या अनुभवांतील असा कोणताहि भाग अदृश्य नाहीं, कीं तो जिचा त्यास उलगडा करता येत नाही, असें कोनतेही संकट नाहीं, अशी कोनतीहि छळणारी काळजी नाहीं, अगर आत्म्याला होणारा आनंद नाहीं अगर आपल्या तोंडावाटें निघणारी अंत:करणपूर्वक केलेली प्रार्थना नाहीं, कीं जिच्याकडे त्या स्वर्गीय पित्याचें लक्ष नाहीं, अगर ज्याची तो मुळींच काळजी घेत नाहीं. “तो मग्न मनाच्यांस बरें

करतो. आणि त्यांच्या क्षतांस पट्टी लावून बांधतो.”2 ईश्वर आणिप्रत्येक आत्मा ह्याजमधील संबंध इतका स्पष्ट व पूर्ण आहे, कीं जणू काय ज्याच्यासाठीं त्यानें आपल्या प्रिय पुत्राला दिलें असे दुसरे आत्मेच नाहींत.

**(५) आपण कोणाच्या नावाने प्रार्थना केली पाहिजे?**

***तुम्ही मला निवडले नाही, तर मी तुम्हांला निवडले व तुम्हांला नेमले आहे; ह्यात हेतू हा की, तुम्ही जाऊन फळ द्यावे, तुमचे फळ टिकावे आणि जे काही तुम्ही माझ्या नावाने पित्याजवळ मागाल ते त्याने तुम्हांला द्यावे. (योहान १५:१६)***

प्रभू येशूनें सांगितलें आहे, “तुम्ही माझ्या नावानें मागाल, आणि मी तुम्हांसाठीं बापाजवळ विनंति करिन, असें मी तुम्हांस म्हणत नाहीं ; कारण बाप स्वतां तुम्हांवर प्रीति करतो.” “म्यां तुम्हांस निवडलें व तुम्हांस नेमिलें आहे, यासाठीं कीं, तुम्ही जाऊन फळ द्यावें व तुमचें फळ राहावें यासाठीं कीं, जें कांहीं तुम्हीं माझ्या नावानें बापापाशीम मागाल तें त्यानें तुम्हांस द्यावें.”3 प्रार्थनेच्या आरंभी व शेवटीं त्या प्रभुचा नुसता नामोच्चार करणें ह्यापेक्षां प्रार्थना करण्यांत कांहीं अधिक आहे. प्रार्थना करावयाची म्हणजे ती प्रभु येशुच्या मनानें व आत्म्यानें त्याच्या वचनांवर, कृपेवर व कार्यावर विश्वास ठेवून करावयाची आहे.

**(६) आपल्या प्रार्थना आणि आराधना ह्याची जोड कोणत्या व्यावहारिक ख्रिस्तीत्वाशी लावण्यात येऊ शकते?**

*देवपित्याच्या दृष्टीने शुद्ध व निर्मळ धर्माचरण म्हणजे अनाथांचा व विधवांचा त्यांच्या संकटांत समाचार घेणे, व स्वतःला जगापासून निष्कलंक ठेवणे हे आहे. (याकोब १:२७)*

*आणि तुमच्यामधील कोणी त्यांना म्हणतो, “सुखाने जा, ऊब घ्या व तृप्त व्हा;” पण त्यांच्या शरीराला पाहिजे ते त्यांना तुम्ही देत नाही तर त्यापासून काय लाभ? (याकोब २:१६)*

आपली पूजा करण्यासाठीं जगाचा त्याग करून आपणापैकीं कोणी संन्यासी अगर जोगी बनावें असा ईश्वराचा हेतु नाहीं. जंगलातील डोंगरात व मनुष्यवस्तीत प्रभुनें ज्याप्रमाणें आपलें आयुष्य घालविलें त्याप्रमाणें आपनहि केलें पाहिजे. जो कोणी प्रार्थनेशिवाय दुसरें कांहीएक करीत नाहीं. तो लौकरच प्रार्थना करण्याचें सोडून देईल, अगर त्याच्या प्रार्थना म्हणजे एक ठराविक व नांवाचाच कर्ममार्ग होऊन बसेल. ख्रिस्ती कर्तव्याचा त्याग करून आपला खांब न वाहता मनुष्ये जेव्हां समाज सोडून जातात , व ज्यांच्यासाठीं त्यानें उत्साहानें काम केलें अशा आपल्या धन्यासाठीं काम करण्याचें जेव्हाम तें बंद करितात, तेव्हा ते प्रार्थनेचा मुख्य मुद्दाच सोडुन देतात व त्याच्या भक्तीसाठी उत्तेजन त्यांजवळ नसतें, अशा लोकांच्या प्रार्थना स्वतांविषयी व आपमतलबाच्या असतात. मनुष्यजातीच्या गरजांबद्दल अगर ख्रिस्ताच्या राज्याबद्दल सामर्थ्य मिळावे म्हणून त्यांस प्रार्थना करतां येत नाहीं.

**(७) ख्रिस्ती सहभागीतेचा उद्देश काय आहे?**

... *आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे न सोडता एकमेकांना बोध*

*करावा, आणि तो दिवस जसजसा जवळ येत असल्याचे तुम्हांला दिसते तसतसा तो अधिक करावा. (इब्री १०:२५)*

ईश्वराच्या सेवेविषयीं एकमेकाला बळकटी आणणें व उत्तेजन देणें हीं करण्याची उपेक्षा केल्यास आपला तोटा होतो. त्याच्या वचनांचा ठळकपणा व त्याचें महत्त्व आपल्या मनांतून नाहींशी होतात. त्याच्या वचनांचा ठळकपणा व त्यांचें महत्त्व आपल्या मनांतून नाहींशी होतात. त्या सत्यवचनांत असलेल्या शुद्धकरणाच्या गुणांनीं आपलें अंत:करण प्रकाशीत व जागृत न होता आपला आत्मिकपणा नाहीसा होतो. ख्रिस्ती बंधु या नात्यानें असलेली एकमेकांमधील सहानुभूति नाहीशीं होते. एकान्तांत बसणारा मनुष्य ईश्वरानें नेमून दिलेलें कार्य पूर्ण करीत नाहीं आपल्या शीलांतील समाजशीलत्वाच्या तत्वाची योग्य जोपासना हें एक ईश्वराच्या सेवेंमध्यें आपली वाढ होण्याचें व आपणांस सामर्थ्य प्राप्त करुन घेण्याचें एक साधन आहे.

ख्रिस्ती लोक एकमेकांशीं संबंध ठेवतील, व ईश्वराच्या प्रेमाबद्दल व तारणाच्या अमूल्य सत्यवचनांबद्दल एकमेकांशीं बोलतील, तर त्यांची स्वतांची अंत:करणें ताजीतवानी होऊन ते एकमेकांस ताजेतवाने करतील. आपल्या स्वर्गीय पित्याच्या कृपेचा अनुभव घेत त्याविषयीं आपणा अधिक शिकावें, म्हणजे त्याच्या प्रेमाबद्दल बोलण्याची आपणांस इच्छा होईल ; व आपण हें करित असतां आपलें अंत:करण थोर होऊन त्यास उत्तेजन प्राप्त होईल. स्वतांविषयीं न बोलता व विचार न करिता प्रभु येशूविषयींच बोललों व विचार केला, तर त्याची समक्षता आपणास अधिक प्राप्त होईल.

**(८) धन्तीत वस्ती करण्यासाठी, आपले विचार आणि जिव्हाळा कोठे केंद्रित होऊ शकतात?**

*ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्याला तू पूर्ण शांती देतोस, कारण त्याचा भाव तुझ्यावर असतो.*
*परमेश्वरावर सर्वकाळ भाव ठेवा, कारण प्रभू परमेश हा सनातन आश्रयदुर्ग आहे. (यशया २६:३-४)*

*वरील गोष्टींकडे मन लावा. पृथ्वीवरील गोष्टींकडे लावू नका. (कलस्सेकरास पत्र ३:२)*

ईश्वर आपणांबद्दल काळजी घेतो ह्याचें जितकें पुरावें आपणाजवळ आहेत, जितक्या वेळां आपण त्याच्याविषयीं विचार करण्याचें मनांत आणलें तर आपणांस सदोदित त्याचाच विचार करावा लागेल व त्याजविषयी बोलण्यांत आनंद मानून त्याचीच स्तुति करावी लागेल; ऐहिक वस्तूंविषयीं आपण बोलतों, ह्याचें कारण आपण त्यांतच आपलें त्यांजवर प्रेम असतें म्हणुन आपलें आनंद व आपलीं दु:खें त्यांशी गुरफटलेलीं असतात तथापि आपल्या ह्या जगांतील मित्रांवर प्रेम करण्यापेक्षां ईश्वरावर अधिक प्रेम करण्यास आपणाजवळ अधिक मोठें कारण आहे. आपला पहिला विचार त्याच्याविषयींच असावा, याच्याच चांगुलपणांविषयी आपण बोलावें, व त्याच्याच सामर्थ्याविषयी सांगावें, व हाच आपला स्वभाव असावा.

त्यानें ज्या मोठमोठ्या देणग्या आपणांस दिल्या आहेत, त्या आपण आपलें विचार व आपलें प्रेम इतर गोष्टींवर ठेवून अखेरीस त्यास देण्यास आपणांजवळ कांहीं नसावें म्हणून दिल्या नाहींत ; तर आपणांस त्याची वारंवार

आठवण व्हावी, व प्रेमाच्या व कृतज्ञतेच्या बंधनानें आपल्या त्या उपकारकर्त्या परमेश्वराशी आपण स्वतांला बांधून घ्यावें म्हणून त्या दिल्या आहेत. पृथ्वीच्या अगदीं सखल प्रदेशावर आपण राहतों तरी स्वर्गाच्या दरवाज्याकडे आपण दृष्‌टि लावूं या. ज्या ठिकाणीं ईश्वराचा वैभवरुप प्रकाश ख्रिस्ताच्या चेहेर्‌यावर पडला आहे. अशा त्या स्वर्गाच्या दरवाज्याकडे आपण दृष्‌टि लावूं. त्या ख्रिस्तामार्फत “देवाजवळ जाणार्‌यांस तो पूर्णपणें तारायास समर्थ आहे.”1

**(९) आपल्या प्रार्थनेत कोणते महत्वाचे घटक असले पाहिजेत?**

***प्रार्थनेत तत्पर असा व तिच्यात उपकारस्तुती करत जागृत राहा; (कलस्सेकरास पत्र ४:२)***

“ईश्वराच्या दयेकरीतां व मनुष्याकडील त्याच्या आश्चर्यकर्मांकरीतां.”2 आपण त्याची स्तुति करणें अवश्य आहे. केवळ मागणें व घेणेम यांनींच भरलेली आपली उपासना व प्रार्थना नसावी. आपणांस आपल्या गरजांचाच व फायद्यांचाच हरहमेश विचार करतां कामा नये. आपण कांहीं कमी प्रार्थना करतों असें नाहीं, तर तींत आपण उपकारस्तुति करावी तितकी करीत नाहीं. ईश्वराच्या दयेचा स्वीकार आपणा नेहमीं करतों, परंतु कृतज्ञताबुद्धि किती तरी थोडी दाखवितों ; व त्यानें जें कांहीं आपणांसाठीं केलें आहे त्याबद्दल किती तरी थोडी स्तुति आपण करतो.

**(१०) जे लोक आनंदाने आपले जीवन आणि अस्तित्व ख्रिस्ताच्या अधीन समर्पित करतील त्यांच्या हृदयातून काय बाहेर पडेल?**

*तेथे तुम्ही आपला देव परमेश्वर ह्याच्यासमोर भोजन करावे आणि ज्या ज्या कामात तुम्ही हात घातला व ज्यात तुमचा देव परमेश्वर ह्याने तुम्हांला यश दिले त्या सर्वांबद्दल तुम्ही व तुमच्या घरच्या माणसांनी आनंद करावा. (अनुवाद १२:७)*

प्राचीनकाळी इस्त्राएल लोक प्रभु ईश्वराच्या उपासनेसाठीं एकत्र जमले होते, तेव्हां त्यानें त्यांस सांगितलें, “मग तेथें आपला देव परमेश्वर यासमोर जेवा, आणि ज्या कार्यारु तूं हात लावतोस. ज्याविषयीं तुझा देव परमेश्वर यानें तुला आशीर्वाद दिला त्यांत तुम्ही आपल्या घरच्यांसुद्धा आनंद करा.”3

आपला प्रभु ईश्वर म्हणजे ममताळू व दयाळू बाप आहे. त्याची सेवा म्हणजे अंत:करण कष्टी कराणारी व तापदायक दु:खमय अशी मानता कामा नयें. ईश्वराची उपासना करणें व त्याच्या कार्यांत भाग घेंणें हें एक सुख होऊन बसलें पाहीजे. ज्यांच्यासाठीं त्यानें इतकें तारण दिलें, त्या त्याच्या लेकरांनीं तो निष्ठूर व मानेवर खडा ठेवून काम करून घेणारा असा धनी आहे, असें समजून त्यांनीं वागावें अशी त्याची इच्छा नाही. तो त्यांना सर्वोत्कृष्ट मित्र आहे. जेव्हां ते त्याची उपासना करितात, तेव्हां त्याजबरोबर असावें व त्यांस आशीर्वाद देऊन सुख द्यावें , त्यांची अंत:करणें आनंदानें व प्रेमानें भरावी अशी त्याची इच्छा आहे. आपल्या लेकरांनीं उपासनेंत दु:ख न मानतां सुख मानावे अशी त्याची इच्छा आहे. जे त्याची भक्ती करावयास येतात त्यांनीं आपल्या आयुष्यक्रमांत आनंदीत असावें व सर्व बाबतींत प्रामाणिकपणानें व विश्वासानें वागावें म्हणून त्याच्या आस्थेचे व प्रेमाचे मौल्यवान् विचार बरोबर न्यावेत अशी त्याची इच्छा आहे.

**(११) जेव्हा आपले विचार, संभाषण, आणि प्रार्थना देवाची स्तुती करून त्याचे गौरव करतील, तेव्हा काय प्रगट होईल?**

*जो आभाररूपी यज्ञ करतो तो माझा गौरव करतो; आणि जो सरळ मार्गाने चालतो त्याला मी देवाने सिद्ध केलेले तारण प्राप्त करून देईन."(स्तोत्रसहिता ५०:२३)*

वधस्तंभाभोंवती आपण एकत्र जमलें पाहिजे. खांबी दिलेला तो ख्रिस्तच केवळ आपल्या ध्यानाचा, संभाषणाचा, व आनंदवृत्तीचा विषय होऊन बसावा. ईश्वरापासून प्राप्त होणाऱ्या प्रत्येक आशीर्वादाचा आपण विचार करावा व जेव्हां आपणांस त्याचें अगाध प्रेम कळून येईल, तेव्हां आपणांकरीता खांबावर ज्या हातास खिळे ठोकले त्या हातावर विश्वास ठेवण्यास आपण तेव्हांच तयार होऊं.

**(१२) देवाचे चांगुलपण जेव्हा आपण जाणून घेतो, तेव्हा सतत आपल्या ओठांवर काय असले पाहिजे?**

*परमेश्वराच्या दयेबद्दल व त्याने मनुष्यांसाठी केलेल्या अद्‌भुत कृत्यांबद्दल लोक त्याचे उपकारस्मरण करोत. ते त्याला उपकारस्मरणरूपी यज्ञ अर्पोत, व स्तोत्रे गाऊन त्याची कृत्ये वर्णोत. (स्तोत्रसहिता १०७: २१-२२)*

प्रार्थनारुप पंखांवरुन आपला आत्मा स्वर्गाच्या जवळ जवळ जाबा. तेथील दरबारांत गानवादनानें त्याची उपासना करतात व आपण कृतज्ञताबुद्धि दाखवीत असतांना स्वर्गीय पाहुण्यांच्या उपासनेस त्यांच्याजवळ जाऊं. "जो स्तुति अर्पितो तो देवाला मान देतो."1

चला आपण आपल्या उत्पन्नकर्त्या ईश्वरासमोर उपकार मानून गायनाचा शब्द करीत2 जाऊं.

*माझ्या दैनंदिन अनुभवत दोन्ही खाजगी आणि वयक्तिक प्रार्थनेत देवासोबत माझा संबंध असावा ह्याच्या गरजेला मी जाणून घेतो.*

**गोल करा:  होय  अनिश्चित**

*माझ्या जीवनात मी प्रार्थना करत असताना देवाची दया आणि चांगुलपण ह्यामध्ये त्याची स्तुती आणि उपकार मानण्याचे मी महत्व समजून घेतो.*

**गोल करा:  होय  अनिश्चित**

*प्रार्थनेच्या आशीर्वादाच्या द्वारे देवाच्या सिंहासनासमोर येण्याचे जे सौभाग्य मला आहे ज्यामुळे माझ्या जीवनात त्याचे अद्भुत सामर्थ्य मी जाणून घेतो आणि प्रार्थना करत असताना इतरांसाठी देखील ते हस्तगत करतो त्यासाठी देवाचे मी आभार मानतो.*

**गोल करा:  होय  अनिश्चित**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________



## धडा १४
## संशयाचें काय करावयाचें

(१) जे लोक येशूच्या दैवत्वाच्या बद्दल थोडे साशंक होते त्यांना येशूने काय प्रतिसाद दिला?

*तेव्हा शास्त्री व परूशी ह्यांच्यापैकी काही जण त्याला म्हणाले, “गुरूजी, तुमच्या हातचे चिन्ह पाहावे अशी आमची इच्छा आहे.” त्याने त्यांना उत्तर दिले, “दुष्ट आणि व्यभिचारी पिढी चिन्ह मागते, परंतु योना संदेष्टा ह्याच्या चिन्हावाचून तिला दुसरे चिन्ह मिळणार नाही. (मत्तय १२:३८-३९)*

बऱ्याच लोकांत व विशेषतः ख्रिस्ती जिण्यातील तरुण लोकांत शास्त्र हें ईश्वराचा शब्द नाहीं अशा प्रकारच्या मतांनी कधींकधीं चलबिचल उडते. अशा लोकांस प्रतिपादन करितां येत नाहींत, अगर त्यांस समजत नाहींत अशा काहीं गोष्टी शास्त्रांत आहेत, व शास्त्र हें देवाचें प्रगटीकरण नाहीं असें लोकांस भासविण्यासाठीं त्याच गोष्टींचा उपयोग सैतान करीत असतो. असे संशय घेणारे लोक असें विचारतात कीं, "सत्यमार्ग आम्हीं कसा समजावा ? शास्त्र म्हणजे जर खरोखरच ईश्वराचा शब्द आहे, तर आमचे संशय व आमच्या मनाचे गोंधळ कसे नाहीसे होतील ?"

ज्या गोष्टींवर आमची श्रद्धा बसावी अशी ईश्वराची इच्छा आहे त्या गोष्टींबद्दल भरभक्कम पुरावा दिल्याशिवाय तो आम्हांस तीवर विश्वास ठेवण्यास सांगत नाहीं. त्याचें अस्तित्व, त्याचें शील. त्याच्या वचनांची सत्यता आपल्या विचारशक्तीचा कसोटीस टिकतील अशा पुराव्यानेच तीं सिद्ध झालीं आहेत; व असा पुरावा शास्त्रांत भरपूर आहे. इतकें आहे खरें, तथापि त्यांत संशयास मुळीच जागा मिळूं नये अशी मात्र व्यवस्था ईश्वरानें केलेली नाहीं. आपला विश्वास पुराव्याच्या पायावर असावा, गृहीत गोष्टींवर असतां कामा नये. संशय घेण्याची इच्छा असणारांस तशीहि संधी दि आहे, व सत्यान्वेषण करणारांस भरपूर पुरावाहि दिला आहे.

**(२) मनुष्य देवाचे मार्ग समजून घेण्यात का अकार्यक्षम आहे?**

*“कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत. (यशया ५५:८-९)*

अमर्याद अशा ईश्वराचें शील, अगर त्याचीं कार्यें पुरतेपणीं समजणें मर्यादित बुद्धीच्या मनुष्यप्राण्यांस केवळ अशक्य आहे. अति तीक्ष्ण बुद्धीला, अगर अति सुसंस्कृत मनाला तो पवित्र परमेश्वर सदोदित अगम्यच असला पाहिजे. “तुझ्यानें शोध करून देवाला जाणवेल काय ? सर्वसमर्थाविषयीं तुला पूर्ण ज्ञान होईल काय ? तें आकाशासारखें उंच आहे, तूं काय करशील? तें अधोलोकांपेक्षां खोल आहे, तूं काय जाणशील?”1

प्रेषित पौल यानें म्हटले आहे, “अहा, देवाची संपत्ति, बुद्धी व ज्ञान हीं किती अगाध आहेत ! त्याचे संकल्प किती दुर्ज्ञेय आणि त्याचे मार्ग किती अनुपलक्ष्य आहेत, ”2 परंतु जरी “त्याजसभोंवतीं मेघ व अंधकार आहेत” तरी “नीती व न्याय त्याच्या आसनाचा आधारच आहेत.”3 आपल्याशीं त्याचे चाललेले व्यवहार, आपल्याविषयीं ज्या हेतूने तो प्रेरित झाला आहे ते हेतू अशा रीतीनें आपणांस समजावे कीं, त्याचे अमर्याद प्रेम व अमर्याद सामर्थ्ययुक्तत्वाची दया हीं आपणांस ओळखता यावी. आपल्या कल्याणाचे असतील, तेवढेच मात्र त्याचे हेतू आपणांस ओळखतां यावी. आपल्या कल्याणाचे असतील, तेवढेच मात्र त्याचे हेतू आपणांस समजतात; ह्या पलीकडे त्याच्या सर्व समर्थ हस्तावर व प्रेमपुरीत अंतःकरणावर आपण नुसता विश्वासच ठेवावयाचा आहे.

**(३) जेव्हा आपण शास्त्रवचन जाणून घेण्यात अयशस्वी होतो, तेव्हा आपल्याला कोणत्या गोष्टीचा इशारा म्हणून लक्ष देण्याची गरज आहे?**

*आणि त्याने आपल्या सर्व पत्रांत ह्या गोष्टींचा उल्लेख केला आहे; त्यांत समजण्यास कठीण अशा काही गोष्टी आहेत. अज्ञानी व अस्थिर माणसे इतर शास्त्रलेखांचा जसा विपरीत अर्थ करतात तसा ह्यांचाही करतात; अशाने ते स्वतःच्या नाशाला कारणीभूत होतात. तर प्रियजनहो, ह्या गोष्टी तुम्हांला पूर्वीपासून कळत आहेत, म्हणून तुम्ही अनीतिमान लोकांच्या भ्रांतिप्रवाहात सापडून आपल्या स्थिरतेतून ढळू नये ह्यासाठी जपून राहा; (२ पेत्र ३:१६-१७)*

ज्या गूढ गोष्टी मर्यादित अशा मनुष्यप्राण्यास कधीहि पूर्णपणें समजावयाच्या नाहींत, अशा गूढ गोष्टी आपल्या दैवी जन्मदात्याप्रमाणेंच देवच शब्द दाखवितों. शास्त्रांत सांगितलेल्या गोष्टी- जगांत पापाचा शिरकाव, ख्रिस्ताचा अवतार, नवीन जन्म, पुनरुत्थान व ह्याशिवाय बऱ्याच इतर गोष्टी-इतक्या गूढ आहेत, कीं त्यांचे मनुष्याला कारणही सांगता येणार नाहीं व समजूनही येणार नाही; व म्हणून त्याच्या वचनांविषयी शंका घेण्याचें कारण नाहीं. ह्या भौतिक सृष्टीत आपली अक्कल गुंग करून टाकणाऱ्या गोष्टी आपणाभोवती आहेत. अगदी साध्या आयुष्याक्रमांत अशीं काही गूढ प्रमेयें दिसून येतात, कीं तीं सोडविणें महान् महान् तत्ववेत्यांसही मुष्कील पडतें. आपल्याला अज्ञेय असे चमत्कार जिकडे तिकडे दिसतात. असें असतां ज्या गोष्टींचा उलगड आपणांस होणार नाहीं, अशा गोष्टी आत्मिक सृष्टीत आढळतील

म्हणून आपणांस आश्चर्य वाटावें काय? ह्या बाबतीत मुख्य अडचण म्हटली म्हणजे मनुष्याच्या मनाचा अशक्तपणा व कोतेपणा ही होय. शास्त्राच्या दैवीपणाबद्दल बळकट पुरावा ईश्वरानें शास्त्रांतच सांगितला आहे; व आपण त्याच्या वचनाच्या सत्यतेबद्दल मुळीच शंका बाळगावयाची नाहीं, कारण त्यांची कार्यें समजणें आपणांस अशक्य आहे.

प्रेषित पेत्रासानें म्हटलें आहे, “त्यांत संमजायास कठीण अशा काहीं गोष्टी आहेत त्यांचा, अज्ञानी व अस्थिर मनुष्य जेणेंकरून त्यांचा नाश होण्यार अशा इतर शास्त्रलेखांप्रमाणें ओढून ताणून विपरीत अर्थ करितात.”1 शास्त्राच्या दैवी उत्पत्तीबद्दल शंका घेणारे लोक शास्त्रांतूनच काहीं कठीण भाग घेऊन त्याचाच विरुद्ध प्रतिपादन करण्याकरितां पुढें आणितात; परंतु हें त्यांचे करणें इतकें शुष्क असतें, कीं असे भागाचा त्या शास्त्राच्या दैवीपणाबद्दल बळकट पुरावा देतात. आपणांला सहज समजेल अशी ईश्वराविषयी हकीकत त्यांत मुळीच नसली, व त्याचा थोरपणा मर्यादित बुद्धीच्या मनुष्यास समजून आला, तर त्या शास्त्रांत दैवी प्रमाणाचा बिनचूक व विश्वसनीय भागच असणार नाहीं. त्यांतील विषयांचा मोठेपणा व गूढ गोष्टी हीं तें शास्त्र ईश्वराचा शब्द आहे, असा विश्वास उत्पन्न करतील.

**(४) ह्या जगाचे सुज्ञान शास्त्रवचनाची समजूत देण्यात का अयशस्वी ठरते?**

*स्वाभाविक वृत्तीचा माणूस देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वही, कारण त्या त्याला मूर्खपणाच्या वाटतात; आणि त्याला त्या*

*समजू शकणार नाहीत, कारण त्यांची पारख आत्म्याच्या द्वारे होते. (१ करिंथकरास पत्र २:१४)*

अंत:करणाच्या गरजा व इच्छा यांस पूर्णपणें व सहज रीतीनें लागू पडतील अशीच सत्यवचनें शास्त्रांत सांगितलेलीं आहेत. ह्या सत्यवचनांनी अतिशय सुसंस्कृत मनाच्या लोकांस थक्क करुन सोडलें आहे, व नम्र परंतु अशिक्षित अशा लोकांस मुक्तीचा मार्गं दाखवून दिला आहे. हीं साध्या रीतीनें मनुष्याच्या समजाबाहेर आहेत, कीं त्यांचे आपण ग्रहण करावयाचें ते फक्त तीं ईश्वरानें सांगितलेली आहेत म्हणून करावयाचें. ह्याप्रमाणे तारणाचा मार्ग आपणांस अगदी उघड करून ठेविला आहे, कारण प्रत्येक आत्म्यानें पश्चातापी होऊन ईश्वराचा मार्ग पत्करण्यास त्या तारणाच्या पायऱ्या (सत्यवचनें) पाहाव्या, व ईश्वराच्या नियमित मार्गानें तारण पावावें म्हणून ख्रिस्ताकडे यावें. तथापि शास्त्रसंशोधन करीत असतां ह्या सहज समजणाऱ्या सत्यवचनांत मनाला चकित करून सोडणारीं, परंतु मनापासून सत्यसंशोधन करणाराचे मनांत पुज्यभाव व श्रद्धा उत्पन्न करणारीं, व ईश्वराच्या वैभवाचें गुप्तस्थान होऊन बसलेलीं गूढ तत्वे भरलेलीं आहेत. शास्त्राचें संशोधन आपण जों जों अधिक करितों, तों तों त्याची पक्की खात्री होते, कीं तें ईश्वराचा शब्द आहे. व मग मनुष्याची विचारशक्ती त्या ईश्वराच्या प्रगतीकरणामुळें नम्र होऊन जाते.

आपणाला पूर्णपणे शास्त्रांतील वचनें समजत नाहीं असें म्हणणें म्हणजे मर्यादित बुद्धीच्या मनुष्याला अमर्याद मनाचें ज्ञान होणें व सर्वदृष्ट्या ईश्वराचे हेतू समजणें अशक्य आहे असें कबूल करणें होय.

**(५) आपल्या हृदयात कोणत्या गोष्टीने प्रवेश करू नये म्हणून आपल्याला इशारा मिळाला आहे?**

***बंधुजनहो, जिवंत देवाला सोडून देण्याइतके अविश्वासाचे दुष्ट मन तुमच्यातील कोणाचेही असू नये म्हणून जपा; (इब्री ३:१२)***

ईश्वराची सर्व गूढ तत्वें त्या सत्यवचनाद्वारें समजत नाहींत म्हणून शास्त्राबद्दल शंका घेणारे व अविश्वासू लोक देवाचें वाचन मानीत नाहीत. शास्त्रावर शंका घेणारे व अविश्वासू लोक देवाचें वचन मानीत नाहीत. शास्त्रावर विश्वास ठेवणारे सर्वच लोक वर सांगितलेल्या दोषारोपापासून मुक्त असतात असें नाही. प्रेषितानें म्हटलें आहे, “भावांनो, जिवंत देवाला सोडून द्याल, असे अविश्वासाचें दुष्ट मन तुम्हांतील कोणाचेंहीं होऊ नये म्हणून जपा.”1 शास्त्राचा अगदीं कसून अभ्यास करणें व त्यात सांगितलीं आहेत तितक्याb“देवाच्या रहस्याचा शोध करणें”2 हीं रास्त आहेत.

परंतु “ज्या गोष्टी गुप्त ठेविलेल्या आहेत, त्या आमचा देव परमेश्वर याच्या आहेत, व ज्या उघड्या केलेल्या त्या आमच्या आहेत.”3 मनाची संशोधकशक्ति नाहीशी करणें हें सैतानाचें काम आहे. शास्त्रांतील सत्यवचनांच्या विचाराशीं युक्त अशा अभिमानामुळे मनुष्यांस आपल्या मानस पटेल अशा रीतीने शास्त्रांतील भाग न समजला, तर उतावळे होतात व त्यांस आपली फजिती झालीसें वाटतें. ईश्वराच्या प्रेरणेनें लिहिलेलीं वचनें आपणांस समजत नाहींत असें कबूल करणें त्यांस कमीपणाचें वाटतें. ईश्वर त्यांस सत्य प्रगत करण्यास ते लायक आहेत असें पाहीपर्यंत वात पाहण्यास ते नाखूष असतात. त्यांस वाटत असतें, कीं आपलें एकट्याचें

शहाणपण शास्त्रवचनें समजण्यास पुरेसें आहे, व ह्या त्यांच्या समजुतीप्रमाणें तीं समजून न आली तर त्यांचे प्रामाण्य ते मानीत नाहींत.

हि गोष्ट मात्र खर आहे किं, लोकांच्या समजुतीनें हल्लीं रूढ असलेले शास्त्रांतील सिद्धांत व त्यांतील मतें ह्यांस शास्त्रांत खर्‍या आधार नाहीं, व तीं खरा प्रेरित वचनांच्या अगदी विरुद्ध आहेत. अशीं वचनें पुष्कळ लोकांच्या संशयाचें व घोटाळयांचें कारण आहे. ह्याचा दोषारोप ईश्वराच्या वाचनावर नसून तो मनुष्यानें केलेय त्यांच्या अर्थविपर्यासाकडे आहे.

**(६) देवाला आपण पूर्णपणे का समजून घेऊ शकणार नाही?**

***“गुप्त गोष्टी आपला देव परमेश्वर ह्याच्या स्वाधीन आहेत, पण प्रकट केलेल्या गोष्टी आपल्या व आपल्या वंशजांच्या निरंतरच्या आहेत; ह्याचा हेतू हा की, ह्या नियमशास्त्राची सर्व वचने आपण पाळावीत. (अनुवाद २९:२९)***

ईश्वर व त्याची कार्यें हीं पूर्णपणें समजणें त्यानें निर्माण केलेल्या प्राण्यांस शक्य असतें., व ते तीं समजले असतें, तर पुढें शोध करण्यास त्यांस कांहीच राहिले नसतें; व मग ज्ञानवृद्धीहि झाली नसती, व मनाची अगर अंतःकरणाची वाढही झाली नसती ; ईश्वर सर्वश्रेष्ठ असाहि झाला नसता; व ज्ञानाच्या अत्युच्च शिखरावर पोहोचल्यामुळें मनुष्याची पुढची वाढ खुंटली असती. परंतु तसें नाहीं म्हणून आपण ईश्वराचे आभार मानु या. ईश्वर अमर्याद आहे; त्याचे ठायीं “ज्ञानाचे व बुद्धीचे सर्व गुप्तनिधी”1 आहेत. मनुष्यानें चिरकाल शोधच करीत असलें पाहिजे, तरीही त्याच्या ज्ञानाचा,

दयाळूपणाचा व सामर्थ्याचा संग्रह कधी संपून जाणार नाही.

**(७) दैवी सुज्ञान कुठे प्राप्त होऊ शकते?**

***आपल्याला जगाचा आत्मा नव्हे, तर देवापासून निघणारा आत्मात्मा मिळाला आहे; ह्यासाठी की, जे देवाने आपल्याला कृपेने दिले ते आपण ओळखून घ्यावे. (१ करिंथकरास पत्र २:१२)***

आपल्या वचनाची सत्यता लोकांस समजून ती त्यांच्या आयुष्यांत यावी अशी परमेश्वराची योजना आहे खरी, तथापि ती समजून येण्याचा एकच मार्ग त्यानें ठेविला आहे. तो हा कीं, ज्या आत्म्याच्या प्रकाशानें तीं सत्यवचनें लिहिलीं गेलीं त्या आत्म्याचा प्रकाशाच्याद्वारेच तीं समजतील "देवाच्या गोष्टीं देवाच्या आत्म्याशिवाय कोणीहि जणात नाही." " कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या रहस्यांचाहि शोधक आहे,"2 तारक प्रभूचें आपल्या शिष्यांस असें वचन होतें कीं, "तरी तो म्हणजे सत्याचा आत्मा येईल तेव्हां तो तुम्हांस मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईल. कारण जें माझें आहे त्यातून घेऊन तें तुम्हांस विदित करील."3

**(८) आपण अभ्यास करत असताना पवित्र आत्म्याला मार्गदर्शन करण्याची जेव्हा आपण परवानगी देतो तेव्हा आपल्याला काय समजते?**

***तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो तुम्हांला मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईल; कारण तो आपल्या स्वतःचे सांगणार नाही; तर जे काही ऐकेल, तेच सांगेल; आणि होणाऱ्या गोष्टी तुम्हांला कळवील. (योहान १६:१३)***

मनुष्यानें आपल्या बुद्धीसामर्थ्याचा उपयोग करावा अशी ईश्वराची इच्छा आहे; व शास्त्राचा अभ्यास त्याचें मन दृढ व उच्च करील. दुसरा कोणताहि अभ्यास तसें करणार नाही. आपण त्या देव मानलेल्या बुद्धीविषयी सावध असावें; कारण ती, मनुष्य या नात्यानें त्याच्या ठिकाणी असणाऱ्या दुर्बलतेस व व्यंगास पात्र अशी आहे. शास्त्रांतील अति साधीं वचनें आपणांस समजूं नयेत आशा रीतीनें त्यांनीं आपल्या मनांत गोंधळ न करण्याची आपली इच्छा असल्यास आपल्याठायीं बालकाप्रमाणें साधेपणा, बळकट श्रद्धा, शिकण्याची उत्सुकता, व पवित्र आत्म्याच्या मदतीची अपेक्षा हीं असलीं पाहिजेत.

ईश्वराच्या सामर्थ्याच्या, ज्ञानाच्या, व त्याचा मोठेपणा न समजण्याच्या आपल्या अपात्रतेच्या जाणीवेमुळें आपण प्रथम नम्रता धारण करावी व त्याच्या समक्षतेंत पुज्यभावानें जाऊन मग त्याचें शास्त्र उघडावें. शास्त्र उघडतांना आपल्या बुद्धीने प्रथम आपल्यापेक्षां कोणीतरी जास्त श्रेष्ठ आहे हें प्रमाणभूत तत्व काबुल करावें व मीं आहें असें म्हणणाऱ्या ईश्वराला नमन करावें.

## (९) आपला सुज्ञानाचा स्त्रोत कोण आहे?

***जर तुमच्यापैकी कोणी ज्ञानाने उणा असेल तर त्याने ते देवाजवळ मागावे म्हणजे ते त्याला मिळेल; कारण तो कोणास दोष न लावता सर्वांना उदारपणे देणग्या देतो. (याकोब १:५)***

बाहेरून दिसण्यांत गहन व न समजणाऱ्या अशा गोष्टी समजून घेण्याच्या इराद्यानें जे लोक प्रयत्न करितात, त्यांस ईश्वर त्या सोप्या व सरळ करून दाखवितो; अशा प्रकारच्या गोष्टी शास्त्रांत बऱ्याच आहेत. परंतु पवित्र आत्म्यानें मार्ग दाखविल्याशिवाय शास्त्रवचनांच्या

अर्थाचा आपल्या हातून विपर्यास होण्याचा बराच संभव असतो.

बरेच लोक त्यांस कांहीं एक फायदा न होतां, शास्त्राचा अभ्यास करितात; परंतु त्यांचे यापासून बरेंच नुकसान होतें. मनांत पूज्यभाव न बाळगतां व प्रार्थना न करितां आपण जेव्हां शास्त्र उघडतों, व आपले विचार व आपलें प्रेम ईश्वराचें ठिकाणीं, अगर त्याच्या इच्छेशीं अनुरूप नसतें, तेव्हां मन संशयग्रस्त होऊन, शास्त्राचा अभ्यास करतांनाच अविश्वास दृढ होतो. विचारावर शत्रू आपला ताबा बसवितो, व भलभलते अर्थ सुचवून देतो. उच्चारानें व आचारानें मनुष्यें जेव्हां ईश्वराशीं एकतानता करण्याचा प्रयत्न करीत नाहींत, तेव्हां, मग तीं कितीका विद्वान असताना,शास्त्रवचन समजण्यांत ढोबळ चुका करितात.

अशा लोकांनी सांगितलेल्या असंबद्धता शोधून काढण्याच्या इराद्यानें जे शास्त्राकडे पाहतात त्यांस आत्मिक परिशीलनबुद्धी नसते. ज्या गोष्टी खरोखर सरळ व सोप्या असतात त्यांजबद्द्ल संशय व अविश्वास धरण्यास त्यांस आपल्या चालबिचल झालेल्या दृष्टीमुळें बरीच करणे सापडतात.

**(१०) जर जाणूनबुजून आपण ज्ञात पापात राहिलो, तेव्हा त्याचा परिणाम देवाशी असलेल्या आपल्या नात्यावर कसा होतो?**

***तर तुमचे अपराध तुम्ही व तुमचा देव ह्यांच्यामध्ये आडभिंतीप्रमाणे झाले आहेत; तुमच्या पातकांमुळे तो तुम्हांला दर्शन देत नाही, तुमचे ऐकत नाही. (यशया ५९:२)***

अशा लोकांस अविश्वासाचें खरें कारण खुशाल लपवूं द्या, खरें कारण म्हटलें म्हणजे अशांतील बहुतेक लोकांस असलेली पापाची

आवड हें होय. अभिमानी व पापप्रिय अंत:करण शास्त्रांत दिलेलें शिक्षण व त्यांत सांगितलेले नियम स्वीकारीत नाहीं, व जे लोक त्यांत सांगितलेल्या जरूर त्या गोष्टी पाळण्यास नाखूष असतात, ते त्याच्या प्रामाण्याबद्दलहि संशय घेण्यास तयार असतात. सत्य मिळविण्याची इच्छा असेल, तर तें मनापासून जाणण्याची इच्छा असली पाहिजे, व त्याप्रमाणें वागण्याची ख़ुशीं असली पाहिजे. ह्या हेतूनें जे लोक शास्त्राचा आभ्यास करितात, त्यांस तें देवाचा शब्द आहे अशाबद्दल भरपूर पुरावा त्यांतच मिळेल, व तारणाचा मार्ग दाखविणारें सत्य समजून येईल.

**(११) देव त्याचा प्रकाश आपल्यासमोर प्रगट करण्यापूर्वी आपल्याकडून कशाची मागणी करतो?**

***जो कोणी त्याच्या इच्छेप्रमाणे करण्याची मनीषा बाळगील त्याला ही शिकवण देवापासून आहे किंवा मी आपल्या मनचे बोलतो हे समजेल. (योहान ७:१७)***

ख्रिस्तानें सांगितलें आहे, “त्याच्या इच्छेप्रमाणें करावयास जर कोणी इच्छील, तर ह्या शिक्षणाविषयीं त्याला समजेल.”1 जें तुम्हांस समजत नाहीं त्याविषयीं शंकाकुशंका काढण्याऐवजीं जो प्रकाश तुम्हांला मिळालेला आहे त्याकडे लक्ष द्या, म्हणजे मग अधिक प्रकाश मिळून सत्य समजेल. ख्रिस्ताच्या कृपेनें तुमच्या समजुतीस पटणारें असें प्रत्येक कर्तव्य करा, व मग ज्या वचनाबद्दल तुम्ही साशंक असाल तीं समजण्यास समर्थ व्हाल.

सुशिक्षित, अशिक्षित वगैरे सर्व लोकांस पटेल असा उघड उघड दिलेला एक पुरावा आहे. तो पुरावा म्हटला म्हणजे प्रत्यक्ष अनुभव हा होय.

शास्त्राची व त्यानें दिलेल्या वचनांची सत्यता सिद्ध करण्यास तो आम्हांस सांगत आहे , त्याची अशी आज्ञा आहे, “अनुभवून पहा, कीं परमेश्वर चांगला आहे.”2 दुसऱ्याच्या शब्दावर विसंबून न राहतां आपण आपल्या करितांच प्रचीती पहावयाची आहे. आणखीहिं त्यानें सांगितले आहे, “मागा म्हणजे तुम्हांस मिळेल.”3 त्यानें दिलेली वचनें पूर्ण केलीं जातील. तीं आजपर्यंत कधींहि खोटीं ठरलीं नाहीत, व पुढेहि कधीं ठरणार नाहींत. ख्रिस्ताकडे आपणा जात असतां व त्याच्या प्रेमांत आनद करीत असतां आपले संशय व आपलें अज्ञान हीं त्याच्या समक्षतेंत पार नाहीशीं होऊन जातील.

**(१२) येशूसोबत आपले नातेसंबंध जसे विकसित होते, तेव्हा आपली साक्ष काय असेल?**

***त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेवले. (कलस्सेकरास पत्र १:१३)***

प्रेषित पौलानें म्हटलें आहे. “त्यानें आम्हांस अंधाराच्या सत्तेंतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेविलें.”1 जो मरणाच्या स्थितीतून जीवांच्या स्थितीत गेला तो “ देव खरा आहे म्हणून शिक्का करण्यास”2 समर्थ आहे. तो साक्ष देतो, कीं “मला मदतीची अपेक्षा होती, व ती मदत मला ख्रिस्तांत मिळाली. प्रत्येक गरज पुरविली गेली, व माझ्या आत्म्याची तहान भागविली व आतां शास्त्र म्हणजे मला प्रभु येशू ख्रिस्ताचें प्रगटीकरणच आहे. मी ख्रिस्तांवर कां विश्वास ठेवितों असें तुम्ही मला विचारतां काय ? तर याचें कारण तो माझा दैवी तारक आहे. मी शास्त्रांवर कां विश्वास ठेवितों ? कारण तें माझ्या आत्म्याला देवाचा शब्द आहे असे आढळून आले

आहे.” शास्त्र खरें आहे व ख्रिस्त देवाचा पुत्र आहे अशाबद्दल आपल्या अंत:करणांतच साक्षी असा. आम्हांस माहित आहे, कीं लबाडीनें रचलेल्या कल्पित गोष्टीस आम्ही अनुसरत नाहीं.

**(१३) जेव्हा आपल्याला जो प्रकाश दिला जातो त्याचे आपण अनुसरण करतो, आपल्या अध्यात्मिक प्रवासावर त्याचा काय परिणाम होतो?**

*तर प्रियजनहो, ह्या गोष्टी तुम्हांला पूर्वीपासून कळत आहेत, म्हणून तुम्ही अनीतिमान लोकांच्या भ्रांतिप्रवाहात सापडून आपल्या स्थिरतेतून ढळू नये ह्यासाठी जपून राहा; आणि आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त ह्याच्या कृपेत व ज्ञानात वाढत जा. त्याला आता व अनंतकालपर्यंत गौरव असो. आमेन.*
*(२ पेत्र ३:१७-१८)*

“कृपेंत व आमचा प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त याच्या ज्ञानात वाढा.”3 असें प्रेषित पेत्रस आपल्या भावांस आग्रहपूर्वक सांगत आहे. देवाचे लोक त्याच्या कृपेत वाढतात तेव्हां त्यांस त्याच्या वचनांचें ज्ञान सदोदित व स्पष्टपणें मिळतें. त्याच्या सत्यवचनांत नवीन प्रकाश व नवीन सौंदर्य हीं दिसून येतील. सर्व काळीं ख्रिस्ती मंडळीच्या इतिहांसात ह्याची सत्यता दिसून आली आहे, पुढेंहि तीअखेर पर्यंत दिसून येईल. “जो प्रकाशणारा उजेड उत्तरोतर दुपारपर्यंत प्रकाशत चालतो त्यासारखी न्यायींची गती असते.”4

**(१४) देवाच्या पुरवठ्याला जाणून घेऊन ग्रहण करण्याच्या आपल्या भविष्यातील क्षमतेचे वर्णन हे वचन कसे करते?**

*कारण हल्ली आपल्याला आरशात अस्पष्ट असे दिसते; परंतु नंतर आपण साक्षात पाहू. आता मला कळते ते अपूर्ण आहे; पण नंतर, मला जसे पूर्णपणे ओळखण्यात आले आहे तसे, मी पूर्णपणे ओळखीन. (१ करिंथकरास पत्र १३:१२)*

श्रद्धेने आपण भविष्यकालाकडे पाहावें, व बुद्धीच्या वाढीसाठीं ईश्वरानें दिलेले वचन लक्षांत ठेवावें. मनुष्याच्या मनाच्या गुणधर्मांचें ईश्वरी मनाच्या गुणधर्मांशीं ऐक्य होऊन आत्म्याच्या प्रत्येक गुणधर्मांचा, प्रकाशाचा उगम जो ईश्वर त्यांशी सहवास घडतो; व मग ईश्वराच्या कार्यांविषयीं जो आपल्या मनांत गोंधळ उडून गेलेला असतो, तो नाहींसा होतो, व जेथें आपल्या मर्यादित बुद्धीचा गोंधळ उडून तीस कोणत्याही गोष्टीचा उलगडा होत नाहीं तेथेच मग आपणांला त्या गोष्टी पूर्णपणें कळून येऊन त्यांचें सौंदर्यहि कळतें. “आम्हांला आतां भिंगातून अंधक दिसतें, परंतु तेव्हां तोंडोतोंड पाहूं; आतां मी किंचित् जाणतों, परंतु जशी माझी ओळख होईल, तसें मी ओळखीन.”1

*मला जाणीव आहे कि ह्या पृथ्वीच्या इतिहासातील अंतिम दिवसात अनेक लोक देवाबद्दल साशंक होतील. त्याने जे पुरावे दिले त्यावर मी माझा विश्वास आधारित करण्याची निवड करून त्याच्यावर विश्वास ठेवतो.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*मला हे जाणून घेण्यात खूप सांत्वन मिळते कि देवाचे सुज्ञान कोणत्याही मनुष्याला समजून घेता येत नाही. मी माझे जीवन त्याच्या हातात देऊ शकतो हे जाणून घेऊन कि त्याच्या हातात सर्व गोष्टींचे नियंत्रण आहे.*

गोल करा: होय अनिश्चित

*मला जाणीव आहे कि जरी देवाबद्दल पवित्र शास्त्र जे काही सांगते ते मला समजत नाही, त्याच्या महानतेचा हा तर अजून एक पुरावा आहे. हे स्पष्ट आहे कि पवित्र शास्त्र हे त्याने प्रेरित आहे.*

गोल करा: होय अनिश्चित

*मोहात टाकणारा माझ्या मनात देव आणि त्याच्या वचनाबद्दल जो सर्व अविश्वास घालतो तो दूर करण्याची निवड मी करतो. देव त्याचा प्रकाश मला प्रगट करण्यात कसे योग्य मानतो त्याचे अनुसरण करण्याची मी निवड करतो.*

गोल करा: होय अनिश्चित



## धडा १५
## प्रभूंत आनंद करणे

**(१) ख्रिस्ती ह्या नात्याने, ख्रिस्ताचे प्रेम, चांगुलपण आणि दया आपण कोणासमोर प्रस्तुत केले पाहिजे?**

*त्या दिवशी तुम्ही म्हणाल : "परमेश्वराचा धन्यवाद करा, त्याच्या नामाचा जयघोष करा, राष्ट्रांमध्ये त्याची कृत्ये विदित करा; त्याचे नाम थोर आहे अशी वाखाणणी करा. परमेश्वरापुढे गायन करा कारण त्याची करणी प्रतापमय आहे; हे सर्व पृथ्वीवर विदित होवो. (यशया १२:४-५)*

प्रभू ख्रिस्ताच्या चांगुलपणा व दयाळूपणा जगाला दाखवून त्याचे प्रतिनिधी होण्यासाठीं ईश्वराच्या लेकरांस पाचारण केले आहे. बापाचे खरें शील ज्याप्रमाणें प्रभू येशूनें आपणांस प्रगत केलें त्याचप्रमाणे आपणहि त्याचा ममताळूपणा व दयापूर्ण प्रीती ज्या ठिकाणीं माहित नाहींत त्या ठिकाणीं लोकांस प्रगट करावयाचीं आहेत.

प्रभू येशूनें म्हटलें होतें, “ जसें तूं मला जगांत पाठविलें, तसें मींहि त्यांस जगांत पाठविलें,” “ मी त्यामध्यें व तूं मजमध्ये; यासाठीं कीं, ते एक होऊन पूर्ण व्हावे ; आणि त्यावरून जगानें जाणावें, कीं तूं मला पाठविलें,”1 प्रभु येशूच्या शिष्यांस पौल सांगत आहे, “तुम्ही ख्रिस्ताचे सर्वांनी जाणलेलें व वाचलेलें पत्र असे आहां.”

**(२) जेव्हा आपण ख्रिस्ताचा स्वीकार करून त्याचे अनुसरण करतो, आपण कोणती भूमिका बजावणे गरजेचे आहे?**

***तुम्हीच आमचे पत्र, आमच्या अंत:करणांवर लिहिलेले, सर्व माणसांना कळलेले आणि त्यांनी वाचलेले असे आहात;शाईने नव्हे, तर सदाजीवी देवाच्या आत्म्याने कोरलेले, दगडी पाट्यांवर नव्हे तर ‘मांसमय अंत:करणरूपी पाट्यांवर’ ‘कोरलेले’, आमच्या सेवेच्या योगे तयार झालेले ख्रिस्ताचे पत्र, असे तुम्ही प्रसिद्ध आहात.***
***(२ करिंथकरास पत्र ३:२-३)***

2 त्याच्या लेकरांपैकी प्रत्येकांत प्रभू येशू आपलें पत्र जगाला पाठवितो. तुम्ही ख्रिस्ताचे अनुयायी आहांत, तर तो तुमच्या कुटुंबांस, गावांस, रस्त्यातील लोकांस, ज्या ज्या ठिकाणीं तुम्ही असाल, त्या त्या ठिकाणच्या लोकांस तो पत्र पाठवितो. तो तुमच्याठायीं वास्तव्य करून ज्यांस त्याची माहिती नाही त्यांच्या अंतरात्मायाशीं बोलतो. ते कदाचित शास्त्र वाचीत नसतील,अगर त्या शास्त्राच्या पानांत असलेला त्याचा शब्द ते ऐकत नसतील, कदाचित त्यांस त्यांच्या कार्यामधून ईश्वराचे प्रेम दिसून येत नसेल, तथापि तुम्ही जर ख्रिस्ताचे प्रतिनिधी असाल तर तुमच्या मार्फत

त्यांस ख्रिस्ताच्या दयाळूपणाविषयी कांहींशी माहिती होईल व त्यावरून ते त्याजवर प्रेम करून त्याची सेवा करावयास लागतील.

**(३) आपल्या जीवनातून कोणते दोन गुणवैशिष्ट्ये प्रगट व्हावे, ते देखील ख्रिस्ताच्या सेवेत, जगापुढे प्रकाश म्हणून व्यक्त व्हावे?**

*चित्तसमाधानासह भक्ती हा तर मोठाच लाभ आहे. (१ तिमथी ६:६)*

ख्रिस्ती लोकांस स्वर्गाच्या मार्गांतील मशालजी असें म्हटलें आहे. त्यांजवर पडणारा ख्रिस्ताचा प्रकाश त्यांनी सर्व जगास द्यावयाचा आहे. त्यांना आयुष्यक्रम व त्यांचें शील अशीं असलीं पाहिजेत, कीं तीं इतरांस ख्रिस्ताचीं बरोबर कल्पना व त्याची सेवा हीं दाखवून देतील.

आपण ख्रिस्ताचे प्रतिनिधी आहोंत, तर त्याची सेवा आपण ती खरोखरच आहे त्याप्रमाणें मनोवेधक करून दाखवूं. जे ख्रिस्ती लोक आपल्या आत्म्यास उदासीनतेनें, दु:खानें, कुरकुरीनें,तक्रारीने व्याप्त करून टाकितात, ते देवाचें व ख्रिस्ती जिण्याचें खोटें प्रदर्शन इतरांपुढें मांडीतात. मनुष्याने सुखी असावे ह्यांत देवास संतोष नाहीं,असा लोकांचे मनावर ते परिणाम करितात, व अशा रीतीनें आपल्या स्वर्गीय पित्याविरुद्ध साक्ष देतात.

**(४) ते मुलभूत तत्व काय आहे, जे आपल्या मनात ठामपणे बसल्यावर, सैतान ज्या गैरसमजुती, अविश्वास आणि चुकीच्या गोष्टी देवाबद्दल प्रस्तुत करतो त्यांना मान्य करण्यापासून रोकता येईल?**

*ज्यांचा भाव परमेश्वरावर आहे ते निश्चल व सर्वकाळ टिकणाऱ्या सीयोन डोंगरासारखे आहेत. (स्तोत्रसंहिता १२५:१)*

ईश्वराच्या लेकरांस अविश्वासाच्या व निराशेच्या मार्गांत नेण्यांत सैतानास आनंद होतो. ईश्वराविषयीं आपल्याठायीं अविश्वास व त्याच्या आपणांस वांचविण्याच्या खुशीविषयीं व सामर्थ्याविषयी संशय उत्पन्न झालेला पाहण्यांत तो आनंद मानितो. ईश्वराच्या कृती आपणांस हानिकारक होतील असें भासविणें सैतानास आवडतें. कृपादृष्टी व द्या हीं प्रभूचेठायीं नाहींत असें दाखविणें हेंहि सैतानाचेंच काम आहे. ईश्वराविषयीच्या खऱ्या गोष्टी तो अगदी उलट भासवितो. त्याच्याविषयीं खोट्या कल्पना तोच मनात भरवून देतो. त्या स्वर्गीय पित्याविषयीच्या खऱ्या गोष्टींवर लक्ष देण्याऐवजीं आपण बहुतेक प्रसंगी सैतानानें भासाविलेल्या खोट्या गोष्टींकडे लक्ष देतों व अशा रीतीनें त्याजविषयी अविश्वासू होत्साते त्याजविरुद्ध आपण कुरकुर करुं लागतों. सैतान हा नेहमीं धार्मिक जिणें उदासवाणे करावयास लावतो. तें कष्टमय व दुस्तर आहे. असें आपणांस भासाविण्याची त्याची इच्छा असते. व जेव्हां ख्रिस्ती मनुष्य आपले धर्मसंबंधी विचार आपल्या आयुष्यक्रमांत दाखवितो, तेव्हां तो आपल्या अविश्वासानें सैतानाच्या खोडसाळ कृतीस पुष्टि देतो.

**(५) पौलासारखे, आपला प्रतिसाद काय असावा जो आपण जीवनाच्या कठीण मार्गावर चालत असताना त्रासांचा अनुभव म्हणून सहन करतो?**

*परंतु त्याने मला म्हटले आहे, “माझी कृपा तुला पुरेशी आहे; कारण अशक्तपणातच माझी शक्ती पूर्णतेस येते.” म्हणून ख्रिस्ताच्या सामर्थ्याची छाया माझ्यावर राहावी म्हणून मी विशेषेकरून आपल्या अशक्तपणाची प्रौढी फार आनंदाने मिरवीन. ख्रिस्तासाठी दुर्बलता, अपमान, अडचणी, पाठलाग, संकटे ह्यांत मला संतोष आहे; कारण जेव्हा मी अशक्त तेव्हाच मी सशक्त आहे. (२ करिंथकरास पत्र १२:९-१०)*

बरेच लोक आपला आयुष्यक्रम कंठीत असतां त्यांनीं केलेल्या चुका, त्यांत आलेली अपयशें,व त्यांच्या झालेल्या निराशा हीच घेऊन घोकीत बसतात, व त्यामुळें त्यांचे अंत:करण दु:खाने व निरुत्साहानें व्याप्त होऊन गेलेली असतें. मी एकदा युरोपांत असतांना वर सांगितल्याप्रमाणें अंत:कारण फार कष्टी होऊन गेलेल्या एका बाईनें आपल्या मनाचे सांत्वन करण्याविषयीं कांही तरी करा असें मला लिहिलें. ज्या दिवशी हें पत्र मला पोहोंचाले त्याच रात्रीं मी एका बागेत गेलें असून त्या बागेचा मालक मला बागेंतील हिंडण्याचा मार्ग दाखवीत मजपुढें चालला आहे, व ती पत्र लिहिणारी बाई मजजवळ आहे असे स्वप्न पडलें. बागेतील फुलें जमा करून त्यांचा सुवास घेत घेत इकडे तिकडे हिंडत असतां त्या बाईने तिच्या वाटेत आलेल्या कात्यंकडे लक्ष देण्यास मला सांगितले. ते कांटे पाहून त्या बैल फारच वाईट वाटले. मालकाच्या मागोमाग ती बाई चालली होती, परंतु काटे पडलेल्या मार्गाने जात होती. जात असतां दु:खाने ती म्हणाली असल्या ह्या सुंदर बागेंत काटेरी झुडपे, काटे वगैरे पडून तिची खराबी व्हावी ही मोठ्या दु:खाची गोष्ट न्हावे काय ? त्यावर तो बागेचा धनी म्हणाला, “काटे बाजूला

ठेवून द्या.गुलाब, जाई, मोगरा वगैरे खुडून घ्या म्हणजे झालें.”

तुमच्या अनुभवांत काही चांगल्या गोष्टी नाहींत काय ? ईश्वरी आत्म्याला दिलेल्या प्रत्युत्तारादाखलच्या काही आनंदकारक गोष्टींनी तुमचे अंत:करण केव्हां तरी भरलें होतें असें काही मौल्यवान प्रसंग तुमच्याजवळ नाहींत काय ? आपल्या आयुष्यक्रमांतील मागील काळाकडे पाहाल तेव्हां काही दिवस सुखाचे गेलेले तुम्हांस आढळत नाही काय? सुवासिक पुष्पाप्रमाणें ईश्वराचीं वचने तुमच्या दोहों बाजूंस नाहींत काय? त्यांच्या सौंदर्यानें व माधुर्यानें तुम्हीं आपलें अंत:करण भरून टाकणार नाही काय?

**(६) जेव्हा एक अपात्र पापी त्या उद्धाराचे चित्र ग्रहण करतो, तेव्हा त्याची साक्ष काय असते?**

***त्या दिवशी तुम्ही म्हणाल : “परमेश्वराचा धन्यवाद करा, त्याच्या नामाचा जयघोष करा, राष्ट्रांमध्ये त्याची कृत्ये विदित करा; त्याचे नाम थोर आहे अशी वाखाणणी करा. (यशया १२:४)***

काटे व काटेरी झाडें तुम्हांला जखमां करून दु:ख मात्र देतील. तुम्ही तीच जमा कराल व दुसऱ्यांस द्याल, तर ईश्वराच्या चांगुलपणा स्वतां न अनुभवता दुसऱ्यांस त्यांच्या आयुष्यक्रमात तो अनुभवण्यास अडथळा करीत नाही काय?

गत काळातील दुख:कारक गोष्टी, म्हणजे अडचणी व निराशा त्या अगदीं तुम्हांस निरुत्साही करून तुम्ही शोक करीपर्यंत, आठवीत बसणे हें शहाणपणाचें काम नाहीं, निरुत्साही आत्मा अंधकाराने व्याप्त झालेला असतो. तो स्वःतां ईश्वराचा प्रकाश न

मिळवितां दुसऱ्यांच्या मार्गावरहि त्या अंधाराची छाया पसरून देतो. ईश्वरानें ह्या सृष्टीत दिलेल्या सुंदर देखाव्यांबद्दल त्याचे आभार माना. त्याच्या प्रेमाबद्दलच्या वचनांकडे सतत पाहावें म्हणून आपण तीं एकत्र करूं या. ईश्वराचा पुत्र आपल्या बापाचे आगमन सोडून, मनुष्य रूपानें देवरूपावर पांघरून घालून मनुष्यांस सैतानाच्या तावडींतून मुक्त करण्यास आला. आपल्या वतीनें त्यानें सैतानावर मिळविलेला जय मनुष्यांस स्वर्गाचे दर खुले करून देऊन ज्या ठिकाणीं देवानें आपलें वैभव प्रगत केलें आहे असें स्थळ प्रगत करितो. पापामुळें पतित लोक नाशाच्या दरींत पडले होते,त्यांस वर काढून त्यानें ईश्वराशीं पुन्हा ऐक्य घडवून आणिलें, ताराकाच्या ठिकाणीं असलेल्या श्रद्धेमुळे दैवी कसोटीस टिकून ख्रिस्ताचें नितीमात्वा त्यांनी पांघरले व त्यामुळें त्याच्या आसनाइतके उंच झाले, ह्या चित्रांचे, देखाव्यांचे आपण मनन करावें अशी ईश्वराची इच्छा आहे.

**(७) कोणतीही शंका न पाहता त्याच्या पलीकडे देवाने त्याचे आपल्याप्रती असलेले प्रेम कसे सिद्ध केले?**

***ज्याने आपल्या स्वतःच्या पुत्रास राखून न ठेवता त्याला आपल्या सर्वांकरता समर्पण केले, तो त्याच्याबरोबर आपल्याला सर्वकाही कसे देणार नाही? (रोमकरास पत्र ८:३२)***

ईश्वराच्या प्रेमाविषयीं आपण संशय घेतों, व त्याच्या वचनांविषयी अविश्वास धरतों, तेव्हां आपण त्याचा अपमान करितों,व त्याच्या पवित्र आत्म्यास दु:ख देतों. एखादी आई आपल्या लेकरांचे कल्याण व्हावे म्हणू प्रयत्न करीत असली, व तिची मुले, जणू काय तिच्या मनांत

आपलें बरें करावयाचें नाही, अशी समजूत करून घेऊन तिजविरुद्ध कुरकुर करूं लागलीं, तर त्या आईस की वाटेल बरे ? कल्पना करा, कीं तीं तिच्या प्रेमाबद्दल संशय घेऊ लागली; तर तिचे अंतःकरण त्यामुळे दुभाग होऊन जाईल. मुलांनी अशा रीतीने वागविलेल्या आईबापांस काय बरें वाटेल ? प्रेषितानें म्हटले आहे, "ज्यानें आपला पुत्र राखून ठेविला नाही, तर आम्हां सर्वांसाठीं दिला तो त्यासहित आम्हांला सर्व काहीं कसा देणार नाहीं ?" १ असें असतां कितीसे लोक, आपल्या शब्दानें जरी नव्हे, तरी आपल्या कृतीनें "ईश्वर हें माझ्यासाठीं करीत नाहीं त्याचें कदाचित दुसऱ्यावर प्रेम असेल: मजवर नाही," असें म्हणत आहेत.

**(८) आपण शंका उत्पन्न केलेल्या विचारांवर का वस्ती करू नये अथवा कोणत्याही अध्यात्मिक बाबींच्या बद्दल अविश्वास इतरांना देखील का देऊ नये?**

*कारण आपल्यातील कोणी स्वतःकरता जगत नाही आणि कोणी स्वतःकरता मरत नाही. (रोमकरास पत्र १४:७)*

*ह्याकरता आपण ह्यापुढे एकमेकांना दोष लावू नये; तर असे ठरवून टाकावे की, कोणी आपल्या भावापुढे ठेच लागण्यासारखे काही किंवा अडखळण ठेवू नये. (रोमकरास पत्र १४:१३)*

*तरी ही तुमची मोकळीक दुर्बळांना ठेच लागण्याचे कारण होऊ नये म्हणून जपा. (१ करिंथकरास पत्र ८:९)*

*बंधूंविरुद्ध असे पाप करून व त्यांच्या दुर्बळ सदसद्विवेकबुद्धीला धक्का देऊन तुम्ही ख्रिस्ताविरुद्ध पाप करता. (१ करिंथकरास पत्र ८:१२)*

ह्या सर्व गोष्टी तुमच्या आत्माची हानी करितात. कारण तुम्हीं उच्चारलेल्या संशयाचा प्रत्येक शब्द सैतानाच्या मोहास बोलावीत असतो, संशय घेण्याकडे तुमची प्रवृत्ती अधिकाधिक दृढ करितो व सेवा करणाऱ्या देवदूतांस दुःख देतो. सैतान तुम्हांस मोह पाडतो त्यावेळी संशयाचा अगर अज्ञानाचा एक शब्दहि उच्चारूं नका. त्याच्या सूचनांस तुम्ही अंतःकरणांत थर द्याल तर तो तुचे मन अविश्वासाने व ईश्वराविरुद्ध असलेल्या प्रश्नांनी भरून टाकील. तुम्ही आपल्या भावना बाहेर बोलून दाखवाल, तर तुम्ही उच्चारलेले प्रत्येक संशय तुमच्या मनावरच विरुद्ध कार्य करून राहतील असे नाही, तर दुसऱ्यांच्या अंतःकरणात विषवृक्षांचे बीज पेरून पुढे त्या वृक्षांस फुलें व फळें येतील. तुमच्या त्या संशयाच्या शब्दांनी उत्पन्न केलेल्या त्यांच्या मनांवरील परिणामास नाहीसें करणें मग दुरापास्त होईल. सैतानाच्या मोहांतून व पाशांतून मुक्त होण्यास तुम्ही समरत व्हाल, परंतु तुमच्यामुळें दुसऱ्यांच्या मनावर जो परिणाम झालेला असतो त्यापासून दुसऱ्यांस मुक्त होता येत नाही. म्हणून तुम्ही, जेणेंकरून आत्मीक सामर्थ्य व आत्मीक जिणें प्राप्त होईल अशाच गोष्टी बोलणें किती महत्वाचें आहे ?

**(९) आपल्या संभाषणात काय असावे जे देवाच्या तारणाला प्रगट करतील?**

***जो आभाररूपी यज्ञ करतो तो माझा गौरव करतो; आणि जो सरळ मार्गाने चालतो त्याला मी देवाने सिद्ध केलेले तारण प्राप्त करून देईन." (स्तोत्रसहिता ५०:२३)***

तुम्ही आपल्या स्वर्गीय पित्याविषयीं जगाला काय निरोप देतां हे देवदूत लक्षपूर्वक पाहत

आहेत. त्या स्वर्गीय पित्याविषयी जगाला काय निरोप देतां हे देवदूत लक्षपूर्वक पाहात आहेत.

**(१०) पवित्र शास्त्र शंका आणि निराशा ह्यासंबंधी आपल्याला काय सल्ला देते?**

*जे काही तुम्ही कराल ते कुरकुर व वादविवाद न करता करा, (फिलिपेकरास पत्र २:१४)*

त्या स्वर्गीय बापापुढें तुमच्यासाठीं मध्यस्थी करण्याकरितां ज्यानें जन्म घेतला, त्या ख्रिस्ताविषयींच तुमचें संभाषण असूं द्या. मित्राचा हात धरीत असतां तुमच्या मुखांतून व अंतःकरणांतून ईश्वराची स्तुती निघूं द्या: अशाने त्या मित्राचे विचार प्रभू ख्रिस्ताकडे वळतील. प्रतिकार करण्यास कठीण अशा मोहांच्या व दुःसह दुःखें व अडचणी आपल्या बंधूंस कळवूं नका. तर प्रार्थनेने ईश्वरास कळवा. संशयाचा अगर निरुत्साहाचा एकहि शब्द उच्चारावयाचा नाहीं असा नियम करून टाका. आशेच्या व पवित्रबळकटी आणाल. मोहानें पगडा बसविलेले व "स्व" विरुद्ध व पापाविरुद्ध होणाऱ्या झटापटींत बहुतेक बेहोष होऊन गेलेले बरेच धैर्याचे आत्मे असतात. अशा एकाही आत्म्यास, मोहाशीं त्याचा झगडा चालला असतां घाबरवूं नका. धैर्याच्या व आशेच्या शब्दांनी उलट त्यास आनंद द्या. ह्याप्रमाणे ख्रिस्ताचा प्रकाश तुमच्यामधून प्रकाशवा. "आम्हांतील कोणी आपणाकरितां जगात नाही."1 आम्हांस समजून न येणाऱ्या वजनानें दुसऱ्यांस धैर्य देऊन ते बळकट होतील अगर त्यांचे धैर्य खचून ते ख्रिस्तापासून व सत्यापासून दुरावतील.

**(११) कोणाच्या सान्निध्यात पूर्णानंद आहे आणि सुख आहे?**

*मी आपल्यापुढे परमेश्वराला नित्य ठेवले आहे; तो माझ्या उजवीकडे आहे, म्हणून मी ढळणार नाही. (स्तोत्रसंहिता १६:८)*

*जीवनाचा मार्ग तू मला दाखवशील; तुझ्या सान्निध्यात पूर्णानंद आहे; तुझ्या उजव्या हातात सौख्ये सदोदित आहेत. (स्तोत्रसंहिता १६:११)*

ख्रिस्ताच्या जिण्याची व शिलाची चुकीची कल्पना बाळगणारे बरेच लोक आहेत. त्यांस वाटतें, कीं तो निष्ठुर, कडक व आनंदरहित असा आहे. अशा तऱ्हेच्या वाईट विचारांनी धर्माचा सर्व अनुभव ज्यांचा बिघडलेला आहे असे बरेच लोक आहेत.

वारंवार असें सांगण्यात येतें कीं, प्रभू येशु नेहमी रडत असे व हसणें कसें तें त्यास माहीतच नव्हते. तो तारक प्रभू दु:खसाही होता खरा व दु:ख त्यास झालेहिं. याचें कारण त्यानें आपल्या अंत:करणात लोकांची दु:खे सांठविली. त्याचें जिनें स्वनाकाराचें, दु:खाची व काळजीची छाया पडलेलें होतें खरें, तथापि त्याचा आत्मा त्यामुळें चेंगरून गेला नाही. दु:खाची छटाहि त्याच्या चेहऱ्यावर उमटलेली नव्हती, तर उलट शांतपणा व गांभीर्य दिसून येत होतीं. त्याचें अंतःकरण म्हणजे जीवनाच्या विहारीचा झराच होतें. व ज्या ज्या ठिकाणी तो जाई त्या त्या ठिकाणी शांतता, आनंद व सुख हीं तो आपल्याबरोबर नेई.

आपला तारक अतिशय गंभीर व उत्सुक होता, तथापि उदास नव्हता, जे त्याचे अनुकरण करितात, त्यांचे जिणें उत्साहाचें असेल, त्यांस आपली जबाबदारी काय आहे, हे समजेल. स्वभावाचा चंचलपणा नाहीसा होईल. परिणामीं अहितकारक होईल अशी करमणूक, थट्टामस्करी त्या ठिकाणी नसेल; तर एखाद्या

नदीप्रमाणें प्रभू येशूचा धर्म शांतता देईल. असें जिणें आनंदाचा दिवा मालवणार नाहीं. त्यास प्रतिबंध करणार नाहीं, हास्ययुक्त चेहऱ्यावर कसल्याही प्रकारच्या दु:खाची छटा आणणार नाहीं. ख्रिस्त सेवा करून घेण्यास नव्हे, तर सेवा करावयास आला. अंत:करणात त्याचे प्रेम दाटेल, तेव्हां आपण त्याचा कित्ता गिरवूं.

*माझ्या पित्यां, देवा तू आपले प्रेम मला जे प्रगट केले कोणत्याही शंकेचा लवलेश नसताना आणि ते देखील माझ्या उद्धारासाठी केले. मी येशुमध्ये वस्ती करण्याची निवड करतो जेणेकरून मला तो जो आनंद आणि सुख देऊ करतो त्याचा अनुभव मिळेल.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*"ख्रिस्ती" हे नाव बाळगण्याचा सन्मान मी कबूल करतो आणि त्याच्यामध्ये वस्ती करण्यात जो आनंद, शांती आणि सुख आहे ते प्रगट करण्याची निवड करतो.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*प्रभूवर विश्वास ठेवण्याची मी निवड करतो कारण मला जाणीव होते कि तोच माझे सैतानाच्या लबाडी आणि अविश्वास ह्यापासून सुरक्षेचा स्रोत आहे.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*मी ज्यांच्या भोवती आहे त्यांना उत्तेजित करून उंचावण्याचा माझा हेतू आहे जेणेकरून ते निराशेत आणि अविश्वासात पडणार नाहीत.*

**गोल करा: होय अनिश्चित**



## धडा १६
## आता आणि सार्वकालिकतेचा आनंद

### (१) इतर लोक जेव्हा आपल्याला दुखावतात तेव्हा आपण काय करावे?

*आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हांला क्षमा केली आहे तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा. (इफिसकरास पत्र ४:३२)*

*विवेकाने मनुष्य मंदक्रोध होतो; अपराधाची गय करणे त्याला भूषण आहे. (नीतीसुत्रे १९:११)*

दुसऱ्यांच्या निर्दयपणाच्या व अन्यायाच्या गोष्टी सतत आपण मनात वागवूं, तर ख्रिस्तानें ज्याप्रमाणें आपणावर प्रेम केलें त्याप्रमाणें आपणांस त्यांच्यावर करता येणार नाहीं. परंतु जर आपले विचार ख्रिस्ताच्या आश्चर्यकारक प्रेमाविषयी व दयेविषयी असतील,तर आपल्याही आत्म्यातून तीं दुसऱ्यांकडे वाहतील. जीं आपणांस दिसून आल्याशिवाय राहात

नाहीत अशी इतरांची व्यंगे व इतरंचे अपराध मनांत न आणितां आपण त्यांवर प्रेम करावें व त्यांस मान द्यावा. नम्रता व “स्व” वर अवलंबून बसण्याविषयींचा अविश्वास वाढवून, दुसऱ्यांच्या अपराधांकडे शांतपणे व ममताळूपणानें पाहावें. असें केल्यानें स्वार्थबुद्धी पार नाहीशी होऊन आपले अंतःकरण विस्तृत व दयाळू असे होईल.

**(२) नैराश्येचा लागवी पसार टाळण्यासाठी आपण काय केले पाहिजे?**

***तू आपल्या अगदी मनापासून परमेश्वरावर भाव ठेव, आपल्याच बुद्धीवर अवलंबून राहू नकोस; (नीतीसुत्रे ३:५)***

गीतकर्त्यानें म्हटलें आहे, “परमेश्वरावर भार ठेव, व बरे कर, भूमीत वस्ती कर व सत्य पाळ.”1“ ईश्वरावर भार ठेव.” प्रत्येक दिवशी कांहीना कांहीतरी काळज्या, ओझी व अडचणी व परीक्षा ह्याविषयीं सांगण्यास आपण कितीतरी उत्सुक असतों. इतक्या उसन्या आणलेल्या अडचणी आपल्या मार्गात येतात, आपण इतकी भीति बाळगतो, इतकी विलक्षण काळजी दाखवितों कीं एखाद्यास सहज वाटेल कीं अशा मनुष्यावर द्या करणारा, प्रेम करणारा व त्याच्या विनंत्या ऐकणारा कोणी नाही.

**(३) कोणत्या अभिवचनाने आपल्याला हे समजते कि देव कोणत्याही परिस्थितीत आपल्याला सोडणार नाही?**

***तुमची वागणूक द्रव्यलोभावाचून असावी; जवळ आहे तेवढ्यात तुम्ही तृप्त असावे;***

*कारण त्याने स्वतः म्हटले आहे, "मी तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणार नाही." (इब्री १३: ५)*

कित्येक असे आहेत, कीं ते नेहमीच भीती व अडचणी आपणांवर ओढून घेतात. ईश्वराच्या प्रेमाची चिन्हें त्यांजभोवती असतांहि व त्याच्या औदार्यमुळे प्राप्त झालेल्या देणग्यांचा नेहमी उपभोग घेत असतांहि ते त्या सुखांकडे दुर्लक्ष करितात. भविष्यकाळीं येणाऱ्या असंतोषकारक गोष्टींवर त्यांचे मन सदोदित लागलेले असते, अगर एखाद्या खरोखरच येणाऱ्या क्षुल्लक अडचणीनें देखील त्यांचे डोळे-वास्तविक ज्या गोष्टींबद्दल कृतज्ञताबुद्धी दाखवयास पाहिजे अशा गोष्टींबद्दल-अंध बनतात. ज्या अडचणींस ते तोंड देतात त्या, त्यांस देवाकडे वळविण्याच्या ऐवजी-जो त्यांच्या मदतीचा एकच मार्ग असतो-त्याजपासून दूर करितात;कारण त्यांमुळे त्यांच्या अंतःकरणांत असंतोष व गोंधळ झालेला असतो.

ह्याप्रमाणें अविश्वास धरून आपलें कल्याण होतें काय ? आपण कृतघ्न व अविश्वासू काय म्हणून असावें ? प्रभू येशू आपला मित्र आहे. सर्व स्वर्ग आपल्या कल्याणासाठीं झटत आहे. रोजच्या जिन्यांतील अडचणी व मनाची टोचणीं ह्यांस मन बिघडून जाईल म्हणून अंतःकरणात थर देतां कामा नये; व जर आपण देऊं तर हरहमेशा आपणांला काहींना काहींतरी मन खट्टू करणारें आढळेल. मनाला चिडविणारा व परीक्षेंत टिकण्यास मदत न करणारा, व त्रास देणारा असा एकांतवास आपण पत्करुंच नये.

**(४) प्रभू आपल्यासाठी काय करेल जेव्हा आपण त्याला कबूल करून मान्य करून त्यावर भरवसा ठेवतो?**

*तू आपल्या सर्व मार्गांत त्याचा आदर कर, म्हणजे तो तुझा मार्गदर्शक होईल. (नीतीसुत्रे ३:६)*

कामधंद्यांत गोंधळून गेलेले तुम्ही असा, अगर तुमच्या आशा अंधुक होत जाऊन तुम्हंस अपयश येण्याची धास्ती पडो, परंतु धैर्य सोडूं नका. ईश्वरावर तुमच्या काळजीचा भार टाकून स्वस्थ व आनंदी राहा. तुमची कामें विचारपूर्वक चालविण्याविषयी शहाणपण मिळण्यास देवाची प्रार्थना करा. व अशा रीतीनें तोटा व पुढें येणारें संकट निवारा. परिणाम हितकारक व्हावा म्हणून तुमच्यानें करवेल तेवढा प्रयत्न करा. प्रभू येशूनें मदत करण्याबद्दल वाचन दिले आहे, परंतु तें आपण प्रयत्न केल्याशिवाय बरीक नव्हे. आपल्या मदत्गारावर विश्वास ठेऊन तेव्हां तुमच्या हातून होण्यासारखें असेल तें केल्यावर मग होईल तो परिणाम आनंदाने पत्कारा.

**(५) आपण जसे संघर्ष व परीक्षांना सामोरे जातो, प्रभू आपल्याला काय उत्तेजन देतो?**

*माझ्या ठायी तुम्हांला शांती मिळावी म्हणून मी तुम्हांला ह्या गोष्टी सांगितल्या आहेत. जगात तुम्हांला क्लेश होतील, तरी धीर धरा; मी जगाला जिंकले आहे." (योहान १६:३३)*

ईश्वराच्या लेकरांनी काळजीच्या भारानें वाकून जावें अशी त्याची इच्छा नाहीं. आपला प्रभू आपणांस फसवीत नाहीं. भिऊ नका; तुमच्या मार्गांत कोणत्याही अडचणी नाहींत असें तो म्हणत नाहीं. आपणांस परीक्षा, संकटें आहेत असें त्यास माहित आहे व तो अगदी सरळपणानें आपणांशी वागत आहे. पापी व दुष्ट अशा जगाबाहेर आपल्या लोकांस काढून नेण्याचें त्याच्या मनांत नाही, तर तो त्यांस

कधीहि न चुकणारा असा आश्रय दाखवून देत आहे. आपली शिष्यांबद्दलची त्याची अशी प्रार्थना होती,कीं “तूं त्यांस जगांतून काढून घ्यावे अशी मी विनंती करीत नाही. तर तू त्यांस वाईटापासून राखावें अशी विनंती करितों. जगामध्यें तुम्हांस क्लेश होतील, तरी धीर धरा, मीं जगाला जिंकलें आहे.”1

**(६) आपल्या दैनंदिन गरजांच्या संबंधी कोणते अभिवचन आपण सिद्ध करू शकतो?**

***तर तुम्ही पहिल्याने देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील. (मत्तय ६:३३)***

डोंगरावरील आपल्या उपदेशात ख्रिस्ताने आपल्या शिष्यास ईश्वरावर विश्वास ठेवण्याच्या अगत्यासंबंधाने मौल्यवान धडे शिकविले होते. हे धडे ईश्वराच्या लेकरास सर्व काळी उत्तेजन येण्यासाठी योजलेले होते, व आज ते आमच्या हातात शिक्षणाने भरलेले व सुख देणारे असे पडले आहेत. काळजीच्या विचारांनी भारावून न गेलेले पक्षी आपली स्तुतीपार गाणी गात असतात, त्यांजकडे पाहण्यास त्या तारकाने आपल्या शिष्यास सांगितले; कारण “ते पेरीत नाहीत व पीकही काढीत नाहीत.” तथापि तो सर्वसमर्थ पिता त्यांच्या गरज भागवितो. तारकानें विचारले होतें, “तुम्ही त्यांच्यापेक्षां श्रेष्ट आहां कीं नाही?2

निर्माण केलेल्या मनुष्यांस व पशुपक्ष्यांस पुरवठा करणारा ईश्वर आपला हात उघडून त्यांस सर्व गोष्टी पुरवितो. आकाशांतील पक्षी त्याच्या देखरेखीखालींच आहेत. तो त्यांच्या चोचींत अन्न टाकीत नाहीं, परंतु त्यांच्या गरज

भागविण्याची तजवीज करितो. त्याने इकडे तिकडे पसरलेले दाने त्यांस गोल करून आणिले पाहिजेत. आपली लहानग्या घरट्यांसाठी काडीकुडी त्यांस जमा केली पाहिजे, आपल्या पिलांस खावूं घातले पाहिजे. आपल्या कामगिरीवर गात गात ते जातात; कारण "तुमचा स्वर्गीय पिता त्यांस चोरतो." तुम्ही त्यांच्यापेक्षा थोर नाहीं काय? सुबुद्ध व आत्म्याने पूजा करणारे या नात्याने तुम्ही पक्ष्यांपेक्षा श्रेष्ट नाही काय? आपला उत्पन्नकर्ता, आपल्या जिवांचा रक्षणकर्ता, व आपल्या प्रतिमेप्रमाणें आपणांला बनविणारा ईश्वर, त्यावर आपण विश्वास ठेविला तर आपल्या गरज पुरविणार नाही काय ?

**(७) ख्रिस्त त्याच्या खात्री देणाऱ्या कृपेचा विचार म्हणून काय करण्याची मागणी करतो?**

*"तसेच वस्त्राविषयी का चिंता करत बसता? रानातील फुले पाहा, ती कशी वाढतात? ती कष्ट करत नाहीत व सूत कातत नाहीत;तरी मी तुम्हांला सांगतो, शलमोनदेखील आपल्या सर्व वैभवात त्यांतल्या एकासारखाही सजला नव्हता. जे रानातले गवत आज आहे व उद्या भट्टीत पडते त्याला जर देव असा पोशाख घालतो, तर, अहो तुम्ही अल्पविश्वासी, तो विशेषेकरून तुम्हांला पोशाख घालणार नाही काय? (मत्तय ६:२८-३०)*

असंख्य वाढणाऱ्या व स्वर्गीय पित्यानें दिलेल्या सुशोभित झालेल्या व मनुष्यावरील आपल्या प्रेमाचें निदर्शक म्हणून उत्पन्न केलेल्या शेतांतील फुलांकडे पहावयास ख्रिस्ताने आपल्या शिष्यास सांगितले. तो

म्हणाला, “शेतांतील भुकमलें कशी वाढतात हें पहा.” ह्या नैसर्गिक फुलांचे सौंदर्य. व त्यांच्या साधेपणा हीं शालमोन राजाच्या वैभवापेक्षां कितीतरी थोर आहेत ? कौशल्यानें विणलेले वस्त्र, ईश्वराने निर्माण केलेल्या नैसर्गिक मनोहर व सुंदर फुलांच्या पासंगासही पुरणार नाही. प्रभू येशू म्हणतो, “जे रानांतले गावात आज आहे, व उद्या भट्टीत पडते त्याला जर देव असा पोशाख घालतो, तर अहो अल्पविश्वासी, तो तुम्हांस विशेषकरून पोषाक घालणार नाही काय?”1 दैवी कारागीर ईश्वर एकाच दिवसांत कोमेजून जाणाऱ्या फुलांस मृदुपणा व रंगवैचित्र्य देतो, तर ज्यांस त्यानें आपल्या प्रतिमेपासून निर्माण केले आहे, त्यांस तो किती तरी अधिक देईल ? काळजीच्या भाराने वाकलेल्यांस, गोंधळ व संशय धरणारांस, व अविश्वासू अंत:करणाच्या मनुष्यांस प्रभूचे हें विचारानें आहे.

आपले पुत्र व आपल्या कन्या हीं सुखी, शांत व आज्ञाधारक असावीत अशी ईश्वराची इच्छा आहे. प्रभू येशु म्हणतो, “मी तुम्हांस आपली शांती देवू ठेवितों. जसें जग देतें तसें मी तुम्हंस देत नाही. तुमचे अंतःकारण घाबरू नये व भिऊं नये.” “माझा आनंद तुम्हांमध्ये असावा, व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून मी तुम्हांस या गोष्टी सांगितल्या आहेत.”

**(८) त्यागमय सेवेच्या प्रती करण्यात येणारे कोणते ६ कृत्ये आहेत, जे आपण, प्रेमाने देवासाठी करू शकतो तसेच इतरांसाठी देखील, आणि त्या बदल्यात, खरा आनंद आणि परिपूर्णता प्राप्त करून घेऊ शकतो?**

*“दुष्टतेच्या बेड्या तोडाव्यात, जुवाच्या दोऱ्या सोडाव्यात, जाचलेल्यांना मुक्त करावे, सगळे*

*जोखड मोडावे, हाच मला पसंत असा उपास नव्हे काय? तू आपले अन्न भुकेल्यांना वाटावे; तू लाचारांना व निराश्रितांना आपल्या घरी न्यावे; उघडा दृष्टीस पडल्यास त्याला वस्त्र द्यावे; तू आपल्या बांधवाला तोंड लपवू नये हाच तो उपास नव्हे काय? (यशया ५८:६-७)*

2 कर्तव्याचा मार्ग विसरून स्वार्थवृत्तीनें शोधीलेले सुख समतोल नसून अविचाराचे व क्षणभंगुर असतें. असें सुख लौकर नाहीसें होऊन आत्मा उदासीनतेने व दु:खानें भरून जातो; परंतु ईश्वराच्या सेवेत आनंद व समाधान ही असतात. अनिश्चित अशा मार्गाने ख्रिस्ती मनुष्यानें जाण्याचें व व्यर्थ दु:ख व निराशा करून घेण्याचें त्याजवर सोपविलेलें नाहीं. ह्या आयुष्यक्रमांत सुखप्राप्ती झाली नाहीं,तरी पुढील जिण्यातील आयुष्यक्रमाकडे पाहून आपणही आनंद मानावयाचा आहे.

**(९) जेव्हा आपण ख्रिस्तासोबत सहभागीतेचा आनंद घेतो आणि सुवार्ताप्रसार करतो, सांत्वनाचे कोणते अभिवचन आपले आहे?**

*... जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे.” आमेन. (मत्तय २८:२०)*

परंतु ह्याहि जगांत ख्रिस्ती लोकांस ख्रिस्ताशीं एक्या ठेवल्यापासून होणारा आनंद,त्याच्या प्रेमाचा प्रकाश व त्याच्या सततच्या सान्निध्यापासून होणारे सुख हीं प्राप्त होतील. आयुष्यमार्गातील प्रत्येक पायरी त्यांस अधिक ख्रिस्ताजवळ व शांतीच्या गृह जवळ आणील म्हणू त्यांनी विश्वास सोडूं नये, तर उलट तो

पूर्वीपेक्षांही अधिक बाळगावा. “एथपर्यंत परमेश्वराने आमचे साहाय्य केले आहे”?1 व अखेरपर्यंत तो आम्हांला मदत करील.

**(१०) भूतकाळात देवाने जो आशीर्वाद आपल्याला दिला तो सदैव आपण आपल्या मनात ताजातवाना म्हणून का ठेवला पाहिजे?**
***मात्र स्वतःविषयी सावधगिरी बाळग आणि स्वतःला फार जप, नाहीतर तू ज्या गोष्टी डोळयांनी पाहिल्या आहेत त्या विसरून जाशील आणि जन्मभर त्या तुझ्या मनातून जातील; तू आपल्या पुत्रपौत्रांना त्यांची माहिती द्यावी, (अनुवाद ४:९)***

चला तर मग आपण ज्या प्रभुनें आपणास सुख देण्याविषयी जें काही केलें व आपला नाश करणाराच्या हातून वाचविलें त्याची आठवण करून देणाऱ्या स्तंभांकडे दृष्टी लावू या. ईश्वराने ममताळूपणें जी कृपा आपणावर केली आहे -- गरिबांचे जे अश्रू पुसले, जीं दु:खें व ज्या काळज्या निवारण केल्या, जे आशीर्वाद दिलें -- ती लक्षात वागवूं, व आपल्या राहिलेल्या आयुष्यक्रमांत जे काही आपणांपुढे आहे, तें अरण्यास स्वतांस दृढ करून घेऊं.

**(११) येणाऱ्या वादाच्या परीक्षा आणि जाच सहन करत असताना आपण कोणते अभिवचन सिद्ध करू शकतो?**

***मनुष्याला सहन करता येत नाही अशी परीक्षा तुमच्यावर गुदरली नाही; आणि देव विश्वसनीय आहे, तो तुमची परीक्षा तुमच्या शक्तीपलीकडे होऊ देणार नाही, तर परीक्षेबरोबर तिच्यातून निभावण्याचा उपायही करील, ह्यासाठी की, तुम्ही ती सहन करण्यास समर्थ व्हावे. (१ करिंथकरास पत्र १०:१३)***

पुढे येणाऱ्या अडचणींकडे लक्ष दिल्याशिवाय आपल्याच्याने राहवत नाहीं. तथापि आपण मागील काळाकडेहि पहिले पाहिजे, व पुढेहिं नजर दिली पाहिजे व म्हटले पाहिजे “एथपर्यंत ईश्वरानें आम्हांस मदत केली आहे.” “जसे तुझे दिवस तशी तुझी स्वस्थता होवो.”2 सोसण्याचे सामर्थ्य आपणांस दिले आहे त्यापेक्षा अधिक खडतर अशी आपली संकटाची परीक्षा होणार नाही. म्हणून जेथे आपणांस काम सापडेल तेथे ते पाहूं व विश्वास धरूं, कीं कांही असले तरी संकटाच्या मानानें सामर्थ्यही आपणांस मिळेल.

**(१२) जरी कठीण वाटणाऱ्या परीक्षा आणि त्रास आपण सहन करून त्याचा अनुभव घेऊ, काय जाणून घेण्यात आपल्याला आनंद आणि सांत्वन मिळते?**

*परंतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांना म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांना देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात. (रोमकरास पत्र ८:२८)*

**(१३) देवाच्या कृपेने विजेते म्हणून, ऐकण्यासाठी कोणत्या अद्भुत शब्दांची अपेक्षा आपण करू शकतो?**

*तेव्हा राजा आपल्या उजवीकडच्यांना म्हणेल, ‘अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादितहो, या; जे राज्य जगाच्या स्थापनेपासून तुमच्याकरता सिद्ध केले आहे ते वतन घ्या: (मत्तय २५:३४)*

ईश्वराच्या लेकरांचा प्रवेश होण्यासाठीं मग हळूहळू स्वर्गाचे दरवाजे उघडले जातील, व वैभवाच्या राजाकडून “आहो माझ्या बापाचे आशीर्वादित, या , जें राज्य जगाच्या

स्थापनेपासून तुम्हांकरितां सिद्ध केलें तें वतन करून घ्या."3 या मधुर गायनाप्रमाणें आशीर्वाद आपल्या कानांवर पडतील.

नंतर प्रभू येशूनें तयार केलेल्या घरी तारलेल्या आत्म्याचें स्वागत होईल. त्या ठिकाणी त्यांचे सोबती पृथ्वीवरील सोबत्याप्रमाणें नीच, खोटे बोलणारे, मूर्तिपूजक, अशुद्ध मनाचे व अविश्वासु असणार नाहीत. परंतु त्यांचा सहवास ज्यांनी सैतानास जिंकले आहे व ईश्वरी कृपादानानें ज्यांचें शील पूर्ण बनलें आहे, अशांशी होईल. त्या ठिकाणी पापाची प्रत्येक प्रवृत्ति, त्रासदायक प्रत्येक व्यंग ख्रिस्ताच्या रक्ताने नाहीशी झालेली असतात . व सूर्यापेक्षां फारच अधिक अशा त्याच्या वैभवाची उत्कृष्टता व ओजस्विता त्या आत्म्यास दिली जाते. ह्या बाहेरील सौंदर्यापेक्षां अधिक महत्वाचें नैतिक सौंदर्य व त्याच्या शीलाची पूर्णता हीं त्याच्याद्वारे प्रकाशमान होतात. ईश्वराच्या मोठ्या शुभ्र आसनापुढे देवदूतांचे वैभव व त्यांचे हक्क यांस सह भागीदार होऊन ते पापरहित उभे असतात.

**(१४) चांगले आणि वाईट ह्याविषयी जो विरोधाभास आहे तो समाप्तीला येत असताना, आपण स्वतःला कोणता महत्वाचा प्रश्न विचारला पाहिजे?**

***मनुष्याने सर्व जग मिळवले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ? अथवा मनुष्य आपल्या जिवाबद्दल काय मोबदला देणार? (मत्तय १६:२६)***

जें देवांचें वैभव वारस या नात्याने मनुष्याकडे येणार त्या वारसा हक्काच्या दृष्टीने पाहतां "मनुष्य सर्व जग मिळवील आणि आपला जीव गमाविल तर त्याला की लाभ

होईल?"1 तो गरीब का असेना, जगाला देत येणार नाही अशी संपत्ती व असें वैभव त्याच्या स्वतांच्याठायीच आहे. ज्याने सर्व सामर्थ्य ईश्वराच्या सेवेला अर्पण केलें आहे,अशा तारण झालेल्या व पापापासून शुद्ध झालेल्या आत्म्याची किमंत सर्वाहून अधिक आहे. ईश्वराच्या व देवदूतांच्या समक्ष स्वर्गात एका तारण झालेल्या आत्म्याबद्दल पवित्र व जयसुचक गायनांनी आनंद केला जातो.

*मला जाणीव आहे कि मी जर स्वतःच्या ज्ञानावर आणि समजुतीवर विश्वास ठेवला तर माझा नाश होण्याच्या मार्गावर मी आहे. त्याच्या राज्यात चालवण्याच्या विश्वासू अभिवचनासाठी मी आभारी आहे.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*भूतकाळातील माझे आशीर्वाद सतत माझ्या मनात ठेवण्याची मी निवड करतो जेणेकरून वर्तमान आणि भविष्यात त्याच्या मार्गदर्शनावर मी शंका घेणार नाही. आयुष्याच्या ह्या प्रवासात संघर्ष आणि त्रासातून जात असताना त्याचे सांत्वन आणि दिशा ह्यासाठी मी त्याचे आभारी आहे.*

**गोल करा: होय अनिश्चित**

*ह्या पवित्र शास्त्राच्या अभ्यास मार्गदर्शिकेच्या मालिकेत त्याच्या अधिक समीप जाण्याचे मार्ग त्याने प्रगट केले म्हणून मी आभारी आहे आणि ते अद्भुत शब्द ऐकण्याची मी वाट पाहतो, "शाबास, माझ्या भल्या व विश्वासू दासा, मी तुझ्यासाठी तयार केलेल्या घरात तुझे स्वागत आहे."*

**गोल करा: होय अनिश्चित**